9eb८

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २२४

REFBK-0006837

# समाजवादाकडे

पां. वा. गाडगीळ

REFBK-0006837

प्रमुख विक्रेते

दी महाराष्ट्र ग्रंथ भांडार लिमिटेड मुंबई ४

सर्वाधिकार सौ. इंदू गाडगीळ यांचेकडे

प्रथमावृत्ति
१९४७

मूल्य ३॥ रुपये

चित्रकारः—श्री. दिनानाथ दलाल.

प्रकाशकः—बा. रा. टेंबे, भास्कर ग्रंथमाला, कोल्हापूर.
मुद्रकः—कृष्णबिहारी वाजपेयी, न्यू टाइम्स प्रिंटरी लि. गिरगांव मुंबई ४.

# प्रस्तावना

गेल्या दोन तीन वर्षांत निरनिराळ्या दिवाळी अंकांतून, इतर खास अंकांतून व दैनिकांतून प्रचलित विषयावरच पण तात्त्विक दृष्टीचे जे लेख मीं लिहिले त्यांतील कांहींचा हा संग्रह आहे. हिंदुस्तानांत आतां अविलंबानें समाजवादी घटना निर्माण करून समाजाचें सामर्थ्य व वैभव वाढवावें याची मला विशेष आतुरता वाटते. त्याहून अन्य मार्ग प्रगतीला नसून समाजवादाविना आपण अनर्थाकडे चाललों आहों अशी माझी खात्री झाली आहे.

तसेंच रशियांत जी सोव्हिअट पद्धति आहे तीच खरीखुरी समाजवादी लोकशाही असून आपण आपल्या इतिहासाचा जरूर तो मागोवा न सोडताहि त्या पद्धतीचा अवलंब केल्यास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थिति त्या कार्यास अनुकूल आहे असा माझा कयास आहे. हे मुद्दे यांतील अनेक लेखांत मांडले आहेत व ज्या लेखांत हे मुद्दे प्रत्यक्षपणें मांडलेले नाहींत त्यांत हा दृष्टिकोन खास आहे.

कांहीं लेखांना आधार असलेली परिस्थिति बदलली आहे तरी पण त्यामुळें मूलभूत सिद्धांत बाधित झालेला नाहीं. प्रचलित राजकारणाकडे समाजवादी दृष्टिकोनानें कसें पहावें व प्रचलित प्रश्न त्या दृष्टीनें कसे हाताळावे हें लोकांसमोर संकलितपणें मांडण्याच्या हेतूनें लेख निवडून हा संग्रह प्रसिद्ध करीत आहे.

या संग्रहास कोणाची तरी प्रस्तावना घ्यावी असें एकदा मनात होतें. पण पुष्कळदां अशा प्रस्तावनांनीं इष्ट हेतु साध्य न होता नसता उपद्रव होतो. म्हणून माझ्या पत्नीनें मजवर पूर्वी लिहिलेला एक छोटासा लेखच या संग्रहात उद्धृत केला आहे. तोच या संग्रहाचा पुरस्कार असें वाचकांनीं मानावें.

ज्या प्रकाशकांनीं व संपादकांनीं प्रथम हे लेख लिहिण्यास मला संधि दिली त्यांचा, व हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्याचें पत्करल्याबद्दल महाराष्ट्र ग्रंथ भांडारचा मी आभारी आहे. तसेच न्यू टाइम्स प्रेसचे कंपोझिंग कॅान्ट्रॅक्टर श्री. पवार यांनीं जी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

मुंबई, ता. २८-५-४७ ★ पां. वा. गाडगीळ

# गाडगिळांबद्दल मला काय वाटतें

गाडगीळांच्या घरीं जेव्हां मी आलें त्या वेळीं ते साधारण पंचवीस-सव्वीस वर्षांचे होते. त्या वेळीं ते विजय प्रेसमध्ये प्रूफें तपासण्याचें काम करीत असत. जरी ते प्रूफें तपासीत होते तरी त्या वेळीं वाचन व नवीन विचार हा त्यांचा क्रम सारखा चालूच असे. छापखान्यांत फार वेळ जाई; पण उरलेल्या वेळांत ते कधींहि स्वस्थ बसले नाहींत. नेहमीं नवीन पुस्तकें आणून तीं वाचून त्यांचा खोल अभ्यास करण्याची त्यांची दांडगी इच्छा असे. आणि त्याप्रमाणे ते रात्रंदिवस काम व अभ्यास यांत दंग असत. पैशाच्या अभावामुळें त्यांना स्वस्थ बसून वाचन करण्यास किंवा वाचनास मुबलक साहित्य कधींच घेतां आलें नाहीं; पण अनेक मित्रांकडून आणि लायब्ररींमधून त्यांनीं तें मिळविलें.

१९२५-२६ सालपर्यंत ते हिंदु महासभेचे पुरस्कर्ते होते आणि ते तसा प्रचारहि करीत होते. त्याच वेळेला स्वयंसेवक दलें काढून मुलांत एकजूट व राष्ट्रीय वृत्ति निर्माण करावी याकरिता ते स्वतः आणि आणखी चारपांच सोबती मिळून प्रयत्न करीत होते. १९२९ सालीं त्यांनीं एक कादंबरी लिहिली. १९३४ सालीं 'समाजवादाचा ओनामा' लिहिलें. १९२९ सालपासूनच त्यांचीं मतें पालटत गेलीं. तरीपण त्यांचा अभ्यासक्रम कधींहि थांबला नाहीं. पुढें त्यांनीं बरींच पुस्तकें लिहिलीं.

मला त्यांच्या पुस्तकांसंबंधी चर्चा करतां येत नाहीं, कारण ते विषय फार गहन आहेत व मी त्यांत अत्यंत 'ढ' अशी बाई आहे. त्यांचें घरात वागणें फार प्रेमाचें असतें; पण व्यवहारदक्षता म्हणून ज्याला म्हणतात ती त्यांच्या ठिकाणीं नाहीं. अमुक करा म्हटलें म्हणजे आवडीनें करतात. थोडा त्रासिक स्वभाव आहे. मला कळो वा न कळो जें आपल्याला लिहावयाचें असेल किंवा जो विचार डोक्यांत येईल तो ते मला सांगत असतात. माझें लक्ष माझ्या कामाकडे असतें; पण मी पण हूं हूं म्हणतें व एखादवेळेस एखादा प्रश्न विचारतें. ह्या त्यांच्या स्वभावामुळें मला वाचनाचा आणि व्याख्यान ऐकण्याचा बराच नाद लागला. त्यामुळें मी जगाच्या मार्गे असूनसुद्धां थोडी जगांत आहे असें मला वाटतें.

( —मनोहर, मार्च १९४३. ) —सौ. इंदू गाडगीळ

# गांधीजींची थोरवी

गांधीजींचा उल्लेख मी 'महात्मा गांधी' असा फारच क्वचित करतों. याचें कारण गांधीजी हे 'महात्मा' नाहींत हें नव्हे. उलट, गांधीजी हे 'महात्मा' आहेत अशी माझी खात्री असल्यामुळें मी उठल्या सुटल्या 'महात्मा' हा शब्द वापरण्याचें टाळतों. 'महात्मा' 'लोकमान्य' 'देशभक्त' या शब्दांत जो अर्थ अभिप्रेत आहे तो अर्थ विसरला जाऊन कृष्णा, गंगा, गोदावरी यांसारखें विशेष नामाचें स्वरूप 'महात्मा' 'लोकमान्य' वगैरे शब्दांना येणें म्हणजे त्या शब्दांचें माहात्म्य नष्ट करणेंच होय. 'महात्मा' या शब्दाचें 'कृष्णाजी' 'गणूजी' 'विठोजी' याप्रमाणें 'महात्माजी' असें जेव्हां रूढ विशेषनाम झालें, तेव्हां 'महात्मा' या शब्दाची पुरी थट्टा झाली. हें गैर आहे. टिळकांच्या पूर्वी राजकारणी माणसें 'राजमान्य' असत. टिळक हे पहिले 'लोकमान्य' असे राजकारणी पुरुष झाले असें त्या शब्दानें सुचविलें आहे. त्या शब्दाचें हें ऐतिहासिक कार्य त्या शब्दास नेहमीं करूं दिलें पाहिजे. म्हणून ज्या वेळीं त्या शब्दांतला विशिष्ट अर्थ वाचकांपुढें मांडावयाचा असेल, त्या वेळींच तो शब्द टिळकांच्या नांवास वापरला पाहिजे. तसेंच राजकारणांत फार थोर अशा आध्यात्मिक योग्यतेचा 'महात्मा' गांधींच्या रूपानें येथें अवतरला ही जगांत कांहींशी अभूतपूर्व अशी घटना आहे हें 'महात्मा' या शब्दानें सूचित केलें आहे. गांधीजयंतीसारख्या अथवा इतर एखाद्या अशाच प्रसंगीं गांधी महात्मा आहेत असें म्हणण्यानेंच त्यांचें वैशिष्ट्य सांगतां येतें. 'महात्मा' हा शब्द विशेषनामासारखा वापरला गेल्यानें त्यांतला अर्थ नष्ट होउन तो निरर्थक अथवा हास्यास्पद शब्द ठरतो आणि गांधींची थोरवी सांगण्यास नवा शब्द व परिभाषा शिल्लक राहत नाहीं.

⁂ ⁂ ⁂

गांधी हे महात्मे आहेत हें त्यांचें फार मोठें वैशिष्ट्य होय. मला त्यांचा स्वभाव, वैयक्तिक वागणूक अगदीं आहे तशीच सर्वस्वीं पसंत आहे

असें म्हणण्याचें ढोंग मी करीत नाहीं. त्यांच्या लिहिण्यांत आणि खाजगी व जाहीर बोलण्याचालण्यांत जो एक अति आर्जवीपणा असल्याचें दिसतें, त्याचें स्वरूप केव्हां केव्हां खुशामतीचें अथवा लाचारीचें दिसतें. अलीबंधूंसंबंधानें कित्येकदां अतिस्नेहाचे उद्‌गार त्यांनीं काढले ते मला तेव्हांहि पटले नाहींत. उलट सावरकर, 'विविधवृत्त' वगैरे गांधींच्या बेताल टीकाकारांसंबंधानें गांधी जें कमालीचें मौन धारण करतात, तें कांहींसें कृत्रिम व टीकाकारांच्या बाबतींत क्रूर वाटतें. यापेक्षा गांधी 'ठोशास ठोसा' देतील तरी बरें अशी मला इच्छा होते. गांधींच्यासारखें बोलावयाचें, लिहावयाचें म्हटलें तर वाङ्मयांतला द्वेषच नव्हे तर त्वेषहि नष्ट होईल कीं काय अशी मला नेहमीं भीति वाटते. आवेश आणि त्वेष वाङ्मयांतून कधींहि नष्ट होतां कामा नयेत. वाङ्मयांत कर्तृत्वनिर्माणशक्ति जी आहे ती आवेशांत व त्वेषांतच आहे. ते गुण कायम राहिलेच पाहिजेत. गांधी जितकें निर्वैरत्वानें बोलतात, लिहितात तसेंच ते नेहमीं असतील असेंहि वाटत नाहीं. सदानंदांना त्यांनीं जें नुकतेंच पत्र लिहिलें तें तुसडेपणा, त्रागा, मत्सर, संताप, दीर्घद्वेष या सर्व दोषांनीं भरलेलें होतें. गांधींच्या आयुष्यांत त्यांनीं इतकें वाईट असें हें एकटें एकच लेखन केलें असेल. 'टिळकांना राजकारणांत नीतिअनीतीची पर्वा वाटत नाहीं' अशा अर्थाचें जें एक वाक्य गांधींनीं पूर्वी उच्चारलें होतें, अथवा 'आय प्रे फॉर हिज सोल' असें कांहीं तरी स्वामी श्रद्धानंदासंबंधानें गांधी बोलल्याची आख्यायिका आहे, तीं विधानेंहि वाईट होतीं. पण हें त्यांचें वाङ्मय अगदीं अपवादात्मक आहे. बाकीच्या वाङ्मयांतील उदात्तता त्यामुळें कमी होत नाहीं.

⁂ ⁂ ⁂

सदानंदांना गांधींनीं लिहिलेलें पत्र वाचल्यानंतर मी माझ्या मनाला प्रश्न विचारला कीं खरे गांधी कोणते ? नारिमन, डॉ. खरे, सुभाषबाबू यांचा गांधींनीं टोचून टोचून छळ केला असा विरोधकांनीं त्यांचा दुर्लौकिक केला आहे. सदानंदांना लिहिलेल्या पत्रांतला 'रस' त्याच जातीचा आहे. मग एरवीं आयुष्यभर उदात्तता जी गांधींनीं दाखविली तें ढोंग म्हणावयाचें काय, असा प्रश्न मीं माझ्या मनास अनेकदां विचारला आहे. अशा प्रश्नाचें उत्तर स्वतःच्या मनाचें परीक्षण केल्यानें चटकन

मिळतें. मत्सर, द्वेष, सूडबुद्धि, तिरस्कार हे भाव माझ्या मनांत अनेकवार येतात. जिभेवर आणि लेखणीवर एखादी शिवी अनावरपणें नाचूं लागते; आणि कित्येकदां बोलतां बोलतां लाळ गळून वक्त्याची फजिती व्हावी अथवा लेखणींतून शाईचा ठिपका पडून कागद खराब व्हावा तशी 'गलत' वक्त्याची अथवा लेखकाची होते. असें गांधींच्या हातून एखादे वेळीं झालें आहे. यावरून सामान्य माणसांचे मनोविकार त्यांनाहि आहेत, हें सिद्ध होतें. आपल्या खाजगी नातलगांशीं गांधी फारसे चांगले वागले नाहींत व स्वतांच्या मताबद्दल त्यांनीं अनेकदां फाजील अहंकार दाखविला आहे ही गोष्ट इतरांच्या ठिकाणीं असणारा तऱ्हेवाईकपणा गांधींच्या ठिकाणींहि आहे, एवढेंच सिद्ध करते. पण माणसाची नैतिक योग्यता केवळ त्याचा केव्हां केव्हां दिसून येणारा स्वभाव कसा आहे यावरून ठरवूं नये. (१) आपला स्वभाव कसा असावा असें त्या माणसाच्या अभिरुचीस वाटतें, (२) आपले (त्याच्या मतानें) अवगुण छपविण्याचाच केवळ नव्हे तर आवरून, दडपून, नष्ट करून, टाकण्याचा तो प्रयत्न किती करतो, (३) आणि हा प्रयत्न (त्यास मिळणाऱ्या यशावरून अथवा इतर निदर्शनांनीं) किती तीव्र असल्याचें दिसून येतें,—या तीन गोष्टींवरून माणसाची नैतिक योग्यता ठरत असते. अवगुण असणें ही मानवता आहे. त्या अवगुणासंबंधानें ज्याची त्याची प्रवृत्ति व कृति कशी आहे यावरून त्या माणसाची नैतिक योग्यता ठरते.

⁂ ⁂ ⁂

गांधींना राजकारणांत जितके शत्रु झाले इतके दुसऱ्या कोणाहि पुढाऱ्यास झाले नाहींत आणि गांधींना जितकी प्रखर टीका सहन करावी लागली इतकी कोणासही सहन करावी लागली नाहीं. पण याचें कारण, गांधींना यश अफाट मिळालें, त्यांच्याशीं लढावयाला गेलेले लढावयाचा प्रयत्न करण्यापूर्वींच धडाधड कोसळले, पुष्कळसे विरोधक त्यांना पटापट सामील झाले, आणखी पुष्कळ मरण गेले, जे थोडे उरले त्यांचा मनोभंग अतिशय तीव्र झाला, ते एकाकी पडले व गांधींच्यावर आपला प्रहार पोंचत नाहीं अथवा त्यांना दुखवत नाहीं म्हणून हे विरोधक फार चिडले. असले हे आवाजानें मोठे, शिवराळपणामुळें

महत्त्व पावलेले, पण संख्येनें व योग्यतेनें क्षुद्र असे लोक सोडले तर बाकीच्या अफाट जनतेचें गांधींच्यावर निःसीम प्रेम आहे. खुद्द कांग्रेसमध्यें त्यांचे राजकीय विरोधक अथवा त्यांच्याशीं राजकीय मतभेद असणारे कार्यकर्ते आहेत तेहि गांधींच्यावर निःसीम प्रेम करतात. याचें मुख्य कारण त्यांच्या लेखनभाषणांतील निर्वैरत्व आणि जिव्हाळा. मी वर म्हटलेंच आहे कीं सदानंदांना त्यांनीं लिहिलेलें पत्र निर्वैरत्वाचें नाहीं. पण शेंकडों आठवडे शेंकडों लेख त्यांनीं लिहिले, त्या सर्वांत निर्वैरत्वाचें त्यांनीं ढोंग केलें असें म्हणण्यांतहि अर्थ नाहीं. द्वेषवृत्ति असलीच तर ती त्यांनीं साफ दडपून टाकली व तिचें प्रदर्शन हें त्यांना नैतिक दृष्टीनें हीनतेचें वाटलें असलें पाहिजे हाच त्याचा अर्थ आहे. प्रसंगविशेषीं एखाद्या व्यक्तीबद्दल अतिगौरवाची भाषा त्यांनीं वापरली आहे. उलट जरूरच तेव्हां युक्तिवाद करतांना नम्र पण स्पष्ट व निर्भीड अशीं उत्तरें त्यांनीं दिलीं आहेत. पण मतभेद व्यक्त करतांना अवश्य तेवढेच शब्द वापरल्यानंतर अधिक मनोविकार आवरण्याचा संयम ते इतका प्रखरतेनें करतात कीं सामान्य माणसांना हें ढोंग तर नसेल ना अशी शंका येते. लेनिन, स्टॅलिन, ट्रॉट्स्की वगैरे क्रांतिवीरांनीं थोडे मतभेद होतांच एकमेकांविरुद्ध किती कठोर भाषा वापरली आणि एकेमकांविरुद्ध केवढीं वैरें उभारलीं हें पाहिलें म्हणजे गांधींच्या निर्वैरत्वाचें महत्त्व लक्षांत येतें. कॉंग्रेसच्या राजकारणास गांधींच्या या निर्वैरत्वाचा विशेष फायदा झाला आहे. लेनिन, ट्रॉट्स्की, स्टालिन यांचे अन्तर्विरोध जसे तीव्र आहेत तसेच कांग्रेसमध्येंच काय पण कांग्रेस वर्किंग कमिटींतहि आहेत. पण त्यांना वैराचें स्वरूप येत नाहीं. तात्त्विक मतभेद तीव्र झाले तरी वैयक्तिक हेवेदावे त्यांत गुंतافत नाहींत आणि थोड्याफार घुसळणीनंतर एकमत होतें तें खरोखरी मोठें श्रेष्ठ दर्जाचें ठरतें. 'कॉंग्रेस वर्किंग कमिटी चुकत नाहीं' असें नेहरू एकदां बोलले, तें फार मार्मिक होतें.

⁂ ⁂ ⁂

गांधींचें राजकारण लोकशाहीप्रधान असतें व त्यासाठीं आणि त्यामुळें तें उघड असतें हें एक त्यांचें नैतिक थोरपण होय. हें राजकीय थोरपणच नव्हे तर नैतिक थोरपण होय असें मी जाणून बुजून म्हणतों आहे. वैचारिक

गुप्ततेनें नैतिक अधःपात होतो व नैतिक अधःपात झाल्यामुळें हुकूमशाही अथवा दहशतवाद उत्पन्न होतो. वैचारिक खुलेपणा असल्यास सत्तालोभ असला तरी तो निर्बल पडतो. निर्वैरत्वाचें वातावरण व लोकांस ऐकूं जाईल एवढा मोठ्यानें विचार करण्याची पद्धति या गोष्टी लोकशाहीचा आत्मा होत. गांधींचा गूढवाद मला आवडत नाहीं. त्यांच्या ईश्वराची मला नेहमीं चीड येते. पण 'अहो गांधी, तुमचें हें मला आवडत नाहीं, तुमचें हें असें असें चुकतें आहे' असें वृत्तपत्रांत ओरडून लिहितां येतें. सामान्य सभ्यपणानें असें लिहिलें तर गांधीच काय पण गांधीजनहि (कांहीं अपवाद वगळल्यास) रागावत नाहींत. टीका, प्रतिटीका सुरू होतात. वर्किंग कमिटींत त्यांचे पडसाद उठतात, व अखेर गांधींनाहि आपल्या ईश्वराला बाजूला ठेऊन सहकाऱ्यांचा सल्ला ऐकावासा वाटतो. प्रसंगीं आपलें म्हणणें वर्किंग कमिटीला पटलें नाहीं, तर गांधी बाजूस जातात, पुन्हां बोलावलें म्हणजे काँग्रेसमध्यें येतात, तिचीं सूत्रें हातीं घेतात. हा सगळा प्रकार इतका सहजपणें होतो कीं विरोधकांना हीं भांडणें लटकीं असून अखेर गांधीच हुकूमशहा आहेत असें वाटतें. पण तें खोटें आहे. गांधींच्या २३ वर्षांच्या नेतृत्वकालांत त्यांना अनेकदां स्वमत गुंडाळून ठेऊन लोकमतापुढें मान तुकवावी लागली. मनांत विचार आला किंवा निर्णय ठरला कीं ते ओरडून पण अगदीं तात्त्विक दृष्टीनें बोलूं लागतात, आपल्या विचारावर अगदीं शिकारीचें रान उठवितात. यामुळें कोणतेंहि धोरण ठरण्यापूर्वीं सगळ्या लोकांना आपापल्या विचारांनीं, संतापानें व शिव्यागाळयांनींहि तें धोरण ठरविण्यांत भाग घेण्याची संधि मिळते आणि अखेर वर्किंग कमिटींत 'गुप्त' चर्चा होऊन निर्णय ठरतो त्यांत गुप्त कांहींच नसतें. १९४२ च्या अलाहाबादच्या वर्किंग कमिटींतील 'गुप्त' चर्चेचीं टिपणें पकडून सरकारनें जाहीर केलीं. पण 'यांत गुप्त कांहींच नाहीं' असें 'न्यूयॉर्क टाइम्स'नेंच लिहिलें. आणि खरोखरच आधीं चार महिने ज्या गोष्टी उघड बोलल्या गेल्या त्यांचीच चर्चा वर्किंग कमिटींत झाली होती.

:: :: ::

गांधी सत्तालोभी आहेत, हा आरोप त्यांच्या कांहीं मित्रांनींहि केला आहे. आणि गेल्या तेवीस वर्षांत त्यांचें पुढारीपण अबाधित राहिलेंहि आहे. ते स्वतःचें मत बाजूस ठेऊन जेव्हां लोकमतास मान तुकवतात तेव्हां त्यांना

पुढारीपणाचा लोभ होता म्हणून त्यांनीं असें केलें असा आरोप करण्यांत येतो. यांत सत्य आहे तें इतकेंच कीं, देशाचें आपण कल्याण करूं असा त्यांना आत्मविश्वास वाटतो व म्हणून आपलें पुढारीपण टिकविण्याचा विशिष्ट प्रयत्न ते करतात हें खरेंच आहे. पण त्यांची या बाबतींतली कार्यपद्धतिहि शांततेची, निर्वैरत्वाची, लोकशाहीची आहे. अमेरिकन पुढाऱ्याप्रमाणें पैशाच्या बळावर, अथवा हिटलरप्रमाणें दहशतवादाच्या बळावर, अथवा कम्युनिस्टांप्रमाणें गुप्तपक्षसंघटनेवर त्यांची भिस्त नाहीं. त्यांची बुद्धिमत्ता, ध्येयनिष्ठा, निःस्वार्थ, कळकळ, कर्तव्यनिष्ठा, क्रियासातत्य आणि या सर्वांपेक्षां लोकमताची व परिस्थितीची नाडी ओळखण्याचा अलौकिक गुण या सर्वांच्यामुळें नेहरू, जयप्रकाश, वल्लभभाई, भुलाभाई, खेर, सप्रू, अच्युतराव, पी. सी. जोशी अशा भिन्न भिन्न प्रकृतींच्या व मनोवृत्तींच्या लोकांना गांधी हेच नेते एकंदरीनें बरे असें कबूल करावें लागलें असून जिनांनाहि अखेर गांधी हेच हिंदी राजकारणाचा पेचप्रसंग सोडवूं शकतील हें मान्य करावें लागत आहे. नरीमन, खरे व सुभाषबाबू यांचे बाबतींत गांधींचेवर अन्याय्य गहजब झाला आहे. नरीमन यांनीं आपल्यावर अन्याय झाल्याचें आकांडतांडव उगाच केलें. खरे यांनीं काँग्रेसच्या घटनेचा भंगच केला. नंतर मुस्लीम लीगमधूनही जिनांनीं शिस्त मोडणारांना हाकललें तेव्हां खरेप्रकरणीं गांधी चुकले नाहींत हें विरोधकांच्याहि लक्षांत आलें. सुभाषबाबूंच्या बाबतींत गांधी कांहींसे दांडगाईनें वागले हें खरें, पण सुभाषबाबू व गांधी यांचे मार्ग अगदीं परस्परविरुद्ध होते या दृष्टीनें ही गोष्ट अपरिहार्यच होती.

:: :: ::

गांधी विद्वान् नाहींत आणि बुद्धिमान नाहींत असा आक्षेप महाराष्ट्रांत ऐकूं येतो. 'मीं घटनाकायदा वाचला नाहीं' असें गांधी म्हणाले त्यावरून गांधी हे 'बेशरम' आहेत अशी टीका एका महाराष्ट्रीय पुढाऱ्यानें केली होती. यांच्या जिभेला आलिकडे हाड उरलेलें नाहीं इतकाच याचा अर्थ होता. गांधी आपला वेळ फार काळजीनें वापरतात. घटनाकायद्याचा अभ्यास ज्यांनीं करावयाचा त्यांनीं तो केलेला असतो. प्रांतिक मंत्रिमंडळाचें मार्गदर्शन गांधी करूं लागले तेव्हां त्यांनीं प्रांतिक घटना वाचलीहि. पण घटनाशास्त्राचीं मूलतत्त्वें त्यांच्या बुद्धींत खोल रुजलीं आहेत. ओरिसा

गव्हर्नराचे नेमणुकीच्या प्रकरणांत लिनलिथगोला आपला निर्णय परत घ्यायला लावून गांधींनीं जगाला चकित केलें. गोलमेज परिषदेंतील त्यांची भाषणें स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वाच्या दृष्टीनें अतिशय श्रेष्ठ दर्जाचीं आहेत. गव्हर्नरांच्या राखीव अधिकारांचे बाबतींत त्यांनीं सॅम्युएल होअरसारख्याशीं द्वंद्व केलें तें त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची साक्ष देणारेंच होतें. कोणत्याही प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास करून निर्णय ठरविण्याच्या त्यांच्या गुणामुळें खेडा, चंपारण व बार्डोली या तिन्ही प्रकरणांत न्याय्य बाजू कोणती ती हेरून तेथेंच त्यांनीं घाव घातला. विद्वत्तेसाठीं विद्वत्ता त्यांचेजवळ नाहीं. पण सुंदर व प्रसादयुक्त इंग्रजी, बिनतोड युक्तिवाद, वाचकांच्या काळजाचा ठाव घेईल अशी अचूक शब्दरचना व स्फटिकासारखें त्या सर्वांमध्यें दिसून येणारें त्यांचें अन्तःकरण या सर्व गोष्टी पाहून विद्यादेवीच या सत्पुरुषापुढें नम्र होते. गांधी हे विद्वान नसतील, पण त्यांचें वाङ्मय वाचूनच आम्हाला विद्वान व्हावें लागतें.

:: :: ::

ज्याच्या निव्वळ नामोच्चारामुळें स्वार्थत्याग, देशसेवा, समाजसेवा यांची जळजळीत स्फूर्ति होते असा गांधीएवढा पुरुष आज जगांत नाहीं. रूझवेल्ट, चर्चिल, चँग कैशेक इतकेंच काय पण स्टालिन, हीं सर्व नांवें त्यांच्या भक्तांना शौर्य, कर्तबगारी, शिस्त, संघटना वगैरे गुणांची आठवण देतील. उलट त्यांच्या विरोधकांना त्यांच्याबद्दल तुच्छता अथवा भीति वाटेल. पण गांधींचें नांव घेतलें कीं, ध्येया-साठीं स्वार्थत्याग, निष्ठा, निदिध्यास, तपस्या, वैराग्य, प्रेम, आदर या गुणांचाच शत्रु-मित्रांना बोध होतो. गेल्या तेवीस वर्षांत लागोपाठ दोन पिढ्यांतून त्यांनीं लक्षावधि माणसें आपल्या स्फूर्तीनें स्वातंत्र्यलढ्यांत धडा-धड उडी घेण्यास पुढें आणलीं. ८ ऑगस्टनंतरच्या बंडांत ज्यांनीं भाग घेतला त्यांना गांधींचीच स्फूर्ति होती. गांधींनीं त्यांचा निषेध केला, तोहि सौम्य होता. जगांत इतरत्र विरोधकांना कसें वागवितात हें पाहिलें म्हणजे गांधींच्या निषेधांतील सौम्यता ध्यानीं येते. 'माझें मत ज्यांना पटत नाहीं त्यांनीं आपल्या मार्गानें जावें' असेंहि त्यांनीं सांगितलेंच आहे. असे जे

अन्य मार्गानें जात आहेत तेहि गांधींपासून आपल्या कार्यासाठीं स्फूर्ति घेतच आहेत. स्वार्थत्याग, सेवा, निष्ठा, तपस्या, निर्वैरत्व, सुहृद्भाव या सद्‌गुणांची ज्योत म्हणजेच गांधी. गांधींचें स्मरण झालें कीं, त्या कुरूप व दंतहीन हास्यांत हे सद्‌गुण प्रकाशूं लागून हृदय भरून येतें. ८ ऑगष्ट १९४२ पूर्वी केव्हां तरी बिर्ला हौसमध्यें वार्ताहरांसमवेत गांधींच्या अगदीं जवळ बसून या अनुभवाचा साक्षात्कार मीं घेतला. त्या वेळीं गांधींनीं सांगितलेले विचार मामुली होते. पण तें थोर व्यक्तिदर्शन माझें हृदय भरून येण्यास कारणीभूत झालें. हृदय जिवंत करण्याचें सामर्थ्य आज जगांत याच एका पुरुषांत आहे.

:: :: ::

शस्त्रास्त्रांनीं गांजलेल्या अशा जगासाठीं निःशस्त्र क्रांतीचा संदेश, आत्मविश्वास, निदिध्यास, गांधींनीं हिंदी लोकांना व त्यांचे मार्फत अखिल मानव जातीस दिला ही त्यांची सर्वांत मोठी देणगी होय. गांधींना यापुढें हिंदी स्वातंत्र्यलढ्याचें नेतृत्व करतां येईल असें मला वाटत नाहीं. अहिंसावादास व राष्ट्रवादास यापुढें शास्त्रीय स्वरूप देऊन तरुणांनीं आपले मार्ग आपण शोधले पाहिजेत. गांधींना कदाचित् ते पटणार नाहींत. पण वर सांगितलेले गांधींचे थोर सद्‌गुण व कार्यपद्धति हीं ज्यांना मान्य असेल व जे तीं अंगीं बाणवतील त्यांनाच निःशस्त्र क्रांतीचें तंत्र बसवितां येईल. शील, चारित्र्य, निर्वैरत्व, सेवाबुद्धि, लोकशाहीप्रेम वगैरे गांधींचीं वैशिष्ट्यें आत्मसात करून पुढें पाऊल टाकलें तरच अहिंसात्मक असा शास्त्रीय मार्ग सापडेल. जगाचा उद्धार यापुढें अशा मार्गानेंच होणार आहे. या मुद्यावर येथें मी फारसें लिहित नाहीं. गांधी महात्मे आहेत व थोर आहेत, असें जें मी म्हणतों त्याला दीर्घ अवलोकन, विवेक व अनुभव यांची पार्श्वभूमि आहे. म्हणूनच मी टिळकांच्यावर करतों इतकेंच, किंबहुना थोडें अधिक प्रेम गांधींवर करतों.

—सत्यकथा, ऑक्टोबर १९४४

# १ ऑगस्टच्या निमित्तानें

लोकमान्य टिळकांना दिवंगत होऊन आज २६ वर्षें पूर्ण होत आहेत. लो. टिळकांचा जन्म १८५६ सालीं झाला. म्हणजे आज टिळक असते तर ९० वर्षांचे असते. न्या. रानडे यांची जन्मशताब्दि ३ वर्षांपूर्वी झाली. लो. टिळकांचा जन्मशताब्दिदिन आणखी १० वर्षांनीं येईल. टिळकांच्या जन्मानंतर एकच वर्षानें ५७ चें प्रसिद्ध बंड झालें आणि हिंदुस्तानच्या पायांत गुलामगिरीच्या बेड्या मजबूत ठोकल्या गेल्या. भौतिक गुलामगिरी-बरोबरच मानसिक गुलामगिरीही दृढपणें पक्कड घेऊन बसली. टिळकांचा सारा जन्म या मानसिक व भौतिक गुलामगिरीशीं झगडण्यांत गेला. आतां मानसिक गुलामगिरी पार नष्ट झाली आहे आणि भौतिक गुलामगिरीही टिळकांची जन्मशताब्दि पुरी होण्यापूर्वी खास नष्ट होईल. त्या वेळीं हिंदुस्तानच्या इतिहासांतील या शंभर वर्षांच्या राजकारणाचा आढावा घेणें बोधप्रद होईल आणि त्या इतिहासांतील थोर पुरुषांत लोकमान्य टिळकांना खात्रीनें अग्रस्थान मिळेल.

अशा या लोकमान्य टिळकांची माहिती आजकालच्या पंचविशी-तिशींतल्या तरुणांना फार थोडी आहे. ही माहिती मिळविण्याचीं साधनें भरपूर आहेत. टिळकांचें मोठें चरित्र केळकरांनीं आणि छोटें करंदीकरांनीं लिहिलें आहे. टिळकांच्या 'केसरी'तील लेखांचे चार खंड महाराष्ट्रांतील सर्व ग्रंथालयांतून आहेत. 'गीतारहस्य' ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. पण या सर्व टिळक-वाङ्मयाचा अभ्यास फार कमी होतो ग्रंथालयांतून टिळकांचे खंड वाचायला नेणारीं माणसें फार थोडीं असून हे खंड वाचून त्यांचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या अत्यल्पच आहे. टिळकांच्यासंबंधानें ही उपेक्षावृत्ति असण्याचें मुख्य कारण म्हणजे टिळक आजच्या मानानें राजकारणांत अगदींच नेमस्त व समाजकारणांत प्रतिगामी वाटतात हें होय. पण आज टिळकांसंबंधानें आपणांस कांहींही वाटलें तरी

टिळकांचें ऐतिहासिक कार्य कळून घेणें हें अवश्य आहे व त्यासाठीं कोणत्या परिस्थितींत टिळकांना कार्य करावें लागलें हें समजून घेणें फार महत्त्वाचें आहे. टिळकांच्या वेळीं लोकमत कसें होतें याची आज कल्पनाच होऊं शकणार नाहीं. अशिक्षित लोक राजकीय परिस्थितीबद्दल अंध होते. ते इंग्रजी सत्ता, इंग्रजी विद्या, कला, शास्त्रें, सुधारणा, राज्यपद्धति यांनीं दिपून गेले होते. पण इंग्रजांचा अंमल घट्ट होण्यापूर्वीं देशांत सर्वत्र जी बेबंदशाही माजली ती इंग्रजांनीं थांबवून सर्व देशभर सुरक्षित दळणवळण आणि कायद्याचें नोकरशाही राज्य सुरू केलें. आगगाडी आली. नवें यांत्रिक युग सुरू केलें. हें इतकें नवें, इतकें चांगलें व इतकें अचानक आल्यासारखें दिसलें कीं हिंदुस्तानच्या उद्धारासाठीं इंग्रजांना ईश्वरानेंच येथें पाठविलें आहे, येथील जातिभेद, बालविवाह, मूर्तिपूजा या मागासलेल्या रूढि व समजुती नष्ट करून व आम्हांस राज्यकारभार शिकवून इंग्रज परत जातील असा मतप्रचार सुशिक्षित पुढारी करूं लागले.

ही विचारसरणी गुलामगिरीची व चुकीची होती. तिचा पहिला जोरदार प्रतिकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केला. पण विष्णुशास्त्री अल्पवयी वारले. त्यानंतर त्यांच्या मतप्रचाराचें सूत्र टिळक व आगरकर यांनीं उचललें. पण टिळक व आगरकर यांचेमध्यें मतभेद झाला व तो विकोपास गेला. या मतभेदांत जी टिळकांची बाजू होती तिचेंच ऐतिहासिक महत्त्व फार होतें आणि तेंच आधुनिक तरुणांच्या लक्षांत नीटसें येत नाहीं. बालविवाह, जातिभेद, निरक्षरता यांसारखे सामाजिक दोष नष्ट झाल्याशिवाय आपणास स्वराज्याची पात्रता येणार नाहीं असें आगरकरांचें मत होतें. उलट टिळक म्हणत, सामाजिक परिस्थिति कशीही असो, राजकीय सत्तेस कोणताही समाज केव्हांही पात्र असतोच. अमुक इतकी समाजसुधारणा झाली म्हणजे राजकीय सत्तेची पात्रता येते हें मुळींच खरें नाहीं. समाजसुधारणेला कधींच अंत नसतो. आणि समाजाच्या कोणत्याही अवस्थेंत जगांतलें एखादें राष्ट्र स्वतंत्र असणें हा त्याचा नैतिक हक्कच आहे. ‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवीनच ’ हें टिळकांच्या वरील शिकवणीचें सारभूत सूत्रवाक्य आहे.

हा स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क फक्त तात्त्विक दृष्टीनें प्रतिपादणें एवढेंच टिळकांचें कार्य असतें तर ते 'लोकमान्य' व 'हिंदी असंतोषाचें जनक' झाले नसते. टिळकांनीं जनतेला राजकीय चळवळ करण्यास प्रवृत्त केलें ही त्यांची थोरवी होय. एकदम एकांतिक चळवळ करण्यास लोकांना त्यांनीं शिकविलें असें नाहीं. तर पीक कमी आल्यास सारा-माफी मागावी, सरकारी धोरणामुळें अडचणी आल्या असतां नेटानें, संघटितपणें व कायदेशीरपणें त्यांचा प्रतिकार करावा हें टिळकांनीं गांवोगांव सभा भरवून लोकांना शिकविलें. त्या वेळीं एका टोकास लोकांना नालायक मानून त्यांच्याकडे तुच्छतेनें पाहणारा समाजसुधारकांचा पक्ष होता, तर दुसऱ्या टोकास राजकीय स्वातंत्र्यासाठीं अधिकाऱ्यांचे खून करावे म्हणणारा दुसरा पक्ष होता. हे दोन्ही पक्ष टिळकांचें विरोधकच होते. पण जनतेला खऱ्या राजकीय संघटित चळवळीचें बाळकडू टिळकांचेमुळेंच मिळालें आणि मध्यमवर्गांतून शेंकडों स्वार्थत्यागी प्रचारक पुढें येऊन सर्वसामान्य शेतकरी समाजांतही टिळकांच्या राजकीय मताचा प्रचार झाला. जनतेला राजकीय संघटनेचें व प्रतिकाराचें शिक्षण टिळकांनींच प्रथम दिलें व त्याचें ठिकाणीं राजकीय पारतंत्र्याची चिड टिळकांनींच प्रथम निर्माण केली ही गोष्ट गांधी, नेहरू, अलीबंधु इत्यादि भिन्नभिन्न विचारसरणीच्या सर्वांनीं कबूल केली आहे.

समाजकारणांत टिळकांचीं मतें कांहीं बाबतींत फार प्रतिगामी होतीं हें खरें आहे. पण राजकारणांत टिळकांची भूमिका नुसती तत्त्व-प्रचारकाची नसून राजकीय संघटनकार पुढाऱ्याची होती. त्या वेळीं ज्या प्रकारचें प्राथमिक राजकीय संघटनेचें कार्य जनतेकडून करून घ्यावयाचें होतें, त्यासाठीं तात्कालिक समाजसुधारणेची अपरिहार्यपणें जरूरी नव्हती, आणि समाजसुधारणेचे विचार लोकांस इतके अप्रिय वाटत कीं टिळकांनीं समाजसुधारणेचा प्रचार केला असता तर राजकीय संघटनेसाठीं त्यांना त्या वेळीं अनुयायी मिळालेही नसते. उलट विरोध झाला असता. बहुधा यामुळेंच सुधारक विचारसरणीची त्यांनीं उपेक्षा केली व त्यांचीं मतें प्रतिगामी राहिलीं. पण जनतेंत पारतंत्र्याबद्दल त्यांनीं इतका तीव्र असंतोष व्यक्त केला आणि बहुजनसमाजांत राजकीय स्वातंत्र्याबद्दल इतकी उतावीळी उत्पन्न केली कीं त्यानंतर म. गांधींनीं केलेली राजकीय झंझावाती चळवळ

टिळकांच्या या कार्यावरच आधारलेली होती. त्याबद्दल काँग्रेसचे पुढारी अजूनही कृतज्ञता बाळगतात.

त्या काळीं समाजसुधारणेपेक्षा राजकीय असंतोषाची व प्रगतीचीच राष्ट्रास गरज होती ही गोष्ट दुसऱ्या एका उदाहरणानें सिद्ध होते. गोपाळराव गोखले हे टिळक-विरोधी पक्षाचे असून त्यांना सुधारकांचा पाठिंबा होता. पण स्वतः गोखल्यांनीं आयुष्यभर राजकीय चळवळ केली आणि समाज-सुधारणेचा प्रचार कधींच केला नाहीं. गोखले हे सरकारचें मतपरिवर्तन करून राजकीय प्रगति करूं पाहात. जनतेचा क्षोभ वाढविल्यास दहशतवादी चळवळी वाढतील व कायद्याचें बंधन तुटून अराजक माजेल अशी गोख-ल्यांच्या नेमस्त पक्षास भीति वाटे. टिळकांना हा धोका दिसे व ते दहशत-वाद्यांना आवरण्याचा प्रयत्नहीं करीत पण लोक कायदा मोडतील हा धोका पत्करूनही टिळक जनतेचा क्षोभ वाढवीत, व संघटित प्रतिकाराचा मार्ग जनतेला दाखवीत. गांधींनीं हेंच कार्य पुढें देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत नेलें.

टिळकांचें हें कार्य ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचें आहे. पण टिळकांच्या या कार्याचा वारसा पुढें कोणीं चालविला, आज टिळक असते तर त्यांनीं कोणतें धोरण पत्करलें असतें, टिळकानुयायी म्हणविणाऱ्यांनीं आज कोणतें धोरण पत्करावें इत्यादि प्रश्न विचारले जातात ते मात्र अगदींच अडाणीपणाचे असतात. टिळकांच्या एकंदर विचारसरणींतलें चिमूटभरही टिळकांनंतरच्या अडचणींच्या दृष्टीनें उपयुक्त असें आढळलें नाहीं. त्यांनीं प्रतिपादलेलें राजकीय स्वातंत्र्याचें ध्येय आतां सामाजिक व राजकीय असें उभयविध अभेद्य स्वातंत्र्य असें झालें आहे. राजकीय चळवळ अशा अवस्थेप्रत आली आहे कीं आतां सामाजिक सुधारणेवांचून राजकीय प्रगति अशक्यच झाली आहे. हिंसा-अहिंसावाद टिळकांना माहीत नव्हता तो आज ॲटम् बॉबमुळें साऱ्या जगापुढें जिव्हाळ्याचा प्रश्न झाला आहे. जमीनमालक व शेतकरी, भांडवलदार व मजूर हे वाद टिळकांच्या वेळीं मुळीं कोणास माहितच नव्हते. टिळकांना शिक्षा झाल्याबद्दल १९०८ सालीं मुंबईच्या मजुरांनीं संप केला तेव्हां 'कामगार चळवळीची ही नांदी होय' असें लेनिननें नमूद केलें. पण पुढें १० वर्षांनीं १९१८ सालीं कामगार-संप झाले तरी त्यांचं ऐतिहासिक मर्म टिळकांनाहि कळलें नाहीं.

टिळकांच्या सार्वजनिक जीवनाच्या आरंभीं शेतकऱ्यांचा खंड वाढत जाऊन त्यापायीं शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे जाऊं लागल्या. तेव्हां शेतकऱ्यांच्या जमिनी अशा प्रकारें सावकारांना घेतां येऊं नयेत म्हणून सरकारनें कायदा केला. त्यास टिळकांनीं पाठिंबा देण्याऐवजीं विरोधच केला. जमीनींचा खंड वाढत जातो याचें संकट त्यांना दिसलेंच नाहीं. शेतकरी याचा अर्थ टिळक जमीन-मालक असाच करीत. कष्टी आणि ऐदी यांतील फरक त्या वेळीं त्यांच्या लक्षांत आला नाहीं. मजुरांचें कारखानदाराविरुद्ध कांहीं गाऱ्हाणें असूं शकेल हें त्यांच्या गांवींही नव्हतें. महाराष्ट्रानें व्यापारांत पडावें असें टिळक प्रतिपादीत. पण आज भांडवलशाही उत्पादन व व्यापार अजिबात नष्ट करून सहकारी तत्त्वावर आर्थिक व्यवहार उभारल्याशिवाय महाराष्ट्राचें एक पाऊलही पुढें सरणार नाहीं ही गोष्ट टिळकांच्या वेळेपासूनही खरी होती हें आतां लक्षांत येत आहे. विभक्त मतदारसंघ टिळकांनीं पत्करला त्याचा केवढा प्रचंड विषवृक्ष आज वाढला आहे याची कल्पना त्या वेळीं ज्या टिळकांनीं व जिनांनीं विभक्त मतदारसंघ मान्य केला त्यांनाही असणें अशक्यच ठरलें.

कँट, स्पेन्सर वगैरे पाश्चात्य पंडितांनीं सामाजिक प्रश्नांचा उलगडा करण्यासाठीं आत्मानात्म चर्चा केली. पण टिळकांचें लक्ष या सामाजिक उलगड्याकडे कधींच न जातां सांख्य व वेदांत यांचें ऐहिक जगाची तुच्छतेनें उपेक्षा करणारें जें तत्त्वज्ञान तत्सदृश तत्त्वज्ञान कँट, स्पेन्सर यांनीं कसें मांडलें आहे याची टिळकांनीं चिकित्सा केली. संन्यास कीं कर्मयोग हा नऊशें पानें खर्चून टिळकांनीं माजविलेला वाद आज अगदींच निरर्थक वाटतो. आपण कर्मयोगशास्त्र लिहीत आहों अशी प्रतिज्ञा करून जो 'गीतारहस्य' ग्रंथ टिळकांनीं लिहिला त्यांत आत्मानात्म, पूर्वजन्मसंचित, ईश्वरकर्तृत्व यांचीच सारी भाकड चर्चा असून 'शठं प्रति शाठ्यं' असें अगदीं उथळ ठोकताळे कर्मयोगाचे मार्गदर्शनार्थ दिले आहेत. चार हजार वर्षांच्या कोणत्याही काळास हें सर्व विवेचन लागू पडेल, अथवा ऐहिक दृष्टीनें कोणत्याच कालखंडास लागू पडणार नाहीं. मोक्ष, निर्गुण, ईश्वर, ब्राह्मी स्थिति हें सर्व निरर्थक शब्दावडंबर आहे अशी आज आम्हां अभ्यासकांची खात्री झाली आहे. गीतारहस्याची भाषा अप्रतिम आणि विवेचन विद्वत्तापूर्ण आहे.

मीं एका काळीं त्याचीं पारायणें केलीं. पण आज तें सर्व विद्वत्तापूर्ण पण निरर्थक वाड आहे असें मला वाटतें.

पाश्चात्य राजकीय विचारांची प्रगति त्या वेळेपर्यंत किती झाली होती याचें ज्ञान टिळककालीन कोणालाच फारसें असल्याचें दिसत नाहीं. मी हें सर्व टिळकांचे दोष दाखविण्यासाठीं लिहीत नाहीं. टिळकांपूर्वीच्या दीडशें वर्षांत झाली नसेल एवढी जागतिक खळबळ व जागृति टिळकांनंतरच्या २६ वर्षांत झाली आहे. या काळांत जें जें नवें घडलें अथवा दिसलें त्यां-संबंधानें टिळकांकडून मार्गदर्शन घेणें अथवा टिळकांच्या जीवनांत त्याचें बीज पाहणें हें अशास्त्रीय आहे. टिळक मृत्यु पावले तेव्हांच ते इतिहासांत जमा झाले. त्यांचा संप्रदाय म्हणून कांहीं शिल्लक राहणें अशक्यच होतें. त्यांचें कार्य इमारत बांधण्यासाठीं उभारण्याच्या पायाडासारखें आहे. स्वातंत्र्य-लढ्याची इमारत रचली गेली व पायाड काढून टाकण्यांत आलें.

खरोखर टिळकांच्या आयुष्यांतली त्यांची जी सर्व क्षेत्रांतली विचार-सामुग्री व विचारपद्धति ती त्यांच्या कार्याला अत्यंत उपयोगी पडली. पण त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस कामगार–संप, ब्राह्मणेतर चळवळ, वगैरे जे नवे प्रश्न उत्पन्न झाले त्यांना टिळकांची सामुग्री व पद्धति त्यांच्या हयातींतच अपुरी पडूं लागली हें उघड दिसत होतें. टिळक स्वभावानें आत्मनिरीक्षक नव्हते, तर हट्टी होते. आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विचारसामुग्रीशीं व विचारपद्धतीशीं पूर्ण विसंगत व त्यांच्या आवाक्याबाहेरचे अनेक प्रचंड प्रश्न उभे राहिले. त्या सर्वांना टिळकांनीं कसें तोंड दिलें असतें हें सांगणें कठीण आहे. त्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्या सर्वांचीच वाताहत कशी झाली हें गेलीं सव्वीस वर्षें आपण पहात आहों. टिळक वारले त्या दिवशीं मी सांगलीस विद्यार्थी होतों. 'ही डाइड ॲट दि प्रॉपर मोमेंट इन हिज लाइफ' (टिळक योग्य समयीं वारले) असे उद्गार एका चाणाक्ष गृहस्थानें काढलेले मला आठवतात. ते उद्गार तेव्हां मला कळले नाहीत. पुढें हळूहळू त्यांचा प्रत्यय येत गेला. अर्थात् हें आजच्या जगासंबंधाचें बोलणें आहे. टिळकांचें ऐतिहासिक कार्य फार उच्च आहेच व तें आधुनिक तरुणांनीं टिळकांचे लेखखंड व तत्कालीन इतिहास वाचून अवश्य समजून घेतलें पाहिजे.

—हंस, ऑगस्ट १९४६

# महाराष्ट्र आणि सोशॅलिझम

" महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स " ही संस्था महाराष्ट्राच्या औद्योगिक उत्कर्षाची काळजी वाहात असतां ' मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ' ही पुणेरी संस्था कशाला काढली ? " असा प्रश्न, आम्ही चार मंडळी गप्पा मारीत बसलों असतां एका मुंबईकरानें आमच्यांतल्याच एका पुणेकरास विचारला. पुण्याचा अथवा मुंबईचा विशेष अभिमान वा द्वेष कोणासच नव्हता, आणि खरोखर आम्ही कोणीच मूळचे पुण्याचेंहि नव्हतों व मुंबईचेंहि नव्हतों. पण मुंबईकरांनीं पुण्याची टवाळी करायची आणि पुणेकरांनीं मुंबईवर मनगटें चावायचीं हा प्रकार केवळ करमणुकीखातर अनेक ठिकाणीं चालतो तसा प्रकार आम्हा मंडळींत चालला होता. तरी पण आमच्या पुणेरी मित्रानें लगेच तात्त्विक विचाराची बैठक घेतली. तो तक्क्याला अघळपघळ लोळत पडला होता तो ताड्कन उठून बसला आणि डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताची मूठ दाबून बोलूं लागला. सुमारें १० मिनिटें तो हातवारे करून वक्तृत्वपूर्णतेनें बोलत होता. त्या भाषणांत संताप, त्वेष, द्वेष, अभिनिवेश, चीड सर्व कांहीं ओतप्रोत भरलेलें होतें. त्यांत महाराष्ट्राचा अभिमान होता, पण त्यापेक्षां बिगरमहाराष्ट्रीयांबद्दल चीड जास्त होती. तो ' महाराष्ट्र ' शब्द उच्चारी तेव्हां त्याला महाराष्ट्रांतले ब्राह्मण तेवढेच दिसतात असा भास होई. " आम्ही येथें राज्यकर्ते होतों, हिंदुस्तानांत आम्हांलाच राजकारण कळतें आणि असें असून, ' महाराष्ट्र ' दरिद्री असल्यानें तो मागें पडतो, ' महाराष्ट्र चेंबर ' मध्येंहि महाराष्ट्रांतल्या बिगरमहाराष्ट्रीयांचेंच प्रस्थ आहे, म्हणून खास महाराष्ट्रीयांच्या उत्कर्षासाठीं ' मराठा चेंबर ' हवी आहे " असें त्यानें शेवटीं प्रतिपादिलें.

' महाराष्ट्र चेंबर ' व ' मराठा चेंबर ' या दोन्ही संस्थांशीं कांहींही संबंध नसणारे आम्ही सर्वजण होतों ही गोष्ट, निष्कारण वैयक्तिक वाद माजूं नये म्हणून, येथें प्रथमच सांगणें जरूर आहे. या दोन्ही संस्थांचे सभासद असणारीं अनेक मोठीं माणसें आहेत. या दोन संस्थांत भांडण असल्याचें

कधीं ऐकण्यांत येत नाहीं. 'मराठा चेंबर' च्या कोणा संस्थापकाचे विचार आमच्या या मित्रासारखे असल्याचेंही मला माहीत नाहीं. आमच्या बैठकींतील त्या मित्राचे विचार तसे होते एवढेंच त्याच्या त्या बोलण्यावरून समजायचें. महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं ही विचारसरणी, ही तेढी भावना आहे हें मात्र खरें आहे. अनेक ठिकाणीं ही विचारसरणी ऐकूं येत असून तिला वस्तुस्थितीचा आधारही बराच आहे. महाराष्ट्रांतली कारकुनी, शेती, हमाली महाराष्ट्रीयांच्या हातीं असली तरी पुष्कळशी सावकारी, व्यापार, धंदे बिगरमहाराष्ट्रीयांच्या हातीं आहेत. यांची संख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येंत शेंकडा ५ हि नसेल. पण शेंकडा २० संपत्ति आणि संपत्तीचें उत्पादन व केन्द्रीकरण करण्याचीं शेंकडा ५० मोठीं केन्द्रस्थानें त्यांच्या हातीं असून प्रांताचें आर्थिक प्रभुत्व कदाचित् शेंकडा ७५ इतक्या प्रमाणांतही बिगरमहाराष्ट्रीयांच्या हातीं असावे. वकीली हा महाराष्ट्रांतला महाराष्ट्रीयांचा एक फार मोठा व्यवसाय. या व्यवसायांतले लोक स्वतःला साऱ्या हिंदुस्थानांत बुद्धिमान समजतात. पण त्यांच्या व्यवसायाचा उपयोग महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षास न होतां अधःपातासच कारण झाला आहे. गरिबांच्या इस्टेटी श्रीमंतांकडे पोचविणें आणि महाराष्ट्रीयांच्या दौलती बिगरमहाराष्ट्रीयांच्या हवालीं करणें ही वाहतूक मुख्यतः या वकील वर्गाच्या साहाय्यानें होते.

महाराष्ट्रांतल्या शहरांतले व खेड्यांतले महाराष्ट्रीय दैन्यावस्थेंतच आहेत; तेथें महाराष्ट्राचें दैन्य फारसें लक्षांत येत नाहीं. मुंबईस हें दैन्य विशेष जाणवतें. साऱ्या जगांतली मानवजात या मुंबईस आहे. त्यांत एकेकट्या लोकसंख्यांची तुलना केल्यास महाराष्ट्रीय हे इतर कोणत्याही प्रांतीयांपेक्षां संख्येनें अधिक आहेत. हिंदुस्थानांतील अव्वल दर्जाचें उद्योगधंद्यांचें शहर, विदेशी व्यापाराचें बंदर आणि राजकीय उलाढालींचें माहेरघर असा या शहराचा दर्जा आहे. ज्या कांहीं लोकांनीं शंभर–दीडशें वर्षांमागें या शहराच्या वैभवाची मुहूर्तमेढ रोवली त्यांत जगन्नाथ शंकरशेट हे सोनार व्यापारी प्रमुख असून ते महाराष्ट्रीय होते. आज हें शहर कोट्यधीशांनीं भरलेलें आहे, पण महाराष्ट्रीय जे येथें आहेत ते नक्तपगारी कारकून,

मजूर, हमाल, पट्टेवाले, भांडीं घासणारे गडी वगैरे दर्जात आहेत. मॅन-होलमध्यें उतरणारे आणि कचराडेपो साफ करणारे लोक महाराष्ट्रीयच आहेत. पोलिसांत महाराष्ट्रीयांचा भरणा पुष्कळ आहे. गिरणी-मजुरांची, इतर मजुरांची, कारकुनांची आणि इपीसरांचो मोठी संख्या महाराष्ट्रीयांची आहे. हें पाहतां मुंबईचें वैभव महाराष्ट्रीयांनींच उभारलें आहे असें म्हणतां येतें. पण भांडवलदार कंपन्यांच्या डायरेक्टरांची यादी पाहतां महाराष्ट्रीय शून्यानेंच मोजावे लागतील. गिरणीमजूरांच्या भागांत हिंडून पाहिलें तर मजूरांना कापड, वाण-सौदा आणि कर्जे पुरविणारे दुकानदार व सावकार हे बिगर-महाराष्ट्रीयच असून महाराष्ट्रीय मजूरांचा पैसा मजूरांच्या हातीं पडतो न पडतो तोंच चाळणींतल्या पाण्याप्रमाणें या बिगरमहाराष्ट्रीय सावकार-दुकानदाराकडे पाघळून जातो. मुंबईस बँका, उद्योगधंदे, व्यापार, घाऊक दुकानदारी या क्षेत्रांत नियंत्रकस्थानीं महाराष्ट्रीय आहेत ते अपवादात्मक आहेत. त्यांची परंपरा स्थापन झालेली नाहीं, त्यांच्यांत संघटना, एकजूट, सहविचार कांहींहि नाहीं. मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरनें व पुण्याच्या मराठा चेंबरनेंही ही विपत्ति समजून घेऊन तिच्या निवारणासाठीं कांहीं प्रयत्न अथवा नुसती चौकशी, चर्चाही केली नाहीं.

अलीकडे सुकून चाललेलीं पण एका काळीं टवटवीत दिसणारीं महाराष्ट्राचीं कांहीं मोठीं वैशिष्ट्यें आहेत. महाराष्ट्रांत हिंदुसभानिष्ठता विशेष आहे. आम्ही राज्यें व राजकारणें केलीं असा महाराष्ट्रीयांना मोठा गर्व आहे. आम्ही अकलेंत विशेष असा त्यांचा प्रामाणिक समज आहे. नव्या पिढीला स्वतांच्या लष्करांकडे पाहण्याची संवय अलीकडे लागली असून आणि बेकारीची झळ जाणवूं लागल्यानें वरील गर्विष्ठ मनोवृत्ति बदलत आहेत. ऐतिहासिक मौजेची अशी एक तुलना येथें सुचते. आम्ही मुसलमानी राज्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून आमच्यांत हिंदुत्वनिष्ठता जास्त. मुसलमान व मराठे यांनींच हिंदुस्तानांत राज्यें केलीं, तेव्हां दोघांनाही आपल्या पूर्व-वैभवाचा अभिमान वाटावा हें स्वाभाविक आहे. पण वर म्हटलेली ऐतिहासिक मौज ती अशी कीं उद्योगधंदे, व्यापारउदीम, सावसावकारी, सारांश धनसंपादनकार्य या क्षेत्रांत मराठे व मुसलमान हे दोघेही मागासलेले आहेत. जिना तक्रार करतात, ‘ देवकरण नानजी कंपनीच्या शेकडों पेढ्या देशभर

पसरलेल्या आहेत, त्यांच्या डायरेक्टरांच्या याद्या पाहिल्या तर शेकडा दोन मुसलमानही त्यांत आढळत नाहींत.' महाराष्ट्रीयांची गोष्ट नेमकी हीच आहे. मराठे आणि मुसलमान दोघेही राज्यपदावरून भ्रष्ट झाले, व धनाला पारखे राहिले म्हणून दोघेही निवळ हमाल झाले; पण त्यांची एकजूट न होता आपसांत तेढ माजविण्यांतच त्यांना आनंद वाटतो. हा केवळ आजचाच प्रकार नाहीं. शिवाजीच्या वेळेपासून खेड्यांतला व शहरांतला वाणउदीम, हुंडी-व्यवहार, व्यापार, सावसावकारी वगैरे सर्व गोष्टी बऱ्याच प्रमाणांत बिगरमहाराष्ट्रीयांच्या हातीं आहेत. या बिगरमहाराष्ट्रीयांनीं महाराष्ट्र व महाराष्ट्रीय यांना कमीअधिक प्रमाणांत परके लेखून वागविलें आहे. महाराष्ट्रीय साहित्यिकांनीं, शूरांनीं व शर्विलकांनीं या बिगरमहाराष्ट्रीयांची तोंडी अथवा हातीं चेष्टा केली अथवा लूट केली आहे. त्यांना बुद्धि व विद्या नाहीं म्हणून त्यांची टवाळी केली आहे. पण त्यांचें धनक्षेत्र काबीज करण्याचें सामर्थ्य मराठ्यांना कधीं प्राप्त झालें नाहीं. या बिगरमहाराष्ट्रीय धनिकांनीं उदार अंतःकरणानें लक्षावधि रुपयांच्या देणग्या महाराष्ट्रांत विद्या, कला, धर्म यांच्या प्रसाराकरतां दिल्या आहेत व त्या आम्हीं घेतल्याही आहेत. पण आपल्याच महाराष्ट्रांत आपण कारकून आणि हमाल कां आहों याची उपपत्ति अजून कोणी सांगण्याचा प्रयत्न करीत नाहीं. ही परिस्थिति सुधारण्याचाही प्रयत्न होत नाहीं.

हा सर्व विचार तटस्थपणें अथवा तिऱ्हाइतपणें मी करतों असें मुळींच नव्हे. ही सर्व परिस्थिति बदलून महाराष्ट्र व महाराष्ट्रीय यांचें वैभव वाढावें असें मला वाटतें. माझ्याजवळ यासाठीं एकादा सिद्ध उपाय आहे असें नाहीं. पण या विषयाकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष जरा शास्त्रीय पद्धतीनें वेधावें म्हणून मी हा विचारप्रपंच करतों आहें. महाराष्ट्रीयांच्या या दुःस्थितीबद्दल चिडलेले अनेक लोक आहेत. पण यांपैकीं कांहींचा सर्व रोष बिगरमहाराष्ट्रीयांवर आहे. त्यांच्याबद्दल समाजांत द्वेष फैलावणें, बिगरमहाराष्ट्रीय थोर पुरुषांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनावर चिखलफेक करणें हें यांच्या महाराष्ट्र-प्रेमाचें व्यक्त स्वरूप आहे. स्वतः महाराष्ट्रीयांबद्दल यांना फारसा आदर नसून महाराष्ट्रांतील अनेक थोर पुरुषांची कुचाळी आणि निंदा करणें हाच यांचा एकटा एक धंदा आहे. महाराष्ट्राचें

वैभव वाढवावें अशी यांची इच्छा असल्याचें कधींच दिसून आलेलें नाहीं. जनतेशीं तर या लोकांचें हाडवैर असतें; हे जनताकल्याण काय करणार ? यांच्यासंबंधीं मला येथें कांहींच म्हणायचें नाहीं. महाराष्ट्राभिमान्यांचा दुसरा जो एक वर्ग आहे, त्यांना उद्देशून मी हें लिहितों आहें. या वर्गांतील महाराष्ट्रीय विचारवंत बिगरमहाराष्ट्रीयांचा द्वेष न करतां स्वावलंबनानें महाराष्ट्राचा आर्थिक उत्कर्ष करावा म्हणणारे आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर बिगरमहाराष्ट्रीय वैश्यांनीं भांडवलशाही पद्धतीचा अवलंब करून कराचीपासून कलकत्त्यापर्यंत आणि काश्मीरपासून कुमारीपर्यंत सर्वत्र आपलें वर्चस्व स्थापलें. ज्यावेळीं मराठे व मुसलमान राजकारण करीत होते त्यावेळीं यांनीं आपलें व्यापारी व औद्योगिक बस्तान देशभर बसविलें. आतां ते ब्रिटिशांच्या आर्थिक सत्तेशीं स्पर्धा करीत असून राजकीय सत्तेवांचून ब्रिटिशांशीं आर्थिक स्पर्धा करणें अशक्य झाल्यानें या व्यापाऱ्यांनीं व उद्योगधंदेवाल्यांनीं राजकारणाचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं आहेत. या बिगरमहाराष्ट्रीय भांडवलशाही वर्गाचा आदर्श महाराष्ट्रीय उद्योन्मुख धंदेवाल्यापुढें व व्यापाऱ्यांपुढें आहे. महाराष्ट्रांत भांडवलशाहीचा उदय व वाढ झाल्यावांचून महाराष्ट्राचा उत्कर्ष होणार नाहीं असें यांचें प्रामाणिक मत असून सोशॅलिस्ट हे महाराष्ट्राच्या उत्कर्षास म्हणजे भांडवलशाहीस विरोध करतात म्हणून या वर्गाचा सोशॅलिस्टांवर मोठा राग आहे.

या महाराष्ट्र-भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या प्रयत्नास थोडेफार यश येईल व येतही आहे. पण बिगरमहाराष्ट्रीयांच्या यशाशीं तुलना करतां मोटारगाडीशीं बैलानें धावण्यांत स्पर्धा करण्यासारखें हें यश आहे. या महाराष्ट्रीय भांडवलदारांच्या मतें महाराष्ट्रीय मजूरांची परिस्थिति सुधारून त्यांची पगारवाढ व्हावी यासाठीं सोशॅलिस्ट जी चळवळ करतात त्यामुळें महाराष्ट्रीय धंदेवाल्यांना धंदा न परवडून बिगरमहाराष्ट्रीय धंदेवाल्यांपुढें महाराष्ट्रीय धंदेवाले पराभूत होतात. या दृष्टीनें सोशॅलिस्ट हे महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षाचे शत्रु होत असें यांचें मत झालें आहे. हें त्यांचे मत अगदीं चूक आहे. तें दुरुस्त केल्यावांचून महाराष्ट्राचा आर्थिक उत्कर्ष करण्याचे यांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहींत. भांडवलशाही पद्धतीनें महाराष्ट्रीयांचा थोडाफार उत्कर्ष यापुढें होईलही. पण तो आधींच पुढें गेलेल्या

बिगरमहाराष्ट्रीयांच्या मानानें फार कमी होईल व कांहीं काळानें पुन्हा अजीबात खुंटेल. याचें मुख्य कारण असें आहे कीं कांहीं प्रांतांचा व राष्ट्रांचा भांडवलशाहीनें खूप उत्कर्ष झाला असल्यानें त्याच भांडवलशाही पद्धतीनें आतां इतर, विशेषतः मागसलेल्या, प्रांतांचा व राष्ट्रांचा उत्कर्ष होणार नाहीं. भांडवलशाहीनें उत्कर्ष होण्याचा मुख्य मार्ग म्हणजे भांडवलाचा प्रचंड सांठा हा होय. पण धंद्यांत भांडवल गुंतवून धोका पत्करण्याची संवय अथवा आत्मविश्वास महाराष्ट्रीयांत नाहीं. प्रस्थापित धंद्यांना भांडवल पुरवून व्याजांत सुख मानणें ही आमची प्रवृत्ति आहे. यामुळें आमच्या धंद्याचें भांडवल तोकडें पडतें. महाराष्ट्रांतला शेतकरीवर्ग सधन झाल्याशिवाय आमच्या मालाला येथें गिऱ्हाईक मिळणार नाहीं. शेतकरी सुखी होण्यास शेतीचें पीक वाढलें पाहिजे. त्यासाठीं शेतीला अधिक भांडवल पाहिजे. पण जमिनींत उत्पन्न होत नाहीं व शेतमालाच्या बाजारभावाची शाश्वती नाहीं म्हणून शेतमालक जमिनीच्या उत्पन्नाचा पैसा जमिनींत भांडवलासाठीं न घालतां बिगरमहाराष्ट्रीयांच्या धंद्यांत गुंतवितात. यामुळें शेतकऱ्याला शेतीसाठीं हुरूप राहात नाहीं. आणि तो मुंबईला मजूरी करून बिगरमहाराष्ट्रीय गिरणीवाल्यास नफा, व बिगरमहाराष्ट्रीय वाणीउदमी आणि सावकार यांना नफा व व्याज देत राहतो. श्रम हेंच धनाचें एकमेव साधन; भांडवल म्हणजे खरोखर संचित श्रमच होत. हें महाराष्ट्रीयांच्या हातीं एकत्रित राहात नाहीं, त्यामुळें तें वापरण्याची अक्कल व परंपरा येथें निर्माण होत नाहीं आणि महाराष्ट्रजनतेचे रोजचे नवे श्रम महाराष्ट्रीयांच्या उत्कर्षाच्या कारणीं लागत नाहीत.

सूर्यप्रकाशांतही उभा असलेल्या आंधळयाला जसा नुसता अंधारच प्राप्त होतो तसे संपत्तीच्या धबधब्याखालीं महाराष्ट्रीय हे कोरडे ठणठणीत दगड राहिले आहेत ही गोष्ट महाराष्ट्राच्या सह्याद्रींत परप्रांतीयांनीं अनेक धरणें उभारून जे सोन्याचे पर्वत रचले त्यावरून दिसून येत आहे. अजून कांही धरणें पूर्वीपेक्षां कितीतरी मोठीं व्हायचीं आहेत. या सह्याद्रींतला खडक आमच्या वांट्याला व जीवन परक्यांच्या वांट्याला असा प्रकार यापुढें शंभर वर्षें वाढत्या प्रमाणावर चालणार आहे. या सह्याद्रीवरील धरणांच्या भांडवलशाहींत महाराष्ट्रीय भांडवलदारांना चारदोन शेअर्स व कारकुनी यापलीकडे कांहींही मिळणार नाहीं. आणि सह्याद्रीवर पडणाऱ्या पाण्यापासून

एवढी प्रचंड संपत्ति निर्माण होणार आहे कीं साऱ्या महाराष्ट्राचाच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानचा ऊर्जितकाळ त्यामुळें उगवेल. हें सर्व वैभव मराठा मजूरांच्या मनगटानेंच उभारलें जाणार आहे. याचा फायदा भांडवलशाही पद्धतीनें मिळवूं असें महाराष्ट्रीय भांडवलदार मानतील तर तो त्यांचा भ्रम आहे. उलट धनोत्पादन-साधनें सार्वजनिक मालकीचीं केल्यास मूठभर भांडवलदारांसच नव्हे तर बहुसंख्य श्रमजीवी समाजास अन्न, वस्त्र, आश्रय, शिक्षण, संस्कृति, आरोग्य, कलाकौशल्य या सर्वांचा लाभ करून देतां येईल. सह्याद्रीवरील या पाण्यानें शेती व उद्योगधंदे या दोहोंचाही उत्कर्ष होऊन महाराष्ट्र हें उद्योग, उत्कर्ष, उत्साह, संस्कृति यांचें नंदनवनच होईल. सह्याद्रीवरील धरणासंबंधानें हा सोशॅलिस्ट दृष्टिकोन त्र्यं. वि. पर्वते यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी मांडला होता, पण तिकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. शेती, उद्योगधंदे व व्यापार या बाबतींत यापुढें महाराष्ट्रानें व हिंदुस्तानांतील इतर मागासलेल्या प्रांतांनीं सोशॅलिझमचाच आश्रय केला पाहिजे. तरच प्रगति शक्य आहे.

महाराष्ट्रांतील बिगरमहाराष्ट्रीयांचें आर्थिक वर्चस्व नाहींसें करून सर्वच महाराष्ट्रीयांचें वैभव वाढविण्याचा उपाय महाराष्ट्र-भांडवलशाही हा नसून सोशॅलिझम हाच आहे. कारण जीवनाच्या सर्वांगांत सोशॅलिस्ट पद्धति वापरूनच जनतेची पिळणूक थांबविणें व जनतेचें वैभव वाढविणें शक्य होईल. उदाहरणार्थ, मालखरेदी-विक्रीच्या सोशॅलिस्ट को-ऑपरेटिव्ह संस्थांनीं खाजगी नफेबाज व्यापारी नाहींसे होतील, सोशॅलिस्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्यांनीं सावकार जातील, सोशॅलिस्ट को-ऑपरेटिव्ह शेतीनें शेतीवरील ऐतखाऊ वर्ग नाहींसा होऊन शेतींत जास्तींत जास्त श्रम व भांडवल यांचा संयोग करतां येईल. पण हा सर्व वैभवाचा विस्तीर्ण मुलूख हातीं येण्यापूर्वी त्या भोवतालची खाजगी मालकीची तटबंदी नष्ट होऊन जमीन, कारखाने, खाणी, धरणें हीं सर्व सार्वजनिक मालकीचीं झालीं पाहिजेत. खरोखर या सोशॅलिस्ट धोरणास महाराष्ट्रीयांचा विरोध असण्याचें कारणच नाहीं. ऐतखाऊ जमीन-मालक जमीन-मालकीला मुकतील, पण बिगरमहाराष्ट्रीय भांडवलदारांची महाराष्ट्रीय जनतेच्या मनगटानें उभारलेली केवढीं तरी वैभवें महाराष्ट्रीय जनतेच्या उपयोगी येतील.

मुंबईच्या गिरण्या सार्वजनिक सरकारच्या मालकींत येण्यानें महाराष्ट्रीयांचें नुकसान होण्यापेक्षां फायदा किती मोठा होईल हें थोडासा विचार केला. असतां सहज लक्षांत येणार आहे. मुंबईंत व महाराष्ट्रांत असलेले उद्योगधंदे सार्वजनिक सरकारच्या मालकीचे करण्यानें त्यांचें उत्पादन वाढेल, बिगर-महाराष्ट्रीयांचें वर्चस्व कमी होईल, आणि एकंदर महाराष्ट्राचा सर्वांगीण उत्कर्ष होईल. खरोखर महाराष्ट्रीय व बिगरमहाराष्ट्रीय हा भेद व त्यांतील तेढ व उच्चनीचता हीही यामुळें सर्व नष्ट होऊन सर्वांनाच सारखे व चांगले दिवस येतील. महाराष्ट्रांतील सर्वच बिगरमहाराष्ट्रीयांची स्थिति चांगली आहे असें नाहीं. त्यांतही कंगालांची संख्या वाढते आहे. भांडवलशाहीचें वैशिष्ट्यच असें आहे कीं माणसांची संख्या वाढेल तसतसें बहुसंख्यांचें दारिद्र्य व थोडथोड्यांचें वैभव वाढत जातें. उलट सोशॅलिझमचें तत्त्व 'जितके अधिक श्रम तितकें अधिक वैभव व सर्वांच्याच वैभवाची तितकी अधिक वाढ' असें असल्यानें लोकसंख्येच्या वाढीबरोबर वैभव वाढत जातें. अर्थात लोक-संख्येलाही आळा घालण्याची जरूर वाटेल तेव्हां तो घालतांही येईल. मुख्य प्रश्न आज आहे तो सर्व श्रम व भांडवल धनोत्पादनाच्या कामीं वापरलें जाऊन त्याचा फायदा सर्व जनतेला कसा मिळावा हा आहे. महाराष्ट्र व इतर मागासलेले प्रांत यांनीं यासाठीं सोशॅलिझम्‌चाच अवलंब केला पाहिजे.

पण शेती व इतर धनोत्पादन–साधनें सार्वजनिक मालकीचीं करतांना त्यांच्या आजच्या मालकांना नुकसानभरपाई देण्याचा विचार व्यर्थ आहे हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण त्यामुळें भावी कित्येक पिढ्यांपर्यंत महाराष्ट्रीय समाजाचें जिणें या मालकांचेकडे गहाण पडेल. युगोस्लाव्हिआंत मार्शल टिटोनें सर्व जमिनी बिनमोबदला खालसा करून कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारमार्फत दिल्या. हाच एक मार्ग मागसलेलीं राष्ट्रें व प्रांत अनुसरूं शकतील. म्हणून हिंदुस्तान व महाराष्ट्र यांनीं आतां सोशॅलिस्ट उपायांचाच अवलंब करणें अवश्य व अपरिहार्य आहे. सोशॅलिझम् हा असलेली संपत्ति वांटून खाण्याचाच केवळ मार्ग नसून, संपत्त्युत्पादनाचे कामीं न येणारे बेकार श्रम व बेकार भांडवल संपत्त्युत्पादनाचे कामीं लावणें, धनोत्पादन वाढविणें व उत्पन्न–धनाचा विनियोग जनतेच्या उन्नतीसाठीं करणें या त्रिविध ध्येयाचा मार्ग आहे. महाराष्ट्राला मुख्यतः आज याचीच गरज आहे.

—वसंत, दिवाळी अंक १९४५.

# हिंदुस्तान, महाराष्ट्र व सोशॅलिझम्

महाराष्ट्राचें आर्थिक भवितव्य काय होईल हा प्रश्न महाराष्ट्रीयांच्या विशेष जिव्हाळ्याचा आहे. अवघ्या दीडशें वर्षांपूर्वी ज्यांची साम्राज्य-पताका दिल्लीपर्यंत जाऊन भिडली होती, त्यांची परिस्थिति गेल्या दीडशें वर्षांत सतत खालावत गेली असून खुद्द महाराष्ट्रांतच महाराष्ट्रीय लोक म्हणजेच मराठे लोक हे कर्जबाजारी शेतकरी, कारकून अथवा हमाल झाले आहेत. याच दिशेनें पुढें आपण कोठें जाणार हा प्रश्न एक मराठा दुसऱ्या मराठ्यास मोठ्या चिंताग्रस्ततेनें विचारीत आहे. कांहीं मूठभर महाराष्ट्रीय धनिक भांडवलशाही पद्धतीनें महाराष्ट्राचा उत्कर्ष करूं पहात आहेत. त्यांचे प्रयत्न धाडसाचे आणि अभिनंदनीय आहेत यांत शंका नाहीं. साखर व गूळ यांचे संयुक्तभांडवली कारखाने महाराष्ट्रांत निघाले असून खास महाराष्ट्रीयांची अशी एक कोटी भांडवलाची वीज कंपनीही पुण्यास निघूं पहात आहे. असे हे प्रयत्न कितीही स्तुत्य असले तरी या प्रयत्नांनीं महाराष्ट्राचें आर्थिक भवितव्य फार मोठ्या अथवा पुरेशा मोठ्या प्रमाणावर सुधारेल कीं नाहीं याचा विचार व्हावयास पाहिजे. हे प्रयत्न जमेस धरूनहि दुसरेही कांहीं प्रयत्न करणें इष्ट व शक्य आहे कीं काय हें आपण पाहिलें पाहिजे. त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकंदर महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षाचा पाया तात्त्विक दृष्ट्या तपासून पाहणें आवश्यक आहे की काय हेंही पाहिलें पाहिजे. अखिल हिंदुस्थानांत लोकप्रतिनिधींचें मंत्रिमंडळ स्थापन झालें असून अकरापैकीं निदान आठ प्रांतांत तरी सर्वस्वी कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ आहेत. ह्यामुळें कॉंग्रेसला आपलें आर्थिक उत्कर्षाचें धोरण आतां निदान तीन चतुर्थांश ब्रिटिश हिंदुस्थानाएवढ्या मुलुखावर अमलांत आणतां येईल. म्हणून हें धोरण तुरळक स्वरूपाचें अथवा वैयक्तिक स्वरूपाचें न ठेवतां त्याची तात्त्विक भूमिका व्यापक धरावी लागेल. एकंदर जनतेच्या जीवनाचा विचार त्यांत व्हावा लागेल. महाराष्ट्राच्या आर्थिक भवितव्याचा विचार सुद्धां फक्त महाराष्ट्रापुरताच करून चालणार

नाहीं, तर अखिल हिंदुस्थानचा महाराष्ट्र हा एक भाग या दृष्टीनेंच त्याचा विचार करावा लागेल, म्हणून महाराष्ट्रासंबंधानें विचार करण्यासाठीं अखिल हिंदुस्थानच्या आर्थिक उत्कर्षाच्या विचारापासूनच सुरवात करूं.

हिंदुस्थानच्या आर्थिक उत्कर्षासंबंधानें ज्या अनेक योजना आजवर आखण्यांत आल्या आहेत, त्यांत ‘ टाटा-बिर्ला ’ योजना आणि नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें मांडलेली योजना या प्रमुख आहेत. ‘टाटा-बिर्ला’ योजनेंत पुष्कळच आंकडेवार माहिती व आंखणी आली असून, पुढील पंधरा वर्षांत हिंदुस्थानचा औद्योगिक व शेतीविषयक उत्कर्ष कसा करावयाचा याची तपशीलवार कल्पना सांगण्यांत आली आहे. नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें इतका तपशील मांडला नाहीं, पण कांहीं तात्त्विक मुद्दे मांडले आहेत. सहकारी शेती, जमिनीची सार्वजनिक मालकी, धंद्यांचें राष्ट्रीयकरण इत्यादि आर्थिक मतें नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें स्वीकारलीं आहेत. पण हिंदुस्थानच्या प्रगतीसंबंधानें कांहीं व्यापक तात्त्विक भूमिका निश्चित झाल्यावांचून हिंदुस्थानची प्रगति होणें शक्य नाहीं. टाटा-बिर्ला योजना ही भांडवलशाही योजना आहे अशी कबूलीच ह्या योजनेच्या निर्मात्यानीं दिली आहे आणि नॅशनल प्लॅनिंग कमिटीची योजना-आखणारांत सर्वच मताचीं माणसें असल्यामुळें ती योजना अमुक एका तत्त्वावर आधारली आहे असें म्हणतांच येत नाहीं. आर्थिक योजना पार पाडणें हा प्रश्न व्यवहाराचा असल्यानें ज्या वेळीं जशी जरूर पडेल तसे उपाय अवलंबावे, तत्त्वाची घासाघीस आधींपासून कशाला, असें कांहीं लोकांचें म्हणणें असतें. प्रत्यक्ष व्यापारधंद्यांत पडलेले धाडशी अथवा विवेकी लोक बहुधा तत्त्वशून्यच असतात. जो तो आपापल्यापुरता विचार-व्यवहार करतो आणि त्या विचार-व्यवहारांतही तत्त्वनिष्ठेपेक्षां नफ्यावर व सौकर्यावर त्याची दृष्टि असते. पण एकोणिसाव्या शतकांत अशा व्यक्तिनिष्ठ म्हणजे व्यक्तिस्वार्थी अर्थव्यवहाराची युरोपांत प्रगति झाली तरी त्यांतूनच पुढें एकामागून एक महायुद्धें उद्भवलीं. आणि माणसाची उत्पादनशक्ति अफाट वाढली असतांही लक्षावधि लोकांना जगभर पुरेसें अन्नवस्त्र मिळत नसून उलट हें अन्नवस्त्र निर्माण करण्याची शक्ति असणारे लक्षावधि लोक बेकारींत तडफडत आहेत. अर्थव्यवहाराच्या मुळाशीं व्यक्तिस्वार्थाखेरीज कोणत्याही तत्त्वविचाराची जरूरी नाहीं

ही जी अँग्लो-अमेरिकन तत्त्वज्ञांची एकोणिसाव्या शतकांतील विचारसरणी, ती आतां चुकीची ठरली असून निवळ व्यक्तिवादी अर्थशास्त्र आतां सर्वांनींच सोडून दिलें आहे आणि सामुदायिक अर्थ-व्यवहाराचें तत्त्व काय असावें याचा विचार सर्वत्र सुरू आहे. यासंबंधानें दोन टोंकाचीं दोन मतें आहेत. संपूर्ण व्यक्तिवादी भांडवलदारांच्या समुदायानें संघटित भांडवलशाही पद्धति चालवावी असा एक संप्रदाय गेल्या दोन युद्धांच्या दरम्यान युरोपांत निघाला. हेंच फॅसिझमचें आर्थिक मूलतत्त्व होय. दुसऱ्या टोंकाचें अर्थव्यवहारतत्त्व म्हणजे सोव्हिएट समाजवादाचें तत्त्व. हिंदुस्थानाला या दोहोंपैकी कोणतें लागू करावें याचा निर्णय निदान जुजबी स्वरूपांत पण स्पष्टपणें ठरविण्यांत आला पाहिजे

भांडवलशाही व्यक्तिनिष्ठ न ठेवता संघटित केली तर त्यामुळें, भांडवलदारांच्या आपसांतील चढाओढीनें होणारी नुकसानी व निर्माण होणारें अराजक नष्ट होतें हें खरें आहे. तरी पण तिजपासून दुसरे महत्त्वाचे अनर्थ घडून येतातच. भांडवलशाही म्हटली कीं स्वदेशांत कमींत कमी मजूरीवर बहुसंख्य जनतेला डांबून जास्तींत जास्त माल निर्मावा आणि बहुसंख्य जनतेनें आपल्या तोकड्या मिळकतीनें त्यांतील माल अंशतः खरेदी केल्यानंतर उरलेला माल परदेशांत विकून नफा मिळवावा हें अपरिहार्य आहे. परदेशचे बाजार मिळविण्याचा प्रसंग आला कीं युद्धप्रसंग उद्भवतात; शिवाय एकदां नफ्यासाठीं माल उत्पादन करावयाचा म्हटलें कीं धनवान गिऱ्हाइकाची बरीवाईट गरज भागविण्याकडे उत्पादनाची प्रवृत्ति होते आणि बहुसंख्य समाजाच्या जीवनाचें पोषण व संवर्धन करणें हें जें कोणत्याही उत्पादनाच प्रमुख कार्य तें होऊं शकत नाहीं. परदेशी बाजार मिळणें अशक्य झालें आणि युद्धाचा वकूब अंगांत नसला तर त्या राष्ट्रांतले भांडवलदार नफ्याच्या अभावीं उत्पादनच थांबवितात आणि त्यामुळें बेकारी भडकत जाते. ज्यांना युद्धाची खुमखुम आहे ते युद्धें माजवितात. एकंदरीनें ज्या मागासलेल्या राष्ट्रांना अर्थोत्पादनामध्यें नव्यानें प्रगति करून घ्यावयाची आहे, त्यांनीं तरी आतां भांडवलशाहीचा अनावर फाफटपसारा पसरून त्यापासून उद्भवणाऱ्या अनावर अनर्थपरंपरेमध्यें गुरफटून जाऊं नये. सोव्हिएट समाजवादी पद्धतीमध्यें वरील सर्व अनर्थ टाळतां येतात. मल

येथें रशियांतील सोव्हिएट समाजवादी पद्धति चांगली आहे किंवा नाहीं यासंबंधानें कांहींच आग्रहानें म्हणावयाचें नाहीं. सोव्हिएट समाजवादी पद्धति रशियांत आज जी आहे ती चांगलीच आहे असें मला व्यक्तिशः वाटतें. पण वाचकांवर हें मत मी लादूं इच्छीत नाहीं. रशियांत कांहींही असो, हिंदुस्थानमध्यें सोव्हिएट समाजवादी पद्धति अमलांत आणली गेली पाहिजे असें माझें निश्चित मत आहे. तेवढेंच येथें मी मांडतों.

हिंदुस्तानांत जी सोव्हिएट समाजवादी पद्धति अमलांत आणावयाची तिचें स्वरूप काय? हें स्वरूप सांगण्यासाठीं एखाद्या 'फॉर्म्युल्या' चा ठोकळा मांडून भागणार नाहीं. हिंदुस्थानच्या विद्यमान आर्थिक परिस्थितींतून ती पद्धति कशी निर्माण करतां येईल व करावी लागेल हें पाहिलें पाहिजे. तें पाहतांना येथील सोव्हिएट समाजवादाचें स्वरूप आपोआप व्यक्त होत जाईल. आज हिंदुस्थानची आर्थिक पुनर्घटना करण्याचें काम समाजवाद्यांनीं अंगावर घेतलेलें नाहीं. मुख्यतः येथील भांडवलदार व राष्ट्रवादी पुढारी यांनीं या आर्थिक उत्कर्षकार्यांत पुढाकार घेतला आहे. त्यांच्या हातून कांहींच कार्य होणार नाहीं असें कोणास वाटेल तर तो भ्रम आहे. कॉंग्रेस मंत्रिमन्डळें प्रतिगामी आहेत असा ओरडा जहाल मताचे लोक करीत असतां स्वतः कॉंग्रेस मंत्रिमंडळें कासवाच्या धिम्या पण निश्चयी धोरणानें मजल दरमजल करीत आपला मार्ग काढीत आहेत. संयुक्त प्रांतांतील जमीनदारी–नाशाची योजना, मुंबई इलाख्यांतील कुळकायदा, खोती बिल, या सर्व योजना कॉंग्रेस मंत्रिमंडळें नेटानें पुढें रेटीत आहेत. या कामीं लवकरच मंत्रिमंडळाचा ब्रिटिश भांडवलशाहीशीं अथवा नोकरशाहीशीं झगडा होईल आणि कॉंग्रेस मंत्रिमंडळांचे हातपाय आखडतील असें कांहीं लोकांना वाटतें. पण तसें होणार नाहीं. कारण कॉंग्रेस मंत्रिमंडळें जो कार्यक्रम अवलंबीत आहेत तो समाजवाद्यांना जसा योग्य वाटणारा आहे, तसाच हिंदी भांडवलदार व ब्रिटिश भांडवलदार यांनाही तो कार्यक्रम आपल्या लगामीं लावतां येईल अशी आशा वाटते. यामुळें एकीकडून कॉंग्रेस मंत्रिमंडळांच्या कार्यास पाठिंबा देणें हें जसें समाजवाद्यांना इष्ट व अपरिहार्य वाटेल त्याचप्रमाणें दुसरीकडून हिंदी भांडवलदार व ब्रिटिश भांडवलदारांची हस्तक ब्रिटिश नोकरशाही यांनाही कॉंग्रेस मंत्रिमंडळाला

उचलून धरावें असें वाटत आहे, याकडे समाजवाद्यांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे. मुस्लिम लीगसंबंधानें ब्रिटिशांचें धोरण जें अगदींच अकस्मात उरफाटें झालें आहे, त्यावरून कॉंग्रेसशीं कांहीं झालें तरी तडजोड करावयाची हें ब्रिटनचें नवें धोरण उघड होतें. याचा हेतु ब्रिटिशांना आंतरराष्ट्रीय राजकारणांत कॉंग्रेसचें पाठबळ हवें हा तर आहेच, पण शिवाय कांहीं मर्यादेपर्यंत कॉंग्रेसचें आर्थिक धोरण ब्रिटिश व हिंदी भांडवलदारांना इष्ट वाटतें हेंही याचें कारण आहे. कॉंग्रेसचें धोरण बहुसंख्य जनतेचें दारिद्र्य घालवावें हें आहे. त्याबरोबरच हिंदुस्थानांत हिंदी व ब्रिटिश भांडवलदारी मालाला गिऱ्हाईक मिळून येथें भांडवलशाही संघटना मजबूत व वर्धिष्णु होण्यास सामान्य जनतेची खरेदीशक्ति वाढणें हें हिंदी व ब्रिटिश भांडवलदारांनाही इष्ट वाटतें; म्हणून या देशांतील जमीनदारी पद्धति, खोती-पद्धति इतकेंच नव्हे तर रयतवारी पद्धतिही एकंदरीनें शेतकरी समाजाचें दारिद्र्य वाढविण्यास कारण झाली आहे. म्हणून या पद्धति नष्ट करून अथवा सुधारून शेतकरी सबल करण्याच्या कॉंग्रेसमंत्र्यांच्या धोरणास हिंदी व ब्रिटिश भांडवलदार वर्गाचा पाठिंबाच मिळेल. पण कॉंग्रेस मंत्रिमंडळें आपल्या धोरणाची बजावणी करीत असतां आणि ब्रिटिश नोकरशाही व हिंदी भांडवलदार या धोरणाचें स्वागत करीत असतां भांडवलदार वर्ग आपल्या हिताच्या दिशेनें कॉंग्रेस सरकारला खेचीत नेईल; त्याविरुद्ध समाजवाद्यांना सावधगिरी बाळगावी लागेल.

हा मुद्दा विशद करण्याला मुंबई इलाख्यांतील कुळ-कायद्याचें उदाहरण विचारांत घेण्याजोगें आहे. या कायद्यानें कायम अथवा दीर्घकालीन वहिवाटीचे हक्क कुळांना दिले यामुळें त्यांना जमिनीबद्दल आस्था उत्पन्न होईल हें खरें. पण तेवढ्यामुळें जमिनीची प्रगति होईलच अशी खात्री नाहीं. कुळें अडाणी, बेजबाबदार आणि अदूरदृष्टीचीं आहेत. तीं जमीन सुधारण्यापेक्षां मालकास सतावण्याचाच प्रयत्न अधिक करतील. यामुळें ऐदी व त्रस्त असे जमीन-मालक जमिनी विकूं लागतील आणि त्या जमिनी बडे भांडवलदार घेतील. हे भांडवलदार शेतीचीं सुधारलेलीं साधनें आणून मोठ्या प्रमाणावर मोठ्या भूक्षेत्रांत भांडवलशाही पद्धतीची शेती करूं शकतात. त्यासाठीं मग "मजूर नेमून मी स्वतः शेती करणार आहे"

असें सांगून कायम वहिवाटीच्या कुळासही मजूर बनविण्याची सोय भांडवलदारासाठीं कुळकायद्यानें करून ठेविली आहे. अशा भांडवलदारी शेतीमुळें शेतीची प्रगति खास होईल आणि आजच्यापेक्षां शेतकऱ्याची मिळकतही खास वाढेल. पण अखेर शेती व कारखानदारी यांत भांडवलशाही संघटनाच वाढून वर म्हटल्याप्रमाणें हे भांडवलदार आपल्या नफ्यासाठीं बाहेरचे बाजार शोधतील व महायुद्धें ओढवून घेतील. शेतीच्या व इतर क्षेत्रांत भांडवलशाहीची भरभराट होण्यापासून येथें दुसरा एक फार मोठा तोटा होणार आहे. आज हिंदुस्तानांत जी भांडवलशाही संघटना आहे तींत मुख्यतः कांहीं विशिष्ट प्रांतांतील भांडवलदारच प्रभुपदावर आहेत. गुजरातचे हिंदु गुजर आणि मुसलमान खोजा, मेमन व बोहरी, मुंबईचे पार्शी, राजपुतान्यांतले मारवाडी सिंधचे सिंधी भांडवलदार आणि मद्रासचे चेट्टी यांनीं अखिल हिंदुस्थानांत शहरापासून खेड्यापर्यंत भांडवलशाही स्थापून बहुसंख्य जनतेच्या आर्थिक नाड्या आपल्या हातीं ठेवल्या आहेत. महाराष्ट्रांत पेशव्यांचें आणि उत्तरेंत मोगलांचें राज्य होतें तेव्हां या दोन्हांच्याही राज्यांत शहरापासून खेड्यापर्यंत गुजर अथवा मारवाडी यांचेंच आर्थिक अधिराज्य होतें. आज कलकत्ता शहरांत ब्रिटिश व मारवाडी यांच्याच मोठमोठ्या मिळकती आहेत. नागपूरवऱ्हाडाकडे हल्लीं मारवाडी समाजाचें वर्चस्व फार माजलें असून मुंबईस गुजराथी व्यापारी आणि धंदेवाला हा आर्थिक सर्वाधिकारी आहे. आणि म्हणूनच कांग्रेससंघटनेमध्यें 'किंगमेकर्स' हा बहुमान जागोजाग गुजर व मारवाडी यांना मिळाला आहे हें अनेकदां पाहायला मिळतें.

अनेक प्रकारच्या भेदांनीं आणि वितुष्टांनीं फुटलेल्या व किडलेल्या या राष्ट्रांत आणखी प्रांतिक वितुष्टें माजविणें हा माझा हेतु नाहीं. मला म्हणायचें आहे तें हें कीं या देशाची भांडवलशाही पद्धतीनें प्रगति करायची झाल्यास निरनिराळ्या प्रांतांतील भांडवलदारांना आपल्या प्रांतांत भांडवलशाहींतलें प्रभुपद मिळणार नसून अखिल भारतीय भांडवलशाहीचा मक्ता कित्येक शतकें आपल्या हातीं बाळगणाऱ्या वर सांगितलेल्या विशिष्ट प्रांतांतल्या भांडवलदारांच्याच हातीं सर्व प्रांतांची शेंडी जाईल. त्या त्या प्रांतांतील लहान लहान भांडवलदार हे या बड्या भांडवलदारांचे हस्तक, दुय्यम

अथवा गुलाम होतील आणि निरनिराळ्या प्रांतांतील एकंदर समाज गुलाम अथवा हमाल बनेल. त्या परिस्थितींत निरनिराळ्या प्रांतांचा उत्कर्ष होत राहीलच. पण वालचंद शेटजींचा उत्कर्ष हाच महाराष्ट्राचा उत्कर्ष असें मानावें लागेल. महाराष्ट्राची प्रगति याच दिशेनें करण्याचें ठरल्यास पुढील वीस वर्षांत महाराष्ट्रांतली बरीच शेतजमीन गुजर व मारवाडी हे खरेदी करतील असा माझा तर्क आहे. वऱ्हाडांत गेल्या वीस वर्षांत या दिशेनें पुष्कळ 'प्रगति' झालेली असून ती लक्षांत घेतां माझा वरील अंदाज मोठासा भरमसाट आहे असें मानण्याचें कारण नाहीं. आजही महाराष्ट्रांतील तालुक्यांच्या गांवीं नजर फिरविली गेल्यास शेती व व्यापार या क्षेत्रांत महाराष्ट्रीयेतरांचेंच पाऊल पुढें पडत असल्याचें दिसून येतें.

या सर्व देशाची म्हणजेच त्यांतील प्रांतांची आर्थिक प्रगति भांडवल-शाही पद्धतीनें करणें वर दर्शविल्याप्रमाणें अनेक दृष्टींनीं अनिष्ट आहे असें पाहिल्यानंतर वर जी सोव्हिएट समाजवादी पद्धति म्हटली ती कोणती हें आतां पाहूं. त्यासाठीं फार मोठा ग्रंथसंभार अथवा विद्वत्ता अथवा विदेश-प्रवास यांची गरज नाहीं. सातारा जिल्ह्यांतील अडाणी शेत-कऱ्यांनीं जो प्रयोग कांहींसा खडबडीत मार्गांनीं करून पाहिला त्याच प्रयोगास सोव्हिएट समाजप्रयोग असें मानण्यास कांहींही प्रत्यवाय नाहीं. यालाच ग्रामराज्य अथवा रामराज्य असेंही कोणी म्हणतात. पैकीं रामराज्य हा शब्द अगदीं चूक आहे. रामराज्य म्हणजे सुराज्य. प्रजेचें लेकराप्रमाणें पालन करण्याचें धोरण भांडवलदारांनीं अवलंबिलें तर भांडवलदारांचें राज्यही रामराज्य होऊं शकतें. पण तें ग्रामराज्य नव्हे. तें सोव्हिएट नव्हे. ग्रामराज्य अथवा सोव्हिएट राज्य म्हणजे ग्रामस्थांचें, ग्रामस्थांनीं ग्रामस्थांसाठीं चालविलेलें राज्य. त्यांत धनोत्पादनसाधनें सार्व-जनिक मालकीचीं असून त्यांचा वापर सार्वजनिक हितासाठीं व्हावा लागतो. रशियांत अशा प्रकारची राज्यपद्धति तेथील लक्षावधि खेड्यांत असून तो रशियन संघराज्याचा पाया आहे. या संघटनेसच तेथें सोव्हिएट पद्धति म्हणतात. अलीकडे गांधींनींही प्रत्येक खेडें हें प्रजाराज्य बनलें पाहिजे असें म्हटलें असून साताऱ्यांतील ग्रामराज्य-संस्थापकांनीं आपल्या अडाणी मनांत हीच ग्रामराज्याची ओबडधोबड मूर्ति बनविली होती. साताऱ्याचा तो

इतिहास तूर्त इतिहासांत जमा झाल्यासारखा दिसत असला तरी लोकमनांत त्याला कायमचें स्थान प्राप्त झालें आहे आणि काँग्रेस मंत्रिमंडळाला अखेर त्याच दिशेनें पाऊल टाकण्यास सर्वांनीं साहाय्य व सक्ती केली पाहिजे.

मुंबईच्या काँग्रेस मंत्रिमंडळापुढें हा प्रश्न फार दूरचा नसून पुढल्याच पावलीं तो उद्भवणारा आहे. कुळांना कायम अथवा दीर्घकालीन वहिवाटीचे हक्क देणें हें प्राथमिक कार्य मंत्रिमंडळानें पार पाडलेंच आहे. पण अडाणी शेतकऱ्यास पुढें काय करायचें हें कळणार नाहीं. नव्या हक्काचा फायदा घेऊन मालकांस सतावण्याचे उद्योग तो सुरू करील. त्यामुळें वर म्हटल्या-प्रमाणें मालक हताश होऊन भराभर जमिनी विकतील व भांडवलदारांच्या हातीं जमिनी जाऊन शेतकरी हा लवकरच कुळ राहण्याऐवजीं मजूर होईल. हा अनर्थ टाळावयाचा असेल तर सरकारनें शेतकऱ्यास हातीं धरून यापुढें मार्गदर्शन केलें पाहिजे. शेतकऱ्याच्या धान्यविक्रींतील अडत काढून टाकून सरकारनें योग्य दरानें त्यांचें धान्य विकत घेण्याचें पत्करलें आहे हें चांगलेंच आहे. त्यामुळें शेतकऱ्याची मिळकत वाढली आहे. पण त्यास बैल, औतें वगैरे खरेदी करण्यास भांडवलाचा पुरवठा व सरकारी नियं-त्रणाचें साहाय्य देणें अवश्य आहे. ही जबाबदारी सरकारनें घ्यायची तर सरकारनें एकदम सामुदायिक शेतीसच हात घातला पाहिजे. यासाठीं मालकी हक्क नष्ट करण्याची जरूरी नाहीं. पण एकेका गावची सर्व जमीन सामुदायिक वहिवाटींत सक्तीनें आणली पाहिजे. त्यासाठीं वयांत आलेल्या नागरिकांच्या मताधिकारानें निवडलेल्या ग्राम-पंचायतीकडे जमीनवहिवाटीचे अधिकार जमीनमालकांनीं व कुळांनींही देणें अवश्य ठरेल. म्हणजे मग सर्व गांवच्या जमिनींची पाहणी करून योजना आंखणें शक्य होईल. याच ग्रामपंचायतीनें ग्रामिकांच्याकडून भांडवल घेऊन सहकारी पतपेढी काढावी. अशा अनेक खेड्यांच्या योजना तालुक्यांत एकत्र कराव्या, तालुक्यांच्या जिल्ह्यांची जुळणी करून ती मंत्रिमंडळापुढें मांडावी म्हणजे सगळ्या प्रांताचें जीवन एका सूत्रांत आणि एका आंखणींत येईल. हें कार्य केवढें व्यापक व मूलग्राही असेल हें समजण्यास एकच उदाहरण पुरे होईल. बैल ही शेतकऱ्याची फार मोठी गरज. आज एकेकट्या शेतकऱ्यास ही गरज भागवावी लागत असल्यानें बैलापायीं शेतकरी कर्जांत मरतो आणि बैल

रोगराई आणि उपासमार यांस बळी पडून चांगल्या जनावराची पैदास कोणीच करीत नाहीं. पण सामुदायिक शेतीचा अवलंब केल्यास इलाख्याला सालोसाल लागणारे बैल निर्माण करण्याचें एक खातेंच सरकारला चालवितां येऊन, गाईच्या दुधाचा भरपूर पुरवठा इलाख्यास करण्याची योजनाही त्यांतच हातीं घेतां येईल. शेतीचा धंदा अशा प्रकारें बरकतीचा झाला म्हणजे त्यांतून भांडवल उरेल तें खेडुतांचे धंदे वाढविण्यास नवीं गांवें व नवीं घरें बांधण्यास उपयोगीं पडेल. समाजवादी जीवन तें हेंच. त्याचा अधिक तपशील येथें देत नाहीं. महाराष्ट्राची व महाराष्ट्रासारख्या मागासलेल्या इतर प्रांतांची प्रगति साधण्याचा हा एकच मार्ग आहे, एवढेंच माझें म्हणणें.

हिंदुस्तानची आर्थिक प्रगति याचा भांडवलशाही अर्थ कांहीं प्रांतांतील भांडवलदारांची साऱ्या देशावर आर्थिक पक्कड स्थापन होणें असा असून निरनिराळ्या इतर प्रांतांना ह्या परिस्थितींत गुलामच व्हावें लागेल. उलट निरनिराळया प्रांतांची म्हणजे त्यांतील जनतेच्या आर्थिक जीवनाची प्रगति व्हायची असेल तर त्यासाठीं वर सांगितल्याप्रमाणें समाजवादी धोरणें आणि दृष्टिकोन पत्करणें अवश्य असून खरी राष्ट्रीय प्रगति म्हणजे निरनिराळया प्रांतांचा उत्कर्ष हीच होय.

महाराष्ट्राच्या उत्कर्षासाठीं महाराष्ट्राचा पृथक्प्रांत बनवून मुंबई त्याची राजधानी करणें अत्यवश्य आहे. नागपूर प्रांत, वऱ्हाड, मराठवाडा, गोंवें व आजच्या महाराष्ट्रांतील दहा जिल्हे यांचें एकीकरण करण्याची चळवळ सुरू झाली असून ती इष्टच आहे. पण त्यासाठीं त्या त्या विभागांतील जनतेची समति मिळविणें सोपें नाहीं. नागपूर, वऱ्हाड, मराठवाडा, गोंवें वगैरे सर्व ठिकाणां-हून एकीकरणास विरोध ऐकूं येत आहे. तथापि ही एकीकरणाची चळवळ करतांना प्रथम महाराष्ट्राच्या आजच्या अकरा जिल्ह्यास मुंबई शहर जोडून तो अलग प्रांत करावा येथून या एकीकरणाच्या चळवळीस सुरवात झाली पाहिजे. मुंबई हें या देशांतील सर्व प्रांतांचें शहर आहे असें मानण्यांत येतें आणि या शहरांत सर्व प्रांतांतील माणसें असल्यानें तें म्हणणें अंशतः खरेंही आहे. पण मुंबई शहर कोणत्या प्रांतास जोडावें या प्रश्नाचा निर्णय मुंबईत किती प्रांतांचीं माणसें आहेत यावरून ठरत नाहीं. मुंबईवर कोणाचें आर्थिक

जीवन किती अवलंबून आहे आणि भौगोलिक दृष्ट्या मुंबई कुणाशीं जोड-लेली आहे यावरून मुंबई कोणत्या प्रांतांत समाविष्ट व्हावी हें ठरवावें लागेल महाराष्ट्राच्या अकरा जिल्ह्यांचाच मुंबईस वेढा पडलेला असून मुंबई ही महाराष्ट्राचाच विभाग आहे. तसेंच महाराष्ट्रीय जनता ही मुंबईत इतर कोणत्याही एकएका प्रांतिक लोकसंख्येपेक्षां अधिक असून मुंबईचा जीवनाधार असा जो कापडगिरणीचा धंदा त्याचा कित्येक लक्ष मजूर वर्ग हा महाराष्ट्रीय आहे. एवढ्यावरूनही मुंबई ही महाराष्ट्राचा एक विभाग आहे हें सिद्ध होतें.

पण मुंबई महाराष्ट्रास जोडावी म्हणण्याचें महत्त्वाचें कारण असें आहे कीं मुंबईतील लक्षावधि महाराष्ट्रीय मजूर महाराष्ट्राच्या अकरा जिल्ह्यांतून येत असून मुंबईतील या मजूरांची महाराष्ट्रांतील घरेंदारें; जमिनी व मिळकती यांचे संबंध तुटलेले नाहींत. खेड्यांतील जमिनीचें उत्पन्न आणि मुंबईतील मजुरीचें उत्पन्न मिळून एका कुटुंबाचा गुजारा होतो. यामुळें मुंबई व महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणच्या राहणीचा परिणाम परस्परांवर होत असतो. म्हणून मुंबईच्या कामगारांच्या प्रतिनिधींना महाराष्ट्रांतील जमीन, आरोग्य, शिक्षण, कारखानदारी यासंबंधाच्या कायदेकानूसंबंधानें बोलण्याचा अधिकार अवश्य असून महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींना मुंबईतील कामगारांच्या जीवनावर बोलण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. ही गोष्ट मुंबई व महाराष्ट्रांतील अकरा जिल्हे यांच्या एकीकरणानेंच होऊं शकेल. मुंबईस जे बिगरमहाराष्ट्रीय आहेत, त्यांचे मुलूख मुंबईपासून तुटलेले असून ते मुंबईकर म्हणजे महाराष्ट्रीयच आहेत असें त्यांनीं मानलें पाहिजे. हा एकीकरणाचा प्रश्न नुसता भाषिक नसून मुख्यतः आर्थिक आहे. आणि महाराष्ट्र व मुंबई यांची एकमेकांच्या आर्थिक उत्कर्षास जरूरी आहे. प्रत्येक प्रांताच्या अशा ज्या विशिष्ट गरजा आहेत त्यांचा परामर्ष घेतला गेला पाहिजे. मुख्यतः निरनिराळ्या प्रांतांचा उत्कर्ष हाच अखिल राष्ट्राचा उत्कर्ष होय असें मानलें गेलें पाहिजे असें माझें आग्रहाचें सांगणें आहे.

# प्रत्येक खेडें हें प्रजाराज्य व्हावें !

मुंबई मंत्रिमंडळानें कायदेमंडळांत आणलेल्या खंडकरी बिलानें धनोत्पादन साधनांच्या मालकीसंबंधीं मूलग्राही प्रश्न उत्पन्न केले असून, ज्या भूमिकेवरून मंत्रिमंडळानें खंडकरी बिलाचें समर्थन केलें आहे, तीच भूमिका मंत्रिमंडळानें कायम टिकविल्यास येथें संपूर्ण समाजक्रांति करण्याची जबाबदारी हें मंत्रिमंडळ घेऊं शकेल असें मला वाटतें. गृहमंत्री मुरारजी देसाई यांनीं साताऱ्याविषयीं जें धोरण स्वीकारलें तें योग्य असें नव्हतें. साताऱ्यांतील बंडाचें ऐतिहासिक महत्त्व त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. यामुळें नजीकचें राजकीय धोरण या दृष्टीनें मुरारजी देसाई यांचे हातून चुका झाल्या असें माझें मत आहे. पण खंडकरी बिल, धान्यपेढ्या वगैरे ज्या अनेक योजना, मुरारजीभाई, वैकुंठलाल वगैरे मंत्री हातीं घेत आहेत, त्यांवरून मुंबई सरकारचें दीर्घकालीन आर्थिक धोरण खरोखर क्रांतिकारक ठरेल अशी मला आशा वाटूं लागली आहे. मुंबई मंत्रिमंडळ जें हें धोरण अवलंबीत आहे, त्याची तात्त्विक पार्श्वभूमि सदर मंत्रिमंडळ अथवा काँग्रेस पुढारी स्पष्टपणें लोकांपुढें मांडीत नाहींत. ती पार्श्वभूमि मांडणें अवश्य आहे आणि याच दिशेनें मंत्रिमंडळानें पुढें कोणत्या योजना अवलंबाव्या याचा विचार जाहीरपणें लोकांपुढें चर्चिला गेला पाहिजे म्हणून या लेखांत तें कार्य मी करूं इच्छितो. हिंदुस्तान हा शेतीप्रधान देश आहे आणि येथें औद्योगिक क्रांति होऊं लागेल तेव्हां ती कारखानदारीच्या क्षेत्रांत होईल तशीच शेतीच्या क्षेत्रांतही करावी लागून आर्थिक उत्कर्षाच्या काळांतही हिंदुस्थानचें शेतीप्रधानत्व कायमच ठेवावें लागेल. कारण अन्नद्रव्यें व कच्चा माल याबाबत हिंदुस्तानला परावलंबी राहण्याची पाळी आल्यास टिकाऊ उत्कर्ष लाभणार नाहीं. म्हणून मंत्रिमंडळानें खंडकरी बिलापासून म्हणजे जमीनविषयक योजनेपासून आपल्या सुधारणाकार्यास सुरुवात केली ही फार चांगली गोष्ट झाली.

मुंबई सरकारच्या खंडकरी बिलानें जमीनमालकी अजिबात रद्द केली नाहीं; पण कुळांना कायम वहिवाटीचे हक्क मालकांच्या इच्छेविरुद्ध देऊन टाकण्यानें जमीन–मालकांच्या मालकी हक्कावर सरकारनें फार मोठें आक्रमण केलें ही मालकांची तक्रार खरी आहे. म्हणून जमीनमालकीच्या तत्त्वाची थोडी चर्चा येथें करणें अवश्य आहे. संयुक्त प्रांत काँग्रेसमंत्रिमंडळानें नुकं- ताच जमीनदारी खालसा करण्याचा कायदा केला. जमीनमालकी हक्कावर हें संपूर्णच आक्रमण सरकारनें केलें. तेव्हां याच न्यायानें बँका आणि कार- खाने यांवरही सरकारी मालकी स्थापित करा, अशी मागणी विरोधी पक्षां- तील मुस्लीम लीगवाल्या जमिनदारांनीं केली. मंत्रिमंडळानें ही मागणी नाकारली आणि फक्त जमिनदारी खालसा करण्यापुरतेंच मालकी हक्कावर आक्रमण केलें. तेव्हां संयुक्तप्रांत सरकार भांडवलशाहीला भ्यालें, अशी टीकाही त्यावर झाली. पण फक्त जमीनदारीवर आक्रमण करणें आणि कारखाने, बँका यांच्या मालकीवर आक्रमण न करणें या धोरणांतील रहस्य मंत्रिमंडळांतील एका सभासदानें त्यावेळीं संयुक्तप्रांत असेंब्लींत स्पष्ट केलें होतें. त्याचा तो युक्तिवाद फार महत्त्वाचा आहे. ज्या हक्काचा नाश केला असतां समाज–जीवनांत पोकळी निर्माण होत नाहीं, उलट समाजाचें जीवन अधिक सुखकर होतें, असा हक्क नष्ट करणें अवश्य आहे असें तो म्हणाला. पोकळी ( व्हॅक्युअम् ) आपल्याभोंवतीं निर्माण झाल्यास श्वासोच्छ्वास करणें अशक्य होऊन आपला प्राण जाईल. म्हणजे जे हक्क समाजाला जीवनसाधनें पुरवितात ते राहिले पाहिजेत व जे अडथळा करतात ते नष्ट झाले पाहिजेत, असा या प्रतिपादनाचा अर्थ आहे. या दृष्टीनें पाहतां जो जमीनमालक आपल्या जमिनीच्या सुधारणेस कारण होत नाहीं, फक्त कुळांनीं काढलेलें पीक खाण्याचा हक्क मागतो, त्याचा तो मालकीहक्क अन्याय्य ठरतो. आज कारखाने, दुकानें यांची खाजगी मालकी नष्ट करण्यास कांग्रेस धजत नाहीं, याचें कारण तेथें खाजगी नफ्याच्या लोभानें कां होईना, बँका, कारखाने, दुकानें या संस्था जास्तींत जास्त कार्य- क्षम ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. या संस्थांची संघटना मालकशाहीनें आपल्या लगामीं ठेवली असून ही मालकशाही एकदम नष्ट केल्यास या संस्था उध्वस्त होऊन समाजजीवन संकटांत येईल–म्हणजेच पोकळी

निर्माण होईल–अशी सरकारला रास्त धास्ती वाटते. म्हणूनच बँका व कारखाने सरकारी मालकींत आणण्याचें नाकारून संयुक्तप्रांत सरकारनें फक्त जमिनदारी तेवढीच खालसा केली. यावरून संयुक्तप्रांत सरकार सोशॅलिस्ट नाहीं अशी टीका कोणीही करावी; पण मालकी हक्क ही मोठीशी पवित्र बाब आहे असें काँग्रेस मानीत नसून बँका, कारखाने या क्षेत्रांतली मालकशाही नष्ट करण्यास योग्य वेळीं कांग्रेस तयार होईल याबद्दल शंका राहत नाहीं.

⁂

जमिनदारी प्रांतांतील जमीनमालकी जशी शेतीच्या उत्कर्षास कारण झाली नाहीं तशीच महाराष्ट्रासारख्या रयतवारी प्रांतांतली जमीनमालकी ही जमिनीच्या उत्कर्षास कारण झाली नाहीं. ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासूनच्या दीडशें वर्षांत जमीनमालकांनीं शेतीच्या उत्कर्षाचे प्रयत्न फार थोडे केले. ऊस, तंबाकू, फळें यांसारखीं पैसे देणारीं पिकें जमीनमालकांनीं भांडवल घालून काढलीं. तांदूळ, गहूं या पिकांच्या जमिनी सुधारण्याचे प्रयत्न त्या मानानें फार कमीच झाले आणि ज्वारी, बाजरी, मका इत्यादि पिकें काढणाऱ्या जमिनींत भांडवल घालण्याचा उत्साह मालकवर्गानें कधींच दाखविला नाहीं. ब्रिटिश अंमलापूर्वी जमिनमालक हे बव्हंशानें स्वतां शेतकरीच असत. जे मालक जमीन खंडानें देत ते जमिनींत भांडवल घालीत आणि पीक ज्या मानानें होई त्या मानानें त्यांना खंड मिळे. सावकार व जमीनमालक यांना कुळांकडून घेणें वसूल करण्यास त्या वेळच्या सरकारकडून मदत फारशी मिळत नसे. राज्यसंस्था दुर्बल असून खेड्यापाड्यांत तिची कदर फारशी चालत नसे. यामुळें कुळें राजीखुषीनें योग्य वाटेल तें देणें भागवीत. तेवढ्यांतच सावकार व जमीनमालक यांना समाधान मानावें लागे. तरीही सावकार व जमीनमालक कुळांना जमिनीचें पीक अधिक यावें यासाठीं साहाय्य, उत्तेजन व मार्गदर्शन देत. पण ब्रिटिश अंमलांत ही सर्व परिस्थिति पालटली. सैनिकीचा धंदा बुडाला व अनेक खेडूत बेकार झाले. ब्रिटिशांच्या धोरणामुळें खेड्यापाड्यांतील धंद्यांची आबाळ होऊन ते बुडून गेले व बेकारींत आणखी भर पडली. या सर्व बेकारांचा भार शेतजमिनीवर पडून शेतजमिनीची मागणी वाढली आणि अर्थातच

मालकांचा खंड वाढत गेला. पीक वाढेल त्या मानानें खंड वाढला तर तें नैसर्गिक ठरेल. पण जमीन तितकीच राहून फक्त कसणाऱ्यांची संख्या वाढण्यामुळें खंडवाढ म्हणजे दरमाणशीं जमिनीचें उत्पन्न कमी येऊनही खंड वाढला असा हा विपरित प्रकार होता. बरें, पीक झालें नाहीं म्हणून खंड कमी घालणें शक्य नव्हतें. कारण आतां म्हणजे ब्रिटिश अमलांत पोलीस व बेलिफ खंडाचा करार क्रूरपणानें अमलांत आणण्यास तयार होते. यामुळें घरादाराच्या जप्तीच्या भीतीनें शेतकरी केवढाही खंड भरण्यास राजी होई. पण यामुळें शेतकऱ्यांची हलाखी वाढून शेतीबद्दलचा त्यांचा उत्साह कमी झाला. यामुळें मालकांना खंड वसूल करणें अखेर जिकीरीचें होऊं लागून, जमिनींत भांडवल घालण्याचा मालकांचा उत्साह कमी कमी होऊं लागला. याच वेळीं इंग्रजी शिकणें, शहरांत घरें बांधणें, कंपन्यांत भागीदारी घेणें इत्यादि पैसा गुंतविण्याचीं इतर साधनें मालकवर्गास दिसूं लागून शेतीचा पैसा अन्य दिशेनें गेला व शेतीची नुसती नासाडी वाढत राहिली. जमीनमालक नोकरी धंद्यांत शिरून शेतकीच्या उत्पन्नाखेरीज इतर उत्पन्नावर ऐषआराम करूं लागला आणि बहुसंख्य शेतकरी समाजाचें दारिद्र्य मात्र वाढत गेलें. जमीन हें बहुसंख्य गरीबांचें उत्पन्नाचें एकमेव साधन. पण मालकांच्या खंडलोभापायीं सालोसाल चढाओढींत जमीन हातची जाण्याचा धोका कुळा-पुढें होता. यामुळें जमीन कसण्याचा उत्साह शेतकऱ्यांत न राहून दारिद्र्य वाढत गेलें होतें. जमीनमालकांचा मालकी हक्क जमिनीचा नासाडी करण्यास अशा प्रकारें कारण झाला होता. या मालकी हक्काचा अंशभाग कुळांना देणें हें जमिनीच्या प्रगतीसाठींच अवश्य होतें. म्हणून कूळकायद्यानें शेतकऱ्यांना जमीन वहिवाटीचा कायम हक्क दिला.

⁂

मालकी हक्काच्या मूलतत्त्वाला कॉंग्रेस मंत्रिमंडळानें अशा प्रकारें हात घातला ही त्याची फार मोठी कामगिरी होय. पण जनतेच्या जीवनाची जबाबदारी आपणावर आहे, असें मानून सरकारनें मालकी हक्काची ही जी मोडतोड केली त्यामुळें कॉंग्रेससरकारची जबाबदारी आणखी पुष्कळ वाढली

आहे. शेतीच्या कुळाकडे जमिनीची कायम वहिवाट सोंपविल्यानें जमिनीची मशागत शेतकरी अधिक करीलच अथवा शेतीच्या प्रगतीस इतर अनुकूल परिस्थिति लाभेलच असें म्हणतां येणार नाहीं. शेतकऱ्याचा अज्ञाणीपणा, त्याचा एकटेपणा व बाजारांत होणारी त्याची कैची अशीं अनेक संकटें शेतकऱ्याच्या प्रगतीच्या आड येत आहेत. शेतकऱ्याच्या प्रगतीसाठीं आजवर अंमलात आलेले उपाय किती वरवरचे आणि देखाव्याचे होते हें सहकारी पतपेढ्यांच्या उदाहरणावरून समजतें. सहकारी पतपेढ्यांमुळें शेतकऱ्याला स्वस्त कर्ज मिळूं लागलें आणि कर्ज काढण्याचें त्यांचें व्यसन मात्र वाढत गेलें. पण ज्या कारणांनीं शेतकरी कर्जबाजारी होतो, तीं कारणें कांहीं नष्ट झालीं नाहींत. शेतकरी आपल्या गरजेला लागणाऱ्या वस्तु खरेदी करण्यास बाजारांत गेला कीं नाडला जातो. त्याला बैल खरेदी करायचा असला तर प्रथम तो बैलाच्या किंमतीसाठीं सावकाराला बळी पडतो. नंतर बाजारांत बैल विकणारा त्याचकडून फाजील किंमत घेतो. नंतर बैल घरीं आणला तरी बैलाच्या दवाखान्यांची सोय गांवोगांव नसल्यानें बैल रोगराईस बळी पडतो. शेतीस लागणारीं औतें, बीं-बियाणें यांच्या खरेदीचीही सर्व रड हीच असते. यानंतर खुद्द शेतीचा प्रश्न येतो. शेतकऱ्यांची आजची शेती बिनहिशेबी असून जगांतल्या सुधारलेल्या पद्धतींना शेतकरी अगदींच पारखा आहे. म्हणून सरकारला शेतीचें उत्पन्न वाढवावयाचें असेल तर शेतकऱ्यांच्या शेतीव्यवहाराचें नियंत्रण करणें जरूर आहे. यापुढें जमीनमालक स्वतः शेतींत येऊन, भांडवल घालून, सुधारलेलीं साधनें वापरून व मजूर लावून शेती करतील तर जमिनींचें पीक वाढेल. पण त्यामुळें भांडवलदारी–कारखानदारीप्रमाणें शेतमजुरांची पिळणूक वाढून शेतीच्या क्षेत्रांत कफल्लकांची गर्दी होईल. त्यानंतर भांडवलदारी उत्पादनांतील सर्व संकटें या शेतीव्यवसायावर कोसळतील. म्हणून शेतीच्या क्षेत्रांत भांडवलदारी शेतीस उत्तेजन न देतां सरकारनें स्वतांच्या देखरेखीखालीं व नियंत्रणाखालीं सामुदायिक शेतीचा प्रयोग दर जिल्ह्यांतल्या कांहीं खेड्यांत करून पाहिला पाहिजे. त्यासाठीं जमीनमालकी रद्द करण्याची जरूरी नाहीं. पण जमिनीचा अनिर्बंध वहिवाट करण्याचा हक्क मालकाचा व कुळाचाही काढून घेऊन शेती सामुदायिक नियंत्रणाखालीं आणली पाहिजे. एकेका खेड्याची जमीन

सर्व एकदम विचारांत घेऊन व सर्व खेड्याची योजना आंखून जमिनीची सुधारणा केल्यास शेती हा आज जो एक जुगाराचा व्यवहार झाला आहे, तो तसा रहाणार नाहीं आणि शरीरसंवर्धनाचें मुख्य धन जें अन्न-वस्त्र त्याच्या साधनांची भरपूर तरतूद होईल.

⁂

सामुदायिक शेती हा सामुदायिक जीवनाचा खरा पाया आहे. हें कार्य लोकांकरवीं लोकशाही पद्धतीनें करविलें पाहिजे. अर्थात् खेड्यांची प्रातिनिधिक अशी जी ग्रामसंस्था तिजमार्फतच तें कार्य घडवून आणलें पाहिजे. ही ग्रामसंस्था वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांच्या मतानें निवडली जाऊन गांवाचा महत्त्वाचा सर्व कारभार तिजवर सोपविला गेला पाहिजे. सर्व जमीनमालकांच्या कबुलायती सदर ग्रामपंचायतीस देऊन त्या ग्रामपंचायतीनें जमिनीच्या खंडाची हमी घ्यावी. स्वतांचें शेत स्वतः करणाऱ्या जमीनमालकानेंही आपली जमीन ग्रामपंचायतीकडे देऊन मग तिजकडून ती लावण करून घ्यावी. सध्यांच मोठीं यंत्रें आणण्याची गरज नाहीं. पण बैल व इतर अवजारें यांची गांवास जी गरज लागेल त्याची खरेदी सरकारमार्फत करावी. पुढें हा प्रयोग सार्वत्रिक झाल्यास एका सबंध प्रांतास सालोसाल लागणारे बैल शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून उत्पन्न करण्याची योजना सरकार आंखूं शकेल. शेतकऱ्याच्या एकेक कुटुंबास साधारण दहा ते बारा एकर जमीन देतां येईल असे जमिनीचे तुकडे पाडण्यांत यावे. नंतर कोणत्या जमिनींत पीक कोणतें काढावें, पीकपालट कसा करावा अथवा एकादी जमीन एकादे सालीं मुळींच पिकवूं नये कीं काय याचा विचार ग्रामपंचायतीनें शास्त्रज्ञ व अनुभवी शेतकरी यांच्या सल्ल्यानें करावा. तसेंच जमिनींत झाडें लावणें, ताली बांधणें आणि अन्य प्रकारें जमिनीची दुरुस्ती करणें हीं कार्यें सामुदायिक पद्धतीनें करावीं. बैल निर्माण करण्याची सामुदायिक योजना आखण्यांत येऊं लागल्यास खेड्यांत गायरानाची व्यवस्था करावी लागेल आणि गांवांत दूधदुभत्याचा भरपूर पुरवठा करता येईल. प्रत्येक शेतकऱ्यास मशागत वेगवेगळी करूं द्यावी. पण नांगरणी, पेरणी, भांगलणी, कापणी, मळणी अशीं अनेक कामें सामुदा-

यिकपणें करणेंच योग्य ठरेल. यानंतर शेतकऱ्यांचें पीक विकण्याची जबाबदारी सरकारनें म्हणजे ग्रामपंचायतीनें घेतली पाहिजे. म्हणजे शेतकऱ्याच्या मालास भाव चांगला येऊन त्याची मिळकत वाढेल आणि ग्रामपंचायतीला मालकांचा खंड भागवितां येईल. आज सरकारनें आपली रेशनिंग योजना पार पाडण्यासाठीं सक्तीची धान्यभरती शेतकऱ्यावर लादली आहे. पण त्यामुळें शेतकऱ्यांचें नुकसान झालेलें नाहीं. उलट जमीनमालकाचा खंड, सावकाराचें व्याज आणि बाजारांत इतर मालाची खरेदी यासाठीं पैसा हवा म्हणून शेतकरी व्यापाऱ्यांस आपलें पीक विकण्यास जाई आणि व्यापारी तें पाडून घेई; यामुळें आजवर शेतकऱ्याची होणारी लूट बंद झाली आहे. हा प्रकार सरकार खालवर प्रातिनिधिक होत गेलें म्हणजे अधिक सुयंत्र व फायदेशीर होईल.

⁂

सामुदायिक शेती ही या नव्या सामुदायिक जीवनाची एक बाजू होय. दुसरी बाजू म्हणजे सामुदायिक व्यापार. आज खेड्यांत जास्तींत जास्त धनवान वर्ग हा व्यापाऱ्यांचा असतो. या व्यापाऱ्यांचें धन जें फुगतें तें तो उत्पादनाच्या अमुक एका कार्यांत साहाय्य करतो म्हणून फुगत नाहीं. अडलेल्या शेतकऱ्यास कोंडींत धरून व्यापारी शेतकऱ्याचा जास्तींत जास्त माल कमींत कमी किंमतींत खरेदी करतो आणि गिऱ्हाइकासही असेंच कोंडींत धरून जास्तींत जास्त किंमतींत कमींत कमी माल विकतो. असा दोन्हीकडून पैसा ओचून जी धनाची फुगवट अथवा सूज येते ती व्यापाऱ्यांची संपत्ति होय. एकंदर समाजास दोन्हीकडून गरीब करून व्यापारी श्रीमंत होत असतो. आणि मग एखाद्या देवळाच्या जीर्णोद्धारास, एखाद्या शाळेस अथवा दवाखान्यास अथवा कॉलेजास जेव्हां व्यापारी देणगी देतो तेव्हां आशाळभूतपणें आपण त्याचा गौरव करतों. पण ही व्यापाऱ्याची सर्व संपत्ति समाजाच्या हातीं राहती तर देवळें, शाळा आणि दवाखाने किती तरी अधिक झाले नसते काय ? याला उपाय सामुदायिक व्यापार हा आहे. सुंठ, कापड, कोयनेल इत्यादि ज्या हजारों वस्तु खेडुतांना लागत असतात त्या ग्रामसंस्थेनें सहकारी तत्त्वावर खरेदी करून दुकान

चालवावें. यासाठीं लागणारें भांडवल गांवांत सहकारी बँक काढून जमवावें आणि दुकानाच्या विक्रीतून बँकेचें व्याज व दुकानाचा खर्च वजा जातां राहणारा नफा गांवासाठीं शाळा, दवाखाने, क्रीडामंदिरें इत्यादींसाठीं खर्चावा. आज खेड्यासाठीं ज्या कोट्यवधि रुपयांच्या योजना आंखल्या जात आहेत त्यांच्या खर्चाची तरतूद केल्यावांचून ह्या कागदी योजना व्यर्थ आहेत. त्यासाठीं निरनिराळे कर बसवितां यावे म्हणून फडणीस डोकें खाजवीत आहेत व लोकमताचा क्षोभ ओढवून घेत आहेत. शेवटीं हे कर वसूल करण्यासाठीं पुष्कळ खर्च होऊन हातीं फार थोडी शिल्लक राहील. त्यापेक्षा वर सांगितलेली सहकारी जीवनाची पद्धति अवलंबिल्यास लोकांना लागणारा पैसा लोकांकडून लोकांच्या ऐपतीच्या प्रमाणांत जेथल्या तेथे मिळत जाईल. लोकांनाही आपला जीवनोत्कर्ष आपण घडवून आणतो अशी जाणीव उत्पन्न होऊन त्याचा आनंद व उत्साह अनुभवतां येईल.

प्रत्येक खेडें हें प्रजाराज्य बनावें अशी घोषणा गांधीजींनीं कांहीं दिवसांपूर्वी केली. पण हें प्रजाराज्य बनवावें कसें हें त्यांनीं सांगितलें नाहीं अथवा काँग्रेसपुढाऱ्यांनीं त्याचा विचार मांडला नाहीं. पुढील पांच दहा वर्षांत जर महाराष्ट्रांत वरीलप्रमाणें सामुदायिक शेती व सामुदायिक व्यापार यांचा योजनापूर्वक अवलंब केला नाहीं तर प्रत्येक खेड्यांत कसलें प्रजाराज्य येईल तें आतां मी सांगतों. महाराष्ट्रांतील शेती मालकाकडून खंडकऱ्याकडे जेली; पण पुढें मालक ती व्यापाऱ्यास विकतील व व्यापारी हें भांडवलदारी शेती वाढवितील आणि शेतकरी आपापल्या गांवीं आपापल्या शेतावर मजूर होतील. त्या गांवांत मग प्रौढ मताधिकारावर ग्रामपंचायत निवडून येईल आणि एखादा व्यापारी अथवा लोकशाहींतला गुंड अध्यक्ष निवडला जाऊन तेंच गांवीचें प्रजाराज्य ठरेल. जनतेला फक्त आर्थिक गुलामगिरी व प्रजाराज्याचा देखावा यांचा लाभ होईल. ही फसवणूक चुकवायची असेल तर वर मीं सांगितलेला कार्यक्रम काँग्रेस मंत्रिमंडळानें अंमलांत आणला पाहिजे. खंडकरी बिलानें एकदां जमीनमालकीवर आक्रमण केल्यानंतर आतां सर्व समाजाचें जीवन आपल्या हातीं सरकारनें घेतलेंच पाहिजे. अर्धी सुधारणा ही सुधारणा न होतां नासाडी ठरते. अशा ग्राम-राज्यांत ग्रामसंस्थेनें निरनिराळ्या कमिट्या स्थापून राज्यकारभार करा

करावा हा तपशीलाचा प्रश्न मी येथें मांडीत नाहीं. सहकारी शेती व सहकारी व्यापार यांचा अवलंब केल्यास खेड्यांत अधिक धंदे उभारण्यास अधिक भांडवल मिळेल. शहरांत गेलेले शेतकरी जरूर तितके खेड्यांत परत आणतां येतील आणि शहरांची बांधणी खेड्यांच्या गरजेनुसार करतां येईल. औद्योगिक क्षेत्रांत सामुदायिक जीवन सुरू करणें यामुळें सहजच सुकर होत जाईल. सर्व देशाचा राज्यकारभार व अर्थकारभार या पायावर उभारला पाहिजे. मात्र नुसतें मंत्रिमंडळ हें कार्य पार पाडूं शकणार नाहीं. काँग्रेससंघटनेनें या कामीं मतप्रसार करून पुढाकारही घेतला पाहिजे.

—नवयुग, दिवाळी अंक, १९४४

# क्रांतीची अहिंसात्मक किमया

विधायक कार्यक्रम आधीं कीं क्रांति आधीं असा वाद सर्वत्र चालतो. हा वाद वृथा आहे. म्हणजे वादांतील बाजू काय आहेत त्या समजून न घेतां हा वाद घातला जातो. वस्तुस्थिति अशी असतें कीं, विधायक कार्यक्रम अशक्य झाल्यासच क्रांतीची आवश्यकता उत्पन्न होते व क्रांति शक्य होते. जीवन हें मुख्यतः विधायकच आहे. ज्या वेळीं विधायक कार्यक्रम अशक्य होतो व क्रांतीची कास धरावी लागते त्या वेळीं ही विधायक कार्यक्रमाची ठळक व तपशीलवार रूपरेषा पुढाऱ्यांच्या व जनतेच्या डोळ्यापुढें असावी लागते. काय घडवून आणण्यासाठीं क्रांतीची जरूरी आहे हें कळतें व क्रांतीचे मार्गहि त्या विधायक कार्यक्रमाच्या जाणीवेंतूनच सुचतात. काँग्रेसची चूक आजवर झालेली आहे ती विधायक कार्यक्रमावर भर देण्यांत झालेली नाहीं. विधायक कार्यक्रमाचे जे १४ मुद्दे गांधींनीं सांगितले ते महत्त्वाचे आहेतच; पण हे १४ च मुद्दे नव्हेत. मुंबईस स. का. पाटील यांनीं बोलाविलेल्या मुंबई इलाखा परिषदेस गांधींनीं जो संदेश पाठविला त्यांत कष्ट करणाऱ्याच्या मालकीची जमीन, मोठ्या कारखान्यांचें राष्ट्रीकरण व विद्यार्थीसंघटना हे आणखी तीन मुद्दे गांधींनीं मांडले. त्यांपैकीं 'कष्ट करील त्याची जमीन' हा विधायक कार्यक्रमाचा मुद्दा आहे तो सर्वांत महत्त्वाचा आहे. पण त्याकडे प्रमुख पुढाऱ्यांचें दुर्लक्ष होतें. यांत मुत्सद्देगिरी आहे. जमीन-मालकांना दुखविण्याची व सामाजिक क्रांतीची तयारी पुढाऱ्यांची नाहीं. तोंडानें 'कष्ट करील त्याची जमीन' हा उखाणा पुढारी उच्चारतात; पण सत्यसृष्टींत ही घटना आणण्यासाठीं प्रथम खंड वाढत्या प्रमाणांत कमी करण्याची चळवळ हातीं घेतली पाहिजे. त्यासंबंधानें सगळे पुढारी व कार्यकर्ते चुपचाप आहेत. त्यामुळें प्रपंचांत मजा मारणारा माणूस ज्याप्रमाणें जग नश्वर आहे व ब्रह्मानंद श्रेष्ठ आहे अशा बाता मारतो त्याप्रमाणें खंड कमी करण्याच्या प्रश्नाकडे ढुंकूनहि न पहाणारे पुढारी 'कष्ट करतो त्याची जमीन' हे

शब्द बडबडत असतात. बाकीच्या विधायक कार्यक्रमाचा जपजाप्यही, केवळ या क्रांतिकारक विधायक कार्यक्रमाकडे कार्यकर्त्यांचें लक्ष जाऊं नये व आपण कांहीं तरी राष्ट्रकार्यांत रत आहों असा भ्रम त्यांना होऊन स्वतांचें शांतवन त्यांना करतां यावें यासाठीं, करण्यांत येतो–निदान त्याचा परिणाम तरी तोच होत असतो. असो.

'कष्ट करतो त्याची जमीन' हें जें गांधींच्या विधायक कार्यक्रमांतलें माझ्या दृष्टीनें मुख्य प्रमेय तें प्राप्त करून घेण्यासाठीं खंड कमी करण्याची चळवळ केली पाहिजे असें मीं म्हटलें. पण तीहि गोष्ट केवळ जमीन–मालकांचे तनखे तोडण्याच्या विध्वंसक दृष्टीनें करावी असें मी म्हणत नाहीं. हा विधायक कार्यक्रम आहे व त्याची पद्धति विधायकच हवी म्हणून खंड कमी करण्याच्या पद्धतीचा मी येथें विधायक पद्धतीनेंच विचार करणार आहें. 'कष्ट करतो त्याची जमीन' हें तत्त्व कधींकाळीं अंमलांत यावयाचें असेल तर तें क्रमशः खंड कमी करण्याच्या पद्धतींतूनच अंमलांत येणार आहे. पण याच क्रमाबरोबर शेती, कारखाने, यांची सर्वांची उत्पादनशक्ति आणि शेतकरी, मजूर, मध्यमवर्ग यांची आर्थिक परिस्थिति ज्यामुळें सुधारेल, प्रचंड आर्थिक उत्कर्षाला जो बीजभूत ठरेल असा कार्यक्रम मी येथें सांगणार आहें. केवळ लेख आकर्षक करण्यासाठीं मारलेली ही एक लोणकढी थाप आहे असें वाचकांनीं समजूं नये. ही सूचना दिसण्यांत किरकोळ–अगदीं क्षुद्र दिसते. पण तिचें सामर्थ्य तिच्या प्रयोगांत आहे. कांग्रेससारख्या प्रबळ पक्षानें तो कार्यक्रम घेतल्यास या लहानशा प्रयत्नाची परिणति समाजक्रांतींत–विधायक आणि अहिंसात्मक क्रांतींत–होईल. पण हें माझें लिहिणें व्यर्थच आहे. मला या सूचनेंत जें भव्य कर्तृत्व लपलेलें दिसतें तें मी या लिहिण्यानें कितीसें व्यक्त करणार? तें कृतीनेंच सिद्ध होईल. म्हणून माझ्याच सूचनेची मीच अधिक प्रशंसा न करतां त्या सूचनेकडेच वळतों.–आणि ही सूचना किती लहान आहे!

* * *

शेतीच्या उत्पन्नांत अर्धा भाग जमीन–मालकाचा खंडस्वरूपाचा आणि अर्धा भाग कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचा अशी उत्पन्न धनाची वांटणी

करण्याची जुनी परंपरा आहे. जमिनींत भांडवल मालक घालतो आणि शेतकरी कष्ट घालतो. शेतीचें हें उत्पन्न सहा मण आहे असें धरून चालूं. विभागणींत पूर्णांक येण्यास मला सहा आंकडा सोईचा आहे म्हणून तो मीं घेतला आहे. या सहा मणांत ३ मण मालकाचे व तीन मण शेतकऱ्याचे. आतां खंड कमी कसा करायचा व त्याचें काय करायचें ? मालकाच्या ३ मणांचे तीन भाग करावे. १ मण मालकाला द्यावा. १ मण शेतकऱ्याच्या ३ मणांत भर घालून त्याचें उत्पन्न ४ मण करावें आणि १ मण जमिनीला भांडवल म्हणून वापरावा. अशा सुमारें हजार अथवा दोन हजार अथवा दहावीस हजार एकर शेतीचा एकेक तुकडा कल्पावा. या सर्व जमिनीच्या एकूण उत्पन्नाचा सहावा हिस्सा भांडवलासाठीं एकत्र करावा. त्याची सामुदायिक शेती करून सुधारलेल्या पद्धतीनें प्रचंड प्रमाणावर उत्पादन करावें. उत्पन्न होईल त्याची वांटणी पूर्वी सांगितल्याप्रमाणें–जमिनीचे तुकडे लहान लहान आहेत व ते वेगळ्या वेगळ्या मालकांचे आहेत ते तसे लक्षांत घेऊन करावी. कदाचित् पहिलीं कांहीं वर्षे भांडवल बुडीत ठरेल. पण पुढें उत्पन्न अफाट वाढेल. शेतींतून शेतकरी व शेतमालक यांचा चरितार्थ वाढत्या राहणी–अनुसारहि भागून शिवाय शेतीचें उत्पन्न उरत जाईल त्यांतून लहान व मोठे धंदे वाढवितां येतील. आणि शेतींत काम न करणाऱ्या जमीन–मालक वर्गाला शेतीखेरीजच्या व्यवसायांत इतका भरपूर रोजगार मिळत जाईल कीं त्यांचा खंड बंद करून शेती सार्वजनिक मालकीची करण्यास या मालकवर्गाचा विरोध कमी कमी होत जाईल. पूर्ण अहिंसाप्रधान मार्गानें पूर्ण अहिंसाप्रधान समाजपद्धति व लोकशाही निर्माण करण्याचा हा उपाय आहे.

माझी सूचना वरील परिच्छेदांत दिली ही एवढीच. पण मी जर तिची उपपत्ति न दिली तर मी हास्यास्पद ठरेन म्हणून येथें संक्षेपतः उपपत्ति सांगतों. माझ्या डोळ्यांपुढें मुख्यतः महाराष्ट्रांतील कांहीं भाग आहे. पण सर्व देशांतल्या शेतीला हीच विचारसरणी लागू आहे. शेती हेंच माणसाचें धनोत्पादन–साधन. अन्न, वस्त्र, आश्रय, औषधपाणी या सर्वांचें प्राथमिक उगमस्थान तेंच. त्यांत सुबत्ता असली कीं, राष्ट्राची सर्व बाजूंनी उन्नति होते. शेतीप्रधान राष्ट्रांत शेतीचा ऱ्हास हेंच राष्ट्राच्या ऱ्हासाचें व

नाशाचें कारण व लक्षणहि असतें. आणि शेतीप्रधान नाहीं कोण ? इंग्लंडनें आपल्या उद्योगधंद्याच्या बळावर सर्व जगांतल्या शेतकऱ्यांची पिळणूक केली म्हणून शेती बुडवूनहि इंग्लंड वैभवास चढलें. पण जगांतल्या शेतकऱ्यांनीं पिळणुकीस बळी पडायचें नाहीं असें ठरविल्यास इंग्लंडला तडफडून मरावें लागेल. उलट जें राष्ट्र स्वतःची शेती वाढवील त्याला आपली पिळणूकहि थांबवितां येईल, जगाची पिळणूक करावी लागणार नाहीं.

* * *

महाराष्ट्रांतील शेती खंगली कां? याचीं अनेक कारणें असतील. पण त्या सर्वांपैकीं मुख्य कारण—आणि सर्व कारणांची बेरीज—त्या शेतीस भांडवल नाहीं हेंच. जुन्या काळाचा विचार आतां नको. जमीनमालकी मध्यम वर्गांकडे जाऊन त्यांना खंड मिळूं लागतो. तो पैसा परत ते जमिनीस भांडवलरूपानें न देतां अधिक व्याज देणाऱ्या इतर धंद्यांत गुंतवितात. म्हणजे मालकाकडून शेतीस भांडवल मिळेनासें होतें. शेतीची सुधारणा व दुरुस्ती होत नाहीं. यामुळें तिचें उत्पन्न घटूं लागतें. यामुळें शेतकऱ्याची उपासमार होऊं लागते. तरुण जवान शेतकऱ्याला शेतींत आपुलकी वाटत नाहीं. म्हणून तो 'म्हमई'ला गिरणीला जातो आणि म्हाताऱ्या—कोताऱ्यांच्या हातून त्या शेतीची मेहनतमशागत पुरेशी न झाल्यानें शेतीचें उत्पन्न आणखी घटतें. यामुळें शेतींत भांडवल गुंतविण्यास मालक आणखी आणखी नाराज होतो व शेतीचा आणखी आणखी ऱ्हास होतो. हें दुष्टचक्र-भांडवल नाहीं म्हणून शेतीवरील श्रम कमी होणें, त्यामुळें उत्पन्न घटणें, त्यामुळें पुन्हां भांडवल आटणें व श्रम आणखी कमी होणें हें दुष्टचक्र कायम राहतें. आणि शेतीचा व त्याबरोबर देशाचा ऱ्हास व नाश होतो.

कोणी म्हणतील जमीन-मालकांनीं शेतीला भांडवलपुरवठा कमी केला याचें कारण शेतकऱ्यांनीं शेतीचे श्रम कमी केले हें होय. मला येथें शेतीच्या ऱ्हासाचीं ऐतिहासिक कारणें शोधायचीं नाहींत अथवा त्याचा गुन्हेगार कोण याचें संशोधन करावयाचें नाहीं. शेतीला श्रम, भांडवल व शास्त्रीय ज्ञान यांचा लाभ करून देऊन शेतीची सुधारणा कशी करावी याची चिंता येथें मी करीत आहें. जमीन-मालकांनीं आपल्या खंडाचा तिसरा भाग ( जमिनसारा वजा जाता का असेना ) शेतीला भांडवल म्हणून द्यावा यांत कांहींच

गार नाहीं. शेतीचें उत्पन्न चोहोंकडे फार घटलें असल्यानें शेतकऱ्याच्या ठिकाणीं शेतीबद्दल ममत्व व शेतीचे श्रम करण्याइतका हुरूप निर्माण करण्यासाठीं जमीनमालकाच्या खंडाचा कांहीं भाग शेतकऱ्याला अधिक द्यावा हेंहि इष्टच आहे. यामुळें जमिनीला अधिक श्रम व अधिक भांडवल मिळूं लागेल. पण हे श्रम व भांडवल यांची फार मोठ्या प्रमाणावर संघटना केल्यावांचून जमीनमालक व शेतकरी यांच्या या स्वार्थत्यागाचें मोल मिळणार नाहीं. म्हणून खंडांतून जमणारें भांडवल हजार, दोन हजार, दहा हजार एकर जमिनीचें एकत्र करावें आणि सरकारनें आपल्या नेतृत्वा-खालीं सामुदायिक शेती करावी. उत्पन्नाची वांटणी वैयक्तिक पण जमिनीची मेहनतमशागत सामुदायिक ही गोष्ट पूर्ण व्यवहार्य ठरेल. जमिनीचें उत्पन्न जसजसें वाढेल तसतसा सरकारसारा वाढवीत जावें. इकडे कारखान्यांचें राष्ट्रीकरणहि सुरू करण्यांत यावें. त्याची पद्धति येथें सांगत नाहीं. पण शेतीच्या या सुधारणेच्या बुडाशीं असलेलीं तत्त्वें तेथेंहि उपयोगी पडतील. शेतकरी व जमीनमालक यांच्या जीवनराहणीस अवश्य इतक्या मर्यादेपर्यंत त्यांना जमिनीच्या उत्पादनाचा वाटा दिल्यानंतर उर्वरित धन वाढत्या प्रमाणांत सरकारसाऱ्याच्या रूपानें घेऊन त्याच्या साह्यानें तालुक्याच्या व जिल्ह्याच्या शहरीं आणि खास खेड्यांत लहान मोठे धंदे काढावे. मुंबईसारख्या शहराचें महत्त्व यामुळें कमी होऊन धंद्यांचें विकेंद्रीकरण आपोआप होणार आहे. शाळा, कॉलेजें, विद्यापीठें पूर्ण मोफत करणें, दवाखाने, आरोग्यसाधनें, करमणुकीचीं व संस्कृतिविकासाचीं साधनें या सर्वांची लयलूट करणें हें कार्य करण्यासाठीं हवा असणारा पैसा, शेती व कारखान्यांना लागणारें नवें नवें भांडवल, यांचा भरपूर पुरवठा होईपर्यंत वैयक्तिक मिळकतींची फाजील वाढ होऊं देऊं नये.

जनतेला हें सर्व समजून सांगण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींनीं घेतल्यास पूर्ण अहिंसात्मक आणि लोकशाहीप्रधान मार्गानें वैभव आणि संस्कृति वाढविण्याचा उपाय यांत आहे. स्वातंत्र्य केव्हां व कसें मिळणार आहे कोणास ठाऊक ? पण हा कार्यक्रम कॉंग्रेसनें प्रांतिक मंत्रिमंडळासाठीं

घेतल्यास माझ्या मतें या कार्यक्रमाच्या शर्तीवर कोणत्याहि पक्षाचें सहकार्य घेऊन प्रांतिक मंत्रिमंडळें चालविणें शक्य आहे. अहिंसेनें साधणारा असा हा एवढाच क्रांतिकारक कार्यक्रम आहे. याची टाळाटाळ करणारे लोक अहिंसेसंबधानें आत्मवंचना करतील, पण यशस्वी होणार नाहींत. म्हणून 'क्रांतीची अहिंसात्मक किमया' असें मोठें धाडशी नांव मी या लेखास देत आहे. सकृद्दर्शनीं यांत तथ्य दिसणार नाहीं आणि आणि या कार्यक्रमाची टीकेनें रेवडी उडविणें सोपें आहे. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास लहानशा बीजांतून वृक्ष उत्पन्न होतो त्याप्रमाणें या आरंभीं लहानशा दिसणाऱ्या कार्यक्रमांतून अहिंसाप्रधान अशी सोव्हिएट लोकशाही निर्माण होईल असें मला वाटतें. यांत गूढ कांहींहि नसून साध्या विचारानें माझा आशय सहज लक्षांत येईल. प्रांतांत मंत्रिमंडळें घ्यावींत अथवा न घ्यावीं यासंबंधानें अमुक एक बाजू येथें मी घेत नाहीं. पण कांग्रेसमध्यें या कार्यक्रमावर एकमत झाल्यास व कांग्रेसनें मंत्रिमंडळें घेतल्यास इतर सर्व पक्षांच्या विरोधास न जुमानताहि कांग्रेसला हा कार्यक्रम यशस्वी करतां येईल एवढेंच माझें म्हणणें. निदान हा कार्यक्रम जनतेसमोर मांडीत राहण्यानेंहि या विधायक कार्यक्रमास जनतेचा पाठिंबा मिळून कांग्रेसच्या स्वातंत्र्ययत्नास जनतेचा पाठिंबा मिळेल. प्रामाणिक अहिंसावाद्यांच्या दृष्टीनें व्यवहार्य असा हा मार्ग आहे.

—चित्रमय जगत् काँग्रेस हीरक-महोत्सव अंक.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# हंगामी सरकारपासून समाजवादाकडे

दिल्लीसिमल्यास पं. नेहरूंचें हंगामी सरकार स्थापन झालें ही घटना इतिहासांत अपूर्व असून देशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याची ती पहिली पायरी आहे यांत मुळींच शंका नाहीं. आणि असें असूनही संपूर्ण स्वातंत्र्याचा अखेरचा निकराचा लढा या घटनेनें सुरू केला, इतकाच या सर्व घटनेचा अर्थ आहे, हा गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेविली पाहिजे. मध्यसरकार स्वीकारण्याच्या आधींपासून 'ही निखाऱ्याची आंघोळ आहे,' अशी जाणीव मुस्लीम लीगनें शब्दानें आणि कृतीनें काँग्रेसपुढाऱ्यांना दिली असून, मुस्लिम लीगनें दंगलीचा सुरू केलेला कार्यक्रम आणि यापुढें एकामागून एक अशीं येणारी संकटें काँग्रेसची नैतिक आणि भौतिक कसोटी पाहणार आहेत. हल्लींचें हें मध्यसरकार, 'हंगामी सरकार' अथवा 'मध्यंतर' सरकार' ( इंटेरिम गव्हर्मेंट ) म्हणून उल्लेखिलें जातें त्याचा मूळ अर्थ असा आहे कीं, घटना परिषद, संघून तिनें केलेला मसुदा ब्रिटननें स्वीकारला व घटना समितीशीं ब्रिटननें तह केला म्हणजे जें स्वतंत्र भारताचें सरकार जन्मास यावयाचें, तें येईपर्यंतच्या काळांत हें 'हंगामी सरकार' काम करणार आहे. पण खरोखर घटनासमिति होऊन जाईपर्यंत पूर्वीचेंच सरकार कां ठेवलें नाहीं ! मध्यसरकार कसलेंहि असलें तरी घटनासमितीचें काम स्वतंत्रपणें चालावयाचें आहे. मग हें हंगामी अथवा मध्यंतर ( इंटेरिम ) सरकार कां निर्माण करण्यांत आलें ! ब्रिटिश सरकारनें सत्तात्यागाचा निश्चय केला आहे याचें द्योतक म्हणून हें मध्यंतर सरकार निर्माण करण्यांत आलें आहे. यापुढें घटनासमिति होईल, तिचा निर्णय म्हणून जी घटना बाहेर पडेल तिला संमति देऊन ब्रिटन स्वतंत्र हिंदुस्थानशीं तह करील व त्या वेळीं ब्रिटन आपली पूर्ण सत्ता काढून घेईल. पण त्या वेळेपर्यंत वाट न पाहतां आजपासूनच हळू हळू सत्तात्यागास आम्ही सुरवात करीत आहों, असें मध्यंतर सरकार स्थापून ब्रिटन जाहीर करीत आहे. ब्रिटनचा हा हृदय-पालट अकस्मात् फार मोठा भाग्यासारखा दिसतो. तो बऱ्याच अंशीं

खराहि आहे. पण स्वातंत्र्य म्हणून जिला म्हणतां येईल ती अवस्था अजून फार दूर आहे. ती अवस्था निर्माण करण्यासाठीं विशिष्ट प्रकारचे प्रयत्न काँग्रेसनें केले पाहिजेत. ते न केल्यास स्वातंत्र्य प्राप्त होण्याऐवजीं नव्या स्वरूपांत नवी गुलामगिरी या देशांत निर्माण झाल्यावांचून रहाणार नाहीं. हा मुद्दा मला या लेखांत मांडावयाचा आहे. तसेंच राष्ट्रीय स्वातंत्र्य याचा सद्यःस्थितींत विशिष्ट अर्थ काय, हें मला दाखवायचें आहे.

पूर्ण स्वातंत्र्य हिंदुस्थानला देऊन टाकण्याचा निर्धार इंग्लंडनें कां केला ! इतकेंच नव्हे तर या निर्धारासंबंधानें हिंदी लोकांची खात्री पटविण्यासाठीं आजपासूनच मध्यंतर सरकार कां सुरू केलें ? याचें कारण मुख्यतः आंतरराष्ट्रीय परिस्थितींत सांपडतें. जोंवर परचक्राची भीति ब्रिटिश साम्राज्याला कमी होती, जोंवर इंग्लंडच्या प्रतिस्पर्ध्यांची आपसांत भांडणें चालत, तोंवर परचक्रापासून साम्राज्याचें रक्षण करण्याच्या प्रश्नापेक्षां साम्राज्यांतील स्वातंत्र्यवाद्यांपासून साम्राज्याचें रक्षण करणें, हा मुद्दा महत्त्वाचा होता. म्हणून अल्पसंख्याकांना हाताशीं धरून, त्यांना चिथावून बहुसंख्याकांचा स्वातंत्र्ययत्न हाणून पाडावयाचा, हें ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचें धोरण होतें. पण आतां सोव्हिअट–रशियाच्या वाढत्या सामर्थ्यामुळें व ब्रिटिश साम्राज्य नष्ट करण्याच्या रशियाच्या निर्धारामुळें परचक्राची भीति ब्रिटिश साम्राज्याला फार मोठी आली आहे. हें परचक्र वर आलें व त्या वेळीं बहुसंख्य स्वातंत्र्यवादी पक्ष सरकारविरोधी असला तर सरकारचा पराभव खात्रीनें होईल; अल्पसंख्याकांचें पाठबळ रणांगण लढविण्यास मुळींच उपयोगी पडणार नाहीं. हें जाणून ब्रिटननें आपलें जुनें धोरण बदललें व नवें धोरण अवलंबिलें आहे. अल्पसंख्याकांच्या असंतोषाची पर्वा न करतां बहुसंख्याकांचा संतोष निर्माण करून परचक्राविरुद्ध त्यांचा पाठिंबा मिळविणें हें इंग्लंडचें नवें धोरण आहे. मुस्लिमलीगच्या विरोधास न जुमानतां ब्रिटननें काँग्रेसला मध्यंतर सरकार आजच बनवूं दिलें याचें कारण परचक्राची भीति निकडीची असल्यानें काँग्रेसच्या संतोषाची तांतडीची गरज ब्रिटिशांना आहे, हें होय.

वरील युक्तिवादांत एक कबूली आहे. हिंदुस्थानांत काँग्रेसच्या हातीं सत्ता देण्यामध्यें ब्रिटनचा हेतु हिंदुस्थान स्वतंत्र करणें हा असण्यापेक्षां,

आपलें साम्राज्य रक्षिण्याची तजवीज करणें हा आहे; आणि ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित राहणें म्हणजे हिंदुस्थान गुलाम राहणेंच होय, असें आपण मानीत आलों आहों; यामुळें मध्यंतर सरकार स्वीकारणें म्हणजे कांग्रेसनें ब्रिटिश साम्राज्याची रखवाली पत्करल्यासारखेंच होत नाहीं काय ? या शंकेचें उत्तर दिल्यावांचून कांग्रेसच्या सध्यांच्या धोरणाचें समर्थन मुळींच होऊं शकत नाहीं. ब्रिटिशांना आपलें साम्राज्य रक्षावयाचें आहेच; पण तें जुन्या स्वरूपाचें म्हणजे हिंदुस्थानांतील बहुसंख्याकांना उघड गुलामगिरींत ठेवण्याचें साम्राज्य आतां आतरराष्ट्रीय परिस्थितींत जिवंत राहूं शकत नाहीं. यामुळें बहुसंख्याकांच्या कांग्रेसच्या हातीं ब्रिटिशांनीं सत्ता दिली आहे. यापुढें राज्यसत्ता हिंदी-लोकांच्या हातीं ठेवून हिंदी बाजार आपल्या हातीं ठेवावा, निदान आपला खूप माल हिंदी बाजारांत खपेल अशी अनुकूलता हिंदुस्थानांत निर्माण करावी, असा ब्रिटनचा हेतु आहे. हिंदुस्थानांत मोठी लोकसंख्या शेतकऱ्यांची. त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारली तर ब्रिटिश मालाला त्यांचें गिऱ्हाईक पुष्कळ मिळेल अशी इंग्लंडची अपेक्षा आहे. आणि हिंदी शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति सुधारणें, ही गोष्ट कांग्रेस उत्तम प्रकारें करणार असल्यानें कांग्रेसचें राज्य ब्रिटिशांना हिंदी बाजार मिळण्यास उपकारकच ठरणार आहे. शिवाय हिंदुस्थानांत नवीन उद्योगधंदे उभारण्यासहि ब्रिटिश यंत्रसामुग्रीची व तज्ज्ञांची मदत लागणारच आहे. अर्थात् कांग्रेस ब्रिटनकडून ही मदत घेईलच.

⁂ ⁂ ⁂

पण असा नुसता बाजार मिळविण्यावरच ब्रिटनला समाधान मानण्याचें कारण नाहीं. त्यांची प्रत्यक्ष साम्राज्य सत्ता म्हणजे सैन्यसत्ता व अर्थसत्ता येथें कायम राहण्यास अजून अनेक गोष्टींची अनुकूलता येथें आहे. अजूनहि जातीय दुहीचा उपयोग ब्रिटन करून घेऊं शकेल. आज मुसलमानांच्या असंतोषाची पर्वा न करतां कॉंग्रेसची म्हणजे पर्यायानें बहुसंख्य अशा हिंदूंची मनधरणी ब्रिटन करीत आहे. असाच इतिहास पूर्वी एकवार घडला होता. १८५७च्या बंडांत मुसलमान फार मोठ्या संख्येनें सामील झाले, या आरोपावरून पुढील वीस वर्षांत ब्रिटननें मुसलमानांना राज्यकारभारापासून

दूर ठेवलें, त्यांना संशयानें वागविलें आणि हिंदूंना राज्यकारभारांत सामील करून घेऊन व त्यांचा संतोष संपादन करून आपलें साम्राज्य ब्रिटननें मजबूत केलें. त्यानंतर हिंदूंची स्वातंत्र्याकांक्षा वाढूं लागली म्हणून मुसलमानांना हाताशीं धरून ब्रिटननें हिंदूंना दडपलें. पुन्हां आतां मुसलमानांना दूर लोटून ब्रिटन हिंदूंना जवळ करीत आहे. ही दुही कायमची नष्ट करणें, हें मात्र इंग्लंडला कधींहि हितावह वाटणार नाहीं. आज ब्रिटिश सैन्याच्या साहाय्यानें कॉंग्रेस मुसलमानांना दडपूं शकते, पण त्यामुळें ब्रिटिश सैन्यसत्तेची गरज येथें कायम राहते. ही गरज कायम राहावी असेंच धोरण ब्रिटिश सेनापतिहि कॉंग्रेसला साहाय्य देतांना ध्यानांत ठेवतील हें कॉंग्रेसनें समजून असणें अवश्य आहे.

कॉंग्रेसच्या हातीं मध्यंतर सरकार देऊनहि आपली अर्थसत्ता व सैन्यसत्ता येथें कायम ठेवण्याचा आणखी एक मार्ग इंग्लंडच्या हातीं आहे. हिंदी भांडवलदार व व्यापारी यांचा आज कॉंग्रेसला पाठिंबा आहे, त्याबरोबरच कॉंग्रेसवर त्यांचें कांहींसें नियंत्रणहि आहे, हें विसरून चालणार नाहीं. मध्यंतर सरकारच्या घटनेवरूनहि हें स्पष्ट होतें. पं. नेहरू हे मध्यंतर सरकारचे पंतप्रधान आहेत याचें कारण, ते तरुणांत व सामान्य जनतेंत लोकप्रिय आहेत. पण ते सोशॅलिस्ट आहेत व भांडवलदारांना हा सोशॅलिझम नको आहे. म्हणून नेहरूंच्याकडे परराष्ट्रसंबंधाचें फक्त बड्या देखाव्याचें खातें देण्यांत आलें आहे; अंतर्गत खात्यांत वल्लभभाई हे गृहखात्यावर आहेत आणि हिंदी भांडवलदार वल्लभभाईंवर किती प्रेम करतात हें जगजाहीर आहे. वल्लभभाईंचे 'ऋणानुबंधी' श्री. भाभा हे व्यापार खात्यावर, टाटांचे श्री. मथाई जमाबंदी खात्यावर, सोशॅलिस्टांचे अ-मित्र राजाजी हे उद्योगधंद्यावर आहेत. भांडवलदारांना नेहरूंचा फायदा घ्यावयाचा आहे, आणि त्यांचा सोशॅलिझम् येथें येऊं द्यावयाचा नाहीं, याची ही तरतूद आहे. पण नुसत्या मध्यसरकारच्या या घटनेनें सोशॅलिझम् येण्याचें टळणार नाहीं. यापुढें भांडवलदारांना बहुसंख्य जनतेची भीति वाढत्या प्रमाणांत वाटणार आहे. या भीतिपासून आपलें रक्षण फक्त ब्रिटनच करूं शकेल अशी भांडवलदारांची खात्री असल्यानें, ब्रिटिशांना हिंदुस्थानां-

तून बाहेर घालविण्याचा दिवस हे भांडवलदार दूरदूरच ढकलतील. आणि दरम्यान् आपल्या भांडवलदारीच्या उत्कर्षांत ब्रिटिशांना भागीदारी देऊन येथील हल्लींची समाजव्यवस्था टिकविण्यासाठीं, जनतेला दडपण्यासाठीं व या हिंदी ब्रिटिश भांडवलदारांना बाहेरचा बाजार जिंकून घेण्यासाठीं ब्रिटिशांचें साहाय्य मिळवितील. त्यामुळें स्वाभाविकच नव्या प्रच्छन्न स्वरूपांत ब्रिटिश साम्राज्य येथें टिकेल ही शक्यता स्पष्ट असून, ब्रिटिशांचा तो हेतु असेल हेंहि सहज संभवनीय आहे.

अशा प्रकारें नव्या स्वरूपांत हिंदुस्थान परतंत्रच राहण्याचे सर्व धोके दिसत असूनहि, कॉंग्रेसनें मध्यंतर सरकार घेतलें तें योग्यच केलें असें मला वाटतें. जुन्या स्वरूपांतलें ब्रिटिश साम्राज्य आतां परचक्रापुढें टिकणार नाहीं, तथापि कॉंग्रेस मध्यसरकारपासून दूर राहिली व आंतरराष्ट्रीय कलहांत ब्रिटिश साम्राज्य मोडलें तर त्या अवस्थेंत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य परत मिळेलच अशी खात्री नाहीं. एक मालक जाऊन दुसरा येईल. महायुद्धासारख्या प्रसंगीं अंतर्गत प्रयत्नांनीं आपण महायुद्धापासून अलिप्त राहून आपलें स्वातंत्र्य स्थापन करूं शकूं, एवढी शक्ति कॉंग्रेसच्या अंगीं आलेली नाहीं. ही गोष्ट गेल्या महायुद्धकालांत सिद्ध झाली आहे. या वेळीं ब्रिटन नाइलाज होऊन अंशतः सत्तात्याग करीत आहे. पुढें वर सांगितलेले मार्ग अवलंबून नव्या स्वरूपांत आपली सत्ता टिकवूं शकेल हें जर आगाऊ कॉंग्रेसमधील समाजवाद्यांनीं समजून घेतलें, तर आंतरराष्ट्रीय अनुकूलता आहे तोंवर मध्यमंत्रिमंडळ आणि प्रांतिक मंत्रिमंडळें यांचीं धोरणें समाजवादाच्या दिशेनें खेचून, देश संपूर्ण स्वतंत्र म्हणजे समाजवादी बनविणें, हें समाजवाद्यांना शक्य आहे. "आधीं स्वातंत्र्य मग समाजवाद," असें कांहीं समाजवाद्यांनाहि वाटतें आणि म्हणून स्वातंत्र्य नसलेली मध्यसत्ता कॉंग्रेसनें घेतली यासाठीं ते कॉंग्रेसला दोष देतात. पण खरी गोष्ट अशी आहे कीं भांडवलदार व वरिष्ठ व्यापारी वर्ग ब्रिटिश सत्ता संपूर्णपणें झुगारून देण्यास कधींच संमति देणार नाहींत. उलट ब्रिटिश सत्तेशीं अपरिहार्यपणें कराव्या लागणाऱ्या झगड्यांतहि हे वर्ग कॉंग्रेसचें साहाय्य मागणारच. अर्थातच मग ते कॉंग्रेसच्या हातीं मर्यादित सत्ता देण्यासहि राजी होणार. म्हणूनच भांडवलदारांनीं नेहरूंच्या पंतप्रधानकीस संमति दिली. पण नेहरूंनीं आतां

आपल्या हातीं आलेल्या पदाचा व सत्तेचा उपयोग हळूहळू भांडवलदारांची धनसत्ता नाहींशी करून शेतकरी-कामकऱ्यांचें म्हणजेच समाजवादी स्वरूपाचें राज्य स्थापण्याकडे केला पाहिजे. तसें करणें शक्यहि आहे.

हा समाजवादाचा कार्यक्रम सांगणें फारसें कठीण नाहीं; आणि नेहरू-सारख्या विद्वानापुढें माझ्यासारख्यानें तो सांगण्याची जरूरी नाहीं. पण कॉंग्रेसच्या गेल्या वीस वर्षांत जी एक गोष्ट व्हावयाला पाहिजे होती पण झाली नाहीं आणि नेहरूंच्या हातीं कॉंग्रेसचीं सूत्रें असतांही जी घडून आली नाहीं ती घडून येणें हें यापुढें अत्यवश्य आहे. कॉंग्रेसची संघटना हल्लींपेक्षां फार अधिक बळकट व कार्यक्षम झाली पाहिजे. तिचें सर्व स्वरूप आमूलाग्र बदललं गेलें पाहिजे.आज कॉंग्रेस मंत्रिमंडळें प्रांतांत अधिकारावर असतां कॉंग्रेस-संघटनेचें प्रत्यक्ष पाठबळ आणि साहाय्य अथवा तगादा त्यांना कोठेंच मिळत नाहीं. याचें कारण निवडणुकीसारख्या नैमित्तिक प्रसंगीं जीं हजारों माणसें कॉंग्रेसच्या कामास येतात तीं निवडणुकी संपल्या कीं आपापल्या संसारास परत जातात. शेतकरी-कामकरी यांचीं गाऱ्हाणीं इतकीं अनंत आहेत कीं, गांवोगांव ज्याप्रमाणें सरकारचा राज्यकारभार चालविणारीं कायमचीं माणसें असतात, त्याप्रमाणें कॉंग्रेसमार्फत जनतेचीं गाऱ्हाणीं सरकारकडे पोंचविणें आणि सरकारला उपाययोजना सुचविणें यासाठीं कॉंग्रेसचीं कायम माणसें खेड्यापाड्यांत काम करणारीं असलीं पाहिजेत. त्यासाठीं त्यांच्या चरितार्थाचा भार कॉंग्रेसनें वाहिला पाहिजे. आज ही शक्यता नसल्यानें कॉंग्रेसचीं वरिष्ठ पदें धनिकांच्या नव्हे पण धनिकांच्या गुलामांच्या हातीं जागोजाग आहेत. यांत पुष्कळ चांगले कार्यकर्ते आहेत. पण ज्या योगें सध्यांच्या समाजाखालीं सुरुंग लागेल असा धोका असलेलें धोरण ते पत्करीत नाहींत; क्रांतिकारक प्रवृत्तीच्या कर्तबगार माणसांचा रस्ताच रोखून धरतात; यामुळें कॉंग्रेससंघटनांत चार दोन चांगलीं माणसें आणि बाकी अडाणी, चुकार, देखावेबाज, झब्बू, खुशामत्ये यांचाच बाजार भरतो. कॉंग्रेसच्या हातीं आतां राज्यसत्ता आल्यामुळें सरकारपासून फायदा मिळवूं इच्छिणारे कंत्राटदार, भांडवलदार, प्रतिष्ठालोभी लोक हे कॉंग्रेसचीं पदें खरेदी करून आपल्या पुजाऱ्यांच्या हातीं देऊं अथवा ठेवूं लागले आहेत. म्हणून यापुढें

काँग्रेसचा अधःपात होण्याचा संभव वाढला असून सामाजक्रांति करण्याऐवजीं समाजक्रांति दडपण्याच्या कामीं काँग्रेस साहाय्यभूत होईल ही भीति आजच डोकावूं लागली आहे.

काँग्रेसला या अधःपातापासून वांचवून तिला क्रांतिकारी बनविण्याचें काम नेहरूंनीं केलें नाहीं तर नुसत्या नोकरशाहीच्या साहाय्यानें त्यांना समाजक्रांति करतां येण्याऐवजीं हल्लींच्या काँग्रेसचें साहाय्य या नोकरशाहीला मिळून ती नेहरूंच्या अमलाखालीं ब्रिटिश अर्थसत्ता व सैन्यसत्ता अधिक दृढ करील. गांधी व नेहरू यांच्या लक्षांत काँग्रेसचा हा दोष आला असून काँग्रेसचा कार्यकर्ता हा सर्वकाळ पगारी सेवक असावा अशी तजवीज गांधी करणार आहेत. पण गांधींची तत्त्वनिष्ठा व कार्यपद्धति हीं भौतिकवादी नसून भ्रममूलक आहेत. गांधींना त्यांच्या राजकारणांत आजवर जें यश आलें तें अंशतः त्यांनी लोकांचा संयम, एकजूट, त्यागवृत्ति आणि निर्धार टिकविल्यानें आलें आहे. बाकीचें आलेलें यश नेहरूंचा व अनेक काँग्रेसवाद्यांचा भौतिकवादी आणि समाजवादी दृष्टिकोन यांमुळें आलें आहे. नेहरू हे स्वतःला पुढारी म्हणवीत नाहींत आणि पुढाऱ्यांस लागणारे गुण त्यांच्या अंगीं नाहींतहि; पण ते भौतिकवाद व समाजवाद यांची ज्योत तेवत ठेवतात. यामुळें त्या विचारसरणीस काँग्रेसमध्यें प्रतिष्ठा मिळते. पण यापुढें काँग्रेसचें जे सर्वकाळ प्रचारक व्हावयाचे आहेत आहेत ते गांधीवाद्यांच्या तंत्रांतले व्हावयाचे ठरले तर त्यामुळें क्रांतिकार्य साधणार नाहींच. उलट हल्लीं एकदोघे पदाधिकारी हाताशीं धरून भांडवलदार, कंत्राटदार व व्यापारी काँग्रेससंघटना आपल्यासाठीं राबवतात, त्याऐवजीं पुढें सगळी पगारी काँग्रेससंघटना भोळेपणानें भांडवलदारांची हमाली करूं लागेल.

काँग्रेसला या संकटांतून वांचविण्याची जबाबदारी समाजवाद्यावर आहे. त्यांना नेहरूंचा उघड पाठिंबा न मिळाला तरी उपयोग पुष्कळ होईल. काँग्रेस ही अगदी समाजवादी पक्षाची बनवूं नये. पण समाजवादी दृष्टिकोनाच्या कार्यकर्त्यांचें वजन काँग्रेसमध्यें वाढून खुल्या लोकशाही पद्धतीनें काँग्रेसचीं वरिष्ठपदें समाजवाद्यांच्या हातीं आलीं पाहिजेत. असें झाल्यास मंत्रिमंडळाचीं धोरणें व योजना शेतकरी-कामकरी राज्य स्थाप-

ण्याच्या दिशेनें खेचतां येतील. वरपासून खालपर्यंत लोकांच्या जीवनाशीं काँग्रेस जागोजाग निगडित झाली पाहिजे. हल्लींच्या कायदेमंडळांतील काँग्रेसपक्षीय सभासदांना चोवीस तास कामास जुंपले पाहिजे. माझ्या मतें कायदेमंडळाच्या सभासदांसाठीं 'जिल्हा असेंब्लींत' जिल्हा काँग्रेसनें कांहीं सभासद, लोकलबोर्डाचे कांहीं सभासद आणि असेंब्लीचे जिल्ह्यांतील सभासद यांचा समावेश व्हावा. खेड्यांतून ग्रामपंचायतींनीं खेड्यांच्या योजना आंखून त्या तालुक्याकडे पाठवाव्या. आणि सर्व तालुक्यांनीं जिल्हा असेंब्लींत सर्व जिल्ह्यांचा आराखडा तयार करावा. म्हणजे कायदे व नियम लोकांच्या गरजांतून निर्माण होतील आणि प्रत्येक खेड्यांतील ग्रामपंचायतीद्वारां सामान्य शेतकऱ्याला आपल्या जिल्ह्याचें जीवन घडविण्याच्या कामीं मनानें व शरीरानें भाग घेतां येईल. प्रत्येक खेडुताच्या ठिकाणीं सामुदायिक कर्तृत्व आणि आपुलकी निर्माण होण्यास हें क्षेत्र फाजील मोठें असून, जिल्हा हेंच आटोपशीर क्षेत्र आहे. अर्थात् कार्यक्रम जो आंखावयाचा तो समाजवादाकडे नेणारा असला पाहिजे. पण आज काँग्रेस मंत्रिमंडळें ज्या योजना हातीं घेत आहेत त्यानाच समाजवाद्यांनीं उचलून धरून पुढें खेचीत नेल्यास त्या कार्यक्रमांच्या अंगीं समाजवाद निर्माण करण्याचें सामर्थ्य आहे, यांत मला शंका वाटत नाहीं. म्हणून मी कार्यक्रमांची मांडणी येथें करीत नाहीं.

—महाराष्ट्र (पुणें) दिवाळी अंक १९४६

# लोकशाहीची नवी कल्पना

रशियांतील सोव्हिएट कम्युनिझम ही जास्तींत जास्त परिपूर्ण अशी लोकशाही आहे असें माझें व आणखी अनेकांचें मत आहे. हें आमचें मत रशियांत जाऊन आल्यानें व समक्ष वस्तुस्थिति पाहिल्यानें बनलें आहे असें मुळींच नव्हे. खुद्द रशियांत जाऊन तेथील परिस्थिति पाहून आलेल्या लोकांत सोव्हिएट रशियाच्या एकांतिक प्रशंसकापासून एकांतिक निंदकापर्यंत सर्वांची गणना होते. तेव्हां "मी समक्ष परिस्थिति पाहून आल्यानें माझें मत अमुक प्रकारचें बनलें आहे म्हणून तें खरें माना" असें कोणी म्हणेल तर त्यांत कांहीं हंशील नाहीं. सोव्हिएट कम्युनिझम ही लोकशाही आहे असें माझें मत बनण्याचें मुख्य कारण म्हणजे माझा समाजवादाचा अभ्यास आणि सिड्ने व बिॲट्रिस वेब यांच्या 'सोव्हिएट कम्युनिझम–ए न्यू सिव्हिलिझेशन,' या ग्रंथाचें वाचन हें होय. पण त्यामुळें माझें मत निर्णायक आहे असें सिद्ध होत नाहीं. कारण लुई फिशर आणि मॅक्स ईस्टमन यांच्या मतें रशियांत सैतानशाही आहे व त्यांचे ग्रंथ कांहीं माझ्या वाचण्यांत आलेले नाहींत. यामुळें माझें मत एकतर्फी आहे हें उघड होय. प्रचलित अशा एकाद्या विषयासंबंधानें सर्वच्या सर्व वाङ्मय उपलब्ध नसतें आणि तें वाचण्याइतका वेळही नसतो. शिवाय सदर वाङ्मय लिहून गेल्यानंतर त्या विषयाची परिस्थिति काय झालेली असेल हें सांगतां येत नाहीं. उदाहरणार्थ, वेबपतिपत्नींनीं आपला ग्रंथ १९३४–३५ मध्यें लिहिला. त्याच्या १९४१ मधील दुसऱ्या आवृत्तींत लेखकांनीं दरम्यानच्या काळांतील घडामोडींची विशेष दखल घेतली नाहीं. राजद्रोहाच्या खटल्यांचें त्यांनीं केलेलें समर्थन बरेंच लंगडें आहे, आणि १९४१ नंतर युद्धाच्या रखरखींत घडलेल्या स्थित्यंतराचें ज्ञान व्हायला कांहींच निःपक्षपाती साधन उपलब्ध नाहीं. सोव्हिएट लेखकांनीं आत्मसमर्थनपर लिहिलेले लेख सत्य शोधूं पहाणाऱ्या वाचकांचें समाधान करूं शकत नाहींत. अशा परिस्थितींत सोव्हिएट कम्युनिझम ही लोकशाही आहे हें मत इतरांना

पटविणें मला अवघड होऊन बसतें. पण अगदीं आजतागायतची रशियाची परिस्थिति आणखी चार वर्षांनीं कळेपर्यंत थांबून सोय नाहीं. हिंदी राजकारणाचे व समाजव्यवस्थेचें प्रश्न अतिशय निकडीचे आले आहेत. शिवाय आणखी चार वर्षांनीं रशियाची आजची परिस्थिति कळेल, पण त्या वेळची कळायला पुढें पुन्हां चार वर्षे लागतील. आणि हें असें अनंत काळ चालेल.

पण सोव्हिएट कम्युनिझम ही खरीखुरी लोकशाही आहे कीं, नाहीं याचा विचार मी हिंदुस्तानचा सामाजिक व राजकीय प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें करीत असल्यानें रशियासंबंधानें कोणतेंही निर्णायक मत न बनवितांही हा विचार करणें शक्य आहे असें मला वाटतें. आणि वाचकांच्या सहकार्यानें तो मीं येथें करणार आहे. हा विषय समजून घेताना मला व वाचकांना नाना ग्रंथांचें सहाय्य अवश्य असेल हें खरें; तथापि येथें या विचाराची मांडणी करावयाची ती कांहींशी ग्रंथनिरपेक्ष व वास्तव दृष्टीनें करायची आहे. हें विवेचन परिपूर्ण व निर्णायक होईल असें नाहीं. वाचकांनीं तें समजून घेतांना त्यांतील अपूर्णतेंत आपल्या विचारशक्तीनें व अधिक अभ्यासानें भर घालावी; आणि या विचारांची अखेर कसोटी येथें आपण प्रत्यक्ष समाजक्रांति करूं तेव्हाच लागणार आहे. हिंदुस्थानांत सोव्हिएट पद्धतीची समाजरचना यावी असें माझें मत आहे. रशियांत ती पद्धति पूर्ण निर्दोष नसेलही. तथापि रशियानें तसा एक प्रचंड प्रयोग केला. यामुळें त्या प्रयोगाचें बरेंचसें स्वरूप आपणांस कळूं शकलें. त्या प्रयोगांत कळलेले अनुभव जमेस धरून आपण येथें विचार करावा आणि आपल्या येथें प्रत्यक्ष प्रयोग करावा हें अगदीं योग्य आहे. मला ही कल्पना पुसट पुसट पुष्कळ वर्षे येत आहे. पण तिचा मनावर दृढ पगडा बसण्यास गेल्या युद्धकाळांत पं. नेहरूंनीं व्यक्त केलेलें एक मत विशेष कारण झालें. ब्रिटिश साम्राज्यशाही येथून गेल्यावर येथें सोव्हिएट पद्धतीची समाजरचना येईल असें अनुमान पं. नेहरूंनीं मांडलें होतें. अर्थात सोव्हिएट रशियाची सही सही नकल करण्याचा पं. नेहरूंचा हेतु असणें शक्यच नाहीं. रशियन इतिहासांतून कल्पना घेऊन येथें स्वतंत्र व जिवंत प्रयोग करावा अशीच नेहरूंची कल्पना असणार. नेहरूंनीं आपलें हें मत बदललें असल्याचें कांहीं लोक सांगतात. पण मला तसें कोठें आढळलें नाहीं.

शिवाय नेहरूंनीं आपलें मत बदललें म्हणण्याला तसें कांहीं कारणही घडलेलें नाहीं. कदाचित् सोव्हिएट राशियाचें एकादें धोरण त्यांना पसंत नसेल. पण तेवढ्यावरून सोव्हिएट समाजरचनेचा प्रयोग येथें करण्याला कांहींच अडचण नाहीं. अथवा सोव्हिएट पद्धतीखेरीज दुसरा एकादा आदर्श नेहरूंना आढळलेला नाहीं.

रशियांतील सोव्हिएट प्रयोगावर हल्ला करणाऱ्यांच्या लिहिण्याचा झोक पुष्कळदां असा असतो कीं, त्या सोव्हिएट पद्धतीपेक्षां अथवा येथें होणाऱ्या त्याच्या संभाव्य प्रयोगापेक्षां अँग्लो-अमेरिकन लोकशाही आणि येथें तिची अंमलांत येणारी लवाडीची नक्कल, याच व्यवस्था अधिक चांगल्या आणि त्या आपणांस मिळवितां व टिकवितां येतील. पण ब्रिटिश साम्राज्यानंतर येथें सोव्हिएट पद्धति येईल असें विधान नेहरूंनीं जें केलें तें फार दूरवर विचारानें केलें आहे. 'श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः' असें हें सूत्रात्मक मत आहे. ती त्यांची निव्वळ इच्छा नसून तो इतिहासक्रम ते सांगत आहेत. थोडा विचार केला तर नेहरूंच्या या मतांतील सयुक्तिकता लक्ष्यात येते. हिंदुस्तानांत आज जी राज्यघटना व समाजघटना आहे, ती बऱ्याच अंशानें कृत्रिम आहे. ब्रिटिश सैन्यसत्तेनें व अर्थसत्तेनें ती घडविलेली असून ही परकी सैन्यसत्ता व अर्थसत्ता जर नष्ट झाली तर येथल्या आजच्या समाजव्यवस्थेचें स्वरूपही नष्ट होईल. मग येथें बेबंदशाही माजेल अथवा न माजेल, आणि लवकर अथवा उशीरां कोणती तरी समाजव्यवस्था निर्माण होईल. ही समाजव्यवस्था सोव्हिएट पद्धतीची असण्याचा दृढ संभव आहे, हा नेहरूंच्या म्हणण्याचा आशय होय; थोड्या विचाराअंतीं हें सहज पटेल. हिंदुस्तानांतील आठ ते दहा कोटी म्हणजे एक चतुर्थांश लोकसंख्या आणि सहा ते सात लक्ष चौरस मैल म्हणजे एक तृतीयांश मुलूख हिंदी संस्थानांच्या अंमलाखालीं जातो. हीं संस्थानें म्हणजे जुलूम, पिळणूक आणि अज्ञान यांच्या या अंधारकोठड्या आहेत. हीं संस्थानें व त्यांतील प्रजा निव्वळ गुलाम आहेत. या प्रजांना आपल्या राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करणें ब्रिटिश सैन्यसत्तेमुळेंच अशक्य झालेलें आहे. ब्रिटिश सैन्यसत्ता नष्ट होतांच हिवाळ्यांत पाचोळा गळून पडतो त्याप्रमाणें संस्थानिकांच्या सत्ता गळून पडतील.

तीच गोष्ट जमीनदार, सावकार भांडवलदार वगैरेंचीही कमी अधिक प्रमाणांत होणार आहे. जमीनदार व सावकार यांनीं प्राचीन जगांत समाजसंवर्धनाचें विशिष्ट काम केलें म्हणून त्यांना समाजानें टिकवून धरलें. आताच्या समाजांत जमीनदार, सावकार, हीं फक्त पिळणुकीचीं यंत्रें झालेलीं आहेत. आजचें त्यांचें अस्तित्व हें ब्रिटिश सैन्यसत्तेवरच अवलंबून आहे. ब्रिटिश सैन्यसत्ता नष्ट होताच जनतेच्या इच्छेनें व आघातानें जमीनदार, सावकार नष्ट होणारच. हिंदी भांडवलदारांनीं नवीन पद्धतीचें औद्योगिक उत्पादन येथें उभारण्याचें बरेंच मोठें कार्य केलें असून हें कार्य कदाचित आणखी कांहीं काळ त्यांच्याच हातून चालूं द्यावें लागेल. ब्रिटिश सत्ता येथून जातां जातांही येथल्या समाजव्यवस्थेवर त्या कोलाहलाचे आघात कसे होतील हें समजणें आज तर्काच्या बाहेर आहे. तथापि दारिद्र्य आणि बेकारी नाहींशी करून बहुसंख्य समाजाच्या हितासाठीं निसर्गाच्या व माणसांच्या जास्तींत जास्त शक्ति वापरतां येणें हें अखेरीस भांडवलशाही नष्ट करून धनोत्पादनसाधनें सार्वजनिक मालकीनें वापरण्यानेंच शक्य आहे. हेंच सोव्हिएट पद्धतीचें सार आहे. ब्रिटिश साम्राज्य येथून नष्ट झालें म्हणजे सोव्हिएट पद्धति येथें येणें हें या प्रकारें अपरिहार्य वाटतें.

कॉंग्रेसच्या आणि अखिल हिंदी जनतेच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याला फार तीव्र स्वरूप आलें असल्यानें आधीं स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावांचून समाजक्रांतीचे प्रश्न कोणीं काढूं नयेत असा जणु दंडकच निर्माण झाला आहे. पण ही मोठी चूक आहे. नुसतें राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हटलें तरी त्या स्वतंत्र राष्ट्राचें सामाजिक स्वरूप कसें असेल यासंबंधानें विचार ठरवावा लागतो. सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतच नव्हे तर नुसत्या राजकीय क्षेत्रांतहि राष्ट्रीय स्वातंत्र्याचें स्वरूप कालमानानें बदललें आहे, हें नजरेस येतें. शिवाजीच्या वेळीं राष्ट्रीय स्वातंत्र्य आणण्यासाठीं महाराष्ट्राएवढ्या छोट्या मुलखांत कोणा तरी एका कर्तबगार व दयाळू माणसाचें अनियंत्रित व आनुवंशिक राज्य स्थापलें म्हणजे भागत असे व तें तेव्हां शक्य होतें. पण लोकमान्य टिळकांचे काळीं असें प्रांताचें राज्य स्थापणें अशक्य झालें आणि मोंगल राजाप्रमाणें अखिल भारतीय अनियंत्रित व आनुवंशिक राज्य टिळकांनीं स्थापूं म्हटलें असतें तर त्यांची वेड्यांत गणना झाली

असती. पार्लमेंटरी लोकशाहीचें लोकनियुक्त व पूर्ण जबाबदार सरकार म्हणजेच राष्ट्रीय स्वातंत्र्याचें सरकार ही कल्पना त्यावेळीं शक्य वाटे व ती सर्वमान्य झाली होती. शिवाजीपासून टिळकांच्या वेळे-पर्यंत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पनेंत हा फरक झाला तो मूलग्राही होता. तसाच मूलग्राही फरक टिळकांच्या नंतरच्या पंचवीस वर्षांत जगभर झाला आहे. स्वतंत्र आणि परतंत्र अशा दोनही प्रकारच्या राष्ट्रांत ही पार्लमेंटरी लोकशाही अपुरी, असमाधानकारक आणि निराशाजनक झाली आहे. गेल्या दीडशें वर्षांत जगांत प्रचंड औद्योगिक क्रांति होऊन माणसाची धनोत्पादनशक्ति वाढली. याच काळांत कांहीं राष्ट्रांत पार्लमेंटरी लोकशाही स्थापन होऊन राज्यसत्ता नियंत्रित झाल्या. छोटीं राज्यें होतीं तीं प्रचंड व बलवान् साम्राज्यें झालीं. विस्तीर्ण मुलुखांत वाहातूक, दळणवळण, संदेशन वाढून ज्ञान-प्रसाराचीं साधनें वाढलीं. शेतीचें पीक आणि जीवनाची इतर साधनेंही वाढलीं. माणसाची धनोत्पादनाची शक्ति वाढली आणि उपभोग्य धनही वाढलें, असा याचा सरळ अर्थ होता. पार्लमेंटांत योग्य माणसें निवडून आणून आपण राज्ययंत्र ताब्यांत घेतलें असें लोक बोलूं लागले. पण १९२८ पासून १९३४ पर्यंतच्या काळांत सर्व जगांत सर्व जिनसांची पूर्ण स्वस्ताई होऊनही अमेरिका, इंग्लंड यांसारख्या देशांतही कोट्यवधि माणसें बेकार झालीं व बाजारांत पडलेले मालाचे ढिगांचे ढीग खरेदी करण्यास त्यांच्याजवळ पैसा नाहीं अशी स्थिति झाली. एकच सोव्हिएट रशिया हा देश असा होता कीं तेथें हा बेकारीचा देखावा कधींही दिसला नाहीं. अमेरिकेंत, इंग्लंडांत, जर्मनींत व इतर स्वतंत्र राष्ट्रांतही लक्षावधि लोकांना भुकेकंगाल व्हावें लागलें आणि हीच अवस्था येथेंही झाली. अर्थात् केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्यानें जनतेचा पोटापाण्याचा मोठा प्रश्न सुटणें अशक्य आहे, हें आतां लक्ष्यांत येत आहे.

सोव्हिएट रशियाविरुद्ध लेखणी व वाणी यांच्या फैरी निष्फळपणें झाडून स्वतांचा व इतरांचा शीण करणाऱ्या लेखकांनीं आणि वक्त्यांनीं इतर जगांत बेकारीचा वणवा माजला असतां, रशियांत मात्र तो माजला नाहीं याची शास्त्रीय उपपत्ति स्वतः समजून घेतली असती, व इतरांस

समजावून दिली असती तर हिंदुस्थानात सोव्हिएट पद्धति निर्माण करण्याचे कामीं त्यांची शक्ति व वेळ खर्च होऊन रशियाला शिव्या देण्यास त्यांना वेळच उरला नसता. असो. बाकीच्या जगांत बेकारीचा वणवा भडकला असतां रशियांतील सोव्हिएट समाजव्यवस्थेंत बेकारी व तज्जन्य दैन्य कां नव्हतें याचा आपण थोडा विचार करूं. एकाच साधारण मोठ्या खेड्याच्या तीन अवस्था आपण विचारासाठीं घेऊं:—

( १ ) त्या खेड्याच्या आजपासून मागें दोनशें वर्षांच्या काळांत प्रवेश करूं. त्या काळीं ( समजा ) शेतकरी आपल्या मालकीच्या लहान-मोठ्या, जमिनी करीत असत. पुढें तेथें एक सावकार आला. त्यानें हळू हळू सावकारी वाढवून जमिनी घशांत घातल्या. एक साल शेतें खूप पिकलीं आणि धान्य खूप आलें. शेतकऱ्यांचे जवळ त्यांच्या चरितार्थापुरतें धान्य राहिलें आणि मालक-सावकाराकडे खंडाचें रूपानें खूप धान्य जमा झालें. त्याला तें सगळें खाऊन टाकतां आलें नाहीं. पण त्यावेळीं पुण्या-मुंबईचा मोठा बाजार नव्हता. विलायत माहिती नव्हती. धान्य विकून पैसे बँकेंत ठेवतां येत नव्हते. गांवापासून चार पांच मैलांपलीकडे इतकें धान्य नेणें सुरक्षित नव्हतें, आणि बांधलेल्या सडकाही नव्हत्या. मालक सावकारानें तें सारें धान्य पेवांत टाकलें. पुढील एक दोन सालीं अवर्षणानें म्हणा, अति अवर्षणानें म्हणा, पिकें बुडालीं. शेतकऱ्यांना स्वतांलाच खायला कांहीं निर्माण झालें नाहीं; मग सावकारमालकाला खंड कुठला मिळणार ? सावकाराला पेवांतलें धान्य आहे, पण शेतकऱ्यांना खायला काय ! पण सावकारानें पेवांतलें धान्य खाऊन संपणारें नव्हतें आणि पेवांत तें आणखी कांहीं दिवस राहिल्यास त्याची माती होणार होती. तेव्हां भुकेल्या शेतकऱ्यांनीं कर्ज म्हणून, दान म्हणून अथवा लूट म्हणून तें धान्य घेणें आणि त्या सावकार–मालकानें तें देणें हा मालक, शेतकरी व स्वतः धान्य या सर्वांच्या दृष्टीनें योग्य उपाय होता. तसेंच अखेर घडून आलें. असें वर्षोगणती चाललें. एक साल सुकाळ, पुढें एक दोन सालें दुष्काळ; तथापि पूर्ण उपासमार अशी कोणाचीच झाली नाहीं. म्हणून ज्या शेतकऱ्यांची मालकीची शेती सावकाराकडे गेली त्यांनाही हा मालकीतील पालट फार जाणवला नाहीं.

(२) आंता त्याच खेड्यांत आपण आज प्रवेश करूं. मघांच्या चित्रांतली कांहीं दृश्यें कायम आहेत. म्हणजे सावकाराकडे शेती गेली आहे. एक साल पीक चांगलें आलें, पुष्कळसें सावकाराकडे बोलें पुढील दोन सालें कडक दुष्काळाचीं गेलीं. पण आतां सावकाराचीं पेवें कधींच बुझलीं होतीं. धान्याचें पीक सावकाराचे घरीं येतांच त्यानें आपल्या कुटुंबाच्या बेगमीचें धान्य ठेवून घेऊन बाकीचें धान्य आगगाडींतून मुंबईस पाठविलें. तेथून पुढे तें कोठें तरी मसणांत गेलें, सावकाराचे हातीं चलनी नोटा आल्या; त्या त्यानें मुंबईच्या बँकेंत ठेवल्या. खेडेगांवांत एक 'पार्लमेंट' हि होतें. (अशी कल्पना करूं.) शेतकऱ्यांनीं आपल्या मताचे प्रतिनिधि तेथें निवडून दिले. त्यांनीं एक शेतीचा तज्ज्ञ बोलावून त्याचा सल्ला विचारला. तो म्हणाला, शेतींत ताली बांधून, खतें घालून, जंगल वाढवून, पिकांचें पालट करून, विहिरी आणि कालवे खणून पीक वाढविणें शक्य आहे. पण जमिनीचा मालक जमिनींत भांडवल घालण्यास तयार होईना. शेतीच्यापेक्षां मुंबईत गिरणींत भांडवल गुंतविल्यास नफा अधिक येत होता. म्हणून त्यानें शेतींत भांडवल गुंतविण्याचें नाकारलें. खेड्यातले तरुण जवान शेतकरी त्या नापीक शेतींत काम करण्याचें नाकारून मुंबईच्या गिरणींत आले. मुंबईच्या गिरणींत नवीं नवीं यंत्रें आलीं. परदेशी कापडानें कापडभाव उतरले कीं गिरणींत बेकारी येईल आणि मुंबईला गेलेला शेतकरी उपाशीं मरायला खेड्यास परत येईल. शेतीला भांवडल नाहीं आणि जवानमर्द शेतकऱ्यांची सेवा नाहीं यामुळें गांवचें पीक कमी कमी होऊं लागलें. जें पिके तें पुनः मालकसावकाराच्या बँकेंत गडप होई. या देशांतील हजारों–लाखों खेड्यांची हीच दशा झाली. विपत्तीचा जोर थोडा वाढताच बंगालचे तीस लक्ष शेतकरी तडफडून मेले. त्याच वेळीं जमीनदार आपल्या धान्याचा पैसा बनवीत होते.

(३) आतां तिसरें चित्र घेऊं. आणखी दहा वर्षांनंतरचा काळ. आतां त्या खेड्यांत सावकार अथवा जमीनदार मालक कोणीही नाहीं. गांवांतील सर्व शेतकरी समाइकीनें शेती करतात. शेतीच्या तज्ज्ञानें शेतींत भांडवल घालण्याचा सल्ला दिला. तेव्हां समाईक उत्पन्नांतून बचत करून ती शेतीला भांडवल म्हणून पुरविण्याचा ठराव गांवच्या पार्लमेंटानें केला. तावडतोब

तो अंमलांत आला. सालोसाल शेतींत भांडवल वाढून पीक वाढलें. आतां शेतीचे श्रम कमी व्हावे म्हणून यंत्रें आणण्याचें पार्लमेंटानें ठरविलें. मुंबईतील भांडवलदारांच्या गिरणींत नवें यंत्र आलें कीं मजूर कमी लागतात व बेकारी माजते. खेड्यांतील समाईक शेतींत यंत्रें येऊन मजूर कमी लागूं लागले तेव्हां त्यांतील मजुरांचा उपयोग नवीं घरें, बागा, क्रीडामंदिरें, शाळा, दवाखाने, कारखाने वगैरे बांधण्याकडे पार्लमेंटानें केला. शेवटीं कामाचे तास कमी केले, पण बेकार कोणासच केलें नाहीं. तेथें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें झालें. इतकेंच नव्हे तर, सर्वच शिक्षण मोफत झालें व सुधारलें. माणसाच्या आरोग्यासाठीं, तृप्तीसाठीं, करमणुकीसाठीं जरूर त्या सर्व गोष्टींची लयलूट झाली. असा हा तृप्त समाज अखेर फुरसत फार मिळाल्यानें ईश्वराचे मार्गे लागेल कीं चावटपणांत गंमत मानूं लागेल यासंबंधीचा विचार मला आज सुचत नाहीं.

"खरी लोकशाही म्हणजे लोकांचें, लोकांसाठीं, लोकांनीं चालविलेलें राज्य" अशी लिंकननें लोकशाहीची व्याख्या केली. पण, खेड्यांतील जमिनीची मालकी जोंवर सावकार-मालकांकडे होती, तोंवर पार्लमेंटांत शेतकऱ्यांचे प्रतिनिधि असून शेतकऱ्यांच्या शेतीची आबाळ होत होती. खेड्यांत पुरेसें शेतीचें उत्पन्न नाहीं म्हणून तरुण शेतकरी मुंबईस जात होता आणि तेथें बेकारी झाली म्हणजे उपाशी मरायला खेड्यांत येत होता. पार्लमेंट हें लोकशाहीचें नुसतें सोंग होतें. शेती लोकांची नव्हती, लोकांकडून, लोकांसाठीं, ती केली जात नव्हती.

उलट सामुदायिक शेती झाल्यावर पार्लमेंट हें शेती, कारखाने, बागा, क्रीडाभुवनें, घरें, आरोग्य, शिक्षण वगैरेंची योजना आंखण्याचें केंद्र झालें. तेथें ज्या योजना आंखल्या जात, त्यांची बजावणी करण्याचें काम गांवकऱ्याकडे आलें, पार्लमेंटासाठीं पांच वर्षांतून एकदा मतें देऊन मग बेकारींत माश्या मारीत बसणें एवढेंच काम सामान्य नागरिकाकडे राहिलें नाहीं. पार्लमेंटानें शेती, कारखाने व गांवसुधारणा यासाठीं आंखलेल्या योजना अंमलांत आणण्याची जबाबदारी ही प्रत्येक नागरिकावर आली आणि हें धनोत्पादक कार्य सक्तीनें करणें हा एक राजकीय हक्क आणि हें एक

राजकीय कर्तव्य ठरलें. पार्लमेंट योजना आंखील त्या हुकमशाही पद्धतीनें न आंखतां गांवकऱ्यांच्या व तज्ज्ञांच्या सल्ल्यानेंच आंखील. हीच सोव्हिएट कल्पना व सोव्हिएट रचना. रशियांत ही जन्म पावून अमलांत आली. तेथें तिचा अधःपात झाला असला ( अथवा तेथें कांहीं घडलेंच नसून अजून तेथें झार निकोलसचेंच राज्य असलें-) तरी हिंदुस्थानांत ही घटना आपण अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा इतका आपणांस तिचा बोध झाला की नाहीं ! स्टालिनला शिव्या देण्यांत आणि छुपा कम्युनिस्ट कोण आहे तो शोधण्याकरितां ज्याच्या त्याच्या अंगचें सालटें काढण्यासाठीं लेखणीचे सुरे बनविण्यांत ज्यांना उत्साह वाटतो, त्यांना आपल्या गरीब शेतकऱ्यांसाठीं ही सोव्हिएट राज्यें स्थापण्याचा विचार करण्यांत उत्साह वाटत नाहीं काय !

स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या जुन्या कल्पना मात्र मोडींत घातल्या पाहिजेत. गांवच्या पार्लमेंटानें सामुदायिक शेतीची योजना आंखायची म्हटलें म्हणजे गांवांतल्या प्रत्येक नागरिकाला काम करण्याची आणि तें योजनेबरहुकूम करण्याची सक्ती असणारच. हीच गुलामगिरी असें कांहीं लोक म्हणतात. जुन्या जमान्यांतला शेतकरी आळशीपणानें व आरामपणानें आपली शेती करी. बैलासंगतीं बैलासारखा अप्रबुद्धपणें आरामांत व कष्टांत दिवस काढी. नांगराखालची जमीन कोणाच्या मालकीत आहे, ती गहाण आहे कीं मोकळी आहे याची त्या बैलानें व शेतकऱ्यानें कधींच पर्वा केली नाहीं. परंपरागत शेतीचें काम बैलासारखेंच निष्काळजीपणें अथवा अथवा सहजपणें तो करी, आणि दारिद्र्य, दुखणें, मरण आलें तर खाटकाच्या अंगणांतील बकरीप्रमाणें त्या दैवी संकटांस शरण जात असे. हा शेतकरी 'स्वतंत्र' होता आणि त्याचें जीवन लोकशाहीचें होतें असें म्हणणें म्हणजे स्वातंत्र्य आणि लोकशाही यांची थट्टा होय. त्यानंतर जन्मास आलेला कारखानदारी मजूर हा पार्लमेंटासाठीं प्रतिनिधि निवडून देऊं लागला, पण ऊस चरकांत पिळून निघावा तसा पिळला जाऊं लागला. हळुहळू त्याच्या कामाच्या परिस्थितीचे कायदे झाले व त्याची परिस्थिति सुधारली, त्याचा रोजगार वाढला, पण भांडवलदारानें खर्च कमी करण्यासाठीं नवीं नवीं यंत्रें उत्पन्न केलीं आणि कामगारावर बेकारीचें

संकट कोसळलें. ही बेकारी हा भांडवलशाहीचा अंगभूत रोग आहे. कारण, भांडवलदारास नफा राहणें हें भांडवलदारीसाठीं अवश्य असतें. हा नफा उरायचा तर उत्पादनाचा खर्च कमी करावा लागतो, त्यासाठीं मजूरा-मजूरांत चढाओढ लावावी लागते आणि त्यासाठीं कांहीं प्रमाणांत मजूरांच्या डोक्यावर बेकारीची तलवार लटकवावी लागतेच. या बेकार आणि उपाशी राहण्याच्या स्वातंत्र्यापेक्षां डोळसपणें सर्वांनीं सर्वांच्या हितासाठीं आंखलेली योजना सर्वांना पार पाडावी लागणें यांतच खरें स्वातंत्र्य आणि खरी लोकशाही आहे.

व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली भांडवलशाही ही समाजाचे आर्थिक प्रश्न सोडवूंच शकत नाहीं. कारण, व्यक्तिस्वातंत्र्याचें सार पार्लमेंटास मत देण्याचा अधिकार हें नसून रोजगारीसंबंधानें करारमदार करण्याचें, कोणताही धंदा करण्याचें अथवा न करण्याचें आणि केवढेंही धनोत्पादनसाधन खाजगी मालकींत ठेवण्याचें स्वातंत्र्य हा असतो. या व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण करण्याचा अधिकार पार्लमेंटांना मुळींच नसतो. लहानसें जातें, बैलगाडी, हातमाग, शिवण्याचें यंत्र वगैरे धनोत्पादनसाधनें गरीबांनाही आपापल्या खाजगी मालकींत ठेवता येतात. पण, दळणाची यांत्रिक चक्की, आगगाडी, कापडगिरणी, एक हजार शिवण्याचीं यंत्रें असलेल्या भांडवलदार शिंप्याचें दुकान, या गोष्टी शेंकडा नव्वद लोकांना आपल्या मालकींत ठेवतां येणारच नाहींत. म्हणून शेंकडा नव्वद लोकांना मजूरच रहावें लागणार. आणि भांडवलदारांना नफा हवा म्हणून मजुरा-मजूरांत चढाओढ लावण्यासाठीं बेकारी कायम ठेवणें भांडवलदारांना अवश्य वाटणार. इंग्लंड व अमेरिका या दोन देशांतील राज्यघटनेंत फरक कितीही असला, तरी जमीन आणि भांडवल म्हणजेच धनोत्पादनसाधनें हीं सार्वजनिक मालकीचीं करण्यास पार्लमेंटाची परवानगी दोन्ही देशांत मिळणार नाहीं. ट्रेडयुनिअन्स म्हणजे कामगारसंघ हे मजूरा-मजूरांतील चढाओढ थांबवितात हें खरें. पण त्यांचें ध्येय भांडवलशाही मोडणें हें नाहीं. भांडवलेदारांना नफा उरेल अशा बेतानेंच त्यांनीं पगाराचा हट्ट धरावयाचा असतो. उलट जितके उत्पादक श्रम करावे तितकें अधिक धन व्यक्तिशः मिळणें हें सोव्हिएट पद्धतीचें ध्येय असतें व सोव्हिएट पद्धतींतच तें शक्य होतें.

उलट कामगारसंघांना भांडवलदारांच्या नफ्यासाठीं कमींत कमी मजुरी पत्करावी लागते. कारण तसें केलें नाहीं तर धंदाच आटतो. इंग्लंडांतली मजूरी जास्त म्हणून ब्रिटिश भांडवलदारांनीं आपलें ब्रिटिश धंद्यांतलें भांडवल काढून तें जर्मनींत पाठविलें. तेव्हां इंग्लंडांतले धंदे बंद पडले. मजूरांत बेकारी वाढली. कामगारसंघटनांना मजूरीचे दर उतरण्यास संमति द्यावी लागली. पण जर्मनीचे मजूरीचे दर आणखी कमी असल्यामुळें ब्रिटिश भांडवलदारांनीं आपले धंदे वाढविले नाहींत. बेकार कामगारांना बैठे तनखे देण्याची पद्धत पडल्यामुळें समाजांत निष्क्रियता, लाचारी यांची वाढ झाली. गेल्या युद्धाच्या आरंभीं ब्रिटनची बरीचशी फजिती झाली, तिचें मुख्य कारण अनेक धंदे भांडवलाच्या अभावीं मोडले वा मागासले आणि जनता बेकार, लाचार व नादान झाली हें होय.

या व्यक्तिनिष्ठ भांडवलशाहींत जें कांहीं व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य वगैरे होतें तेंही आतां संघटित भांडवलशाहींत अथवा फॅसिझम्‌मध्यें मुळींच उरलें नाहीं. आणि आतां भांडवलदारांना फॅसिस्ट झाल्यावांचून जगतांही यावयाचें नाहीं. आंतरराष्ट्रीय युद्धाची भीति ही पुढील कांहीं वर्षें डोकीवर लटकणाऱ्या तरवारीसारखी कायम राहणार. अर्थात् देशांतील धनोत्पादन-वाढविणें हें भांडवलदारांना अवश्यच आहे. त्यासाठीं श्रम शक्ति व धनोत्पादनसाधनें जास्तींत जास्त प्रमाणांत राबवून कांहीं बड्या भांडवलदारांनीं आपसांत एकजूट करून लहान भांडवलदारांना खाऊन टाकणें, कामगारसंघटना बंद करणें अथवा त्यांना भांडवलदारांच्या आपसांतील चढाओढीचा फायदा मिळेल हें अशक्य करणें आणि अशा प्रकारें कामगा-रांना पिळवणुकीच्या चिमट्यांत धरणें हें संघटित भांडवलशहांना शक्य व अपरिहार्यच झालें आहे. उत्पादनाचीं साधनें प्रचंड होऊन तीं सर्व समाजा-साठीं एकत्रित उत्पादनकार्य करणार असल्यानें सगळा समाज एका उत्पादनयंत्रांत बांधला गेल्यासारखा राहणार हें अपरिहार्यच आहे. याचेंच नांव टोटॅलिटेरिअन अथवा आखबंद समाजघटना. हींत धनोत्पादन साधनें मूठभर लोकांच्या मालकींत राहतील तर ती समाजघटना फॅसिस्ट ठरेल. त्या समाजांतील नव्वद टक्के लोकांना उत्पाद-

नाऱ्या आंखणींत कोणी कांहीं विचारणार नाहीं. भांडवलदारांच्या नफ्या-साठीं कमी मजूरीवर राबणें हाच त्यांचा भोगवटा. उलट सोव्हिअट पद्धति म्हणजे धनोत्पादनसाधनांची सार्वजनिक मालकी आणि लोकहितासाठींच त्यांचा वापर. ही पद्धति अंमलांत असल्यास सामुदायिक उत्पादनाची योजना सर्वांच्या सल्ल्यानें आंखण्यांत येईल व धनोत्पादन. जितकें अधिक होईल तितका उपभोग सर्वांनाच अधिक मिळेल. आखीब आर्थिक योजना, कामाची सक्ति आणि अखंड म्हणजे टोटॅलिटेरिअन जीवन हें प्रचंड धनोत्पादनसाधनांच्या आजच्या जमान्यांत कोणालाच सुटणार नाहीं. फॅसिझममध्यें शुद्ध गुलामगिरी आणि दारिद्र्य आहे, पण सोव्हिअट पद्धतींत जितके अधिक श्रम तितकें अधिक श्रमफळ मिळत असून, सामुदायिक योजना आंखण्यांत व ती पार पाडण्यांत सर्वांना भाग घेतां येत असल्यानें त्यांत कर्तृत्वाचा उत्साह व ईर्षा उत्पन्न होण्यास वाव आहे.

प्रत्येक राष्ट्रानें परक्यांच्या आर्थिक गुलामगिरींत जायचें नाहीं या तत्त्वाचा चोहोंकडे आतां पुरस्कार होऊं लागला असून, परचक्राचें भय सर्व राष्ट्रांना वाटत असल्यानें निरनिराळ्या राष्ट्रांत भांडवलशाही असली कीं तिचें स्वरूप अतिशय निकराचें म्हणजे फॅसिस्ट असणार. कारण, भांडवलशाही राष्ट्रास नफा मिळविण्यासाठीं देशाबाहेरचे बाजार लागतात. या बाजारासाठीं आंतरराष्ट्रीय चढाओढ चालून बाजारभाव उतरणार. त्यामुळें भांडवलदारांस नफा कमी राहणार व मजुरांची मजुरी घटत जाणार. या आंतरराष्ट्रीय बाजा-रांच्या चढाओढींतच भयानक आंतरराष्ट्रीय युद्धें माजतात. उलट सोव्हिअट पद्धतींत स्वदेशी बाजार हाच महत्त्वाचा असल्यानें समाजाच्या उपभोगाच्या गरजेइतकें पुष्कळ उत्पन्न करावें व तें भोगावें हें सहज शक्य आहे. परचक्राला तोंड देण्याला हा समाज सज्ज राहीलच. पण नफा हें त्याचें तत्त्व नसल्यानें बाजार जिंकण्यासाठीं त्याला आक्रमक धोरण अवलंबिण्याची आवश्यकता नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांसारखीं थोडीं राष्ट्रें भांडवलशाही उत्पादनांत पुढें आलीं तेव्हां त्यांना एका शंभर वर्षांत पिळणुकीला सारें मागासलेलें जग अपुरें पडून आपल्या लुटीच्या मुलुखाचा हिस्सा मागणाऱ्या जर्मनीला व जपानला चिरडून टाकावें लागलें. आतां तर जगांतलें प्रत्येक राष्ट्र आपली उत्पादनशक्ति भांडवलशाहीच्या आधारानें वाढवून जगाचा बाजार जिंक-

ण्यासाठीं पुढें येत आहे. या प्रत्येकाला आतां फॅसिझम्, मजुरांची उपासमार व नेहमीं युद्धांचा धाक याखालींच आपल्या जनतेला दाबून ठेवावें लागेल. हीं संकटें टाळण्याचें सामर्थ्य सोव्हिएट पद्धतींतच आहे ही गोष्ट सोव्हिएट पद्धतीचें स्वरूप समजून घेतल्यास सहजच पटणार आहे.

" सोव्हिएट पद्धतींत व फॅसिस्ट पद्धतींतही अखेर मॅनेजरांचेंच राज्य असतें व फॅसिस्ट पद्धतींत बडे नफे असल्यास सोव्हिएट पद्धतींत बडे पगार असतात आणि दोन्हींतही मजुरांची सक्ति असते, त्याअर्थी दोहोंतही सारखीच गुलामगिरी आहे " असा एक आक्षेप सोव्हिएट पद्धतीवर कांहीं विद्वान-ब्रुवांचा असतो. पण तो सोव्हिएट पद्धतीसंबंधानें अपूर्ण समज, गैरसमज अथवा दुराग्रह याचा परिणाम आहे. रशियांतील सोव्हिएट पद्धतींत ट्रेड-यूनिअन्स ऊर्फ कामगारसंघटनांना फार महत्त्व असून योजना आंखण्यांत व मजुरीचे दर ठरविण्यांत या संघटना एकजुटीनें व प्रामुख्यानें भाग घेतात. श्रमजीवी अशा मुख्यतः खालच्या ( म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्याहून भिन्न अशा ) मजुरांचे हितसंबंध सांभाळणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य असतें. यामुळें मॅनेजरांच्या हुकुमशाहीस जागरूक कामगारसंघ आळा घालूं शकतात. शिक्षण हें सार्वत्रिक व केवळ्याहि उच्च दर्जापर्यंत मोफत असल्यानें समाजाच्या सर्व दर्जांतून मॅनेजरीच्या लायकीचे लोकही पुढें येतात व मॅनेजर ही एक वेगळी जात राहणें अपरिहार्य आहे असें मानण्याचें कारण राहात नाहीं. फॅसिस्ट राष्ट्रांना नफ्यासाठीं बाहेरचे बाजार हवे असतात, ते मिळाले नाहींत कीं, जनतेचे तनखे तोडावे आणि जमल्यास आंतरराष्ट्रीय युद्धें करावीं हें फॅसिस्टांना अपरिहार्य असतें. सोव्हिएट पद्धतींत उत्पादनाची अवस्था मागासलेली असल्यास उत्पादनास ईर्षा वाटावी यासाठीं अधिक लायक नोकरास अधिक पगार देण्यांत येतो. पण त्यामुळें विषमता वाढत नाहीं तर लायकी वाढविण्याची ईर्षा व एकंदर उत्पादनाचें परिमाणही त्यामुळें वाढवितां येतें आणि त्यामुळें किमान मिळकतीची पातळी वरवर जाऊन वरच्या पातळीवर समता निर्माण होण्याकडे या उत्पादन-पद्धतीचा कल राहतो. जास्तींत जास्त उत्पादनाची गरज आणि अधिक उत्पादन करणाऱ्यास अधिक मिळकत, यामुळें कर्तृत्वाच्या चढा-

ओढीस वाव राहून समाजाच्या सर्व थरांतून उत्तमोत्तम गुणांचीं माणसें पुढें येऊं शकतात आणि निसर्गतः ज्यांची प्रगति मंद असेल अशांचाही कांहीं ना कांहीं उपयोग करून घेतां येतो. सर्वांच्या मिळकतींची किमान पातळी उंच ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जें काम करण्यास समर्थ नसतील त्यांना मोफत पोसलें गेलेंच पाहिजे. पण श्रमाची आणि सामुदायिक जीवनाची सक्ती ही मात्र सुटत नाहीं. सामुदायिक जीवनाची सक्ति नको असेल तर पुन्हां चरखा आणि बैलगाडा या जीवनाकडे धावलें पाहिजे. पण त्या परिस्थितींत आज आम्हांला कोणी स्वतंत्रपणें जगूंच देणार नाहीं. शिवाय, ती परिस्थिति दारिद्र्याची आणि अतिशय यातायातीचीहि आहे. निसर्गाचा स्वामी होऊं पाहणाऱ्या माणसानें पुन्हां निसर्गाचा गुलाम होण्यासारखें तें जिणें आहे.

शेवटीं, मीं वर मांडलेले विचार यापेक्षां अधिक आटोपशीरपणें, ठाशीवपणें आणि निःसंशय अधिक अधिकारवाणीनें प्रो. लास्की यानें ज्यांत मांडले आहेत असा एक उतारा भाषांतर करून येथें देतों. प्रो. लास्की म्हणतो, "व्यक्तिस्वातंत्र्यवादी भांडवलदारी लोकशाहीकडून समुदायवादी आंखीव लोकशाहीकडे जाण्याच्या मार्गांत अल्पकाल अथवा कायमचा व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश होतो असें मानण्यास पुरावा नाहीं. पण माझ्या प्रमेयाचें समर्थन करण्यासाठीं व्यक्तिस्वातंत्र्य या कल्पनेंत ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो त्यांचें पृथक्करण येथें केलें पाहिजे. 'व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे आवश्यक व अपरिहार्य अशा घटनांना मान्यता देणें हें होय,' हें मार्क्सचें अर्थपूर्ण सूत्र मीं अनेक वेळां सांगितलें आहे. चंद्रलोकावर राहतां येणें शक्य झाल्याशिवाय चंद्र पाहिजे म्हणून रडत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जगांत परिस्थितीचे अपरिहार्य असे कांहीं परिणाम असतात. त्यांच्याशीं आपल्या मनानें जमतें घेतलें पाहिजे. मृत्यु ही अशीच एक गोष्ट आहे. तसेंच माणसाच्या व्यक्तिविकासाला विशिष्ट रूप व आकार देणारे कांहीं अनुभव पुष्कळदां फारच फार दुःख सोसून खरेदी करणें हेंहि अपरिहार्य असतें. त्यासाठीं मनानें तयार असलें पाहिजे. अवश्य व अपरिहार्य काय आहे याची चौकट मला एकदां मिळाली म्हणजे तिच्या आंत माझ्या स्वतंत्र्याला किती वाव आहे याचा मी शोध करतों. हा शोध करीत असतांना

माझी कर्तृत्वाची ईर्षा सतत जागृत राहते. आपण प्रत्येकजण एक सामाजिक कार्य करीत आहों ही जाणीव आपणास असते. आणि आपल्या वैयक्तिक हितापेक्षां तें श्रेष्ठ आहे अशी जाणीव असूनसुद्धां त्या सामाजिक कार्याला माझा व्यक्तिगत व अहंकारयुक्त असा कांहींतरी विशिष्ट आकार मी देत असतोंच. सारांश, समाजांतील आम्हा प्रत्येक व्यक्तीचें हित साधावयाचें हें समाजाचें ध्येय आहे, तसेंच तें हित साधण्याचें साधनहि आपण प्रत्येक-जण आहेंत. समाजांत आम्हा प्रत्येकाला सामाजिक व्यवहारांत हस्तक्षेप करण्याइतका वाव असून स्वतःच्या पुरता कोणता तरी प्रयोग करण्याचें थोडेसें स्वातंत्र्यहि आहे अशी जाणीव असणें हेंच व्यक्तिस्वातंत्र्य होय. आपलें कार्यक्षितिज विस्तृत असून त्यांत निवड करण्याला आपल्याला अधिकार आहे. आपलें व्यक्तिवैशिष्ट्य विकसून घेण्याला अनिर्बंध संधि त्यांत आहे या जाणिवेंतून आपलें व्यक्तिस्वातंत्र्य उगम पावत असतें. ज्या समाजांतील संस्थांत कार्य करतांना त्यांतील व्यक्तिमात्राला आपण कांहीं तरी नवीन निर्माण करूं शकूं अशी आशा वाटून त्या आशेमुळें त्या निर्मितीचें कर्तृत्व गाजविण्यास त्याला उत्साह वाटतो, आणि या कर्तृत्वामुळें त्याला आपल्या श्रेष्ठ व्यक्तित्वाचा अनुभव येऊन उल्हास वाटूं लागतो, त्या समा-जांत व्यक्ति-स्वातंत्र्य आहे असें मी मानतों.

रशियांतील राज्यकर्त्यांनीं अपरिहार्य म्हणून प्रचंड बंधनें जनताजीवना-वर घातलीं असतांही तेथील सोव्हिएट समाजव्यवस्थेंत स्वातंत्र्य आहे असें जें मी म्हणतों तें वर मीं दिलेल्या अर्थानें म्हणतों. ब्रिटिश कामगार चर्चिल अथवा रुझवेल्ट यांच्याविरुद्ध टीका करूं शकतो तशी रशियन कामगार स्टालिनविरुद्ध करूं शकत नाहीं. तथापि, रशियन कामगार आपल्या कार-खान्यांतील फोरमनविरुद्ध व व्यवस्थापकाविरुद्ध जशी टीका करूं शकतो तशी टीका ब्रिटिश कामगार आपल्या फोरमनवर अथवा व्यवस्थापकावर करूं शकत नाहीं. रशियन कामगारांचीं जीवनसाधनें आज तोकडीं आहेत. त्याला चांगलीं घरें नाहींत. तरी पण, खालच्या वर्गांत जन्माला आला म्हणून खालींच राहिलें पाहिजे अशी परिस्थिति त्याला तेथें नाहीं. त्याला बेकारीचें भय नाहीं. म्हातारपणाला तो भीत नाहीं. त्याच्या आरोग्याची काळजी राष्ट्र वाहतें. त्याच्या मुलांची सुस्थिति राखणें हें राज्यकर्त्यांचें पहिलें कर्तव्य आहे.

तो श्रमशक्ति राष्ट्राच्या सेवेत खर्च करतो, तीमुळें त्याला एक उच्च दर्जा मिळत असतो. कारण, भांडवलशाही अवस्थेमध्यें श्रमशक्ति जशी केवळ एक क्रयविक्रयाची वस्तु असते, तशी ती तेथें राहिलेली नाहीं. गेली एक सबंध पिढीइतका काळ रशियन नागरिकाला आपण एक प्रचंड साहस करीत आहों याचा उत्साह वाटून राहिला आहे. आपल्या भवितव्यासंबंधानें ऐतिहासिक दृष्टया भव्य असा एक प्रयोग आपण करीत आहों, या जाणीवेनें वाटणारा उल्हास,त्याला गेली सबंध पिढीभर वाटला. तेथील कामगार-पुरुषापेक्षांहि कामगार-स्त्रीला हा उत्साह अधिक वाटला आहे. कम्युनिस्ट हुकुमशाही तेथें प्रत्येक व्यक्तीच्या विकासाची योजना आंखीत असेल; या योजनेचे जे पायाभूत नियम असतील त्यांचा भंग करणाऱ्याना कठोर शिक्षा करण्यांत येत असेल. तथापि, कोट्यवधि व्यक्तींना, आपला वैयक्तिक विकास आपण करून घेऊं शकतों, अशी जाणीव या कम्युनिस्ट हुकुमशाहीनें सत्य-सृष्टींत निर्माण केली आहे ही गोष्ट कोणी विचारपूर्वक अमान्य करील असें वाटत नाहीं. व्यक्तिविकासाचें सामर्थ्य आपल्या ठिकाणीं आहे ही जाणिवच त्या त्या व्यक्तीला आपलें व्यक्तित्व स्थापित करण्याचें सामर्थ्य देते; ही जाणीव हेंच त्या व्यक्तिस्वातंत्र्याचें रहस्य होय."

**"रिफ्लेक्शन्स ऑन दि रेव्होल्यूशन ऑफ अवर ओन टाइम" पृ. २४२-४३**

**—नवयुग, दिवाळी अंक १९४५.**

# ‘माझें कोणत्याच पक्षाशीं जमत नाहीं’

“माझें कोणत्याच पक्षाशीं जमत नाहीं” हा आरोप खरोखरच माझ्यावर कोणीं केला असल्यास त्या आरोपास सरळ कबूलीजबाब देऊन मोकळें होणें हा मला प्रामाणिक व सोपा मार्ग वाटतो. हा कबूलीजबाब देतांना हिंदुस्तानांतील व मुख्यतः महाराष्ट्रांतील प्रमुख पक्षांवर मला प्रतिकूल टीका करावी लागणार आहे. दिवाळीसारख्या महोत्सवाच्या वेळीं हें काहीं आनंददायक काम नव्हे. तथापि मी काँग्रेसवादी असून काँग्रेसविरुद्धही टीका करणार आहे हें वाचकांनीं लक्षांत घ्यावें आणि दिवाळीच्या महोत्सवाचा उपयोग काँग्रेसेतर पक्षाविरुद्ध निवडणूकप्रचार करण्यासाठीं करणार आहे असा समज कोणीं करून घेऊं नये.

मी एका काळीं जातिनिष्ठ, ईश्वरनिष्ठ व हिंदुसभावादी होतों. त्यावेळीं काँग्रेसमध्यें राहूनही हिंदुसभेंत राहणें यांत विरोध मानण्यांत येत नसे. पुढें मी जेव्हां समाजवादी विचार वाचूं, ऐकूं लागलों तेव्हांपासून माझ्या डोक्यांतील हिंदुत्वनिष्ठेचा कैफ साफ उतरला. हळूहळू माझी जातिनिष्ठा, जुनाट धर्मनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, अध्यात्मनिष्ठा सर्व नष्ट झाली आणि मी पूर्ण भौतिकवादी झालों. हिंदुसभेशीं तेव्हांपासून माझें बनेनासें झालें. म्हणजे मीं हिंदुत्व सोडलें असें नव्हे. तें मी सोडूं शकणार नाहीं. त्यांतले हक्क व अधिकार मीं सोडावे, पण कर्तव्यें चुकत नाहींत. ‘तुम्ही हिंदु आहां काय?’ असें मला कोणीं विचारलें तर मी ‘होय’ असें म्हणतों. याचें कारण हिंदु या नात्यानें अस्पृश्यतानिवारणासारख्या ज्या जबाबदाऱ्या इतिहासक्रमानें हिंदूवर येऊन पडल्या आहेत त्या मी झुगारून देऊं शकत नाहीं. मुसलमानांची गोषाची चाल नष्ट करण्यासाठीं मुसलमानांनींच चळवळ केली पाहिजे, त्याप्रमाणें अस्पृश्यतानिवारणासारखे हिंदूंतले दोष हिंदूंनींच नष्ट केले पाहिजेत. यासाठींच हिंदुसभेचीही गरज आहे. पण अखिल हिंदूंचे समाईक राजकीय व आर्थिक हितसंबंध असे कांहींही नाहींत. मशिदीवरून वाद्यें वाजविणें, देवळें व मशिदी यांच्या विशिष्ट जागा असणें असले प्रश्न

राजकारणापासून आमचें लक्ष दूर नेण्यासाठीं आमच्या हितशत्रूंनीं उत्पन्न केलेले असतात, त्यांना महत्त्व न देतां जनतेच्या राजकीय व आर्थिक हक्कासाठीं झगडलें पाहिजे. ही जनता सर्व धर्मांची व सर्व जातींची संमिश्र आहे. म्हणून तिच्या राजकीय व आर्थिक उद्धाराचें कार्य हिंदुसभा करूंच शकणार नाहीं. या बाबतींत हिंदुसभेच्या नांवाचा दुरुपयोग कसा होत आहे याची हिंदुसभावादी तरुणांना कल्पना नाहीं. कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांत हिंदुसभापुढाऱ्यांनीं पंचाण्णव टक्के हिंदु असणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताच्या कायद्यास विरोध करून सर्वत्र जमीनमालकांची बाजू घेतली आणि दारूबंदी यशस्वी करण्यासाठीं मुंबईस घरमालकांवर कॉंग्रेस सरकारनें कर बसविला त्यास मुसलमानघरमालकांची बाजू घेऊन हिंदुसभेनें विरोध केला. राजकारणांत तात्त्विक बाजू अशी हिंदुसभेनें कोणतीच घेतली नाहीं. मुस्लिम लीगशीं सहकार्य करून मंत्रिमंडळें बनविण्यासाठीं हिंदुसभेच्या आदेशास लाथाडणाऱ्या मुत्सद्यांसही हिंदुसभेनें पाठिंबा दिला. सरकारनें दिलेली कोणतीही नोकरी हिंदु माणसानें घ्यावी असलें राजकारण हिंदुसभा पुढाऱ्यांनीं अवलंबिलें. यामुळें लढाऊ वृत्तीचीं आणि स्वातंत्र्यवादी माणसें हिंदुसभेंतून गेलीं व आतां स्वातंत्र्यलढा करण्याच्या प्रतिज्ञा हिंदुसभावाद्यांनीं केल्या तरी त्या कोणी खऱ्या मानीत नाहीं. अलीकडे श्री. मामा दाते, श्री. शं. नवरे वगैरे नवीन तडफदार विचारवंत हिंदुसभेस लढाऊ व प्रगतिशील बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण हिंदु जनतेचे म्हणून वेगळे असे राजकीय व आर्थिक प्रश्न असणेंच शक्य नसल्यानें हिंदुसभेला हिंदूंचें लढाऊ राजकारण व अर्थकारण करतांच येणार नाहीं. 'हिंदुसभेची राजकीय व आर्थिक भूमिका' ही शब्दयोजनाच असत्य आहे. यामुळें हिंदुसभेशीं माझें पटत नाहीं.

पण आर. एस्. एस्. शीं माझें पटत नाहीं याचें मला स्वतांलाच फार वाईट वाटतें. कठोर शिस्त, उत्तम शरीरप्रकृति, आज्ञाधारकत्व, स्वार्थ-त्याग वगैरे गुण या संघटनेंतील कार्यकर्त्यांच्या अंगीं ओतप्रोत भरलेले आहेत. बुद्धिमान् व खानदानी घराण्यांतील तरुण या संघटनेंत आहेत. तथापि हिटलरनें ज्याप्रमाणें माणसाचा राक्षस बनविला तशी अवस्था या संघटनेच्या पुढाऱ्यांनीं या संघटनेंतील तरुणांची करण्याचें ठरविलेलें दिसतें.

स्वतः विचार करायचा नाहीं, इतरांचे विचार समजून घ्यायचे नाहींत. अर्थकारण, राजकारण, यांची आजच्या जगांतील परिस्थिति व उपपत्ति समजून घ्यायची नाहीं आणि 'अंधेनैव नीयमाना यथांधाः' अशीच परंपरा निर्माण करायची असें या संघटनेच्या पुढाऱ्यांचें वर्तन आहे. कांहीं चिकित्सक तरुणांचीं मनें अस्वस्थ होऊन ते प्रश्न विचारतात तेव्हां जगांतील सर्व नव तत्त्वज्ञानाबद्दल तिरस्कार उत्पन्न होईल असें विपर्यस्त ज्ञान शिकविलें जातें. पुण्यास एका पी. एच. डी. शिक्षकानें आपलें वक्तृत्व व मराठी भाषेवरील प्रभुत्व यांच्या साह्यानें आर. एस. एस. मधील तरुणांची बुद्धि बिघडविण्याचा मक्ताच घेतला आहे. त्याला स्वतांला अर्थशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास यांचें नीटसें, ज्ञान झालेलें नाहीं व तें झालें आहे असें त्यास वाटतें, ही त्याला आपलें प्रतिगामी कार्य चिकाटीनें करण्यास हुरूप वाटण्याला विशेष सोय आहे. आर. एस. एस. तरुणांची लोकसेवेवर श्रद्धा नाहीं. मुंबईतील बंदरांत स्फोट झाल्यानें जनतेवर जी आपत्ति ओढवली त्यावेळीं जनतादुःखनिवारण कार्यांत सामील न होतां आर. एस. एस. तरुण तटस्थ प्रेक्षक राहिले हें पाहून मला वाईट वाटलें. 'पूर्ण तयारी झाल्यावर लढा द्यायचा' असें त्यांना शिकविण्यांत येतें. पण लढायचें म्हणचे काय करायचें, कुणाशीं लढायचें व कशासाठीं लढायचें याचा उमज या तरुणांना नाहीं. हिटलरसारखें भयानक यश व भयानक अपयश येण्याला यांना येथें संधि नाहीं हेंच भाग्य. यामुळें या तरुणांचे डोळे आज ना उद्या उघडतील अशी आशा वाटतें. पण तोंवर शिस्तप्रिय तरुणांचा हा फार मोठा वर्ग स्वतांस व समाजास अपाय करीत आहे याबद्दल खेद झाल्यावांचून राहात नाहीं.

मी मुसलमान नसल्यानें मुस्लिम लीगशीं माझें पटत नाहीं असें एकाद्यास वाटेल. पण तें बरोबर नव्हे. मुस्लिम लीगचें धोरण योग्य असेल तर मीं हिंदु असूनही मुस्लिम लीगला पाठिंबा दिला असता. शिवाय हिंदुसभेला मी जितका विरोधि आहे तितका मी मुस्लिम लीगला विरोधि नाहीं हें कांहीं वाचकांस अगदीं चमत्कारिक वाटेल. पण तें सत्य आहे. हिंदुसभावाद्यांची व कॉंग्रेसमधील शुद्ध राष्ट्रवाद्यांची मुस्लिम लीगबद्दलची वृत्ति चुकीची आहे. १९३७ सालीं

मुस्लिम लीगला मुसलमानांत फारसा पाठिंबा नव्हता तो आतां वाढला आहे. याचा अर्थ मुसलमान राष्ट्रवादी होते ते जातिवादी झाले असा नव्हे. हिंदुस्थानांतला मुसलमान समाज हा नऊ-दशांश प्रमाणांत मागासलेल्या हिंदु जातींतलाच बनलेला आहे. तो अज्ञ, अडाणी, लाचार व सर्वथैव मागासलेला आहे. तो जमीनदार, अमीर, नबाब, पैसेवाले व धाकदपटशा देणारे यांना भीतीनें अथवा लाचारीनें मतें देत होता. सुशीक्षित मुसलमान बड्या अधिकाऱ्यांचे गुलाम होते, नोकऱ्यांचे मार्गे लागले होते. व्यापारधंद्यांत बोहरी, खोजा वगैरे समाज सोडले तर सर्व मुसलमान मागासले आहेत. राजकीय स्वातंत्र्याबद्दल मुसलमान समाज बेफिकिर आहे. धर्मवेड त्या समाजांत विशेष आहे. अशा समाजास जिनांनीं राजकारणांत ओढलें आणि वरिष्ठ वर्गीय हिंदूंनीं व इंग्रजांनीं मुसलमानांस अर्थकारणांत व राजकारणांत मार्गे रेटलें आहे अशी प्रखर जाणीव दिली. सुशिक्षित मुसलमान तरुणांची संख्या वाढत असून नोकऱ्या व व्यापारधंदे यांचें क्षेत्र त्या प्रमाणांत वाढत नसल्यानें जिनांच्या राजकीय हांकेस आधिकाधिक मुसलमान 'ओ' देत आहेत. हिंदुसभा कॉंग्रेसच्या राष्ट्रवादाकडून सरकारी नोकऱ्या, सरंजामदारी यांकडे म्हणजे मार्गे मार्गे जात आहे तर मुस्लिम लीग ही मुसल्मानांना सरंजामदारी व सरकारी नोकरी यांजकडून पुढें खेचीत आहे.

मी मुसलमान असतों व समाजवादी नसतों तर मुस्लीम लीगमध्यें गेलों असतों असें मला वाटतें. कारण हिंदूंतला अस्पृश्य समाज जसा राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे बाबतींत चेंगरलेला आहे तसाच मुसलमान समाज चेंगरलेला आहे. मुसलमानांतील अगदीं थोडा वरिष्ठ वर्ग सरंजामदार व अडाणी आहे. व्यापार व उद्योगधंदे यांत तो नाहीं. हिंदुस्तानांत व्यापारधंदा, राजकारण व शिक्षण या क्षेत्रांत हिंदूंतील वर्ग मुसलमानांपेक्षां व अस्पृश्यांपेक्षां फारच पुढें आहेत. यांची संख्या फारच थोडी असून बाकीचा स्पृश्य व अस्पृश्य असा प्रचंड हिंदु समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांकृतिक दृष्टीनें चेंगरलेला आहे. याचा अर्थ हिंदु, पारशी, वगैरेंचा मूठभर समाज सोडल्यास सर्व हिंदुस्तानांतील सर्व जातींचा व धर्मांचा समाज चरकांतल्या उसासारखा पिळला जात असून या त्याच्या पिळणुकीशीं कोणत्याही धर्माचा कांहीही संबंध नाहीं. या सर्व समाजांची ही

दुःखें जातीय भांडणानें सुटणार नाहींत. देश स्वतंत्र झाला पाहिजे. त्या स्वातंत्र्यासाठीं सामान्य जनतेनें एकजुटीनें झगडा केला पाहिजे. असा झगडा सुरू होईल तेव्हां वरिष्ठ वर्ग ब्रिटिशांचे बाजूस जातील व त्या झगड्यास समाजवादाचें स्वरूप येईल. मुस्लीम लीगचा या क्रमास विरोध आहे. मुसलमान जनतेच्या पाठिंब्यानें मूठभर सुशिक्षित व धनिक मुसलमानांसाठीं अधिक जागा व व्यापारधंद्यांत अधिक स्थान, हिंदूंना व सरकारला दमदाटी दाखवून मिळवायचें हें मुस्लिम लीग पुढाऱ्यांचें ध्येय आहे. यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा लांबणीवर पडतो, बहुसंख्य समाजाची कुचंबणा वाढते. धर्मवेड वाढून राजकीय व आर्थिक प्रश्नांवरील लोकांचें लक्ष उडतें, देशांत दुही माजते, पाकिस्तानसारख्या असंभाव्य मागण्यांचें वेड वाढतें आणि परकी सत्तेस आपलें आसन स्थिर करण्यास संधि सांपडते.

हिंदुमुसलमान शेतकरीकामकऱ्यांत आपल्या वर्गीय हितासाठीं संघटना करण्यासाठीं जेव्हां ईर्षा उत्पन्न होईल तेव्हांच हीं जातीय वेडें नाहींशीं होतील. कारण हिंदु वरिष्ठ वर्ग मुसलमान वरिष्ठ वर्गापेक्षां आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत फारच पुढें असल्यानें वरिष्ठ वर्गीय हिंदु व वरिष्ठ वर्गीय मुसलमान यांचें ऐक्य कधींच होणार नाहीं. जिनांचें बळ आहे तें यांतच आहे. सामान्य हिंदु जनता व सामान्य मुसलमान जनता ही सारखीच अज्ञ व पिळली जात असून तिची संघटना सुरू झाली म्हणजे धर्मभेद व जातिभेद विसरले जाऊन त्यांची एकजूट होईल. पण त्यावेळीं समाजवादाची भूमिका न स्वीकारतां हिंदुमुसलमान ऐक्याचे कॉंग्रेस पुढाऱ्यांचें प्रयत्न फसतात याचे कारण दोन्ही धर्मांच्या वरिष्ठ वर्गीयांत एकजूट करण्याचा तो प्रयत्न असतो व त्यांत मुसलमानांना जेवढें द्यावें त्याहून ते अधिक मागतात. यामुळें एकजूट अशक्य होतें. सामान्य जनता सगळीच कफल्लक असल्यानें कोणी कोणाकडे कांहीं मागूं शकत नाहीं, सर्वांनीं एकजुटीनें झगडून आपलें स्वातंत्र्य व वैभव मिळविलें पाहिजे, हें शिक्षण परिस्थितीनें त्यांना मिळतें. मुस्लिम लीगचे पुढारी मुसलमानांतील मूठभर वरिष्ठ व सुशिक्षित वर्गाचें हित साधण्यासाठीं जनता-पाठिंब्याचा उपयोग दमदाटी करून करूं पाहतात. हे लीगपुढारी निःस्वार्थी व समाजहितैषी आहेत अशा भ्रमानें मुसलमान

जनता त्यांचे मागें जाते. या जनतेची जागृत संघटना करण्याचें कार्य मुस्लिम लीगवाले अंगावर घेऊं इच्छीत नाहींत. म्हणून आतां कॉंग्रेसनें मुस्लिम लीगचें समाधान करण्याच्या भरीस न पडतां हिंदुमुसलमान जनता संघटनेचें कार्य हातीं घ्यावें म्हणजेच समाजवादी बनावें असें मला वाटतें.

मी स्वतांला समाजवादी म्हणवीत असतां स्वतांला समाजवादी म्हणविणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांशीं माझें कां पटत नाहीं याचा विचार येथें केला पाहिजे. याचें उत्तर फार सोपें आहे. येथल्या कम्युनिस्ट पक्षाचें ध्येय आपला पक्ष टिकविणें, वाढविणें आणि सोव्हिएट रशियाला मातृभूमि मानून त्याला उपकारक होईल असें धोरण येथें ठेवणें हें आहे. त्यांनीं समाजवाद सोडला असें त्यांना वाटत नाहीं. रशिया जगला व येथील कम्युनिस्ट पक्ष जगला म्हणजे समाजवाद खात्रीनें येईल असें त्यांना वांटतें. रशिया इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत पडतांच कम्युनिस्टांनीं 'लोकयुद्धा' चें धोरण पुकारलें त्याचा हेतु पक्ष कायदेशीर करणें एवढाच होता. आतां केवळ रशियाच्या परराष्ट्रीय राजकारणाची तुतारी फुंकणें हें कॉंग्रेसला रुचणार नसल्यानें मुस्लिम लीग व आंबेडकर यांच्या धोरणास पाठिंबा देऊन ते मागासलेल्या वर्गांचें पुढारीपण घेऊं पाहात आहेत. यांत समाजवादी दृष्टि कोठेंच नसून निवळ संधिसाधूपणा व रशियाची भाटगिरी आहे. रशियालाही यांचें धोरण पसंत नाहीं ही गोष्ट सोव्हियट लेखक डायकॉव्ह यानें गांधी–जिना वाटाघाटीसंबंधानें लिहितांना जिनांच्या म्हणजे कम्युनिस्टांच्या धोरणाविरुद्धच लिहिलें आहे यावरून सिद्ध झाली. त्याप्रमाणें कम्युनिस्टांनीं आपलें पाकिस्तानविषयक धोरण बदललेंही आहे. यापुढें मी भाविष्य करून ठेवतों कीं सोव्हिएट लेखक (म्हणजेच सरकारहि) वेळोवेळीं नेहरूंच्या व कॉंग्रेसच्या भूमिकेलाच प्रत्यक्ष अथवा पर्यायानें पाठिंबा देतील आणि नुसतीच रशियाच्या परराष्ट्रीय खात्याची गुलामगिरी करणाऱ्या कम्युनिस्टांची फरपट होत जाईल. याचें एक अगदीं ताजें उदाहरण घडलें आहे. सिमला परिषदेचें अपयश येथल्या कम्युनिस्टांनीं अंशतः कॉंग्रेसच्या माथीं मारलें. पण सोव्हिअट लेखक डायकॉव्ह यानें जिनांनीं ब्रिटिशांच्या प्रेरणेनें हटवादीपणा धारण करून सिमला परिषद बुडविली असें म्हटलें असून कॉंग्रेसपुढाऱ्यांचें मतही असेंच आहे. अर्थात् मग कम्युनिस्टांची फरफट झालीच.

पण माझें सर्वांत मोठें भांडण कॉंग्रेसशीं आहे. आणि मी कट्टर कॉंग्रेसनिष्ठ असून अहिंसावादी असल्यानें हें माझें भांडण अगदीं निकरास आलें आहे. जर्मनी आणि जपान यांनीं फॅसिझम उर्फ संघटित भांडवलशाहीचा एकेक संपूर्ण प्रयोग केला आणि शस्त्रास्त्रांनीं जगावर आपली सत्ता स्थापण्याचा पूर्ण व कार्यक्षम असा प्रयोग केला. त्यास उलट शस्त्रास्त्रांनीं ठार व्हावें लागलें असून शस्त्रास्त्रांचा व भांडवलशाहीचा प्रयोग आतां पराभूत व मागसलेल्या राष्ट्रांच्या आटोक्याबाहेरचा आहे. ज्याचे हातीं प्रबळ शस्त्रास्त्रें तो जगाचा स्वामी होणार, आधुनिक शस्त्रास्त्रें हीं अति प्रचंड असल्यानें खाजगी व्यक्तींना तीं बाळगतां येणार नाहींत; तीं राज्यकर्त्यांच्याच हातीं राहणार. म्हणजे इंग्लंड, अमेरिका व रशिया या देशांतील राज्यकर्त्या वर्गाच्या प्रबळ शस्त्रास्त्रांपुढें त्या त्या देशांतील जनताही दुर्बळच राहणार. पैकीं इंग्लंड व अमेरिका येथील भांडवलशाही स्वदेशाच्या व परदेशांच्या पिळणुकीवर आधारली असून राज्यकर्त्यांच्या शस्त्रास्त्रांशीं झगडून स्वातंत्र्य व लोकशाही स्थापण्याचा मार्ग बंद झाला आहे. अशावेळीं पिळणूक करणाऱ्या राज्यकर्त्यांविरुद्ध जनतेनें सार्वत्रिक संप घडवून आणून पिळणुकीचें राज्ययंत्र अडवून पाडणें मोडून टाकणें हा एकच मागसलेल्या व अंकित राष्ट्रांपुढें व्यवहार्य मार्ग आहे.

जगाचें आजचें हें भवितव्य बऱ्याच अंशानें हेरून महात्मा गांधींनीं. असहकार योगाचा दिव्य संदेश पंचवीस वर्षांपूर्वीं हिंदी जनतेला दिला. त्यावेळची गांधींची कल्पना व प्रयत्न अहिंसात्मक लढ्यानें स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं जीवित वाहणाऱ्या कार्यकर्त्यांचा संघ स्थापावा हाच होता. कांग्रेस हाच असा संघ होईल ही त्यांची कल्पना नसेल. पण गांधीवाद्यांचा एक गट त्यावेळेपासून आजतागायत हयात आहे. या गटाचे हातून व कांग्रेसचे हातून अहिंसात्मक लढ्याचें सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न काय झाले? गेल्या पंचवीस वर्षांत केळकर व सावरकर यांच्या गटांचा पराभव महाराष्ट्र कॉंग्रेसनें केला यासाठीं विजयोत्सव करण्यांत फारसा अर्थ नाहीं. केळकर आणि सावरकर यांना गांधींचा अहिंसावाद समजणें शक्य नव्हतें इतकेंच नव्हे तर पहिल्या महायुद्धानंतर हिंदी भांडवलशाहीनें जोर बांधल्यामुळें उद्भवलेल्या प्रश्नांचें आकलन करण्याचेंही सामर्थ्य त्या दोन पुढाऱ्यांत नव्हतें,

म्हणून त्यांचा पाडाव झाला. पण त्यांच्या जागीं जे नवे पुढारी आले त्यांनीं राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा यशस्वी करण्यासाठीं काय केलें ? केळकरांचे विरोधक शंकरराव देव हे पूर्वी कौन्सिलप्रवेशास विरोध करीत त्याचें कारण सनदशीर राजकारणापासून अलग अशा प्रकारें अहिंसात्मक स्वातंत्र्यलढा उभारला पाहिजे असें शंकरराव सांगत. मला तें केव्हांच पटलें नाहीं. लोकांचें दैनंदिन जीवन कायदेमंडळामार्फत चालणारच व तें चालविलें पाहिजे असें केळकर म्हणत तें खरें होतें. पण अखेरीस शंकरराव यांनींच अचानक एक दिवस कौन्सिलप्रवेशाचा पुरस्कार केला. काँग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन झाल्यावर सत्याग्रहसंप्रदायास फक्त आपल्या वैयक्तिक जीवनांत त्यांनीं स्थान दिलें. मन्त्रिमन्डळें आलीं आणि गेलीं. पण अहिंसात्मक स्वातंत्र्यलढ्याची तयारी कोणींही केली नाहीं. शेवटीं अचानक पुढारी पकडले गेले आणि बाहेरच्या कार्यकर्त्यांनीं जनतेनें जो स्वातंत्र्यलढा केला तो पूर्ण अहिंसात्मक लढा केला नाहीं आणि त्यांत जितपत अहिंसा पाळली गेली तितपत ती शंकरराव यांनीं पढवून तयार केली होती असें म्हणतां येणार नाहीं. देव तुरुंगांतून सुटण्यापूर्वी त्यांच्या भक्तगणांनीं ऑगस्टवाद्यांचा चोहोंकडून धिक्कार चालविला होता.

श्री. शंकरराव देव यांच्यावर टीकास्त्र चालविण्याची ही संधि मला साधून घ्यायची नाहीं. मला त्यांचेसंबंधानें कांहीं उच्च अपेक्षा आहेत. भयंकर व घाणेरड्या टीका सहन करून अतिशय शांतपणें व निर्वैरत्वानें आपलें कार्य करीत राहणारीं माणसें देवांच्यासारखीं महाराष्ट्रांत नाहींतच. मी त्यांच्या अतिशय निकट परिचयांत आलों असून त्यांचा महाराष्ट्राभिमान देशाभिमान व तपस्या मोठी आहे हें मी नीट जाणतों. ते ढोंगी नाहींत कारण त्यांची 'सिन्सिरिटी' म्हणजे कार्याचा जिव्हाळा हा सोंग आणून येत नाहीं. अशा या देवांचें पंचवीस वर्षांचें जीवन अहिंसेशीं ज्यांचा कांहींही संबंध नाहीं त्यांना बदल्या देण्यासाठीं खर्चं व्हावें, आणि अहिंसेचा लढा मागें पडावा हें देवांचें व देशाचें दुर्दैव होय. देव म्हणतात ही लोकशाही आहे. लोक ठरवितात तसें होतें. पण हें खरें नव्हे. त्रिपुरीला सुभाषबाबू लोकशाहीनें निवडून आले तेव्हां देवांनीं लोकशाहीविरुद्ध बंड करण्याची धमकी घातली व

लोकशाहीला आपणापुढें लोटांगण घालायला लावलें. या 'लोकशाही' विरुद्ध अहिंसेसाठीं देवांनीं कधीं तरी आग्रह धरला काय ? माझा मतलब असा कीं अहिंसात्मक असा स्वातंत्र्यलढा व समाजवादी लढा करण्याचें यंत्र हें स्वरूप कॉंग्रेसचें बनलें पाहिजे. येत्या कायदेमंडळाच्या निवडणुकी कॉंग्रेसनें जिंकल्यावर जी भयंकर व बिनतोड अगतिकता कॉंग्रेसपुढें येईल ती तोडण्यासाठीं एक तर मुस्लिम लीग व ब्रिटिश साम्राज्यशाही यांना शरण गेलें पाहिजे अथवा अहिंसात्मक स्वातंत्र्यलढा आणि समाजवादी लढा म्हणजे शेतकरीकामकऱ्याचा सार्वत्रिक संप घडविण्याची पूर्व तयारी कॉंग्रेसनें केली पाहिजे. कॉंग्रेसमध्यें हा पराक्रम करण्याचा वकूब आहे, इतर कोणत्याच पक्षांत तो नाहीं म्हणून मी कॉंग्रेसमध्यें आहे. पण कॉंग्रेसला या गोष्टी करायला सांगण्यासाठीं पूज्य पुढाऱ्यांशीं व कार्यकर्त्यांशीं मला भांडावें लागतें. याचाच अर्थ कॉंग्रेसशीं माझें जमत नाहीं.

—झंकार, दिवाळी अंक १९४५

# नित्ययुद्धाचा सिद्धांत

धनुर्धारी, दिवाळी अंक, १९४४

## आतां पुरे ही लढाई !

चालू युद्धासंबंधानें लोकांचा उत्साह मावळूं लागला आहे. येथले लोक आतां युद्धाला कंटाळले आहेत. युद्ध सुरू होऊन अडीच वर्षे झालीं होतीं त्यावेळेपर्यंत येथें कोणाला युद्धविषयक आपत्ति जाचत नव्हत्या. महागाई तोंवर फारशी जाणवली नव्हती. नवे रोजगार मिळूं लागले होते. कॉंग्रेस बराच मोठा लढा देणार या आशेवर लोक झुलत होते. जपान अथवा जर्मनी यांची जुलमी सत्ता येथें येईल इतकें तिकडीचें भय कोणासच वाटत नव्हतें. किंबहुना सत्तापालट होऊन इंग्रजांऐवजीं दुसरी एखादी सत्ता येथें आली तर आपलें काय होईल इतका खोल विचार थोड्या लोकांनींही केला नव्हता. युद्ध कधीं संपेल, कसें संपेल याचा अंदाज बांधण्याला ठाम साधनही लोकांजवळ कांहीं नव्हतें. आणि आपणांस फारशी तोशीस न लागतां ब्रिटिशांच्या पराभवाच्या गोड बातम्या रोजच्या रोज पुरविणारे हें युद्ध लवकर संपावें अशी इच्छाही तेव्हां कोणास नव्हती. गेल्या दोन वर्षांत मात्र लोकांची ही मनोवृत्ति बदलली आहे. रोजच्या वाढत्या महागाईनें लोक जेजावले असून पैसा असला तरी अन्न मिळत नाहीं व मिळतें तेंही चांगलें नाहीं, म्हणून लोक या युद्धास त्रासले आहेत. संयुक्त राष्ट्रांबद्दल कोणास फारशी सहानुभूति येथें नसल्यानें व जर्मनीच्या आपत्तीबद्दल अनेकांना सहानुभूति वाटत असल्यानें युद्धांतील संयुक्तांच्या विजयाच्या आजकालच्या बातम्या कोणालाच आनंद देत नाहींत. सिंगापूर जपानच्या हातीं पडलें त्यावेळीं लोकाना जो आनंद वाटला तो संयुक्तांनीं पॅरिस परत जिंकलें त्यावेळीं येथें कोणासही झाला नाहीं. जनतेला फॅसीझम् आवडत नाहीं. पण त्याहीपेक्षां ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध जनता फार चिडली आहे. आणि एवींतेवी संयुक्तांचा विजय होणारच, तर मग हें युद्ध लवकर संपून जपान व जर्मनी याना तहाच्या अटी जरा सौम्य मिळाल्या तर बऱ्या, युद्धाचा

शेवट कांहींही होवो पण ब्रिटिशांना कोणीतरी जबरदस्त प्रतिस्पर्धी शिल्लक राहो आणि ब्रिटिशांच्या अडचणी शिल्लक राहूनच लवकर युद्ध संपो व एकदांची स्वस्ताई होवो अशी लोकांना घाई झाली आहे.

## युद्धांचा उपयोग

सामान्य लोकांची, साम्राज्यसत्तेविरुद्ध असलेल्या तेढीमुळें, ही उपजत भावना आहे. पण शास्त्रीय दृष्टीनें या युद्धाकडे पाहण्याचा प्रयत्न करूं इच्छिणाऱ्या माझ्यासारख्याची दृष्टि या सामान्य माणसाच्या दृष्टीहून फारशी भिन्न नाहीं. कारण ब्रिटिशसाम्राज्यासारखी जबरदस्त सत्ता निःशस्त्र जनतेच्या केवळ अंतर्गत बळावर उलथून पडणें हें अशक्य असल्यामुळें युद्धासारख्य आंतरराष्ट्रीय संकटाचें साहाय्य मिळेल म्हणून मलाही युद्धाकडे आशेनें पहात बसावेंसें वाटे. असें युद्ध घडून येणें न येणें ही कांहीं येथल्या कोणाऱ्याच हातची बाब नसते. जागतिक कारणांनीं तें घडून आल्यास आपले मनोरथ त्यांतून पार पडावे एवढीच स्वाभाविक सर्वांची इच्छा असते. आणि ही आशा सफल न होतां युद्ध संपूनही जाऊं लागलें म्हणजे साहजिकच आशाभंगाचें दुःख भोगावें लागतें. फॉरेस्ट हे युद्धाचें उघड उघड कौतुक करतात, तें चूक असेल, पण ब्रिटिशासारखे साम्राज्यवादी लोक युद्धांचा जो धिक्कार करतात त्यामुळें युद्धें हीं खरोखरच वाईट असतात असें म्हणण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीची वाढ युद्धामुळेंच झाली. आतां त्यांना युद्धें नको असलीं तर त्याचें कारण आतां युद्धानें त्यांना कांहीं मिळवायचें नसून त्यांचें नुकसानच व्हायचें आहे, म्हणून त्यांना युद्धें नको आहेत. पण त्यासाठींच आम्हाला तीं उपयोगी आहेत. हीं साम्राज्यें कायम राहून जर युद्धें थांबणार असतील तर जगाचें भवितव्य मोठेंसें चांगलें होईल असें वाटत नाहीं. प्रचंड शस्त्रास्त्रें राज्यकर्त्यांच्या हातीं असतात; प्रचंड धनोत्पादनसाधनें ज्यांच्या मालकीचीं असतात तेच राज्यांचे सूत्रधार होतात आणि या राज्यकर्त्यांचीं शस्त्रास्त्रें जितकीं जबरदस्त असतील तितकें प्रजेचें स्वातंत्र्य कमी होतें व तिची पिळणूक अधिक होते. राज्यकर्त्यांच्या शस्त्रास्त्रांचा पराभव प्रजा करूं शकत नाहीं. फक्त दुसऱ्या प्रतिस्पर्धी सत्तांकडूनच या राज्यकर्त्यांचीं शस्त्रास्त्रें

उध्वस्त होऊं शकतात. शस्त्रास्त्रसत्तेखालीं दडपलेल्या कोणत्याही प्रजेला आपल्या वरील शस्त्रसत्तेचा प्रतिकार करण्यास हीच संधि असते. म्हणून जर कां जगांतील बड्या राष्ट्रांनीं एकजूट होऊन आपसांतील युद्धें थांबविलीं तर जगांतील प्रजाजनांना जुलूम, जबरदस्ती व पिळणूक यांतून सुटण्याला संधिच मिळणार नाहीं अशी भीति वाटते.

:: :: ::

## युद्धें कायमचीं थांबणार ?

चालू युद्ध संपत आलेसें दिसलें तरी तिसरें महायुद्ध होईल असे आश्वासन पुष्कळ लोक स्वतांच्या मनाला देत आहेत. तिसऱ्या महायुद्धाची भीति (अथवा आशा) गांधींनींही व्यक्त केली आहे. पण त्याची ते खात्री देत नाहींत. यापुढें तिसरें युद्ध व्हायचें तें सोव्हिएट रशिया आणि अँग्लोअमेरिकन्स यांचे दरम्यान झालें तर व्हायचें. कारण हींच तीन मोठीं राष्ट्रें जगांत राहणार आहेत. पण रशियानें चालू महायुद्धाबाबत फार मोठी तयारी करूनही व रणांगणावर अद्वितीय मर्दुमकी गाजवूनही रशियाचा हेतु आंतरराष्ट्रीय शांतता हाच होता व आहे अशी माझी खात्री पटलेली आहे. चालू महायुद्धापूर्वीं हिटलर तरवार खणखणावून साऱ्या जगाला भेडसावीत होता त्यावेळीं स्टालिन हिटलरचा रोख आपणावरच आहे हें ओळखून युद्धाची तयारी करीत होताच; पण तसें करतांनाही इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व रशिया यांच्या संयुक्त बळाच्या जरबेनेंच हिटलरला नमवितां आल्यास नमवावें असें त्याचे कळकळीचे प्रयत्न चालू होते. स्टालिनचा परराष्ट्रमंत्री लिट्विनॉफ् हा हें कार्य अतिशय नेकीनें व निकरानें करीत होता. तसेंच चालू युद्धानंतर आतां पुन्हा आंतरराष्ट्रीय शांततेचे प्रयत्न स्टालिन करील याबाबत मला शंका वाटत नाहीं. केवळ या युद्धापूर्वीचे अनुभव जमेस धरायचें म्हटलें तर चेंबर्लेननें ज्याप्रमाणें स्टालिनच्या कार्यांत अडथळे आणले तसे चर्चिल आणणार नाहीं. कारण रशिया जर अंतर्गत पुनर्घटनेच्या कार्याकडे अधिक लक्ष देईल आणि चर्चिलला त्याचें साम्राज्य आनंदानें उपभोगूं देईल तर तें चर्चिलला हवेंच आहे. रशियाविरुद्ध दुसऱ्या एकाद्या राष्ट्रास चिथावून

त्या दांडग्या रशिअन अस्वलाची खोडी काढण्यास चर्चिल धजावणार नाहीं. रूझवेल्ट हा स्टालिनशीं आंतरराष्ट्रीय शांततेसाठीं सहकार्यच करील. कारण आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन झाल्यास जगाच्या बाजाराची लूट करणें अमेरिकेला सहज शक्य होईल. स्टालिन हा स्वतांच्या एका देशांतच कम्युनिस्ट समाजरचना स्थापण्याच्या उद्योगांत आहे. (अथवा जी कोठली समाजरचना त्याला स्थापावयाची आहे ती त्याला प्रथम आपल्या रशिया-पुरतीच स्थापावयाची आहे.) यामुळें तो बाहेरच्या जगाच्या वाटेस जाणार नाहीं. फक्त बचावाचें धोरण पत्करून, चालू महायुद्धांत झालेलें प्रचंड नुकसान भरून काढण्यांत व नवीन वैभव वाढविण्यांत रंगून जाईल. यामुळें पुढील बरींच वर्षें तरी युद्ध टळेल. पण प्रचंड शस्त्रास्त्रें लवकर उतरणार नाहींत. तीं जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतल्या प्रजाजनांना धाकांत ठेवण्यास उपयोगी पडतील आणि जगांतील प्रजा आपापल्या राज्यकर्त्यांच्या दडपणाखालीं पिचत राहील. खरें पाहतां भावी आंतरराष्ट्रीय शांततेचें हें दृश्य मला सकृद्दर्शनीं असें निराशाजनक दिसतें आहे.

⁘ ⁘ ⁘

## अटळ इतिहासक्रम

इंग्लंड, अमेरिका, रशिया वगैरे राष्ट्रांचीं जीं जाहीर धोरणें आहेत त्यावरून आंतरराष्ट्रीय शांतता नांदण्याचा हा संभव केवळ तर्कानें मीं वर मांडला आहे. पण प्रचलित समाजघटनेची जी ऐतिहासिक प्रवृत्ति आहे ती लक्षांत घेतली तर मात्र ही आंतरराष्ट्रीय शांतता फार काळ नांदेल असें वाटत नाहीं. गेल्या महायुद्धापूर्वींही युद्ध टाळण्याचा प्रयत्न करणारे मुत्सद्दी व तीं टळूं शकतील असें मानणारे तत्त्वज्ञ जगांत होतेच. पण तें महायुद्ध झालेंच व त्यानंतर गेल्या वीस वर्षेंभर चालू असलेलीं लहान लहान युद्धें आणि त्यानंतर सुरूं झालेलें भयंकर महायुद्ध हीं या मुत्स-द्यांना व तत्त्वज्ञांना मुळींच टाळतां आलेलीं नाहींत. याचें कारण अगदीं साधें आहे. एका देशाच्या व्यवहारांत जो प्रकार घडतो तोच फार मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय व्यवहारांत घडतो. एक भांडवलदार आपला धंदा करीत असतां त्याला मिळत जाणारा अधिकाधिक नफा तो भांडवलतां

पुनः पुनः जमा करून बाजाराचें क्षेत्र वाढवीत जातो. त्याचा हा व्याप वाढत असतां, हत्ती चालतांना ज्याप्रमाणें त्याच्या पायाखालीं कृमी, कीटक व इतर प्राणी मरत असतात त्याप्रमाणें, किरकोळ भांडवलदार व व्यापारी बड्या भांडवलदाराच्या रगाड्यांत चेंगरून जातात. हीं सर्व लहान लहान युद्धेंच चाललेलीं असतात. हा प्रकार चालू असतां अधिक कार्यक्षम असा दुसरा एक भांडवलदार पुढें येतो व तो पहिल्याशीं टक्कर देतो. त्या दोघांत मग एक दुसऱ्याचा पराभव करतो व त्यास नष्ट करतो अथवा त्यास आपल्या भागीदारींत घेऊन गिळून टाकतो. आणि पूर्वी लहान लहान चढाओढींचीं युद्धें चालू असतां दोन बलवान भांडवलदारांच्या लढ्यामुळें चढाओढींचें प्रचंड युध्द उभें राहतें. एका देशांतल्या देशांत भांडवलशाही व्यवहारांत शस्त्रें वापरण्यांत येत नसलीं तरी आर्थिक चढाओढीस निकराच्या युध्दाचें स्वरूप खासच येतें. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत प्रत्यक्ष शस्त्रेंच वापरण्यांत येत असल्यामुळें हें युध्द साध्या डोळ्यांनाही रक्तरंजित व क्रूर स्वरूपांत दृष्टीस पडतें. इंग्लंडसारख्या बड्या राष्ट्रास बारीक बारीक राष्ट्राशीं युध्दें करावीं लागतात त्यावेळीं बारीक बारीक बेडक्या खाऊन साप फुगत जातो तसें इंग्लंडसारखें राष्ट्र फुगत जातें; त्याला जडत्वही येत जातें. या काळांत लहान लहान युध्दें चालू असतात. पुढें कालक्रमानें जर्मनीसारखें एकादें तल्लख राष्ट्र नवीन बलाढ्यता मिळवून इंग्लंडला आव्हान देतें व त्यामुळें बडें युध्द सुरू होतें. भांडवलदारांना वाढत्या नफ्यास भांडवलाचें स्वरूप देऊन परदेशांतील अधिक अधिक बाजार जे व्यापावे लागतात, त्यासाठीं निरनिराळ्या राष्ट्रांतील भांडवलदारांची स्पर्धा चालते. त्यासाठीं राज्यकर्ते भांडवलदारांचीं युद्धें खेळत राहतात. हा क्रम यापुढेंहि टळणें अशक्य आहे.

## मामुली शांतताकाळ अशक्य

मला मुख्यतः हिंदुस्थानसंबंधानें बोलावयाचें आहे आणि हिंदुस्तान आंतरराष्ट्रीय युद्धाच्या जंजाळांतून आतां सुटणार नाहीं असें मला म्हणायचें आहे. हा प्रश्न निघाला आहे तो हिंदुस्तानने स्वातंत्र्यलढा केव्हां करावा यासंबंधानें निघाला आहे. 'चालू युद्धकाळांत आतां नवा स्वातंत्र्यलढा होणें शक्य

दिसत नाहीं. देश थकलेला आहे, सरकारचें सामर्थ्यही अफाट वाढलें आहे. गांधींच्या कोणत्याच अहिंसात्मक चळवळीला या युद्धकाळांत वाव मिळणार नाहीं. पण युद्ध कांहीं निरंतर चालणार नाहीं. हें युद्ध संपल्यावर आंतरराष्ट्रीय शांततेचा कालखंड पुन्हां येईल. आजची नागरिकस्वातंत्र्याची गळचेपी त्यावेळीं कमी होईल मग गांधींचा अहिंसात्मक लढा पुन्हा शांततेच्या काळांत आरामांत सुरू होईल व मग आम्हीं स्वतंत्र होवूं' असे मांडे मोठमोठीं माणसें मनांतल्या मनांत खात आहेत. मी गांधींच्या अहिंसा-वादास मुळींच प्रतिकूल नाहीं. पण त्या विषयाची चर्चा येथें मला करावयाची नाहीं. गांधीजींशीं माझे असलेले मतभेदही मला येथें सांगा-वयाचे नाहींत. मला फक्त आंतरराष्ट्रीय युद्धासंबंधानें बोलावयाचें आहे. एक युद्ध संपून दुसरें युद्ध सुरू होण्याच्या दरम्यानचा मामुली शांततेचा काळ यापुढें हिंदुस्तानला मिळणार नाहीं असें माझें म्हणणें आहे. गेल्या वीस वर्षांतही बारीकसारीक युद्धें झालींच, पण हिंदुस्तानच्या अंतर्गत राजकारणास त्यांनीं बाध आणला नाहीं असें आम्हीं मानीत होतों. दोन महायुद्धांच्या दरम्यान वीस वर्षांइतका मोठा काळ अंतर्गत राजकारणाच्या दृष्टीनें 'मामुली शांतते'चा गेला तसा यापुढें वीस वर्षांचाच नव्हे तर पाच वर्षांचाही मिळणार नाहीं असें मला म्हणावयाचें आहे. **फार काय, हें युद्ध निरंतरच चालत राहील असें कोणी म्हटल्यास तें फारसें चूक होणार नाहीं.** युद्ध याचा अर्थ युद्धपरिस्थिति असा व्यापक करणें मात्र अवश्य आहे. राज्यकर्त्यांचीं प्रबल शस्त्रास्त्रें, राजकीय दडपशाहीचे जबर कायदे, नागरिक-स्वातंत्र्याचा अभाव, मूठभर भांडवलदारांची नफेबाजी, बहुसंख्य जनतेला सर्व आवश्यक जिनसांची टंचाई, उपासमार, रोगराई, जीवनाची अनिश्चिती याच गोष्टी देशाच्या सरहद्दीपासून दूर अशा अंतर्भागांत राहणाऱ्या आम्हांला महायुद्धाची झळ म्हणून सोसाव्या लागत आहेत. या गोष्टी चालू राहतील तोंवर महायुद्ध चालू आहे व मामुली शांततेचा हा काळ नव्हे हें जर आपण मान्य केलें तर मामुली शांततेचा काळ आतां (समजा) पंचवीस वर्षेपर्यंत तरी येणार नाहीं असें मला वाटतें.

* * *

## नित्यमहायुद्धाचा कालखंड

मानवजात हजारों, लाखों वर्षें या जगांत नांदत व लढत आली असली तरी गेल्या दोन तीनशें वर्षांत माणसाच्या जीवनाला जें एक प्रचंड स्वरूप आलें आहे तें पूर्वीच्या लाखों वर्षांत नव्हतें. गेल्या तीनशें वर्षांत धनोत्पादनसाधनें प्रचंड झालीं, दळणवळणाचीं साधनें प्रचंड झालीं व युद्धाचीं साधनेंही प्रचंड झालीं. हा सर्व प्रकार जगांत नवीन आहे. गेलें महायुद्ध व चालू महायुद्ध हा जगांत अगदीं नवीन प्रकार आहे. नेपोलिअनचें युद्धही त्यापूर्वीच्या युद्धांचे मानानें प्रचंडच होतें. त्यानंतर भयंकर मोठें युद्ध होण्यास शंभर वर्षें लागलीं. त्यानंतर अवघ्या वीस वर्षांतच पहिल्या महायुद्धां-पेक्षाही कितीतरी मोठें युद्ध उभें राहिलें. आतां यापुढील युद्ध कदाचित याहीपेक्षां मोठें ठरेल व तें पांचच वर्षांत येईल, कदाचित हें युद्ध संपून पुढलें युद्ध सुरू होईपर्यंतच्या काळांत युद्धपरिस्थिति म्हणून जी वर वर्णिली ती कायमच राहील. कदाचित् हें युद्ध न संपताच पुढलें सुरू होईल अथवा हेंच लांबेल. या सर्व गोष्टी संभवनीय आहेत. **हा नित्यमहायुद्धाचा कालखंड आहे.**

* * *

## गेल्या सवाशें वर्षांत

ब्रिटननें नेपोलियनचा १८१५ सालीं पाडाव केला. त्यापूर्वी पोर्तुगीज, डच व स्पॅनिश साम्राज्यांशीं ब्रिटननें सामने देऊन दिग्विजय मिळविला होता. पुढें १७४० पासून १८१५ पर्यंतच्या पाऊणशें वर्षांत ब्रिटननें फ्रेंच साम्राज्याशीं सामना देऊन फ्रान्सला नामोहरम केलें. ब्रिटनला मिळालेला हा दिग्विजय ब्रिटनच्या वाढलेल्या प्रचंड धनोत्पादनसाधनांनीं, प्रचंड व्यापारानें व प्रचंड युद्धसाधनांनीं दिला होता. नेपोलियनविरुद्ध ब्रिटनला मिळालेला विजय इतका प्रचंड ठरला कीं 'यशासारखें यशस्वी कांहींच नसतें' या न्यायानें इंग्लंडच्या तरवारीच्या दराऱ्यावर बसून ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं जगाच्या बाजारपेठा काबीज करण्याचा सपाटा चालविला. चीन व रशिया यांच्याशीं गेल्या शतकांत इंग्लंडला युद्धप्रसंग करावे लागले. हिंदुस्तानांतही अनेक युद्धें इंग्रजांना लढावीं लागलीं. पण झंझावाताच्या

सोसाट्यानें कडब्याचें कूड मोडून पडावें त्याप्रमाणें इंग्लंडचे सर्व प्रतिपक्षी इंग्लंडच्या रट्टयापुढें मोडून पडले. या सर्व युद्धांनीं इंग्लंडचें साम्राज्य व सामर्थ्य वाढत गेलें. जिंकलेल्या मुलखांत इंग्लंडनें आपली नफेबाजी यशस्वी करण्यासाठीं तेथलें तेथलें उत्पादनसामर्थ्य वाढविलें. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं जर्मनीची शक्ति प्रचंड होत गेली आणि विसाव्या शतकाच्या आरंभीं ती इतकी प्रचंड झाली कीं १९१४ सालीं जर्मनीनें ब्रिटनला युद्धास आव्हान दिलें. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांनीं आपल्या संयुक्त बळानें जर्मनीचा पराभव केला. या युद्धांत पुनः इंग्लंडचें साम्राज्य वाढलें. पण जगांतलें अद्वितीय श्रेष्ठत्व मात्र इंग्लंडला नंतर राहिलें नाहीं. यापुढें युद्धानें साम्राज्य वाढण्याऐवजीं कमीच होईल अशी इंग्लंडची खात्री झाली. एक अँग्लोअफगाण युद्ध सोडलें तर दोन महायुद्धाच्या दरम्यान इंग्लंडनें भेकडपणाचा दोष पत्करूनही युद्ध टाळलेंच. अमेरिका, रशिया, जर्मनी, जपान, इटाली, इतकीं प्रतिस्पर्धी राष्ट्रें इंग्लंडच्या अद्वितीय प्रभुत्वास आव्हान देऊं लागलीं. यांतलीं सर्व अथवा कांहीं आपसांत भांडतील, जर्मनी–रशिया, जपान–रशिआ, फ्रान्स–इटाली, इत्यादींचीं युद्धें माजून आपणांस तटस्थ राहतां येईल व आपलें साम्राज्य सुरक्षित ठेवून पुन्हां सर्व बलाढ्य करतां येईल अशी आशा इंग्लंडला वाटत होती; त्या दृष्टीनें मुत्सद्यांनीं प्रयत्नही केले. पण ते सर्व फुकट गेले, महायुद्ध भडकलें आणि या महायुद्धांत कांहीं काळ असा गेला कीं, इंग्लंड एकाकी व हताशपणें लढत होतें.

## या युद्धानंतर

चालू महायुद्ध संपत आलेंच आहे व तें लवकरच संपून संयुक्तराष्ट्रांचा विजय होणार असें आपण धरून चालूं. ब्रिटनचें साम्राज्य शाबूत राहील असेंही आपण धरून चालूं. नेपोलिअनपासून कैसरपर्यंतच्या शंभर वर्षांत या साम्राज्याला रशिया हा प्रतिस्पर्धी भेटला. पण तो अगदीं दुबळा ठरला. नंतर जर्मनी जबरदस्त भेटला. पण ब्रिटननें त्याला मोडून काढलें. या युद्धानंतरची परिस्थिति मात्र अगदीं वेगळी होणार आहे. जर्मनी व जपान यांचा चुराडा झाला असें धरून चाललें तरी अमेरिका, रशिया व ब्रिटन अशीं तीन राष्ट्रें प्रबळ स्वरूपांत या युद्धांतून बाहेर पडतील. आणि पुढें चीन, तुर्कस्तान

( व पुन्हा कदाचित जर्मनी, इटाली, जपान ) इत्यादि राष्ट्रें अधिकाधिक प्रबळ होत जातील. त्यापैकीं रशियाला नफेबाजीसाठीं साम्राज्य नको असेल असेंही आपण धरून चालूं. तथापि रशियाचा मुलूख इतर कोणास नफेबाजीसाठीं नको असेल असें रशिया धरून चालू शकत नाहीं. म्हणजे रशियाला भांडवलदारी राष्ट्रांची स्पर्धा व महत्त्वाकांक्षा जाणवणार व रशिया शस्त्रास्त्रसज्ज राहणारच. अमेरिका व इंग्लंड यांमध्येंही स्पर्धा राहीलच. अमेरिकेचें उत्पादनसामर्थ्य या युद्धांत इतकें प्रचंड वाढलें आहे कीं, अतिशय प्रचंड असा बाजार आज अमेरिकेला हवा आहे. ऑस्ट्रेलिआ, कानडा व दक्षिण आफ्रिका यांची हीच अवस्था आहे. आफ्रिका व दक्षिण अमेरिका हे प्रचंड मुलुख आहेत. पण ते साम्राज्यस्पर्धेचे विषय होऊं शकत नाहींत. कारण तेथें लोकसंख्या फारच थोडी असल्यानें बाजारांतलें गिऱ्हाइक व कारखानदारी मजूर तेथे नाहींत. उलट अफाट लोकसंख्या, अफाट धनसाधनें व कांहींशी मागसलेली म्हणून मजूर होण्याच्याच लायकीची जनता, ही हिंदुस्तान व चीन या देशांतच आहे. पैकीं हिंदुस्तान हें इंग्लंडचें राखीव कुरण असें सर्वांनीं प्रथम मानलें तर मग अमेरिकेच्या मालाला व भांडवलाला चीनमध्यें मुक्तद्वार हवेंसें वाटणारच.

## आंतरराष्ट्रीय स्पर्धा अपरिहार्य

अमेरिकेनें चीन व ब्रिटिश साम्राज्यानें हिंदुस्तान हें आपलें आर्थिक विस्तारकेन्द्र ठरविलें व आपसांत तडजोड केली तरी दोघांचेंही नफे फुगूं लागतांच एकमेकांच्या बाजारावर एकमेकांचें आक्रमण सुरू होणारच. उत्पादनसाधनें हल्लीं एवढीं प्रचंड झालीं आहेत कीं, ज्यांच्या हातीं हिंदुस्थान अथवा चीन यांपैकीं एक देश असेल त्याला आपल्या बचावासाठीं आणि वाढत्या बाजारासाठीं दुसरा देश हवा असणें अपरिहार्य आहे असें वाटणारच. म्हणजे इग्लंड व अमेरिका हीं जीं आज मित्रराष्ट्रें आहेत त्यांना एकमेकांचें तीव्र वैर थोड्याच काळांत वाटूं लागेल यांत मुळींच शंका नाहीं. भांडवलशाही म्हटली की तिला वाढतें बाजारक्षेत्र लागतें व आपलें बाजारक्षेत्र कोणी तरी घेईल याची भीति वाटते. म्हणून त्यांना शस्त्रास्त्रसज्ज राहावें लागतें. आणि त्याचा परिणाम म्हणून वर उल्लेखिलेली सर्व युद्ध-

परिस्थिति उत्पन्न होते. हिंदुस्तान व चीन या दोन्हींवर यापुढें कोणाची तरी एकच सत्ता स्थापन झाल्यावांचून त्या दोन देशांवर सत्ता चालविणाऱ्या कोणत्याही दोन राष्ट्रांत चुरस वाढल्यावांचून राहणारच नाहीं. इंग्लंड व अमेरिका यांसारख्या आजच्या जिवलग मित्रांची ही गोष्ट. मग स्वतः चीन, तुर्कस्तान व इतर पौर्वात्य राष्ट्रें यांना ब्रिटन व अमेरिका या दोघांचा द्वेष वाटला तर नवल काय ? हीं राष्ट्रें पौरस्त्य राष्ट्रांवरील पाश्चात्यांचें आर्थिक प्रभुत्व उधळून लावण्यास वाढत्या तेढीनें उद्युक्त होणार व ब्रिटनअमेरिकेला धाक दाखविणार आहेत. अँग्लोअमेरिकनांचा हा प्रचंड वाढता पसारा यापुढें आपल्या मुलुखावर लोभी दृष्टि टाकील ही भीति रशिआला वाटेल. म्हणून तो अँग्लोअमेरिकनांना नेहमीं युद्धाच्या धाकांतच ठेवणार. युरोपीय राष्ट्रांची व इतर ठिकाणची परिस्थति येथें विचारांतही घेतली नाहीं. केवळ इंग्लंड, अमेरिका व रशिआ हीं राष्ट्रें चालू युद्ध जिंकून विजयी झालीं तरी तेवढ्यामुळें हल्लींहून अधिक प्रचंड महायुद्धाची परिस्थिति जगांत व हिंदुस्तानच्या डोकीवर कायम राहील असें अनुमानावें लागत आहे.

## तेढी व अंतर्भेद

पण इंग्लंड, अमेरिका व रशिया यांनीं अजून युद्ध संपविलेंच नाहीं. तें संपवावें कसें या बाबतींतच त्यांची चुरस लागली आहे. ब्रिटनचें राज्य आहे असेंच बेदरकारपणें हिंदुस्तानांत नांदावें ही गोष्ट जपानचा पराभव करण्याच्या दृष्टीनेंही अमेरिकेला धोक्याची वाटत आहे. रशिया, जर्मनीचा पराभव करून, अँग्लोअमेरिकन्स जपानशीं लढण्यांत गुंतले असतील त्यावेळांत, युरोपची आपणास हवी अशी नवी घडी बसवूं पहातो आहे. चिनी कम्युनिस्टांना हाताशीं धरून चीनमध्येंहि नवी घडी बसविण्याचा प्रयत्न रशिया करील व त्यापायीं अँग्लो-अमेरिकनाशीं त्याचा खटका उडणें अशक्य नाहीं. अँग्लो-अमेरिकनांचें आज असलेलें व दररोज वाढत जाणारें बळ रशियाला पुढें धोक्याचें वाटणार असून हिंदुस्तानांतील ब्रिटिश सत्तेखालीं सुरुंग लावण्याची इच्छा या युद्धकाळींच रशियाला होणें संभवनीय आहे. म्हणून हें महायुद्ध संपण्यापूर्वीं हें युद्ध व ही युद्धपरिस्थिति कायमच राहावी अशा तरतुदी होत आहेत असें वाटतें.

## त्रिदळ कर्तव्य

हें युद्ध संपून दुसरें सुरू होण्याच्या दरम्यानचा मामुली शांततेचा काळ येण्याची वाट पहात जे लोक स्वातंत्र्ययत्न थबकवून बसावें म्हणतात, त्यांना जगांतला समुद्र ओसरून जाण्याइतका काळ थांबावें लागेल असें यावरून वाटतें. ज्याला स्वातंत्र्य हवें आहे त्यानें युद्धकाल हा आतां निरंतरचा आहे असें मानूनच स्वातंत्र्ययत्नास तांतडीनें लागलें पाहिजे. युद्धकालींच हा यत्न करायचा म्हटलें म्हणजे जगांतील इतर प्रवाह आपल्या यत्नास अनुकूल कितीसे आहेत याचा विचार करूनच पाऊल पुढें टाकलें पाहिजे. उदाहरणार्थ ब्रिटिशाविरुद्ध अमेरिका व रशिया येथील लोकमत आपणास अनुकूल करून घेणें हें अवश्य आहे. तेथल्या राज्यसत्तेशीं झगडतांनाही, रशिया व अमेरिका येथील जनतेची युद्धासंबंधानें जीं पुरोगामी ध्येयें आहेत त्याजशीं आपण एकरूप आहों हें त्यांना आपण जाहीर केलें पाहिजे. केवळ पूर्ण स्वातंत्र्याचा सोलीव हक्क आपण हटवादानें मागत नसून संयुक्त राष्ट्रांच्या युद्धकार्यांत सामील होण्यास अवश्य इतकें मर्यादित स्वातंत्र्यही पुरे ही गांधींची व कॉंग्रेसची मागणी, युद्ध चालू असतांच जगांतल्या इतर राष्ट्रांतील जनतेच्या आकांक्षांशीं एकरूप होण्याच्या दृष्टीनें, हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय जनतेच्या ध्येयवादांत गुंतवून देण्याच्या दृष्टीनें, फार मार्मिक अशी आहे. अखेरीस हिंदुस्तान व चीन यांसारख्या आज पिळणुकींत सांपडलेल्या व अधिक पिळणुकींत सापडण्याचा संभव असलेल्या राष्ट्रांनीं आपली गुलामगिरी व पिळणूक झुगारून दिल्यानेंच जगांतील युद्धांचें कारण नष्ट होणार आहे व त्यांचें स्वातंत्र्य त्यांना मिळणार आहे. नित्ययुद्धाचा जो सिद्धांत मी येथें सांगतों आहे त्याचें रहस्य असें आहे कीं जगांतली साम्राज्यशाही संपेपर्यंत हें युद्ध अथवा युध्दपरिस्थिति नष्ट होणार नाहीं. आणि साम्राज्यशाही ही यापुढें मुख्यतः चीन व हिंदुस्थान येथेंच पक्कड ठेवणार असल्यामुळें जगांतली साम्राज्यशाही नष्ट झाल्यावाचून हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार नाहीं. जगांतलीं युध्दें थांबविणें, साम्राज्यवाद नष्ट करणें व हिंदी स्वातंत्र्य संपादणें हे तिन्ही प्रश्न अशा प्रकारें एकरूपच आहेत.

## अनुकूल परिस्थिति व प्रयत्न

अर्थात हिंदी लोक केवळ झोंप घेत पडून राहिले तरी भावी यशाचें जांभूळ अनायासें त्यांच्या तोंडांत पडेल असें मी सुचवीत नाहीं. आंतरराष्ट्रीय परिस्थिति आमच्या मोक्षास बराच काळपर्यंत अधिकाधिक अनुकूल होत जाणार असून रशिया व चीन यांचे प्रश्न अखेर हिंदुस्तानच्या मोक्षावांचून सुधारणार नाहींत असें मला वाटतें. चालू युध्दाचाच हा आवश्यक्रम आहे. हा जी आंतरराष्ट्रीय राजकारणाची अपरिहार्य स्थिति तिला हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यप्रयत्नानें पुरेशी मजबूत तरफ पुरविल्यास अथवा उलटा अलंकार वापरून बोलायचें तर या आंतरराष्ट्रीय परिस्थितीस आपण आपल्या यत्नाची तरफ बनविल्यास जगाचा हा क्रम यशस्वी होईल व त्यांतच आपलेंही यश आपल्या हातीं येईल. आपण हा यत्न कसा करावयाचा हें सांगणें हा या लेखाचा विषय नव्हे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीपुरतें बोलून येथेंच थांबतों.

# चालकशाही समाजव्यवस्था

## फॅसीझम, सोव्हिअट पद्धति व समाजवादाचें भवितव्य

मुंबई-येथील वाङ्मय सेवामंडळाच्या विद्यमानें कांहीं दिवसांपूर्वी प्रो. मा. दा. आळतेकर यांचे अध्यक्षतेखालीं पां. वा गडगीळ यांचें 'चालकशाही समाजघटना' या विषयावर व्याख्यान झालें. त्याचा गोषवारा पुढें दिला आहे. पां. वा. गाडगीळ आपल्या व्याख्यानांत म्हणाले,

"जेम्स बर्नाम या अमेरिकन लेखकानें 'मॅनेजेरिअल रेव्होल्यूशन' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याचा उल्लेख मिनू मसानी यांनीं आपल्या एका पुस्तकांत व कांहीं व्याख्यानांत केला. 'मॅनेजर' म्हणजे धंद्यांचें चालक. बर्नामचें मत असें कीं "फॅसिझम्, बोल्शोव्हिझम अथवा इंग्लंडअमेरिकेंतील लोकशाही यांत

### फारसा भेद उरलेला नाहीं

सर्वत्र चालकशाहीच स्थापन होत असून जर्मनी व रशिया या दोनहि देशांत फक्त चालकशाहीच आहे. भांडवलशाही झाल्यावर समाजवाद येईल असें जें मार्क्सचें भाविष्य होतें तें साफ चुकलें असून आतां भांडवलशाही मेली अथवा मरत आहे खरी, पण समाजवाद न येतां सर्वत्र चालकशाहीच येत आहे." समाजवाद येण्याचा संभवहि खुंटला आहे असें बर्नाम सांगतो.

बर्नामच्या या मताचा मसानींनीं विशेष प्रकारें उपयोग केला आहे. रशियांत समाजवाद नाहीं व तो तेथें येणें अशक्य असून तेथें आतां जर्मनीसारखीच फॅसिस्टशाही अथवा चालकशाही आहे आणि यामुळें रशिआ प्रतिगामी होत चालला आहे असें प्रतिपादण्यासाठीं मसानी बर्नामचा उपयोग करीत असून मार्क्सवाद मेला असें सांगण्याचा त्यांचा रोख आहे. आमचे कांहीं 'साप्ताहिक' मित्रहि क्रिमिया परिषदेंतून 'मॅनेजरशाही' अवतरणार म्हणून अश्रुपात करूं लागले आहेत. या 'मॅनेजरशाही' ऊर्फ

'चालकशाही'संबंधानें बर्नाम काय म्हणतो व त्या प्रश्नाचें एकंदर स्वरूप काय हें मी सांगणार आहे. मला मुख्यत: तीन मुद्दे मांडायचे आहेत.

( १ ) पहिली गोष्ट आहे ती ही कीं मार्क्सवाद मेलेला नाहीं. बर्नामनें आपले विचार मार्क्सच्याच पद्धतीनें मांडले आहेत हाच त्याचा प्रमुख पुरावा आहे. पण मार्क्सनें सांगितलेल्या एका मुद्द्याकडे बर्नामनें दुर्लक्ष केलें यामुळें त्याचा घोटाळा झाला.

( २ ) दुसरी गोष्ट अशी कीं बर्नामनें चालकशाही जगांत येत आहे असें म्हटलें त्याचें हें म्हणणें खरें मानलें तरी त्यासंबंधानें अश्रुपाताची गरज नाहीं. चालकशाहीमध्यें विषमता फार असेल हें खरें. पण तींत बेकारी नसणार, व्यक्तिमात्रास संपत्ति, सुख व संस्कृति यांचा हल्लींहून किती तरी अधिक वाटा निश्चितपणें मिळणार व लोकशाहीला बराच वाव मिळणार हें बर्नामनें

## प्रांजळपणें कबूल केलें आहे

तेव्हां 'चालकशाही' येणार म्हणून उसासे टाकण्याचें कारण नाहीं.

(३) तिसरी गोष्ट अशी कीं मार्क्सच्या ज्या एका शिकवणींची बर्नामनें उपेक्षा केली तो मुद्दा म्हणजे मनुष्यकर्तृत्व हा होय. रशियन समाजघटनेंत या मनुष्यकर्तृत्वास वाव असल्यानें तेथें समाजवाद निर्माण होण्याची आशा नष्ट झालीच असें मानण्याचें कारण नाहीं. निदान चालकशाहींतून कोठेंच समाजवाद येणारच नाहीं, असें मानणें निराधार आहे.

या तीन मुद्यांची थोड्या विस्तारानें चर्चा करतों.

भांडवलशाहीनंतर समाजवाद येईल असें जें मार्क्सनें भविष्य केलें तें चुकलें असें बर्नाम म्हणतो. पण मार्क्सनें भविष्य खरोखर काय सांगितलें तें पाहिलें पाहिजे. मार्क्स हा स्वतांला 'शास्त्रशुद्ध समाजवादी' म्हणवितो. यांतील 'शास्त्रशुद्ध' हा शब्द विशेष महत्त्वाचा आहे. रॉबर्ट ओवेन हा तत्त्वज्ञ परोपकारवादी होता. भांडवलदारांनीं परोपकारवृत्ति स्वीकारून समाजाचें कल्याण केलें पाहिजे असें तो म्हणे. ओवेनलाही 'समाजवादी' असें म्हणण्यांत येई. पण ओवेनचा समाजवाद हा नुसता काल्पनिक समाजवाद

( युटोपीअन सोशॅलिझम ) असून मार्क्सचा 'सोशॅलिझम' हा 'सायंटिफिक' आहे म्हणजे

## 'शास्त्रशुद्ध समाजवाद'

आहे असें मार्क्स म्हणे. समाज व इतिहास यासंबंधानें विचार करतांना नुसता सद्गुणाचा उपदेश करून चालत नाहीं तर इतिहासक्रमांत कोणतें कर्तृत्व केव्हां शक्य आहे तें पाहूनच त्याची इष्टानिष्टता ठरविली पाहिजे हा विचार त्यानें मांडला. यासाठीं मार्क्सनें प्राचीन इतिहासाचें मंथन करून त्याची शास्त्रीय उपपत्ति मांडली व मुख्यतः भांडवलशाही या समाजव्यवस्थेचीच त्यानें चिकित्सा केली तिच्या वाढीबरोबरच तिच्या नाशाचीं बीजेंहीं तिच्या अंगीं कशीं आहेत, त्याचप्रमाणें भांडवलशाहीचा नाश कसा करतां येईल वगैरे गोष्टी सांगून त्यानें भांडवलशाहीची शास्त्रशुद्ध चिकित्सा केली. आणि समाजवादी समाजघटनेची पूर्वतयारी भांडवलशाहीच्या गटांतच होत असून कामगारांच्या अंगीं भांडवलशाहीच्या नाशाचें सामर्थ्य येतें, भांडवलशाहीचें दुःख असह्य होऊन कामगार भांडवलशाहीचा नाश करतील आणि समाजवाद स्थापतील असें मार्क्सनें सांगितलें. पण भांडवलशाहीच्या नाशापासून समाजवादाच्या स्थापनेपर्यंत कोणकोणत्या अवस्थांतून जावें लागेल हें मार्क्सनें सांगितलेंच नाहीं. त्यानें मुख्य चिकित्सा केली ती भांडवलशाहीची केली व समाजवादाचा फक्त संदेश देऊन संभव सांगितला. भांडवलशाहीचा नाश करून समाजवाद स्थापन करणें शक्य व्हावें अशी वेळ इतिहासक्रमांत येते आणि म्हणून भांडवशाहीमुळेंच दुःखग्रस्त, जागृत व संघटित झालेला मजूर वर्ग ही क्रांति घडवून आणील असा मनुष्यस्वभावाचा एक अंदाज मार्क्सनें लिहून ठेविला आहे. तो त्याचा अंदाज चुकला कीं काय हें अजून ठरायचें आहे. पण

## त्याच्या शिकवणीचा मुख्य भाग

त्यानें हा अंदाज सांगितला हा नसून भांडवलशाहीची त्यानें जी चिकित्सा केली ती मार्क्सचें वैशिष्ट्य होय. भांडवलशाहीची मार्क्सनें केलेली ही चिकित्सा बर्‍यांमला मान्यच आहे.

भांडवलशाहीच्या अंगींच तिच्या मृत्यूचीं बीजें आहेत असें मार्क्सच्या विचारसरणीप्रमाणें कसें म्हणतां येते, त्यांतून सोशलिझम् कसा येतो व बर्नामर्ने मार्क्सची चूक कोठें पाहिली याचा आतां विचार करूं.

भांडवलशाही याचा अर्थ ज्याचेजवळ भांडवल त्याची सत्ता असा आहे. बहुसंख्यसमाजाला चरितार्थसंपादनाचा व्यवसाय मिळवून तो चालविणें हेंच जीवनांतील सर्वांत मोठें कार्य असतें. ज्याचे हातीं भांडवल तोच बहुसंख्य समाजाला व्यवसाय उर्फ रोजगार पुरवूं शकतो. म्हणून बहुसंख्य समाजाचें जीवन त्याचेच हातीं असतें. इंग्लड या देशांत ही भांडवलशाही पद्धति सुरू झाली त्यापूर्वी तेथें लहान लहान हस्तव्यवसाय असून श्रम करणारे कारागीर हेच आपल्या उत्पादन साधनाचे मालक होते. आपला मालहि त्यांचे तेच विकीत असत. तशा त्या परिस्थितींत उत्पादनहि फार थोडें होई. पण भांडवलशाही पद्धतीनें उत्पादनाची अफाट वाढ केली. उदाहरणार्थ पाच सुतार प्रत्येकीं आपापल्या घरीं आपापल्या हत्यारांनीं रोज एकेक खुर्ची करीत असतील. पुढें एकाद्या भांडवलदारानें खुर्च्या करण्याचीं हत्यारें, लाकूड, काम करण्याची जागा सर्व स्वतांचे खरेदी करून पाच सुतार मजुरीनें नेमले तर ते पाच सुतार प्रत्येकीं वेगवेगळ्या श्रमानें एकेक खुर्ची न करतां सर्वजण मिळून श्रमविभागपूर्वक खुर्च्या करतात. यामुळें एकेकटे सुतार जेवढ्या वेळांत पांच खुर्च्या करतील तेवढ्याच वेळांत तितकेच सुतार श्रमविभाग पद्धतीनें दहा, पंधरा खुर्च्या करतील. उत्पादनसामर्थ्यांत ही जी वाढ होते तिचें स्वरूप क्रांतिकारक असतें. खाजगी एकेकट्या हस्तव्यवसायिकाकडून निर्माण होणाऱ्या धनापेक्षा एका भांडवलदाराच्या भांडवलांतून सामुदायिकपणें निर्माण होणारें हें धन परिमाणांत फारच अधिक असतें. पुढें शास्त्रीय व यांत्रिक शोधांनी हें परिमाण आणखी आणखी वाढतें. श्रमविभाग व शास्त्रीय आणि यांत्रिक उत्पादन पद्धति यांचे साह्यानें होणारें भांडवलदारी उत्पादन समाजांतील उत्पादनाच्या अनेक व्यवसायांत शिरतें व सर्वत्र उत्पन्न धनाचें परिमाण वाढतें. पण श्रम करून धन निर्मिणाऱ्या मजुरांची मिळकत त्या प्रमाणांत वाढत नाहीं. कारण धनाचें परिमाण वाढतें त्या प्रमाणांत गिऱ्हाइक वाढत नसल्यानें भांडवलदारास उत्पादनसामर्थ्य जितक्या प्रमाणांत वाढतें तितक्या प्रमाणांत उत्पादन वाढविण्याची गरज

नसते. अर्थात् तो मजुरांची संख्या कमी ठेवतो. पण नव्या सुधारलेल्या पद्धतीच्या उत्पादनापुढें जुन्या हस्तव्यवसायिकांच्या मालाचा टिकाव न लागून यांचे धंदे बुडतात व ते बेकार होऊन भांडवलदाराकडे रोजगारीसाठीं येतात. यामुळें भांडवलदारापुढें त्याच्या गरजेहून अधिक मजूर उभे राहतात व त्यांच्यांत चढाओढ लावून भांडवलदार मजुरीचे दर उतरवितो. याचा भांडवलशाही बाजारावर जो एक महत्त्वाचा परिणाम होतो तो असा. निरनिराळ्या भांडवलदारी व्यवसायापासून उत्पन्न होणारा जो माल असतो त्याचें गिऱ्हाइक म्हणजे एकूण भांडवलदारांचे एकूण मजूर हेच असतात. पण ते कांहीं एकूण भांडवलदारांचा

**सर्व माल खरेदी करूं शकत नाहींत.**

मजुरांची मजूरी त्यांच्यामधील चढाओढीमुळें कमींत कमी अशी ठरते. उलट उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धतीमुळें उत्पन्न झालेल्या मालाचें परिमाण जास्तींत जास्त झालेलें असतें व एकूण कामगारांनां जी एकूण मजूरी मिळते तीच त्यांची खरेदीशक्ति असते. ती खर्चून एकूण भांडवलदारांच्या एकूण मालांतला काहीं भाग ते खरेदी करतात. यामुळें एकूण भांडवलदारांनीं जी एकूण मजूरी वाटली ती त्यांची वसूल होते. भावी भांडवलाचा भाग म्हणून कांहीं भाग भांडवलदारांस काढून ठेवायचा असतो. याहून उरलेला जो माल तो नफ्याचा माल. पण तो कोठें विकावयाचा ? त्यासाठीं भांडवलदारास जुन्या हस्तव्यवसायाचें गिऱ्हाईक मिळतें. त्यामुळें उत्तरोत्तर जुने हस्तव्यवसाय भांडवलशाही उत्पादनाच्या मालाशीं होणाऱ्या चढाओढींत मोडकळीस येऊन जुने धंदेवाले बेकार होतात व भांडवलदाराच्या दारीं मजूर म्हणून येत असतात उत्पन्न होणाऱ्या धनाचे पुढीलप्रमाणें भाग पडत असतात. एक भाग उत्पादक धन. हें भावी उत्पादनाचें साधन म्हणून बाजूस काढून ठेवण्यांत येतें. दुसऱ्या म्हणजे उपभोग्य धनापैकीं भांडवलशाहीच्या उत्पादनक्षेत्रांतल्या एकूण मजुरांना जेवढी मजुरी वाटलेली असते.

**तेवढ्याच किंमतीचा भाग**

मजूर खरेदी करतात. याहून अधिक उरणारें धन भांडवलशाही उत्पादनांतील मजुराबाहेरचे म्हणजे लहान हस्तव्यवसायिकाचें जें गिऱ्हाईक

त्यांजकडून खरेदी केलें जातें. त्यामुळें भांडवलदाराला जी किंमत मिळते तोच त्याचा नफा. हा नफा तो भांडवलांत भर म्हणून घालतो. अर्थात वाढलेल्या भांडवलाला अधिक मजूर लागतात. ते मोडकळीस आलेल्या हस्तव्यवसायी कारागिरांतून मिळतात. यांत जो एक विशिष्ट क्रम दिसत आहे तो असा कीं भांडवलशाही उत्पादनाच्या क्षेत्रांत भांडवलशाहीचा माल अंशतः खपतो व बाकीचा माल भांडवलशाहीच्या वर्तुळाबाहेर हस्तव्यवसायिकाच्या क्षेत्रांत खपतो. यामुळें हें हस्तव्यवसायिकाचें क्षेत्र भांडवलशाही उत्पादनाच्या कक्षेंत येतें. पुन्हा बाजाराचें क्षेत्र वाढतें. असें होता होता सारें जग भांडवलशाही उत्पादनाच्या वर्तुळांत आलें म्हणजे काय होईल पहा. या भांडवलशाही मजुरांनीं आतां त्यांना मिळणाऱ्या मजुरीइतका माल खरेदी केल्यानंतर उरलेला माल खपण्याला आतां भांडवलशाही उत्पादनाच्या बाहेरचें गिऱ्हाईक मिळूंच शकणार नाहीं. कारण आतां जग व्यापलेलें असतें. हा न खपणारा माल बाजारांत असेपर्यंत नवीन माल निर्माण केला जाणार नाहीं. यामुळें नवी रोजगारी लोकांना मिळणार नाहीं व

## लोक बेकार रहातील.

पण त्यामुळेंच बाजारांतला माल खपणार नाहीं. म्हणजे माल खपत नाहीं, तोंवर नवीन उत्पादन होत नाहीं, तोंवर रोजगारी मिळत नाहीं, रोजगारी नाहीं तोंवर लोकांजवळ खरेदीशक्ति नाहीं, खरेदीशक्ति नाहीं तोंवर माल खपत नाहीं असें हें दुष्ट चक्र कायम फिरत रहातें. आणि एका बाजूस उपभोग्य मालाच्या राशी सडत रहातात व दुसऱ्या बाजूस बेकार आणि भुकंपाल मानवसमाज सन्थ राहतो. असा हा भीषण देखावा मानवजात फार काल सहन करणार नाहीं व भांडवलशाहीनेच संघटित केलेलें व जागृत केलेलें मजूर ही परिस्थिति नष्ट करतील असें मार्क्सनें म्हटलें आहे.

भांडवलशाहींत ही आपत्ति कां येते व उत्पन्न धनाचें तीन भाग होतात असें आतांच म्हटलें. त्यांतला भांडवलाचा भाग पुढील उत्पादनासाठीं काढून ठेवला पाहिजे. उपभोग्य धनापैकीं जेवढ्या मालाच्या किंमतीइतकी मजुरी वाटली असेल तितके धन मजूर खरेदी करतील. बाकीचें जें

धन उरतें व आतां खपत नाहीं त्यामुळें वरील दुष्ट चक्र उद्भवतें. तें खपून त्याची किंमत भांडवलदाराला नफा म्हणून न मिळेल तर तो नवें उत्पादनच करणार नाहीं आणि भांडवल, माल व माणसें सर्व आपापल्या जागीं निकामी राहून सडून जातील. धनोत्पादनसाधनें खाजगी मालकींत नसतीं, तीं जर सर्व जनतेच्या मालकींत असतीं तर हा न खपलेला माल जनतेच्या सुखोन्नतीसाठीं आणि सांस्कृतिक उन्नतीसाठीं वापरला गेला असता.

## याचेंच नांव समाजवाद;

मजुरांना ही परिस्थिति स्पष्ट दिसूं लागल्यानें, भांडवलशाहीचें दुःख असह्य झाल्यानें ते धनोत्पादनसाधनांची खाजगी मालकी नष्ट करतील व धनोत्पादनसाधनांची सार्वजनिक मालकी म्हणजेच समाजवाद स्थापन करतील असें मार्क्सचें अनुमान आहे. यावरून हें लक्षांत येईल कीं भांडवलशाहीच्या वाढीची, र्‍हासाची व नाशाची मीमांसा जितकी या विचारसरणींत आहे तितकें समाजवादाचें विवेचन नाहीं. त्याचा फक्त संदेश व संभव सांगितला आहे.

मार्क्सची भांडवलशाहीची ही मीमांसा बर्नामला मान्य आहे. पण मार्क्सच्या अंदाजाप्रमाणें समाजवादाची स्थापना रशियांतहि झाली नाहीं व आतां ती कोठेंच होणेंहि शक्य नाहीं असें बर्नाम म्हणतो. या त्याच्या म्हणण्याचा विचार करण्यापूर्वी चालकशाहीसंबंधानें त्यानें काय म्हटलें आहे तें पाहूं. भांडवलशाही उत्पादन प्रचंड प्रमाणावर होऊं लागतें तसें तें संयुक्त भांडवली पद्धतीनें होत जातें. उत्पादनाचें कार्य अजस्र होतें. त्यासाठीं यंत्रज्ञ व शास्त्रज्ञ लागतात. ते पगारी असतात. त्यांना मालाचा खप कोण कोठें कसा करतो याचा पत्ता नसतो. बँकवाले भांडवल उभारतात व नफातोटा यांकडे नजर ठेवतात. पण उत्पादन कसें होतें हें त्यांना कळत नाहीं. कच्चा माल आणणें, कारखाना चालविणें, पक्का माल करणें, बाजार शोधणें सर्व विविध कार्यांचें संयोजन करून उत्पादनकार्य अखंड राखणें हें कार्य मॅनेजर म्हणजे चालक करतात धंद्यांचे मालक म्हणजे जे भागीदार ते कोठेंतरी दूर राहून

निष्क्रियपणें नफा खात असतात.

धनोत्पादक श्रम करण्याला ईर्षा राहावी म्हणून धनोत्पादनसाधनावर खाजगी मालकी हवी असें लॉक म्हणत असे. पण आजच्या प्रचंड उत्पादनाच्या कार्यांत खासगी मालकाच्या कर्तृत्वास मुळींच वाव राहिलेला नाहीं. फक्त पगारी नोकराकडून सामुदायिक उत्पादन प्रचंड प्रमाणांत होऊं लागलें आहे. ही परिस्थिति भांडवलशाहींत उत्पन्न होईल व खासगी मालकी निरर्थक होईल असें मार्क्सनें सांगितलें होतें. बर्नाम पुढें म्हणतो कीं आतां खाजगी मालकी निरर्थक होऊन भागीदारांचे नफे कमी कमी होत आहेत, आणि उत्पादनसाधनावर मॅनेजरांचा ताबा वाढत आहे. मॅनेजर ऊर्फ चालक यांचा एक स्वतंत्र वर्ग त्यांना स्वतांलाहि न कळत बनतो आहे. या वर्गाच्या मालकींत नव्हे तरी नियंत्रणाखालीं उत्पादनसाधनें जातात. तीं आपल्या नियंत्रणाखालींच ठेवण्याची दक्षता हा वर्ग घेत राहातो. हळूहळू बँका, बाजार या सर्व बाबतींत अनियंत्रित चढाओढ नाहींशी करून चालकशाहीचें सुयंत्र नियंत्रण तेथें उत्पन्न होतें. हें चालक हळूहळू नफापद्धति अजिबात बंदच करतात असें बर्नाम सांगतो. पण जर्मनींत अजून भांडवलशाही व नफापद्धति कायम आहे हें बर्नामनें मान्य केलें असून रशिआंत भांडवलशाही व नफापद्धति मुळींच नाहीं अशीही कबूली बर्नामनें दिली आहे. मात्र मॅनेजर ऊर्फ चालक हे सामान्य माणसाच्या किती तरी पट अधिक पगार आपणांला घेतात असें बर्नाम म्हणत असून रशिआंत व जर्मनींत

## चालक वर्गाला प्रचंड पगार

देण्यांत येतो हें खरें आहे. तसेंच जर्मनींत व रशिआंतहि समाजांत चालकवर्गाचें वर्चस्व स्थापन झालें असावें हें शक्य आहे असें मला वाटतें. पण मला म्हणायचें आहे तें हें कीं चालकशाही येणार म्हणून काहीं लोक शोक करतात तो अनाठायीं आहे. चालकशाही म्हणजे अन्यायाची, लोभ्याची अथवा गुंडाची सत्ता नव्हे. ती शास्त्रशाही आहे. म्हणजे शास्त्रीय दृष्टीनें सामाजिक व्यवहार कसे करावे हे चालक ठरवितील व तसे व्यवहार चालविणें हें शास्त्रीय दृष्टीनेंच जर अवश्य असलें तर तें केवळ चालकानें ठरविलें म्हणून त्याज्य नव्हे. चालकशाही समाजांत भांडवलशाहींतील आर्थिक बेबंदशाही नष्ट होईल. अर्थात त्यासाठीं

व्यक्तिस्वातंत्र्यावर नियंत्रण येणारच. तें सर्वांच्या हिताचें आहे. बेकारी ही कोणत्याहि समाजाचें सामर्थ्य पोखरणारी असल्यानें चालकशाहा बेकारी साफ नाहींशी करतील. निरनिराळ्या वर्गांच्या पगारांत विषमता पुष्कळ राहील. पण समाजांत फुकटखाऊ वर्ग राहणार नाहीं. कमींत कमी मजूरी ही बरीच उच्च दर्जाची राहील. सुख, संस्कृति व सामर्थ्य यांचा लाभ व्यक्तीला व समाजाला फार मोठ्या प्रमाणावर मिळाला पाहिजे त्यावांचून आंतरराष्ट्रीय कलहांत राष्ट्रें टिकत नाहींत ही गोष्ट चालकांना कळत असल्यानें ते समाजरचना खाजगी व्यक्तीच्या अथवा एखाद्या वर्गाच्या हितासाठीं न करतां सर्व समाजासाठीं करतील. बर्नामनें हें मान्य केलेलेंच आहे. अशा या चालकशाही समाजांत

## लोकशाहीला वाव मिळतो

हेंहि बर्नाम कबूल करतो. उत्पादनव्यवहार कार्यक्षम होण्याचे दृष्टीनें सर्व प्रकारच्या टीका व प्रतिटीका करण्यास वाव व उत्तेजन मिळतेंच. शिवाय व्यक्ति अथवा गट यांवर अन्याय होत राहून तो झाकला गेल्यास पुढें स्फोट होऊन समाजविध्वंसाची भीति असते म्हणूनही मतप्रदर्शनास मर्यादित स्वातंत्र्य असते. स्टालिनला बेछूट शिव्या देण्याचें सुख ज्यांना हवें असेल त्यांना तें मिळणार नाहीं. तथापि उत्पादनाच्या बाबतींत अथवा अमुक एका सामुदायिक व्यवहारांत अमुक एक धोरण चुकीचें असेल तर तसें बोलण्यास रशियांत स्वातंत्र्य आहे. त्यामुळें कार्यक्षमता वाढते व वैयक्तिक उत्कर्षास वाव मिळतो. स्टालिनच्या नांवाचा जगांत गवगवा आहे तितका खुद्द तो रशियांत नाहीं. उत्पादनाच्या कामीं विशेष संशोधन, संघटना अथवा विक्रम केलेल्या स्त्री-पुरुषांचा तेथें गौरव होत असतो. स्थानिक अथवा प्रांतिक प्रश्न स्थानिक अथवा प्रांतिक लोकशाहीनें सोडविले जातात व स्थानिक अथवा प्रांतिक माणसाना त्या त्या क्षेत्रांत कर्तृत्वानें पुढें येण्यास वाव मिळतो. रशियांतील या लोकशाहीची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. इंग्लंडांत समाजव्यवहारापैकीं शेंकडा ९९ बाबी खाजगी मालकीच्या क्षेत्रांतील असतात. पार्लमेंटास त्याबाबत कांहींच करतां येत नाहीं. या खाजगी व्यवहारामुळें समाजावर येणारीं दुर्धर संकटें मात्र पार्लमेंटास निस्तरावीं लागतात व

लोकांना भोगावीं लागतात. पार्लमेंटाला, वृत्तपत्रांना व वक्त्यांना विचार-स्वातंत्र्य आहे तें फक्त १ टक्का क्षेत्रापुरतें आहे. ९९ टक्के प्रमाणांत

## एकंदर व्यवहार खाजगी व अंधारांत

चालतात. उलट रशियांत सर्व उत्पादन सामुदायिक मालकीनें चालत असल्यानें ९९ टक्के व्यवहार नुसताच सार्वजनिक चर्चेचा नव्हे तर कर्तृत्वाचा विषय असतो. सर्व व्यवहार प्रत्यक्ष म्हणजे वास्तव आणि कृतीच्या स्वरूपांत चर्चेला येतो. ( केवळ मेटॅफिजिकल म्हणजे व्यवहाराशीं संबंध नसणाऱ्या तत्त्वाचे विषय चर्चेस येत नाहींत. ) यामुळें कृतीच्या जबाबदारीनेंच टीका करावी लागते व प्रत्यक्ष व्यावहारिक असे सर्व विषय असल्यानें मतभेदांस वावच कमी असतो. धनसाधनावर खाजगी मालकी असावी म्हणणारे पक्षच तेथें राहूं देण्यात येत नाहींत हें खरें. पण आजच्या प्रचंड उत्पादनाच्या काळांत खाजगी मालकशाही हीच लोकशाही, लोकसुख व लोकउन्नति यास अपायकारक आहे. सोव्हिअट लोकशाहीचें हें स्वरूप वेब पतिपत्नींच्या ग्रंथांत दिलें आहे. तें कांहीं वेळ पूर्वग्रह बाजू सारून नीट समजून घेतलें पाहिजे. रशियांत चालकशाही आली आहे, तीच तेथें कायम राहणार आणि साऱ्या जगावर ही चालकशाही कोसळणार असें म्हणून जे लोक धि:कारानें, टिंगलखोरपणानें बोलत आहेत, मार्क्स चुकला रे चुकला म्हणून टाळ्या पिटीत आहेत त्यांना प्रथम मी हें सुचवूं इच्छितों कीं, तुमचें सर्व म्हणणें खरें मानलें तरी चालकशाही ही आजच्या साम्राज्यशाही समाजघटनेपेक्षां सर्व बाजूंनीं

## अधिक चांगली घटना आहे

व समाजवाद येणारच नसला तर चालकशाही आल्यानें व राहिल्यानें जगाचा फायदाच होईल, नुकसान होणार नाहीं.

खुद्द बर्नामनें आपले विचार मार्क्सच्या विचारसरणीचा अवलंब करूनच मांडले आहेत. समाजघटना ही आर्थिक उत्पादनप्रकारावरून घडत असते, उत्पादनप्रकार व समाजघटना यांच्या एकमेकांवर क्रियाप्रतिक्रिया होत असतात व समाजव्यवस्थेचें नाक धनोत्पादनसाधनांवर ज्यांची सत्ता असते त्यांच्या हातीं असतें हें मार्क्सचें मतच बर्नामनें आपल्या संशोधनास

आधारभूत घेतलें आहे. पण बर्नामनें मार्क्सच्या एका विशिष्ट सिद्धांताची उपेक्षा केली असल्यानें त्याला आतां समाजवादाबद्दल निराशा वाटूं लागली आहे. खरोखर भांडवलशाहीचें नुकतेच मीं जें वर्णन केलें तेथेंही मानवजात एकदां अगतिक झालीच आहे. बाजारांत माल पडून आहे तो खपत नाहीं आणि त्यासमोर उभ्या असलेल्या बेकारांजवळ पैसा नसल्यानें त्यांना तो माल खरेदी करतां येत नाहीं व तो माल खरेदी होऊन संपल्याखेरीज नवीन उत्पादन होत नाहीं व बेकारी जात नाहीं. म्हणजे संपत्तीच्या ढिगासमोर माणसांनीं उपाशी मेलें पाहिजे ही येथें बिनमोड अगतिकता येत आहे. पण धनोत्पादन-साधनाची खाजगी मालकी हें या अगतिकतेचें कारण आहे हें ओळखून माणसें ही खाजगी मालकी नष्ट करतील असें मार्क्सनें सांगितलें होतें. एकुणिसाव्या शतकांत युरोपांत अनेक क्रांतिकारक उठाव झाले व रशियांत यशस्वी क्रांति झाली. हें क्रांतिकारक

## मनुष्यकर्तृत्व मार्क्सनें प्रतिपादिलें

हें बर्नामनें लक्षांत घेतलेलें नाहीं. रशियांत आज चालकशाही आहे असें मानलें तरी रशियन समाजघटनेचें हें वर्णन अपुरें आहे. उत्पादनसंघटना फार मोठ्या प्रमाणाची आणि यांत्रिक व शास्त्रीय स्वरूपाची झाली, सर्व व्यवहार योजनापूर्वक चालू लागले म्हणजे चालकाचें प्रस्थ त्या समाजांत कांहीं प्रमाणांत माजावें हें साहजिकच आहे. पण सोव्हिअट राज्यघटनेचें स्वरूप या चालकशाहीला खेचून पायबंद घालता येईल असें आहे. लहान गावें, जिल्हे, प्रांत, प्रजासत्ताक राज्यें व या सर्वांवर संयुक्त राज्य, अशा श्रेणीनें खालपासून वरपर्यंत अप्रत्यक्ष निवडणुकीनें नागरिकांच्या सोव्हिअट संघटना निर्मिलेल्या आहेत. राजकीय सत्ता या सोव्हिअट संघटनेच्या हातीं असून चालकशहांना आपल्या धोरणांचें व योजनांचें समर्थन या सोव्हिअटपुढें करावें लागतें. शिवाय अगदीं लहान कारखान्यापासून प्रचंड कारखान्यापर्यंत कामगारसंघटना तेथें आहेत. यांना सोव्हिएटमध्यें स्थान आहे. ते कामगार-संघ कामगारांच्या हितास जपत असतात. तसेंच खाजगी उत्पादक व धनाचे उपभोक्ते ऊर्फ गिऱ्हाइक यांच्याहि संघटना तेथें असून भांडवलशाही अथवा जमिनदारशाही यांचा तेथें पूर्ण अभाव आहे. ज्यांना पगार खूप मिळतो

त्यांना शिल्लक धन सरकारला कर व कर्जरूपानें द्यावें लागतें. त्या धनाच्या साह्यानें खाजगी धंदा व नफेबाजी करतां येत नाहीं. उत्पादनकार्य व राज्यसत्ता यांत जनतेला इतका विविध द्वारांनीं हात घालता येत असल्यानें चालकशाहीची लगाम जनतेकडून या सर्व मार्गांनीं खेचली जात असेल हें उघड दिसतें. रशिया हें अत्यंत मागासलेलें राष्ट्र होतें. त्याला उत्पादनाचे बाबतींत अगदीं थोड्या अवधींत जगाच्या पुढें नेण्यासाठीं जी विशेष आमिषें दाखविण्यांत आलीं त्यांतच खूप पगार विशेष कर्तबगार लोकांना द्यावा लागला. पण सर्व प्रकारच्या शिक्षणाचा फैलाव तेथें झपाट्यानें होत असून चालकीय गुणांचें शिक्षणही अनेकांना मोफत दिलें जात असल्यानें हल्लींची पगाराची विषमता नाहींशी होण्याचा खास संभव तेथें आहे. कामकरी संघ, गिऱ्हाईक संघ, उत्पादक संघ व नागरिकांची सोव्हिअट्स् इतक्या मार्गांनीं चालकशहांच्या हुकुमशाहीस आळा घालण्याचे मार्ग जे जनतेस मिळाले आहेत त्यांचा मुळींच उपयोग न करतां रशियन जनता गुलामाप्रमाणेंच चालकशहांच्या सत्तेस शरण जाते असें ज्यांना वाटत असेल त्यांना कोणताच नवा मुद्दा समजणार नाहीं. कारण मनुष्यस्वभावांतील गतिमान व जिवंत शक्ति त्यांना आकलन करतां येत नाहींत.

खरोखर जनतेच्या विविध नियंत्रक संघटना बनविल्या असतांहि जनता गुलामासारखीच वागेल हें खरें असेल तर जर्मनींत फॅसीझम्‌खालीं कामगारसंघटनेस बंदी कां केली असावी आणि सोव्हिएट संघटनासारख्या संघटना तेथें कां नसाव्या? रशियांत भांडवलशाही नाहीं व

## जर्मनींत भांडवलशाही अजूनहि आहे

असें बर्नाम कबूल करतोच. शिवाय तेथें कामगारसंघटना नाहींत हेंही लक्षांत घेतलें पाहिजे. फॅसिझम व सोव्हिअट पद्धति यांत हा असा मूलभूत फरक आहे. तरीपण जर्मनी व रशिया येथें सारखीच समाजघटना आहे असें म्हणणाऱ्याशीं वाद अथवा चर्चा करणार कशी? असो.

रशिआंत जी विविध जनतासंघटना आहे ती आजची विषमता नष्ट करून खराखुरा समाजवाद स्थापन करण्याचा प्रयत्न करील असा खास

संभव आहे. ज्यानें त्यानें शक्तिनुसार काम करावें आणि ज्याच्या त्याच्या गरजेनुसार त्याला धन मिळावें हें वाक्य मूळचें बायबल अथवा तशाच कोठल्या तरी धर्मग्रंथांतलें आहे. मार्क्स व लेनिन यांनीं तो अंतिम आदर्श पुढें ठेविला आहे हें खरेंच आहे. पण त्या अवस्थेस पोंचण्यापूर्वी कोणत्या रस्त्यानें व पायऱ्यांनीं जावें हें मार्क्स व लेनिन यांनीं सांगणें शक्य नव्हतें व सांगितलेलें नाहीं. यामुळें त्यांचें भविष्य चुकण्याचा प्रश्नच येत नाहीं. समाजवाद स्थापण्याचा प्रयत्न माणसें करतील हा मनुष्य-स्वभावाबद्दलचा मार्क्सचा अंदाज खरा ठरला आहे. भांडवलशाहीचा गति-सिद्धांत त्यानें स्थूलमानानें सांगितला तोहि खरा ठरला असून भांडवल-शाहीच्या गर्भांतच समाजवादी संघटनेस अवश्य असें सामुदायिक उत्पादन होईल हेंहि त्याचें म्हणणें खरें ठरलें आहे. सुशिक्षितांनीं हे

## नवे नवे पुढें येणारे विषय

स्वतः नीट समजून घेतले पाहिजेत. त्रुटित उल्लेख आणि उथळ धिःकार अथवा गौरव यांनीं अशा विषयांचीं वासलात लावूं नये."

शेवटीं अध्यक्ष आळतेकरांनीं समारोप केल्यावर सभा संपली.

फेब्रुवारी, १९४५

# भांडवलशाहीचा गतिसिद्धान्त

## [ एका अभ्यासमंडळांत दिलेलें व्याख्यान ]

भांडवलशाही उत्पादनपद्धतीचा गतिसिद्धान्त आज सांगावयाचा आहे. म्हणजे भांडवलशाही पद्धति विकास अथवा ऱ्हास पावत असतांना तिच्या अंगीं कोणते गुण विशेष दिसून येतात व समाजव्यवस्थेवर तिचा एकंदरीनें काय परिणाम होतो हें येथें सांगावयाचें आहे. त्यासाठीं प्रथम भांडवलशाहीचें स्वरूप समजून घेऊं.

शाही म्हणजे सत्ता. एकंदर समाजाच्या जीवनावर भांडवलवाल्यांची सत्ता ज्या उत्पादनपद्धतीमुळें निर्माण होते, ती उत्पादनपद्धति व त्यावेळची समाजव्यवस्था ही भांडवलशाही होय. प्रचंड धन्द्यांच्या मालकांच्या हातीं एकंदर समाजाला रोजगारी पुरविण्याची अथवा समाजाची रोजगारी अडविण्याची सत्ता आहे, म्हणून अशा समाजव्यवस्थेस 'भांडवलशाही समाजव्यवस्था' म्हणावयाचें.

भांडवलशाहीचें विशेष लक्षण असे. भांडवलवाल्यांच्या उत्पादनाच्या क्षेत्रांत जी जनता असते, त्या जनतेला, तिनें भांडवलवाल्याच्या उत्पन्न केलेल्या धनाच्या किंमतीहून कमी मजूरी दिलेली असते. या कमी मजुरीनें ती मजूर जनता त्या उत्पन्न धनाचा कांहीं भाग खरेदी करते. बाकीचें उरलेलें धन भांडवलदाराला आपल्या उत्पादनक्षेत्राच्या बाहेरच्या क्षेत्रांत नेऊन विकावें लागतें. या बाहेरच्या क्षेत्रांतील जुन्या धंदेवाल्यांचा माल उणाव व महाग असल्यानें त्या मालाचें गिऱ्हाईक या भांडवलदाराच्या सुबक व स्वस्त मालाला मिळतें. या बाहेरच्या क्षेत्रांत माल विकून भांडवलदाराला मिळणारा जो पैसा तो त्याचा नफा होय. या बाहेरच्या क्षेत्रांतील जुन्या धंदेवाल्यांचे धंदे बुडून ते बेकार होतात व भांडवलदाराच्या दाराशीं मजूरीस येतात. भांडवलदारही त्याला मिळालेल्या नफ्याचें रूपांतर

नव्या भांडवलांत करतो व या नव्या बेकारांना काम देतो. त्यामुळें भांडवलशाही-उत्पादन क्षेत्राचें वर्तुळ मोठें होतें. या नव्या उत्पादन-वर्तुळांत पुन्हां पूर्वीचाच सर्व प्रकार घडतो. उत्पन्न धनांतील फक्त कांहीं भाग मजूर खरेदी करतात. उरलेलें धन या वर्तुळाबाहेरच्या क्षेत्रांत जातें. तेथें तें जुने धंदे बुडवून बेकारी निर्माण करतें; पुन्हां उत्पादनाचें वर्तुळ वाढत जातें. यापासून बेकारीचा अनर्थ उद्भवणें अपरिहार्य ठरतें. यांत भांडवलशाही उत्पादनाचें जें एक विशेष स्वरूप लक्षांत येतें तें हें कीं, उत्पादनाच्या क्षेत्रांत उत्पन्न झालेल्या मालाला उत्पादनाच्या क्षेत्रांतील मजूर जनतेहून अन्य म्हणजे बाहेरच्या क्षेत्रांतील गिऱ्हाईक नफ्यासाठीं हवें असतें. समुद्राच्या पाण्यांत टाकलेल्या खड्यापासून एकाबाहेर एक अशीं वर्तुळें वाढत जातात व तीं वर्तुळें, शास्त्रज्ञ असें सांगतात कीं, अत्यंत सूक्ष्मपणें समुद्राच्या जगांतील सर्व किनाऱ्यापर्यंत जाऊन पोंचतात, त्याप्रमाणें, भांडवल-शाहीच्या उत्पादनक्षेत्राचीं वर्तुळें जगाचा अखेर ग्रास करतात. वरील विवेचनावरून समजून येईल कीं, भांडवलदाराला मिळणारा जो नफा, त्या नफ्यांतूनच हीं वर्तुळें वाढत असतात. या नफ्यालाच स्थूलमानानें, वाढावा अथवा ( सर्प्लस व्हॅल्यू ) असें आपण म्हणूं.

या वाढाव्याचें स्वरूप येथें आपण समजून घेऊं. वाढावा असा अर्थ-शास्त्रांत कांहीं प्रकारच नाहीं असें पुष्कळ अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे. पण आपण वाढावा म्हणतों तरी कशाला हें येथें समजून घेतलें पाहिजे. कोष्टी कापड विणतो, तें तो अंशतः स्वतःसाठीं ठेवून बाकीचें शेतकऱ्याला देतो. उलट शेतकरी जें धान्य निर्माण करतो त्यांतलें तो अंशतः स्वतःसाठीं ठेवून बाकीचें कापडाच्या मोबदल्यांत कोष्टयाला देतो. येथें हे दोघेजण दोघांच्या चरितार्थापुरतें उत्पन्न काढतात व तें खर्चून उभयतांचा चरितार्थ चालवितात, असें आपण समजूं. एका गांवांतील शेतकरी, कोष्टी, तेली, माळी, न्हावी, चांभार, शिंपी, धोबी हे सर्वजण स्वतांसाठीं व एकमेकांसाठीं आपापल्या श्रमानें वस्तु निर्माण करतात अथवा सेवा करतात. मूल्य ( व्हॅल्यू ) म्हणजे श्रमनिर्मित अशा उपयुक्त वस्तु व सेवा या ठिकाणीं सर्व गांवकऱ्यांचें एकूण मूल्य सर्वांच्या चरितार्थापुरतेंच उत्पन्न होतें असें आपण समजूं. याला 'चरितार्थापुरतें

मूल्य’ म्हणजे सबिसस्टन्स व्हॅल्यू म्हणतात. आतां आपण दुसरें एक उदाहरण घेऊं. ताजमहाल बांधणारे मजूर आणि तेथेंच जवळपास खेड्यांत राहणारे शेतकरी, कोष्टी, तेली, माळी, न्हावी, चांभार, शिंपी, धोबी यांचा संबंध कसा आहे? शेतकरी, कोष्टी, तेली, माळी, न्हावी, चांभार, शिंपी, धोबी, हे आपापल्या श्रमफलाचा विनिमय करून जगतात. सर्व मिळून सर्वांचें चरितार्थमूल्य निर्माण करतात. पण ताजमहालशेजारच्या खेड्यांतील खेडुतांना सर्वांच्या श्रमांनीं परस्परांचा सांभाळ करून शिवाय ताजमहाल बांधणारांचा सांभाळ करावा लागे. उलट ताजमहाल बांधणारांचें श्रमफल खेडुतांना कांहींच मिळत नसे. म्हणजे ताजमहाल बांधणाऱ्यांना गांवकरी जे श्रमफल देत तें त्यांच्या चरितार्थमूल्याहून अधिक असे. हीच सर्प्लस व्हॅल्यु अथवा वाढावा.

म्हणजे कसें? मूल्याचें उत्पादन व मूल्याचा उपभोग हीं आर्थिक व्यवहाराचीं दोन टोकें आहेत. उपभोगास म्हणजे उपयोगास कमींत कमी जेवढें मूल्य लागतें तेवढें जर उत्पन्न करता आलें नाहीं तर मानव जात खंगून खंगून मरून जाईल. म्हणून जें उपभोगायचें तेवढें तरी परत उत्पन्न करण्याची शक्ति त्या उपभोक्त्यांना म्हणजे उत्पादकांना हवी. ही कमींत कमी चरितार्थमूल्य निर्माण करण्याचीं शक्ति जेवढ्या मूल्याच्या उपभोगानें येतें तेवढें मूल्य हें चरितार्थमूल्य होय. इतकें कमींत कमी मूल्य निर्माण करण्याची शक्ति मानवजातींत असतें तोंवर मानवजात कशी-बशी जगूं शकते. पण विद्या, कला, संस्कृति यांची वाढ होण्यास विद्या, कला, या कामीं आपले श्रम अहोरात्र खर्चणारांचा चरितार्थ इतर उपभोग्य धन निर्माण करणारांनीं आपल्या श्रमानें चालवावा लागतो. म्हणजे या श्रमकारी लोकांच्या अंगीं स्वतांच्या चरितार्थास लागणाऱ्या मूल्याहून अधिक मूल्य निर्माण करण्याची शक्ति यावी लागते व ती त्यांनीं वापरावी लागते. शिकार, शेती, हस्तव्यवसाय यांचीं हत्यारें व पद्धति यांत सुधारणा उत्तरोत्तर होत गेली व श्रमकारी वर्गांना आपल्या गरजेपेक्षां अधिक मूल्य निर्माण करतां येऊं लागलें. हें अधिक मूल्य (वाढावा) इतर वर्गांनीं श्रमकारी वर्गांकडून हिरावून घेतलें व त्यामुळें जगांत विद्या, कला, संस्कृति यांचा प्रसार झाला. अर्थात् त्यामुळें एकंदर समाजाचा फायदाच झाला हा भाग

निराळा. येथें फक्त वाढाव्याचें म्हणजे सर्प्लस व्हॅल्यूचें अस्तित्व सिद्ध करणें एवढाच आपला हेतु आहे.

एकादें कुटुंब म्हणजे नवराबायको, दोन, तीन लहान मुलें व श्रम करूं न शकणारीं वृध्द मातापितरें एवढें असूं शकेल. या कुटुम्बांतील नवराबायको हीं स्वतांच्या श्रमांनीं स्वतांचा सांभाळ करून वृद्धांचा व मुलांचाही सांभाळ करतात. मग वृद्धांच्या व मुलांच्या सांभाळासाठीं जें मूल्य तीं दोघे खर्च करतात तें वाढावामूल्य म्हणावें काय? नाहीं. या नवराबायकोंचा सांभाळ त्यांच्या लहानपणीं वृद्धांनीं आपल्या तरुणपणीं केलेला असतो. व आजचीं मुलें या नवराबायकोंच्या वृद्धपणीं त्यांचा सांभाळ करणार आहेत. म्हणजे तीन पिढ्यांत ही देवघेव होते व अखेर सर्वजण सर्वांच्या चरितार्थापुरतेंच मूल्य म्हणजे ( सब्सिस्टन्स व्हॅल्यूच ) निर्मितात.

समाजाच्या रक्षणास राज्यसंस्थेची गरज भासूं लागली म्हणजे राज्यकारभार हाही चरितार्थमूल्य उत्पन्न करण्यास उपयोगी असा व्यवसाय मानावा लागतो. उत्तरोत्तर चरितार्थमूल्याहून अधिक मूल्य म्हणजे वाढावा निर्मिण्याची शक्ति श्रमकर्त्यावर्गांत निर्माण होत असते. यंत्रें व शास्त्रें यांचा उत्पादनाचे कामीं उपयोग होवूं लागला म्हणजे चरितार्थमूल्याहून अधिक मूल्य म्हणजे वाढावा निर्मिण्याचें सामर्थ्य माणसाचे अंगीं येतेंच. हा वाढावा समाजानें एकंदर समाजाच्या उन्नतीसाठीं वापरीत राहाणें हें समाजवादाचें वैशिष्ट्य होय. भांडवलशाहीचें वैशिष्ट्य असें कीं हा वाढावा उत्तरोत्तर भांडवलाच्या मालकांच्याच मालकींत येतो. त्याचा परिणाम भांडवलाच्या अधिकाधिक वाढींत होत असतो. आतां भांडवलशाहीची ही वाढ होत असतां तिचीं कोणकोणतीं लक्षणें दिसून येतात हे पाहायचें.

वाढाव्यालाच यापूर्वी स्थूलमानानें नफा म्हटलें आहे. येथें त्यांतल विशिष्ट भेद ध्यानांत घेऊं. भांडवलदार आपल्या नफ्याचा हिशेब करतांना कच्चा माल व यंत्रें वगैरेंची झीज यांची किंमत आकारतो, मजुरांची मजूरी आकारतो, जागाभाडें आकारतो आणि शेवटीं भांडवलाचें व्याज आकारतो. याहून अधिक राहील तो त्याचा नफा.

वाढावा जो मिळतो. तो मजुरापासूनच मिळतो. असें मानण्याला विशेष कारण आहे. जागेचें जास्तींत जास्त वापराचें भाडें देऊन

टाकलेलें असतें. त्याचें मूल्य मालांत उतरतें. कच्चा माल जो वापरला तो मालांत उतरतो. यंत्राच्या झिजेचें मूल्य मालांत उतरतें. रोज ६ तास काम एका मजुरानें केल्यास त्याच्या मजुरीचें मूल्य भांडवलदारास मिळतें असें आपण समजूं. पण मजूर हा सर्व दिवसासाठीं भाड्यानें घेतलेला असतो. ६ तासानंतर आणखी ४ तासपर्यंत मजुरास कामावर ठेवल्यास त्याचा काय परिणाम होईल ? पुन्हा कच्चा माल खपेल, यंत्र झिजेल. पण मजुराच्या मजुरीचें मूल्य आधींच वसूल झालें असल्यानें या ४ तासांतील मजुराचें श्रमफल मात्र भांडवलदारास मोफत मिळेल. हाच त्याचा वाढावा. तो अशा प्रकारें मजुराकडून मिळतो.

उत्पादनसाधनांत क्रांति व त्यायोगें माणसाच्या धनोत्पादनसामर्थ्यांत अफाट वाढ हें भांडवलशाहीचें ठळक लक्षण असतें. वाढावा हा मजुरांच्या श्रमफलांतून मिळतो ही गोष्ट भांडवलदारास महत्त्वाची असते. म्हणून मजुरीचें मूल्य वसूल करण्यांत कमींत कमी उत्पादनवेळ खर्च झाला आणि एकूण उत्पादनवेळ जास्तींत जास्त झाला म्हणजे मजुराचे मोफत श्रम जास्तींत जास्त वेळ होतात व वाढवाही जास्तींत जास्त मिळतो. म्हणून मजुराची मजुरी कमींत कमी ठरली पाहिजे. मजूरमजुरांतील चढाओढीचा फायदा घेऊन भांडवलदार मजुरांची मजुरी कमी करीत असतो. पण भांडवलशाही उत्पादनाचें क्षेत्र, अनेक भांडवलदार त्या क्षेत्रांत उतरल्यामुळें वाढत जातें. यामुळें मजुरांचा तुटवडा पडूं लागतो अथवा मजूर हे आपसांतील चढाओढ थांबवून संघटना करतात. यामुळें ही मजुरांची मजुरी वाढते. या वाढीस आळा घालण्यासाठीं मजुरांच्या मजुरीहून कमी खर्च लागेल अशीं यंत्रें भांडवलदार वापरूं लागतो, उत्पादनाच्या पध्दति अधिकाधिक शास्त्रशुद्ध व कार्यक्षम करतो. यामुळें साहाजिकच मानव जातीचें उत्पादनसामर्थ्य वाढत जातें. जुन्या जगाचें स्वरूप यामुळें पूर्णपणें बदलतें. हजारों लाखों माणसें काम करीत असणारे कारखाने व त्यांचीं शहरें निर्माण होतात. आगगाड्या, मोटारी, विमानें यांनीं लहानलहान मुलूख जोडले जातात. सारें जग एक होत जातें. या सर्व अवाढव्य घडामोडीचा उगम मजुरांची मजुरी वाढूं लागली कीं तिला आळा घालण्यासाठीं भांडवलदार मजुरांच्या मजुरीहून कमी खर्चाचीं यंत्रें काढून तीं वापरूं लागतो त्यांत असते.

मजूरांची निरंतरची बेकारी हाही या यंत्रोपयोगाचा एक परिणाम असतो. कारण मजूरीचे दर कमींत कमी असे राहण्याशाठीं मजूरांचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक असणें जरूर असतें. ज्यावेळीं हा पुरवठा कमी पडतो त्यावेळीं भांडवलदार हा नवें यंत्र काढून अथवा उत्पादनपद्धति सुधारून मजूरांची गरज कमी करतो. यामुळें पुन्हां मजूरांचा पुरवठा मागणीपेक्षां जास्त होतो, व कांहीं मजूर बेकार राहिल्यामुळें बाकीच्यांचे मजूरीचे दर कमी होतात. येथें हें लक्षांत येईल कीं बेकारीचा हा रोग भांडवलशाहीच्या अंगभूतच असून तो तिच्याबरोबरच तिच्या सर्व आयुष्यभर वाढत असतो.

माणसाची धनोत्पादनक्षमता भांडवलशाहीमुळें अतोनात वाढते याचाच अर्थ सुखाचीं, हिताचीं, सुसंस्कृतिवर्धनाचीं साधनें भांडवलशाहींत खूप वाढतात. म्हणून माणसाचें सुखही भांडवलशाहींत अतोनात वाढलें असेल असें आपण मानतों व भांडवलशाहींत एकंदर जनतेला सुखसाधनांचा लाभ झाला हेंहि खरें आहे. पण मानव जातीवर हालअपेष्टांचाही कहर या भांडवलशाहीनें ओढवला आहे. भांडवलशाहीनें उत्पादनपद्धतींत सुधारणा करून आपला माल सुबक व स्वस्त केला यामुळें जुन्या धंदेवाल्याचे धंदे बुडून ते देशोधडीस लागले. बेकारीचें दुःख त्यांना मनस्वी भोगावें लागलें. कारखान्याच्या नव्या जीवनांत त्यांना अमानुष वागणूक सहन करावी लागली. मजूरामजूरांतील चढाओढीमुळें बेकारी, दारिद्र्य व दुस्थिति त्यांना भोगावी लागली. पुढें यंत्राशींही त्यांना चढाओढ करावी लागली. यामुळें बेकारीचा धाक नेहमीं कायमच राहिला. नवी संस्कृति अशी कांहींच न मिळतां सदा काळजीचें, अनिश्चित रोजगारीचें, कोंदट राहणीचें, देशांतराचें जविन बहुसंख्य समाजास मिळत गेलें.

धनोत्पादन कार्याची संघटना हेंही भांडवलशाहीचें वैशिष्ट्य होय. दहा दहा, वीसवीस हजार कामगार एका श्रमगृहांत पद्धतशीरपणें घड्याळाच्या ठोक्यासारखें नियमितपणें काम करूं लागले. देखरेखीची गरज उत्तरोत्तर अतीशय कमी झाली. एकेका उत्पादनगृहांत हा सुयंत्रपणा आला तथापि भांडवलदारभांडवलदारांत चढाओढ होवू लागून तेथें अराजक माजलें.

मोठा मासा लहान माशास खातो या प्रकारास मात्स्यन्याय म्हणजे अराजक अथवा बेबंदशाही म्हणतात. तसा प्रकार भांडवलशाही उत्पादनाचे बाबतींत होवूं लागला. मोठ्या धंदेवाल्याशीं चढाओढींत लहान लहान धंदेवाले उत्तरोत्तर ठार होत गेले. हे मोठे त्यांच्यापेक्षा अधिक मोठयाकडून खाल्ले गेले. हा प्रकार म्हणजे अत्यंत क्रूर अशीं हीं आर्थिक युद्धेंच असत. समाजांत गरजेहून अधिक माल निर्माण होतो, तो स्वस्तांत स्वस्त पडून बाजारात चढाओढींत खपावा म्हणून मजूरांना कमी मजूरीवर जास्तींत जास्त चिपाडून घेण्यांत येते, प्रसंगीं नुकसान सोसूनही माल विकण्याची चढाओढ चालते, अखेर कितीतरी मालाची नासधूस होते; कापसाचा भाव उतरूं नये यासाठीं अमेरिकेंत कापसाचीं शेतें उभ्या पिकानिशीं नांगरून टाकण्यांत आलीं. १९२९ सालीं कोट्यवधि डॉलर भांडवलाची नासाडी होऊन लक्षावधि लोक ठार बुडाले. त्यानंतर बेकारी व संपत्तीचा विध्वंस यांचा वणवा जगभर पेटला.त्यामुळें झालेलें नुकसान हल्लींच्या महायुद्धाइतकें खास झालें असेल एवढेंच नव्हे तर त्या आर्थिक मंदींतूनच हें महायुद्ध उद्भवलें आहे. असो. सांगण्याचा मुद्दा असा कीं भांडवलशाहीच्या विकास-क्रमांत मजूरांच्या श्रमगृहांत उत्पादनसंघटना उत्तम प्रकारें व जलद वाढत असतां तितक्याच भयंकरपणें व जलद सगळ्या आर्थिक जगांत बेबंदशाही, कलह व विध्वंस माजत राहतात.

भांडवलशाहीचीं वर्तुळें वाढता वाढता अखेर जग व्यापतात व पुढें बेकारी कायम राहून धंदा चालू राहणें व नफा मिळणें अशक्य होतें. भांडवलशाहीची वाढ होता होता हा तिचा मृत्यु घडतो असाच याचा अर्थ होय. कारण नफा हाच भांडवलशाहीचा प्राण होय. भांडवलशाहीचा हा मृत्यु अपरिहार्य असून त्याची अपरिहार्यता दुसऱ्याही एका प्रकाराने दाखविता येते. नुकतेच आपण पाहिलें कीं मजूरांचा पुरवठा कमी पडूं लागून मजूरीचे दर वाढूं लागले कीं मजूरीच्या खर्चापेक्षां कमी खर्चांत काम करणारीं यंत्रें भांडवलदार शोधून काढतात. त्यामुळें मजूरांची संख्या कमी करता येते व मजुरांची कार्यक्षमताही वाढते. आपल्या मजूरीइतकें मूल्य निर्माण करण्यास मजूर पूर्वी जितका वेळ खपत होता त्यापेक्षा कमी वेळांत तो आपल्या मजूरीइतकें मूल्य निर्माण

करूं शकतो. यामुळें भांडवलदारासाठीं करावयाच्या मोफत श्रमाचा वेळ वाढतो. पण उलट मजूरांची संख्या कमी होते. यामुळें भांडवलदारासाठीं राबले जाणारे सर्व माणसांचे एकूण तास कमी होतात. मजूरांची उत्पादनशक्ति वाढत जाते खरी, पण एकूण भांडवलांत मजूरीचा खर्च अतीशय कमी होतो. कारण मजूर कमी लागावे यासाठीं यंत्रसामुग्रीवर खर्च फार होतो. यंत्रसामुग्री, कच्चा माल वगैरे हें भांडवल स्थिर (कॉन्स्टंट) स्वरूपाचें असतें. याचा अर्थ असा कीं त्याचें मूल्य मालाच्या स्वरूपांत जितकेंच्या तितकें अवतरतें. मजूरास दिलेली मजूरी ही मात्र वाढावा देणारें भांडवल असतें. कारण मजूराच्या चरिता॰र्थास लागणारें मूल्य निर्माण करण्याइतका वेळ मजूर राबला म्हणजे त्याची मजूरी वसूल होते. उत्पादनाच्या आणखी अधिक वेळांत यंत्रें, कच्चा माल वगैरे पुन्हा खर्चावा लागतो. मजूर मात्र मोफत वापरता येतो. पण यंत्रांत गुंतलेल्या भांडवलाच्या प्रमाणांत आतां मजूरीतलें भांडवल इतकें प्रचंड प्रमाणांत कमी होतें कीं मजूराची उत्पादनशक्ति कितीही वाढली तरी एकंदरीनें भांडवलाच्या प्रमाणांत नफ्याचें प्रमाण कमी कमी होतें. भांडवलशाहीच्या विकासक्रमांत अशा प्रकारें नफ्याचा दर कमी होत जातो. नफा व वाढावा यांतला आणखी एक महत्त्वाचा फरक येथें लक्षांत घेणें जरूर आहे. वाढावा हा फक्त मजूरच निर्माण करतात असें आतांच सांगितलें आहे. त्यांची उत्पादनशक्ति वाढत जाते याचा अर्थ त्यांचा वाढावा काढण्याचा वेग व प्रमाण वाढत असतें. पण नफा हा सर्व भांडवलावर आकारला जातो. त्याचें एकूण भांडवलाशीं प्रमाण कमी होत जातें. पण एकूण उत्पन्नधनाचें परिमाण वाढत जात असतें. समाजवादी समाजघटना उभारण्याचे दृष्टीनें हा मुद्दा फार महत्वाचा आहे.

समाजवादी समाजघटना निर्मिणाऱ्याच्या दृष्टीनें आणखी एक वैशिष्ट्य भांडवलशाहीच्या अंगीं असल्याचें दिसून येतें. नफ्याच्या ईर्ष्येनें भांडवलशाहीच्या आरंभकाळीं भांडवलदार हा धनोत्पादनाचे प्रयत्न निकरानें करतो आणि म्हणून धनोत्पादनसाधनांची मालकी त्याच्याकडेच ठेवणें त्यावेळीं जरूर होतें. त्याच्या नफ्याच्या आंचेनें त्यानें जी भांडवलशाहीची वाढ केली त्यामुळें माणसाचें धनोत्पादनसामर्थ्य वाढलें इतकेंच नव्हे तर उत्पा-

दनाच्या कार्यांत आखीवपणा, नेमकेपणा, वक्तशीरपणा, सारखेपणा इतका आला आहे कीं कामाची तपासणी व देखरेख हें एक शास्त्रच बनलें असून आतां नफ्याच्या आंचेनें नव्हे तर नक्त पगारी तज्ज्ञ देखरेख्यामार्फत उत्पादनाचें कार्य हजारों कामगारांकडून अगदीं यंत्रासारखें करून घेता येतें. शास्त्र, यंत्र व मानवी कर्तृत्व यांची इतकी प्रगति झाली असल्यानें आतां खाजगी मालकी रद्द केली तरी समाजाकडून समाजासाठीं उत्पादन करविणें व नफा होईल तो परत समाजानें वापरणें सहज शक्य झालें आहे. भांडवलशाही पद्धति आतां चालूच शकत नाहीं. नफ्याच्या दराची घट होवूं लागली कीं भांडवलशाही पद्धतीवर एकामागून एक संकटें येऊं लागतात. भांडवलाचें केन्द्रीकरण सुरू होतें, मोठे भांडवलदार लहान भांडवलदारांना खाऊन टाकतात व त्यांच्याहून मोठे असतात ते या मोठ्यांना खातात. यामुळें भांडवलशाहीचें जीवन संकटमय होतें, म्हणून भांडवलशाही पद्धतीचें म्हणजे नफापद्धतीचें उत्पादन म्हणजे धनोत्पादनसाधनांची खाजगी मालकी कायम ठेवून करावयाचें उत्पादन थांबविणेंच अवश्य ठरतें. पण उत्पादनसाधनांची व उत्पादक मजुरांची कार्यक्षमता वर सांगितल्याप्रमाणें वाढली असल्यानें समाजवादी उत्पादनपद्धति सुरू करणेंही आतां शक्य झालें आहे. भांडवशाहीच्या विकासाचीच ही फलश्रुति होय.

# 'माझा मार्क्सवाद!'

( मी मार्क्सवादी कसा झालों, माझ्या मतें मार्क्सवादाचें स्वरूप काय हें या लेखात मीं संक्षेपानें सांगितलें आहे. )

"मार्क्सवाद ही शास्त्रशुद्ध विचारसरणी आहे" असें मीं एकदां लिहिलें. तेव्हां एका माजी मार्क्सवादी पंडितानें हें विधान सिद्ध करा असें मला आव्हान दिलें. मी तें आव्हान स्वीकारलें नाहीं. मार्क्सवादासंबंधानें प्रसंगोपात्त मीं थोडें फार लिहिलें आहे. ज्यांना माझ्या मताचा खुलासा हवा आहे त्यांना तें माझें लेखन वाचून शक्य तो खुलासा मिळूं शकेल. त्यासंबंधानें कोणास कांहीं शंका असली तर तिचें निराकरण करण्याचा प्रयत्न मी कांहींसा करूं शकेन. पण वादाचें आव्हान स्वीकारून रणांगण जिंकण्यानें अमुक मतवाद खरा हें सिद्ध होतें असें मला वाटत नाहीं. द्वंद्वयुद्धांत जो विजयी होईल त्याची बौद्धिक व नैतिक बाजू सत्याची आहे हें म्हणणें जसें आतां रानटीपणाचें मानलें जातें त्याचप्रमाणें बौद्धिक वादयुद्ध करून प्रतिपक्षास चीत करण्यानें आपली बाजू सत्य ठरतो हेंही आतां चूक मानलें पाहिजे. शारीरिक द्वंद्वयुद्धांत प्रतिपक्षी चीत झाला हें प्रत्यक्ष व्यवहारांत सिद्ध तरी होऊं शकतो. पण बौद्धिक द्वंद्वयुद्धांत हें सिद्ध कसें करणार ? त्याचा त्यानें पराभव कबूल न केला तर पराभव ठरणार कसा ? शाळांतील विद्यार्थ्यांत वक्तृत्वाच्या चढाओढींत जयापजय ठरविण्यास पंच नेमतात. पार्लमेंटांतील वादविवादांचे जयापजय बहुमताच्या पाठिंब्यानें ठरतात. पण विचाराचें सत्यसंशोधन या दोनही पद्धतींनें होऊं शकणार नाहीं. वादांत अहंकारास पडलेला माणूस प्रतिपक्षाची भूमिका समजून घेण्याचें टाळतो, किंवा मुद्दाम त्या भूमिकेचा विपर्यास करतो अथवा आडमुठेपणा पत्करून व अडाणी लोकमताच्या तारेवर बोटें नाचवून लोकमत आपल्याकडे ओढून घेतो. केव्हां केव्हां स्वतःचें खरें न

प्रामाणिक मतही एकाद्या लेखकास बौद्धिक अपात्रतेमुळें अथवा अपुरे-पणामुळें प्रतिपक्षास निरुत्तर करतां येईल इतकें बिनतोडपणें मांडतां येत नाहीं. अशा वेळीं आपली भूमिका समजून देतां यावी यासाठीं तो कोणाचें बौद्धिक साहाय्य घेण्यास जाईल तर चोहोंकडे अंधानुयायी, अंधविरोधक मत्सरी वावदूक, फक्त जिंकूं पाहणारे वादयोद्धे, उपेक्षेनें ठार करूं पहाणारे बौद्धिक महंत अथवा आपल्या गगनभेदी आवाजानें प्रतिपक्षाचा विध्वंस करूं पाहणारे बौद्धिक दहशतवादी यांचाच कोलाहल माजला असल्यानें सत्यसंशोधक बुद्धी गांगरून जाऊन व्याकूळ होते.

बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवस्मयदूषिताः ।
अबोधोपहताश्चान्ये जीर्णमंगे सुभाषितम् ॥

[ बुद्धिमान मत्सरानें ग्रासलेले आहेत, सामर्थ्यवंतांचे ठिकाणीं गर्विष्ठपणाचा दोष उत्पन्न झाला आहे, बाकीचे मूर्ख आहेत; माझे चांगले विचार माझ्या ठिकाणींच जिरून जातात. ] असें भर्तृहरीनें चिडून जाऊन म्हटलें आहे, त्याचा अनुभव प्रत्यहीं येतो.

⁂ ⁂ ⁂

शिवाय उपलब्ध सर्व साधनसामुग्रीचा उपयोग करूनच एकादें मत बन-विणें हें योग्य असलें तरी तें कालस्थलाच्या विशिष्ट मर्यादेंत शक्यही नसतें. मी स्टालिनच्या समाजव्यवस्थाविषयक मतासंबंधानें आणि त्याच्या पर-राष्ट्रीय धोरणासंबंधानें बराच अनुकूल आहे. "तुम्ही लुई फिशरचा अमुक एक ग्रंथ वाचल्यावांचून स्टालिनबद्दल अनुकूल मत बनवितां कामा नये" अशी ताकीद जेव्हां माझे कांहीं मित्र मला देतात तेव्हां मी तें साफ नाका-रतों. मीं जरूर वाटलें व शक्य झालें तितकें वाचलेलें साहित्य आणि सम-जून घेतलेले विचार यावरून स्टालिनबद्दल माझें मत मीं बनविलें असून तें मला योग्य वाटतें असें माझें उत्तर आहे. सर्व वाङ्मय वाचून मत बनवा-यचें याचा अतिरेकी अर्थ लावला तर वाचण्यांतच सर्व हयात जाऊन मत

बनवायला कालच राहणार नाहीं. शिवाय लुई फिशर कितीही हुशार असला तरी त्याला मार्क्स व लेनिन यांनीं मांडलेलीं क्रांतितत्त्वें समजलीं नाहींत अथवा उत्तम शब्दचित्रें लिहिणाऱ्या या लेखकाला तत्त्वविचार समजून घेण्याइतका वेळही कधीं मिळालेला नाहीं असें 'लेनिन्स रशिया' आणि 'स्टालिन्स रशिया' हीं फिशरचीं दोन छोटीं पुस्तकें वाचून माझें मत झालें आहे. 'लेबर, थिअरी ऑफ व्हॅल्यू' आणि 'सर्प्लस व्हॅल्यू' हे सिद्धांत कळल्यावांचून लेनिनच्या आर्थिक पुनर्घटनेला चांगलें म्हणणें आणि स्टालिनच्या पुनर्घटनेला वाईट म्हणणें हें दोन्ही अडाणीपणाचें आहे. ट्रॉट्स्कीला मार्क्स व लेनिन यांचीं तत्त्वें माहीत होतीं. पण त्यांना त्यानें वेदप्रामाण्य दिलें व कोणत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नाजूक परिस्थितींत स्टालिन पुनर्घटना करीत होता याचें पुरेसें आकलन त्याला झालें नाहीं ही गोष्ट ट्रॉट्स्कीचें 'रेव्होल्यूशन बिट्रेड' हें पुस्तक वाचून माझ्या लक्षांत आली. वेब- पतिपत्नींनीं लिहिलेलें 'न्यू सिव्हिलिझेशन' हें पुस्तक वाचल्यानें सोव्हिअट रशिया ही लोकशाही आहे हें पटतेंच. कारण लोकशाहीची आपली जुनी कल्पनाच बदलते आणि लोकस्वातंत्र्याचा नवा निकष आपणाला मिळतो. 'मॅनेजेरिअल रेव्होल्यूशन' या ग्रंथाचा लेखक बर्नाम याला जनतेच्या सामुदायिक कर्तृत्वाचें व जाणीवेचें सामर्थ्य गिऱ्हाइकांच्या व कामगारांच्या संघटनेंतून निर्माण होतें व हें नव्या लोकशाहीचें सार होय हा मुद्दा कळलेलाच नाहीं यामुळें त्याच्या विद्वत्ताप्रचुर ग्रंथांत सर्व घोटाळा झाला आहे. स्टालिननें माणसें मारलेलीं दिसतात, पण बोल्शेव्हिक क्रांतीच्या मार्गें झारशाही, प्रतिक्रांति आणि वर्षानुवर्षे छळ पावल्यामुळें कोणत्याही विधायक कार्यास अपात्र स्वभाव बनलेले शब्दप्रामाण्यवादी व क्रूर असे अनेक बोल्शेव्हिक, ही सर्व परंपरा लक्षांत घेतली असतां क्रिया–प्रतिक्रियात्मक रक्तपात तेथें झाला हें स्वाभाविक वाटतें. सारांश मूलतत्त्वांचें ज्ञान व योग्य विचार पद्धति यांच्या साह्यानें इतिहासज्ञान यथार्थ होतें. नुसतीं ढीगभर पुस्तकें वाचल्यानें अथवा अहंकारयुक्त वितंडवादानें ज्ञान होत नाहीं. एकमेकांच्या भूमिका समजून घेणें देणें हें अवश्य आहेच. पण वादांत वितंडा केव्हां

येईल याचा नेम नसतो. म्हणून चर्चा करावी पण वादांत पडूं नये असें माझें मत आहे.

मी स्वतःला मार्क्सवादी म्हणतों; पण ही गोष्ट माझ्या अनेक मित्रांना मान्य नाहीं. मार्क्सवाद म्हणजे काय यासंबंधानें मार्क्सवाद्यांतही एकवाक्यता नाहीं. आणि मार्क्सवाद नांवाचें शब्दप्रमाणशास्त्र आहे ही गोष्ट मार्क्सनेंही नाकारली आहे. ‘ आय् ॲम् नॉट् ए मार्क्सिस्ट ’ असें मार्क्स केव्हां तरी म्हणाला अशी आख्यायिका आहे. अशा सर्व परिस्थितींत मार्क्सवाद शास्त्रशुद्ध आहे हें सिद्ध करण्याचा वावदूकी प्रयत्न करणेंच अयुक्त आहे. पण वर मीं म्हटल्याप्रमाणें चर्चा व्हावी आणि विचाराला लोकांना विषय द्यावा हें मला योग्य वाटतें. म्हणून मी मार्क्सवाद कशाला म्हणतों हें येथें सांगणार आहें. येथवर प्रस्तावनाच इतकी झाली कीं, पुढला विषय त्या मानानें लहान ठरेल; पण वावदूकांच्या तडाख्यांतून जिवंत राहिलों तरच कांहीं तरी बोलतां येईल म्हणून एवढी पूर्वतयारी हवीच होती.

× × ×

मी मार्क्सवादी कसा झालों याची एक लहानशी कथा आहे. भगवद्गीतेचा अभ्यास करीत असतां आत्मा स्वतंत्र आहे कीं प्रकृतिबद्ध आहे यासंबंधीं मी नित्य विचार करीत असें. प्रो. वा. म. जोशी यांच्या ‘नीतिशास्त्र प्रवेश ’ या ग्रंथांत या वादाची चर्चा बरीच चांगली आली आहे. आत्मा अगदीं नव्याण्णव टक्केपर्यंत प्रकृतिबद्ध असेल, पण निदान एक टक्का तरी स्वतंत्र आहे असा त्यांनीं आग्रह धरला असल्याचें मला आठवतें. पण वामनरावांचा हा हिशेब मला आवडला नाहीं. आत्मा पूर्ण बद्ध असावा ही गोष्ट वामनरावांना पटत नाहीं अथवा आवडत नाहीं असें दिसतें. आत्मा स्वतंत्र—थोडा तरी स्वतंत्र असला पाहिजे असें त्यांना हवें होतें. पण मला या आत्म्याच्या स्वातंत्र्यांत धोका वाटे. आत्मा हा कांहीं मर्यादेपुरता जरी लहरी असला तरी लहरी राजाप्रमाणें त्याच्या वर्तनांत धोका आहे असें मला वाटे. तेव्हां आत्म्याचें स्वातंत्र्य म्हणजे तरी काय याचा मी विचार करूं लागलों. मी आहें, मी स्वतंत्र आहें हें जें स्फुरण आहे तेंच स्वातंत्र्याचा पुरावा होय असें कांहीं पंडितांनीं म्हटलें आहे. हा पुरावा प्रत्येक शरीरांत स्फुरणाऱ्या जीवात्म्यासंबंधानें आहे. हें स्फुरण कसें होत

असावें अशा विचार करतां करतां मला एक दृष्टांत सुचला. सायकलच्या टायरमधील हवा आणि बाहेरची हवा या दोन्ही एकच असतात, पण सायकलच्या टायरमधील थोड्या जागेत अधिक हवा कोंडली जाऊन ती टायरवर दाब पाडते, तिचें अस्तित्व बाहेरच्या हवेहून पृथक आणि दाबयुक्त म्हणजे स्फुरणयुक्त म्हणजे अहंकारयुक्त होतें तसेंच जीवात्म्याचें स्फुरण असलें पाहिजे अशी कल्पना मला सुचली. प्रकृतीच्या शरीरसंपुटांत परमात्म्याचा जेवढा अंश सांपडतो तेवढा तो जीवात्मा होतो. त्याला ' मी आहें, मी स्वतंत्र आहे, इतर वस्तुजातापासून भिन्न आहे, ' हें जें स्फुरण होतें तें हवेला सायकलटायरच्या उपाधीमुळें येणाऱ्या पृथकत्वासारखें, प्रकृतीच्या उपाधीमुळें आलेलें आहे. म्हणजे हें पृथकत्व, हें स्वातंत्र्य, प्रकृतीच्या उपाधीनें नियंत्रित असें आहे. जीवात्म्याचें स्वातंत्र्यच नियंत्रित आहे. वामनराव जोशी यांनीं आत्म्याला जें एक टक्का स्वातंत्र्य दिलें तेंही त्याला नाहीं. या कल्पनेमुळें मला आनंद झाला. याचें विशेष कारण होतें. असें पारतंत्र्य अथवा नियंत्रितत्व ही गुलामगिरी नव्हे. गीतेंत 'प्रकृति' शब्द एका विशिष्ट अर्थानें योजलेला आहे. ज्याला इंग्रजींत कॉन्स्टिटय़ूशन, म्हणतात त्या अर्थी तो शब्द आहे. प्रकृति म्हणजे सृष्टीची कॉन्स्टिटय़ूशन, सृष्टीचे कायदे. परमात्मा स्वतंत्र असतो कीं नियंत्रित असतो या प्रश्नास अर्थच नाहीं. परमात्मा निर्गुण आणि निराकार आहे.

'पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ॥
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

असा तो सर्वव्यापी आहे. विरल हवा जशी दृग्गोचर नसते तसा हा परमात्मा कोणत्याही इंद्रियांना ' चर ' नसतो, मुळींच गोचर नसतो. किंबहुना प्रकृतिरूपानेंच तो गोचर होतो व या प्रकृतीच्या उपाधींत शिरून जीवत्व पावतो. (प्रकृतिं स्वां अधिष्ठाय संभवाम्यात्ममायया) प्रकृति म्हणजे सृष्टिघटना. जीवात्मा हा प्रकृतिबद्ध असतो असें गीतेचेंही म्हणणें आहे. इंग्लंडचा राजा जसा कायद्यानें बद्ध असतो, मोटार हाकणारा ज्याप्रमाणें रस्त्याच्या डाव्या बाजूनें मोटारी चालविण्याच्या कायद्यानें बद्ध असतो, पण या बद्धतेमुळेंच समाजास

खरखुरें स्वातंत्र्य मिळूं शकते त्यामुळें जीवात्मा प्रकृतिबद्ध असला तरी त्यांतूनच सर्व जीवात्म्यांचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतां येईल. यासाठीं प्रकृतीचें स्वरूप, सृष्टीचे गुणधर्म समजून घेतले पाहिजेत; म्हणजे त्यांचा अवलंब करून समाज सुखी व उन्नत करतां येईल. लहरी राजा आणि लहरी मोटारवाला यामुळें समाजावर अनर्थ ओढवतो आणि लहरी जीवात्म्यामुळेंही तो ओढवूं शकेल. उलट राजा व मोटारवाला नियमबद्ध झाले तर त्यामुळें समाजाचें सुख व हित वाढेल जीवात्माही नियमबद्ध असेल तर अनेक जीवात्म्यांचें सुख व हित वाढेल. तसेंच अनेक, अनंत जीवात्मे लहरी आहेत असें ठरलें तर जगांत मनुष्य-कर्तृत्वास वाव मुळींच न राहून मनुष्य-जीवन हताश, निष्क्रिय, निरुत्साही होईल. पण जीवात्मे प्रकृतिबद्ध आहेत असें ठरलें अथवा मानलें तर प्रकृतीचे नियम, सृष्टीचे गुणधर्म शोधून काढून त्यांच्या आधारानें जीवात्म्याची उन्नति करून घेतां येईल. म्हणून जीवात्माही बद्ध आहे असें मला पटलें, तेव्हां मला फार आनंद झाला. माझ्या विचाराचें हें जें आंदोलन मीं वर दिलें आहे ती मागून आतां सुचलेली कल्पना नव्हे. १९२५ सालीं गीतेवर बक्षिसासाठीं निबंध मागविलेले होते त्यावेळीं मीं गीतेवर निबंध लिहिला. मला बक्षिस मिळालें नाहीं. पण पुढें दोन वर्षांनीं 'गीतातत्त्वांजली' या नांवानें तो निबंध मीं छापून काढला. त्याच्या शेवटच्या प्रकरणांत मीं वरील सर्व विचार तपशीलानें मांडला आहे. त्या वेळीं मला समाजवादांतलें कांहींहि कळत नव्हतें अथवा मीं कांहींही वाचलें वा ऐकलें नव्हतें. वरील विचारामुळेंच मी समाजवादाकडे वळलों. वेदान्ताकडून समाजवादाकडे जाण्यास पुलासारखा उपयोग या विचाराचा मला झाला. तें कसें तें आतां सांगतों.

वरील विचारास नियतिवाद अथवा प्रकृतिवाद असें नांव देणें योग्य असून इंग्रजींत या विचाराला डिटर्मिनिझम् असें नांव आहे. प्रकृतीच्या बंधांतून पलीकडे जाऊन परमात्मस्वरूपांत विलीन होणें, मोक्ष पावणें हें वेदांताचें प्रतिपाद्य आहे. माझी अध्यात्मवादावर कधींच श्रद्धा बसली नाहीं. त्याची परिणति ढोंग अथवा मूर्खपणा अथवा हे

दोन्ही प्रकार यांत होते असें माझें तेव्हांपासून मत असून आजतागायत ते माझें मत कायम आहे. गीतेंत स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त व त्रिगुणातीत यांचीं जीं लक्षणें दिलीं आहेत तीं सर्व प्रकृतीच्या क्षेत्रांतील आहेत. दया, विनय, सुहृद्भाव, निर्वैर, अनासक्ति हे सर्व सद्गुण तद्विरुद्ध दुर्गुणाइतकेच प्रकृतींच्या क्षेत्रांतील आहेत. हे थोर गुण मानवजातींत वाढविण्याच्या प्रयत्नाहून अन्य व श्रेष्ठ कोणतेंही वेगळें ध्येय मानण्याचें कांहींच कारण नाहीं असें माझें मत बनलेलें आहे. हे गुण मानव जातींत वाढविण्याचें ध्येय साध्य करण्याचे मार्ग कोणते याचें चिंतन करीत असतां मुंबईच्या कम्युनिस्टांनीं प्रसिद्ध केलेलीं पाश्चात्य लेखकांचीं कम्युनिझम् वरील छोटीं छोटीं पत्रकें माझ्या हातीं लागलीं. ज्याला डायलेक्टिकल मटीरिऑलिझम् म्हणून आज आम्ही ओळखतों तो विचार त्यावेळीं माझ्या प्रथम वाचनांत आला व माझ्या मनाची त्यानें पकड घेतली. याचें कारण तो नियतिवादासारखा, प्रकृतिवादासारखा आहे हें माझ्या एकदम लक्षांत आलें. प्रकृतिवादापेक्षां तो श्रेष्ठ आहे हें कळण्यासहि वेळ लागला नाहीं. कारण मानव जातीची अमुक स्थिति कोणत्या कारणानें होते आणि तींत पालट कसा होतो, उन्नति कशी होते आणि या दृष्टीनें मनुष्ययत्न कसा असावा याचे नियम शोधून काढण्याचा विचार व त्यासाठीं निकराचा यत्न करण्याचा विचार म्हणजे कम्युनिस्टांचा मटीरिऑलिझम् हाच होय हें मला पटलें. त्याचें संशोधन आणि पुरस्कार करणारा कार्ल मार्क्स हा प्रकृतिवाद सांगणाऱ्या श्रीकृष्णासारखाच श्रेष्ठ आहे असें मला तेव्हां वाटलें व अजूनही वाटतें.

* * *

“ तुम्हांला डायलेक्टिकल मटीरिऑलिझम् पटतो का, पटत असल्यास चला मी तो नाशाबित करतों, तुम्ही शाबित करा, चला होऊं द्यात दोन हात ” असें आव्हान दंड थोपटून आणि तालमींतील माती आंगाला लावून जेव्हां एखादा वावदूक मला देतो तेव्हां माझी बोबडी वळते. हेगेल वाचल्यावांचून मला मार्क्स समजणार नाहीं इतकेंच नव्हे तर मार्क्स वाचण्याचा व समजून घेण्याचाही मला हक्क नाहीं असें या मित्रांचें म्हणणें

आहे. हेगेल समजण्याला ग्रीन, स्पिनोझा, कँट, हे वाचले पाहिजेत. त्याच्या मागें जाऊन ॲरिस्टॉट्ल वाचला पाहिजे. ही यादी सर्व म्हणजे फार आहे. माझ्या या मित्रांनीं ती मला ताकीदपूर्वक सांगितली तेव्हां " मि या जन्मांत यांतलें कांहींही वाचणार नाहीं, मला वेळ नाहीं " असें मी त्यांना स्पष्ट सांगितलें. पण वस्तुस्थिति अशी होती कीं हा सल्ला मला गेल्या चार वर्षांतच मिळाला. त्यापूर्वी मला मार्क्सवादाचीं मूलतत्त्वें कळलीं होतीं. माझा गीतेवरील निबंध मीं जावडेकरांना दाखविला आणि मार्क्सचा मटीरिआलिझम् मला कां आवडतो हें सांगितलें, तेव्हां त्यांनीं कोणत्याहि पांडित्याची अट अथवा दहशत न घालतां मार्क्सवादाची उपपत्ति मला सांगितली. अध्यात्मवादासंबंधानें माझा त्यांचा मतभेद आहे. पण तो बाजूस ठेऊन त्यांनीं माझें मार्गदर्शन केलें. सॅंशचे 'बेसिक प्रिन्सिपल्स ऑफ सायंटिफिक सॉशॅलिझम्' मार्क्सचा 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' वगैरे पुस्तकें मीं त्यांच्या सल्ल्यानें वाचलीं. पुढें माझें मी स्वतंत्रपणें वाचूं लागलों. विद्वत्तेनें न भेडसावतां अथवा मतभेदाचें घर्षण वाढूं न देतां अथवा सांप्रदायिक आग्रह न ठेवतां तत्त्वविचार शिकविण्यांत जावडेकरांसारखा गुरुजी महाराष्ट्रांत तरी नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. एका दिव्यानें दुसरा, तिसरा, चौथा असे अनेक दिवे पहिल्याचसारखे लागतात तसे जावडेकरांच्या शिकवणीचें होतें. असो. 'कॅपिट्ल'च्या पहिल्या खंडाचीं मीं अनेक पारायणें केलीं. गीतेवरील शांकरभाष्य 'लावण्या' साठीं मी एका काळीं तासचे तास बसत असे, तसाच कॅपिटलच्या पहिल्या सवाशें पानांपैकीं एकादें पान 'लावतांना' माझे पहाटेचे तासचे तास गेले व मी निराश झालों असें अनेकदां घडलें. पण अखेरीस तो अतिशय अवघड विषय मला समजला असें मला वाटतें. पुढें कॅपिटल्चा दुसरा व तिसरा खंड हे मी संक्षिप्त आवृत्त्यांतून अनेकदां वाचले. त्यांची समग्र मूळ संहिता मी जेमतेम दोनदांच वाचली आहे. अनेक ठिकाणीं ती तपशीलामुळें समजायला कठीण आहे. पण प्रमुख सिद्धांत संक्षिप्त आवृत्त्यांतून आले आहेत. स्ट्राचीचें 'नेचर ऑफ कॅपिटॅलिस्ट क्रायसिस' हें पुस्तक 'कॅपिटल्' ग्रंथ समजण्यास

उत्कृष्ट आहे. मी तें पुस्तक पाच सहा वेळ चांगलें वाचलें आहे. म्हणून आतां हेगेल, स्पिनोझा किंवा आणखी तसलें तत्त्वज्ञानात्मक कांहींही मी वाचणार नाहीं. शिडने हूकनें हेगेलचीं तत्त्वें आपल्या दोन उत्कृष्ट ग्रंथांत सांगितलीं आहेत तेवढें ज्ञान मला पुरे.

× × ×

'मटीरिॲलिझम्' हा शब्द 'मॅटर' म्हणजे पदार्थ यांपासून झालेला आहे. विशिष्ट गुणधर्म 'मॅटर' ला असतात व आत्म्याला अथवा ईश्वराला अशा गुणधर्मांचें बंधन नसतें ही कल्पना पौरस्त्याप्रमाणें पाश्चिमात्य धर्मविचारांतही रूढ आहे. युरोपांत अठराव्या शतकात जे स्वतांला मटीरिॲलिस्ट म्हणवीत ते फ्रेंच तत्त्ववेत्ते ईश्वर मानीत नसत; जग पदार्थधर्मांनीं जखडलें आहे व हे पदार्थधर्म बुद्धीनें समजून घेऊन आणि त्यांचें अवलंबन करून आपलें सुख व हित वाढविणें हें मानवजातीचें कर्तव्य होय असें ते मानीत. पण गोचर अथवा जड सृष्टीचे गुणधर्म काय आहेत आणि त्यांचा गति-स्थिति सिद्धांत काय आहे हें कळून आल्यावर ते जडधर्म अचल, अपरिहार्य व पुन्हा पुन्हा तेंच तेंच राहाटगाडगें चालविणारे आहेत असें फ्रेंच मटीरिॲलिस्टांच्या सिद्धांतापासून अनुमान निघालें. जगांतील दुःख हें अपरिहार्य आहे असा हा संदेश होता. दुःख नाहींसें करण्यासाठीं झगडावें कसें याचा उपाय शोधीत तळमळणाऱ्या मार्क्सला हा संदेश मानवला नाहीं. हेगेलनें फ्रेंच जडवाद्यांचा हा अपरिहार्यवाद बाजूस सारून माणसांची प्रगति होतेच होते हा क्रांतिवाद मांडला व तो मार्क्सनें स्वीकारला. पण मार्क्सला हेगेलचा भाववाद जसा नापसंत होता तसेंच थेसिस, ॲंटिथेसिस आणि सिंथेसिस हें त्याचें तिकाटणेंही मार्क्सला पसंत नसून 'पॉव्हर्टी ऑफ फिलॉसफी' या ग्रंथांत मार्क्सनें त्या परिभाषेचा उपहास केला आहे. कॅपिटलच्या बावीसशें पानांपैकीं पहिल्या खंडांतल्या एका पाच ओळींच्या परिच्छेदांत 'निगेशन,' 'निगेशन ऑफ दि निगेशन' वगैरे परिभाषा मार्क्सनें मांडली आहे. इतरत्र त्यानें या परिभाषेंत आपले सिद्धांत मांडल्याचें माझ्या ( अर्थात् अपुऱ्या ) वाचनांत मला आढळलें नाहीं.

डायलेक्टिक ऊर्फ विरोधविकास म्हणून जो सिद्धांत मार्क्सनें मांडला तो त्यानें हेगेलपासून बीजरूपानें घेतला, पण त्याची भौतिक मांडणी अगदीं स्वतंत्रपणें केली व आपल्या विचारसरणीला 'डायलेक्टिकल मटीरिअलिझम्' असें नांव दिलें. भौतिक सृष्टीत याचें एक फार उत्कृष्ट उदाहरण आहे. आहे. कोंबडीचें अंडें हें तें उदाहरण होय. अंड्याचें कवच आतल्या जीवाचें रक्षण, पोषण व संवर्धन करीत असतें व जीवाबरोबर स्वतांही वाढत असतें. होता होता एक वेळ अशी येते कीं कवचाची वाढ खुंटते. आंतील जीवाचें रक्षण, पोषण, संवर्धन करण्याची कवचाची शक्ति संपते. तें आतां आंतल्या जीवाचा कोंडमारा करते. मग कोंबडी तें कवच फोडते व जीवाची मुक्तत करून त्यांच्या विकासाचा रस्ता मोकळा करते. ज्या कवचानें जीवाचा एक वेळीं विकास होतो तेंच कवच पुढील एका वेळीं जीवाच्या विकासास विरोध करतें. मग हा विरोध मोडून काढून—कवच फोडून जीवाचा विकास करावा लागतो. या प्रक्रियेस भुस्कुटे यांनीं 'विरोधविकास' हे सुटसुटीत व अर्थपूर्ण नांव दिलें आणि मागाहून आम्ही सर्व लेखक तोच शब्द वापरूं लागलों. यांत पदार्थगुणधर्म आणि मानवी कर्तृत्व या दोन्हींचा दृष्टांत आला आहे. कवचाचा गति-स्थिति धर्म हा पदार्थधर्म व कोंबडीनें कवच फोडणें हें कर्तृत्व. समाजव्यवस्थेच्या आर्थिक अंगास मार्क्स हा सिद्धांत पुढीलप्रमाणें लावतो. धनोत्पादनसाधनांवरील मालकी हक्क हे समाजाच्या एका अवस्थेंत धनोत्पादनाच्या प्रयत्नास प्रोत्साहन देऊन माणसाचें वैभव वाढवितात. असें होतां होतां एका काळीं मालकी हक्काच्या तत्त्वाच्या अंमलबजावणी-मुळेंच धनोत्पादनाच्या प्रयत्नास उत्तेजन नाहींसें होतें, बेकारी वाढते आणि मग कोंबडी ज्यांप्रमाणें कवच फोडते त्याप्रमाणें माणसानें धनो-त्पादनसाधनांवरील मालकी हक्क नष्ट करून धनोत्पादनाच्या प्रगतीस वाट मोकळी करून द्यावी लागते. ब्रिटिश साम्राज्यशाहीनें हिंदुस्थानच्या आधु-निक प्रगतीस साहाय्य केलें आहे. पण तीच साम्राज्यशाही तिचीच वाढ खुंटल्यामुळें आतां अधिक उत्कर्षास अडथळा आणते म्हणून माणसांनीं नष्ट केली पाहिजे. सृष्टीचे–सजीव व निर्जीव सृष्टीचे–गतिस्थिति धर्म यांची क्रांतिप्रवणता, आणि क्रांति घडवून आणण्याचें मनुष्यकर्तृत्व या दोहोंची व्यवस्था यांत झालेली आहे.

मानवी जीवन व समाजरचना यांच्या गति-स्थितीचें मुख्य कारण, रहस्य व आधार धनोत्पादनप्रकार हा आहे हा मार्क्सचा फार मोठा शोध होय. माणूस हा नुसता पोटार्थी आहे असें मार्क्सचें मत असल्याचा अर्थ यापासून कोणी काढतात. पण तो चूक आहे. चरितार्थधन संपादिल्या-वांचून जगणेंच अशक्य आहे इतकेंच नव्हे तर अनादिकालापासून पुरेसें चरितार्थधन निर्माण करण्यासाठीं बहुसंख्य जनतेची शक्ति, अक्कल व वेळ खर्च पडली असून त्या उत्पादनाचे परिश्रम, त्यासाठीं अवश्य असणारीं संघ-टना यामुळें माणसाची संस्कृति, धर्म, राजकारण यावर परिणाम झाला असून या सर्वांचा एकमेकांवर व आर्थिक उत्पादनावर परिणाम झाला आहे असें मार्क्स सांगतो. या सर्वांची जी गतिस्थिति असते तिचें मुख्य कारण आर्थिक उत्पादन प्रकार हेंच असून मानवाच्या प्रत्येक विकासांत व क्रांतींत उत्पादनप्रकाराच्या विकासाचीं चाकें कमी अधिक वेगानें फिरतांना दिसतात.

× × ×

धनोत्पादनसाधनांची मालकी हें सध्यांच्या उत्पादनप्रकाराचें मुख्य अंग आहे. ती मालकी खाजगींतून जाऊन सार्वजनिक होणें यालाच क्रांति असें मानलें जातें. या क्रांतीसंबंधानें मार्क्सनें कांहीं भविष्यें सांगितलीं व तीं चुकलीं हें म्हणणें खोटें आहे. भांडवलशाहीनें माणसांचीं दुःखें वाढतात त्याचबरोबर मजूर वर्ग संघटित होत जातो. या संघटनेनें जें बळ वाढतें त्याच्या साह्यानें भांडवलशाहीपासूनचीं दुःखें नष्ट करण्यासाठीं मजूर वर्ग भांडवलशाहीचा नाश करतो असा फक्त भांडवलशाहीचा गतिधर्म मार्क्सनें सांगितला आहे. ती फक्त विरोधविकासाची मांडणी आहे. भांडवलशाही स्वतां विकसत असतां मजूरसंघटना व ऐनजिनशीं उत्पादन वाढतें. होतां होतां भांडवलशाहीची वाढ खुंटते, मजूरसंघटना व उत्पादनक्रिया यांच्या वाढीस भांडवलशाही विरोध करते आणि मग मजूर भांडवलशाहीचा नाश करतो असा विरोधविकासक्रम मांडून दाखवून भांडवलशाहीच्या नाशा-साठीं अनुकूल असा इतिहासक्रम व शक्यता आहे, असें कामगारांना दाखविणें व त्यांना क्रांतीसाठीं उत्साहित करणें हा या प्रतिपादनाचा हेतु

आहे. भविष्य सांगणें अथवा मनुष्यकर्तृत्वापासून भिन्न अशीं अनुमानें काढणें हा याचा हेतु नाहीं.

माणसें हीं आर्थिक दृष्ट्या एकेकटी व्यक्ति नसून मनुष्यव्यक्तीचें जीवन सामुदायिक आहे ही गोष्ट मार्क्सनें आग्रहानें सांगितली आहे. प्रत्येक हरिण आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असतें. अशीं अनेक हरणें एकत्र राहातात तरी त्यांचें परस्पराशीं आर्थिक बंधन नसतें. म्हणून त्यांचा समुदाय हा कळप होय. माणसें आर्थिक दृष्ट्या परस्परावलंबी असतात. तेली, शेतकरी, सुतार, लोहार, कोष्टी, शिंपी हे केवळ आपल्यासाठींच ते ते व्यवसाय करीत नाहींत. सर्व समाजासाठीं करतात. आणि मग आपल्या श्रमांचीं फळें विनिमयानें एकमेकांस देतात. म्हणजे माणसाचें उत्पदनकार्य वैयक्तिक दिसलें तरी तें वास्तविक सामुदायिक असतें. जितकी उपयुक्त उत्पादक मेहनत अधिक तितकें धन अधिक होतें व विनिमयांत अधिक मिळूं शकतें. हें धन श्रमशक्तीच्या प्रमाणांत मर्यादित असतें. म्हणून विनिमयानेंच वाटावें लागतें व विनिमय अपरिहार्यच होतो. तेल्याचें तेल सर्वांनीं घेतलें. पण त्याला इतरांचें श्रमफळ मिळालें नाहीं तर तेली मरेल व तेल निघणेंच बंद होईल. म्हणूनच ‘ श्रमनिर्मित उपयुक्त वस्तु हें मूल्य ’ असें म्हटलें आहे. हें मूल्य सामुदायिक असतें. कारण सर्व उत्पादनच सामुदायिक असतें. सर्व समाजाच्या गरजेहून अधिक मूल्य उत्पन्न झालें म्हणजे तो वाढावा अथवा सर्प्लस व्हॅल्यू होय. [ ही मी व्याख्या अथवा शास्त्रीय उपपत्ति देत नाहीं. मार्क्सवादांत माझ्या समजुतीनें काय काय येतें त्याचा हा नुसता उल्लेख आहे. मी मला मार्क्सवादी मानतों म्हणजे काय काय गोष्टी मी मानतों तें स्थूल मानानें येथें सांगत आहें. ] मूल्य हें सामुदायिक ठरलें म्हणजे अर्थात् वाढावाही सामुदायिक ठरतोच. पण समाजाच्या एका विकासावस्थेंत धनसाधनें खाजगी असतात. या खाजगी मालकीच्या वाढीच्या इतिहासांत अनेकांची खाजगी मालकी नष्ट होऊन मालक व मजूर असे संबंध निर्माण होतात, वाढावा सामुदायिक प्रयत्नानें उत्पन्न होतो पण धनोत्पादनसाधनांचा मालक तो लुबाडून घेत असतो. पुढें त्यामुळेंच सर्व समाजास दारिद्र्य येतें. अखेरीस धनोत्पादन-

साधनांची मालकी खाजगींतून काढून सार्वजनिक केली म्हणजे वाढावा जो असतो त्याचा विनियोग सर्व समाजासाठीं करतां येतो.

रशियांत धनोत्पादनसाधनें सार्वजनिक मालकीचीं केलीं असल्यानें वाढाव्याची संपत्ति सर्व जनतेच्या उपयोगांत येते हेंच त्या समाजाचें वैशिष्ट्य आहे. माणसांना धनोत्पादक श्रमाचा हुरूप यावा म्हणून तेथें पगारांत विषमता आहे हें खरें, पण अधिक काम करणाऱ्याला अधिक पगार हें तत्त्व नीतिदृष्ट्या समर्थनीय ठरतों. उलट भांडवलशाहींत एकानें उत्पादनांत जास्त कौशल्य दाखविलें अथवा नवें यंत्र काढलें कीं चौघे बेकार होतात. सोव्हिएट पद्धतींत नैतिक श्रेष्ठता आहे ती ही. शिवाय उत्पादनश्रमास उत्तेजन आणि बेकारीचा अभाव यामुळें धनाचें व त्याबरोबरच वाढाव्याचे परिणाम वाढत जाऊन एकंदर व्यक्तिमात्रांची किमान मिळकत वरच्या पातळीवर येत जाते आणि अशा प्रकारें विषमता हळूंहळूं कमी होत जाते. सर्प्लस व्हॅल्यूचें तत्त्व कळल्यावांचून सोव्हिएट समाजघटना कळणार नाहीं असें जें मीं आरंभीं म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे.

स्टालिनचीं ‘ एकेका देशांत सोशॅलिझम् ’ ( सोशॅलिझम् इन सिंगल कंट्रीज ) इत्यादि तत्त्वें मला पटलेलीं आहेत. अहिंसा हें यापुढें क्रांतीचें मोठें हत्यार ठरेल अशी माझी खात्री झाली आहे. या सर्वांची उपपत्ति येथें सांगत नाहीं. मी कोणत्या विचारसरणीचा मार्क्सवादांत समावेश करतों व मार्क्सवादाकडे मी कसा आलों हें येथें संक्षेपानें सांगितलें आहे. मी वादविवादांत कोणापुढेंच टिकणार नाहीं पण अमुक-शें ग्रंथ वाचण्याची अटही मान्य करणार नाहीं. मार्क्सवाद हें जिवंत आणि प्रत्यक्ष प्रयोगाचें शास्त्र आहे. जरूर इतकेंच निवडक वाचन ( म्हणजे मग तें फार करावें लागत नाहीं ) चिंतन आणि क्रिया यांतून त्याचा बोध होत जातो. एकमेकांचा आशय समजून घेण्यासाठीं केलेली चर्चा फारच उपयुक्त असते. पण वादयुद्धें टाळलींच पाहिजेत.

# कलकत्त्यांतील फुटपाथवर माणसें उपाशीं कां मरतात ?

कलकत्त्यांतील फुटपाथवर माणसें उपाशीं कां मरतात ? या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे असें कोणी म्हणेल. शरीर जगण्यास अन्न लागतें आणि ज्यांना अन्न मिळत नाहीं अशीं माणसें उपासानें मरतात हें या प्रश्नाचें साधें उत्तर आहे. कलकत्त्यास फारतर आठवड्यास पाचशें तें सातशें माणसें मरत असतील; पण अवध्या बंगालमध्यें आठवड्यास पन्नास हजार माणसें मरत असलीं पाहिजेत असें कुंझरू म्हणतात. आणि हीं सारीं माणसें अन्न नाहीं म्हणून मरतात हें वरील प्रश्नाचें साधें उत्तर नव्हे काय ?

\+ + +

पण हें उत्तर दिल्यावरही माझा प्रश्न शिल्लक रहातोच. खेड्यापाड्यांत गरिबांच्या हातांशीं धान्य येतच नसेल म्हणून ते मरत असतील. पण कलकत्त्यासारख्या शहरांत धान्याचे अनेक साठे सुरक्षित रीतीनें पडलेले असतांना माणसांनीं उपाशीं कां मरावें ? तें धान्य खरेदी करण्याला गरीबांजवळ पैसे नसतात व धान्याचे मालक गरीबांना तें मोफत देण्यास तयार नसतात, असें या प्रश्नाचें उत्तर देतां येईल. पण माझा प्रश्न अजूनही वेगळा आहे. भुकेचा आगडोंब पोटांत उसळत असतां बंगालचे.गरीब लोक ' चोरी करूं नये ' हा मनुस्मृतींतला व पीनल कोडांतला नियम अगदीं कसोशीनें कां पाळीत आहेत, चारीकसारीक गुन्हे करणारांना सरकार तुरुंगांत घालते, त्यांचेकडून काम करून घेते व त्यांना चांगल्याप्रकारें जगण्यास अवश्य तेवढें अन्नवस्त्र देतें. एवढ्यासाठीं तरी, फुटपाथवर मरण्यापेक्षां लहानसहान गुन्हे करूनही तुरुंगाचा रस्ता हीं माणसें कां सुधारीत नाहींत असा माझा प्रश्न आहे. या लोकांनीं गुन्हे करावे असें माझें म्हणणें नाहीं. समाजाचा नैतिक अधःपात झाल्यानें त्याची प्रगति कधींही होत नाहीं. बंगालचें अन्नसंकट निवारण्याच्या कामीं आतां सरकार व लोक ह्या दोघांचेंही सहकार्य यापुढें होईल व जनतेवरील आपत्ति टळेल व तशीच ती टाळली

पाहिजे. गुन्हेगारी हा उपासमार टाळण्याचा उपाय नव्हे, उलट त्यामुळें समाजावर अधिकच मोठीं संकटें ओढवतील हें निःसंशय खरें आहे. पण गुन्हेगारीनें जगण्यापेक्षां प्रामाणिकपणें उपाशी मरणें बरें असें मानण्याइतकी उच्च संस्कृति बंगालच्या जनतेचे ठिकाणीं आहे असें समजावें कीं पोटांत आग भडकल्यावर जीव बचावण्यापुरता गुन्हा करण्यासही जें मानसिक त्राण लागतें तेवढेंही त्राण या बंगाली लोकांत नाहीं कीं काय असा खरोखर माझा प्रश्न आहे. बंगालच्या जनतेच्या ठिकाणीं संस्कृति किती आहे अथवा निदान साधी माणुसकी किती आहे याचा मी विचार करतों आहे.

बंगालची जनता भुकेची आग भडकल्यावरही गुन्हे करण्यास प्रवृत्त होत नाहीं याचें कारण मनुस्मृति अथवा पीनल कोड यांतील ' चोरी करूं नये ' हा आदेश तिला माहीत असतो हें नव्हे. असें कोणतेंही ज्ञान त्यांना शेंकडों हजारों वर्षांत कोणींहि दिलेलें नाहीं. वरिष्ठ वर्गांचें धन, सत्ताधाऱ्यांचा दरारा आणि साधनवंत व विज्ञानवंत यांची भीति यांनीं त्यांच्या भावना आकसून, दडपून, मरून गेल्या आहेत; किंबहुना आधुनिक काळाला अथवा कोणत्याच काळाला प्रतियोगी व उपयुक्त अशा भावना त्यांच्या ठिकाणीं निर्माण होण्यास कधीं अवसरच मिळालेला नाहीं. हक्क, कर्तव्य, धाडस, दया, निर्दयपणा, हावरेपणा, संयमबुद्धि, सूडबुद्धि, धूर्तपणा असले कोणतेही व्यावहारिक सद्‌गुण अथवा दुर्गुण यांच्या ठिकाणीं कधीं उत्पन्न होऊंच शकले नाहींत. हे लोक शरीरानें माणसें आहेत. मानव प्राणी या नात्यानें त्यांच्या ठिकाणीं जे प्राणिगुण असावेत ते आहेत. शेती, मच्छीमारी, नौकानयन वगैरे त्यांचे जे जीवनव्यवसाय ते यांना येतात. विवाहसंस्था व कौटुंबिक जीवन हीं त्यांच्या परिचयाचीं आहेत. भुतें, समंध आणि महंत यांतला धर्म त्यांना दिसतो. पण खाजगी मिळकत, करारमदार व राजसत्ता यामुळें उत्पन्न होणारे जे जगड्व्याळ व्यवहार त्यांतलें या बंगाली माणसांना कांहींही कळत नाहीं. थोडेंफार कळत असलें तर त्यांची त्यांना भयंकर भीति वाटते. तो त्या सर्वांपासून दूरदूर पळत असतो आणि त्याला कळत अथवा न कळत तो त्या व्यवहाराच्या जाळ्यांत सांपडून पिळला

जात असतो. हताश, अवश व नाइलाज असें त्याचें जीवन आहे. यामुळेंच तो मूढ, मंद, भित्रा, निस्त्राण झालेला आहे.

बंगालच्या माणसांची, बंगालच्या सामान्द जनतेची ही अवस्था कां झाली, केव्हां झाली ? इतिहासाचा साधारण नियम असा दिसतो कीं शेतीच्या सुपीक क्षेत्रांत रहाणारे आणि शिकार अथवा युद्ध करण्याची यांच्या जीवनास फारशी गरज पडलेली नाहीं असे लोक दुबळे, मूढ व संघटनाकर्तृत्व नसलेले असे आढळून येतात. मध्यआशियांतील मोगल, तार्तर वगैरे टोळ्या नापीक वाळवंटावर भटकत आणि दूरदूरच्या प्रदेशावर शिकार व लुटालूट करून उपजीविका करीत. त्यांना तीक्ष्ण बुद्धिमत्ता, संघटनाशक्ति व युद्धकलेचें ज्ञान त्यांच्या जीवनावश्य अशा राहणीमुळेंच मिळे. पंजाबसारख्या सरहद्दप्रदेशांत शेती हेंच उपजीविकेचें साधन असे तरी तो सरहद्द प्रदेश असून रानटी टोळ्यांचा उपद्रव शेजारच्या मुलूखांतून होत असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं लढाऊ बाणा आणि तदनुषंगी बुद्धिमत्ता, तल्लखपणा व संघटनाशक्ति हे गुण येत असत. महाराष्ट्रांत मुलूख डोंगराळ व फारसा सुपीक नाहीं, यामुळें वर्षांतून कांहीं दिवस परमुलुखावर स्वाऱ्या करून अथवा आपसांतच लूटमार करून मराठ्यांना उपजीविका करावी लागे. उलट चीन, हिंदुस्तान या सारख्या अफाट देशाच्या अंतर्भागांत सुपीक शेतीची अफाट क्षेत्रें आहेत. तेथें लहान खेड्यांतून रहाणारी थोडथोडी लोकवस्ती अहोरात्र अत्यंत मागासलेल्या पद्धतीनें शेतीचा व्यवसाय करी व आपली गुजराण करी. या शेतीच्या व्यवसायांत धाडस, पराक्रम, बुद्धिमत्ता, संघटनाशक्ति वगैरे गुणांच्या विकासास कधीं वाव नव्हता व त्या गुणांची कधीं गरज नव्हती. अशा लोकवस्तीचे प्रदेश हे नेहमीं रानटी टोळ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडले आहेत. हिंदुस्तानांत मोगल्स व चीनमध्यें मांच्यू हे जे राज्यकर्ते झाले ते अशा रानटी टोळ्यांतून आलेले होते. मोगल्स व मांच्यू यांचीं राज्यें अनुक्रमें हिंदुस्तान व चीन यांवर स्थापन झाल्यानंतर कांहीं पिढ्यांनीं हे राज्यकर्ते सुपीक शेतीच्या व दुबळ्या शेतकऱ्यांच्या मुलुखावर राज्य करता करता पराक्रमाच्या गरजेच्या अभावीं स्वतःही दुबळे झाले.

बंगालच्या सुपीक मुलुखांतील लक्षावधि प्रजा ही अशा प्रकारें तिच्या व्यवसायामुळें दुबळी व मागासलेली आहे हें दिसून येतें. मोंगलाच्या ऱ्हासकालांत ब्रिटिशांचा अमल बंगालमध्यें बसूं लागल्यापासून या बंगाली समाजाची दुःस्थिति फारच वाढली. ईस्ट इंडिया कंपनीनें व तिच्या नोकरांनीं बंगालची लूट कशी केली हें इतिहासांत प्रसिद्धच आहे. मोंगलांनीं बंगालवरचे सुव्यवस्थेचे अधिकार ब्रिटिशांना दिले व पिळणुकीचे अधिकार मोंगल अधिकाऱ्याकडे ठेवले, यामुळें प्रजेची पिळणूक अतोनात झाली. आपल्या अधिकारान्वयें लष्कर व पोलीस ठेवून 'शांतता व सुव्यवस्था' राखणाऱ्या ब्रिटिशांना लोकांच्या हिताची व सुखाची काळजी करण्याची जरुरी नव्हती आणि जोंवर ब्रिटिशांच्या बंदुकानीं प्रजा खचली जाऊन दुबळेपणानें स्वस्थ राहिली होती व सरकार, सावकार, दुकानदार यांजकडून कितीहि पिळणुक झाली तरी विरोध करीत नव्हती तोंवर मोंगल अधिकाऱ्यांनीं पिळणुकीपलीकडे प्रजेच्या हिताचा व सुखाचा विचार कधीं केलाच नाहीं. आणि आधींच दुबळी असलेली प्रजा अधिकाधिक दुबळी व निस्त्राण होत गेली. वॉरन हेस्टिंग्जनें पुढें जमिनीचा महसूल वसूल करण्याचे मक्ते देण्याची वहिवाट घातली. यामुळें जनतेच्या पिळणुकीस सीमाच राहिली नाहीं. नंतर कॉर्नवॉलिसनें जमीनमहसूल कायमचा ठरवून दिला व या महसूलअधिकाऱ्यांना हजारों, लाखों कोट्यवधि शेतकऱ्यांच्या जमिनीचे मालक बनविलें. शेतकऱ्यांच्या जमिनी इतक्या मोठ्या प्रमाणांत लुबाडून नवीन जमीनदार वर्ग निर्माण केल्याचें क्रूर उदाहरण इतिहासांत सांपडणेंच कठीण. या नवीन जमीनदारांना महसूल कायमचा ठरवून देण्यांत आला. पण शेतकऱ्यांना त्यांनीं किती पिळावें याला पुढें शंभर वर्षेंही कांहीं मर्यादा घालण्यांत आली नाहीं. पुढें कुळांच्या पिळणुकीवर नियंत्रण घालणारे कायदे झाले. त्यांचा परिणाम फारसा झाला नाहीं. मुख्य जमिनदार, त्याचा पोटजमिनदार, त्याचा परत पोटजमिनदार असे अनेक जमिनदार नुसते बांडगुळासारखे शेतकऱ्यांच्या डोक्यावर वाढूं लागले. कुळांमध्यें जमिनींचे तुकडे वाढत जाऊन जमिनी लहान झाल्या व शेती मागास होऊं लागली. जमिनदारांना शेतींत भांडवल गुंतविण्यापेक्षां इतर धंद्यांत भांडवल गुंतविण

फायदेशीर वाटून जमिनीचें भांडवल तुटूं लागलें. यामुळें पुन्हा शेती मागासली आणि शेतकरी अधिकाधिक कंगाल व मूढ बनत गेला.

अशा या बंगालमध्यें जनतेचें राजकारण फारसें झालें नाहीं ही गोष्ट स्वाभाविक व लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कोणत्याही समाजाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचें स्वरूप प्रथम दहशतवादाचें असतें व तसेंच तें हिंदुस्तानांत प्रथम होतेंही. पण महाराष्ट्रांत व इतरत्र या दहशतवादी चळवळीस जनतेच्या चळवळीचें स्वरूप लवकरच आलें. उलट बंगालमध्यें राजकीय दृष्ट्या जागृत झालेल्या मध्यम वर्गीय तरुणांना जनतेची चळवळ फारशी करतांच आली नाहीं. यामुळें बंगालमधील जहाल राजकीय चळवळीचें स्वरूप अजून दहशतवादीच आहे. बाकीचें राजकारण म्हणजे जमिनदार वर्गाचें राजकारण म्हणजे शामप्रसादी राजकारण प्रतिगामी असते व दरिद्री जनतेला राजकारणच नसतें. कसेंबसें धनोत्पादन करावें, वरिष्ठ वर्गाकडून पिळून घ्यावें, लुटून घ्यावें, आधुनिक सुधारणेस भिऊन तिजपुढें चकित, मूढ, लाचार व्हावें व निसर्गप्रकोपास विरोध न करतां अथवा त्यांतून वाट न काढतां त्यांस सरळ बळी पडावें हा त्यांचा पिढ्यानुपिढ्या जीवनक्रम आहे. बंगालच्या शेतकऱ्याची लूट व पिळणूक अतोनात झाल्यामुळें ते उपाशी मरतात हें खरेंच. पण या मानवी जुलुमाचा कोणत्याही प्रकारें प्रतिकार न करतांच हीं माणसें अगदीं मरेपर्यंत उपाशी कां रहातात, पोट भरण्यासाठीं वाममार्गासही कां जात नाहींत याची माझ्या मतें वर दिली ही उपपत्ति आहे. या भयंकर आपत्तींतून या बंगाली समाजाचा उद्धार होण्यास तेथें जमिनदारी नाहींशी करून बऱ्याच प्रमाणांत समाजक्रांतीचे उपाय अवलंबावे लागतील. त्यांची चर्चा अर्थातच या लेखाच्या कक्षेंत येत नाहीं म्हणून येथेंच थांबतों.

# हें चित्र पाहा आणि हें चित्र पाहा

———— ० ————

## सावंतवाडीच्या शेतकऱ्यास फासांतून सोडवा

सावंतवाडी संस्थानांतील एका जमिनदाराची खंडबाकी नारायण चंद्रो भाइडकर नांवाच्या शेतकऱ्यांकडून वसूल व्हावयाची होती. त्या-संबंधानें कोर्टाचा जप्तीचा हुकुमनामा घेऊन सदर जमिनदार भाइडकरांकडे गेले व भाताचा मुडा जप्त करूं लागले. सदर भात हें तेवढेंच भाइड-करांच्या मुलामाणसांना खाण्याचें अन्न होतें. म्हणून तें जप्त करूं नका असें म्हणून नारायण चंद्रो भाइडकरानें जमिनदाराच्या पायावर लोटांगण घातलें. जमिनदारानें नारायण चंद्रोला लाथ मारली. तेव्हां नारायण चंद्रो आणि इतर कांहीं इसम यांनीं संतापानें जमिनदारावर लाठीचा हल्ला केला व त्या हल्ल्यांत जमिनदाराचा वध झाला. हा खून खटला पुढें कोर्टांत चालून भाइडकर व पालकर या दोघांस फाशीची शिक्षा सांगण्यांत आली आहे. इतर अनेक आरोपींना निरनिराळया मुदतीच्या कैदेच्या शिक्षा सांगण्यांत आल्या आहेत. भाइडकर व पालकर यांची फाशी माफ व्हावी म्हणून मुंबईतल्या सावंतवाडीकर नागरिकांची खटपट चालू असून भास्करराव जाधवांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस एक जाहिर सभाही झाली. या माफी-मागणीस आम्ही एका अग्रलेखांत पाठिंबा दिला होता. आमचें हें वर्तन खुनास उत्तेजन देणारें आहे असें प्रत्यक्ष अथवा पर्यायानें म्हणणारे चार पांच टेलिफोन-संदेश आम्हांकडे आले व त्याच आशयाचीं कांहीं पत्रेंही आलीं आहेत. कोणाचेंही असें मत व्हावें हें दुर्दैव होय. आमची या संबं-धानें काय भूमिका आहे आणि कोणाचीही काय असावी हें आज थोडक्यांत सांगतों.

कोणती माणुसकी आम्हांला येथें हवी, असा रोखठोक प्रश्न चालू इतिहास आम्हां सर्वांपुढें अक्राळ विक्राळ मुद्रा करून विचारीत आहे.

नारायण चंद्रो भाइडकराच्या वाडवडिलांचा जमिनजुमला होता तो त्यांनीं आपल्या 'मूर्खपणा'मुळें सावकारींत गमावला. नारायण चंद्रो हा कुळ झाला. त्याला एके सालीं जमिनमालकाचा खंड भागवितां येईना म्हणून जप्ती आली. जप्ती चुकविण्यासाठीं नारायण चंद्रो जमीनमालकाच्या पाया पडला. मालकानें लाथ मारली. तेंव्हां नारायण चंद्रोचें डोकें भडकलें व त्यांनीं जमीनमालकाचा खून केला. इंडिअन पीनल कोड नांवाचा एक कायदा आहे. त्याप्रमाणें खुनास फाशीची शिक्षा आहे हें नारायण चंद्रोला माहीत होतें. पण त्यानें पीनल कोड जुमानलें नाहीं. म्हणून तो फाशी जात आहे. आपल्या पापाचें फळ भाइडकर भोगीत आहे. माथेफिरूपणानें पीनल कोडाचा उपमर्द करणारा भाइडकर शेतकरी हा माणुसकीचा एक विशिष्ट नमूना आहे.

वाचकहो, आतां माणुसकीचा दुसरा—दुसऱ्या टोकाचा नमुना इतिहासानें आपणापुढें मांडला आहे तो पाहा. कलकत्ता नांवाचें एक मोठें शहर बंगालमध्यें आहे. त्या शहरांत गेले कांहीं आठवडे दररोज सरासरी ७५ माणसें रस्त्याकडेच्या फूटपाथवर कित्येक दिवस अन्नाचा कणही न मिळाल्यामुळें तडफडून तडफडून मरत आहेत. त्यांच्याजवळ धान्यखरेदीस पैसा नाहीं. तो कां नाहीं त्याची चर्चा येथें नको. नाहीं एवढें खरें. कलकत्त्यास धान्य अगदींच नाहीं असें नव्हे. तेथें पेवेंचीं पेवें आणि गुदामेंचीं गुदामें तुडुंब भरलेलीं आहेत. पण तें धान्य विक्रीला येतही नाहीं. येथें सांगण्याची मुख्य गोष्ट अशी कीं, हीं उपाशी माणसें या धान्यानें भरलेल्या पेवावर अथवा गोदामावर हल्ले करीत नाहींत व धान्यें हिसकून घेत नाहींत. फार काय पण त्यांनीं लहानसान गुन्हे केले तर सरकार त्यांना तुरुगांत ठेऊन तेथें त्यांना काम देईल व खाऊंही घालील. यामुळें त्यांची उपासमार तरी वांचेल. पण हीं माणसें उपासमार पत्करतात, मरतात. पीनल कोडाचा गुन्हा करीत नाहींत. हिंदु माणूस मरतांना गीतेचें चिंतन करतो, मुसलमान कुराणाचें चिंतन करतो, त्याप्रमाणें हा बंगालचा भुकी पीनल कोडाचें चिंतन करीत प्राण सोडतो कीं काय न कळे. भाइडकरानें पीनल कोडाचा उपमर्द केला म्हणून तो फाशी जाणार आहे. बंगालचा

भुकी पीनल कोडाची आज्ञा पाळतो, पण मरतोच आहे. एक कायदा व शांतता यांचा भंग करून मरतो. दुसरा कायदा व शांतता यांच्या मांडीवर डोकें ठेऊन तडफडत मरतो. माणुसकीचा कोणता नमुना तुम्हांला हवा असा हिंदी लोकांना चालू इतिहासाचा प्रश्न आहे.

\+ + +

बंगालचा भूकबळी पीनल कोड वाचूं शकत नाहीं. तो कायदा व सुव्यवस्था पाळण्यासाठीं कायद्याचा मान राखीत नाहीं. गुन्हा करण्यालाही जी थोडीशी माणुसकी लागते तीही त्याला गेल्या पावणेदोन वर्षांच्या ब्रिटिश अमलानें निर्मिलेल्या जमिनदारशाही पिळणुकींत मिळाली नाहीं. दोनशें, अडीचशें वर्षेंपर्यंत अमानुष पिळणुकींत तो चरखांतून काढलेल्या उसाप्रमाणें चिपाडला आहे. सर्वस्वी नागवला गेला आहे. घाण्यास जुंपून अर्धपोटी राबवलेल्या व जन्मभर डोळ्यास ढापणें घातलेल्या बैलाप्रमाणें तो शरीरानें कृश आणि दुबळा, मनानें असंस्कृत आणि मूढ, अंध आणि भेकड असा झाला आहे. आधुनिक सुधारणेचें हें जग आपणांस खायला आलें आहे असें वाटून तो भेदरला आहे. त्याची आंतडी अन्न अन्न करीत आहेत. पण हातपाय गुन्हा करण्याचेंही धाडस करीत नाहींत. आंतड्यांची वळवळ त्यास असह्य होते, पायाच्या नाड्या आंखडतात, तापलेल्या फूट-पाथवर त्याचे हातपाय गारठतात व मुडपतात, सभोंवारच्या कलकत्त्याच्या वैभवाकडे तो डोळे गरगरां फिरवून पाहतो, त्या वैभवाच्या ध्यानांत मग्न होऊन तो डोळे मिटतो, देह पसरतो, पुढें काय होतें हें त्यानंतर त्याला कळत नाहीं.

* * *

माणसानें कायदा व सुव्यवस्था पाळणें हेंच त्याचें परम कर्तव्य असेल, पीनल कोड हाच मानवधर्माचा मौलिक वेदग्रंथ असेल तर कलकत्त्याच्या फुटपाथवर आणि बंगालच्या खेड्यांत मरणारे शेंकडों, हजारों, लाखों भुकी हे आदर्श नागरिक आहेत. इतक्या पापभीरु, इतक्या कायदाभीरु नागरिकांवर राज्य करणें अगदीं कमी खर्चाचें व सोपें आहे. पण अशा दुबळ्या नागरिकामुळें राज्यसत्ता दुबळी होते, समाज दुबळा व असंस्कृत

राहतो, राष्ट्राच्या राष्ट्र केवळ पोटभरू होते. बंगालची पांच कोटी जनता या हीन माणुसकींतून वर आल्याखेरीज बंगाल व हिन्दुस्तान यांना जगांत माणुसकीचा दर्जा मिळणार नाहीं. सावंतवाडीच्या जमीनमालकानें भाईडकर या शेतकऱ्यास लाथ मारली, म्हणून देहभान विसरून त्या जमीनमालकांवर लाठी चालवून त्याचा खून करणारे भाइडकर व पालकर हे वरील प्रकारच्या हीन माणुसकींतले खास नाहींत. त्यांनी केलेल्या खुनास आम्ही उत्तेजन मुळींच देऊं इच्छीत नाहीं. पण शेतीचें प्रेम, बायकामुलांचें प्रेम आणि स्वाभिमानाचें वेड त्यांचे ठिकाणीं आहे हें या खुनामुळेंही सिद्ध झालें आहे. हे गुन्हे नष्ट करण्यासाठीं या माणुसकीचाही नाश करणें अवश्य असेल तर कांहीं दिवसपर्यंत प्रजेला कायदेशीरपणें जाच केला, म्हणजे असे गुन्हे भराभर होतील, सरकारला दडपशाहीला उत्तम संधि मिळेल, मग बेसुमार दडपशाही गाजवून सावंतवाडीसच काय, पण साऱ्या हिंदुस्तानांत स्मशानशांतता मिर्माण करतां येईल, ज्याप्रमाणें बंगालमधून सैन्यासाठीं माणसें मिळत नाहींत, तेथील शेती मनुष्यप्रयत्नाभावीं खचत चालली आहे, तेथली जनता हवालदील झाली आहे, त्याप्रमाणें साऱ्या हिंदुस्तानांतील माणसें व इतर भौतिक परिस्थिति होईल तर साऱ्या हिंदुस्तानांतून सैन्यासाठीं माणसें व उद्योगधंदे खलास होतील आणि सारी जनता हवालदिल होईल. कायदा व शांतता मात्र छान नांदेल.

× × ×

खुनाला उत्तेजन देण्याची आम्हांला थोडीही इच्छा नाहीं. पण शेतीचा व मुलाबाळांचा दुरभिमान बाळगणारा स्वाभिमानी पण अडाणी, धाडशी पण अविचारी, असा सह्याद्रीच्या खडकांतला हा खडकाळ मराठा पीनलकोडाच्या धाकानें नेस्तनाबूत करणें एवढेंच राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे काय ? सावंतवाडीच्या राणीसरकार व सावंतवाडीचे जमीनमालक यांना आम्ही नम्रपणें विचारतों कीं, ब्रिटिश अमलांत कायद्याची जबरदस्त कैची शेतकऱ्यांना पिळण्यासाठीं जमिनदारांना वापरायला सापडली म्हणून अडाणी शेतकऱ्यांची सावकारीनें तुम्ही नागवणूक केली. ही नागवणूक भयानक प्रमाणांत झाल्यामुळें

शेतकरी गुन्हे करूं लागले. तेव्हां खालसा मुलुखांतील परकी सरकारनें शेतकरी ऋणमुक्ततेचे कायदे करून शेतकऱ्यांचीं कर्जें भराभर माफ केलीं. ही गोष्ट खालसा मुलुखांत पन्नास वर्षांपूर्वी घडली. हल्लीं शेतकऱ्याला सावकार व जमीनमालक यांविरुद्ध इकडे पुष्कळ संरक्षण दिलें जातें. शेतीला साहाय्य-ही देण्यांत येतें. तरीही शेतकरी भुकेकंगालच आहे इतका अन्याय अजून शिल्लक आहे.

\+ + +

संस्थानांतून खंड डोईजड, शेतकरी विमोचनाचे कायदे नाहींत, स्वतां जमिनमालक शेतींत लक्ष घालीत नाहींत, शेतीला भांडवल पुरेसें नाहीं, बाजारभावाची अनिश्चिती, जुने रोजगारधंदे बुडाले, मराठ्याचा लष्करी पेशा बुडाला, असा सर्व बाजूंनीं मराठा शेतकरी—विशेषतः संस्थानचा शेतकरी गांजलेला आहे व या गांजणुकीमुळें तो प्रसंगीं गुन्ह्यास प्रवृत्त होतो. त्यास फटके मारून, तुरुंगांत घालून, फाशी देऊन, ताळ्यावर आणा-वयाचें असें सरकार म्हणेल तर तें अशक्य नाहीं. पण त्यामुळें अत्यंत हीन आशा माणुसकींप्रत तो मराठा जाईल आणि मग पावसांतले किडे थोडे ऊन्ह पडलें कीं पटापट मारून पडतात तसा हा शिवाजीचा मराठा लहानशाही राष्ट्रीय संकटानें बंगालच्या भूकबळीसारखा तडफडत तडफडत मरून पडेल. तसें होणें हें संकट आहे. त्या शेतकऱ्याला सावकार, जमिनदार, यांच्या कैचींतून सोडंविला पाहिजे. त्याच्या शेतीला साहाय्य केलें पाहिजे. भाइडकर, पालकर हीं गुन्हेगार प्रवृत्तीचीं माणसें नव्हेत. अविचारी अडाणी पण परिस्थितीनें गांजलेली धाडशी स्वाभिमानी अशीं हीं माणसें आहेत. खडकाळ सह्याद्रीच्या पोटीं जन्मलेला सगळा मराठा असाच आहे. त्याचा पारखी त्याचा नेता भेटला म्हणजे हाच मराठा पुन्हा राष्ट्राचा अलंकार होईल. सावंतवाडीच्या राणी सरकारनीं व तेथील जमीनमालकांनीं या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहावे व भाइडकर-पालकर यांना फांसावरून उतरवून शेतकरीसाहाय्याच्या योजना हातीं घ्याव्या.

अग्रलेख—लोकमान्य २९-१०-४३.

# केवळ चर्चेसाठीं

लोकशक्तीचें माजी संपादक आचार्य शंकरराव जावडेकर यांनीं कॉंग्रेस समाजवादी पक्षाचे साप्ताहिक ' उषा ' या पत्रांत ' भावी लढा कसा व केव्हां करावा ? ' यासंबंधानें एक लेख लिहिला आहे. ठाणें येथील महाराष्ट्र समाजवादी पक्षाच्या चर्चासभेंत त्या लेखांतील विचारसरणी ही महत्त्वाची भूमिका म्हणून चर्चेसाठीं घेतली जाणें योग्य असल्यानें जावडेकरांनीं सुरू केलेल्या चर्चेत आम्हीं कांहीं मुद्यांची भर घालूं इच्छितों. हंगामी राष्ट्रीय सरकार व घटना परिषद यांतून पूर्ण स्वातंत्र्य निर्माण न झालें तर लढा अपरिहार्य होईल. तेव्हां तो लढा कसा करावा याची चर्चा करणें अवश्य वाटल्यावरून जावडेकरांनीं ही चर्चा सुरू केली आहे. " हंगामी राष्ट्रीय सरकारांतून घटनापरिषदेंतून संपूर्ण स्वातंत्र्य निर्माण होऊं शकलें नाहीं तर पुनः राष्ट्रसभेला लढा करावा लागेल व तसा तो तिनें करावा येथपर्यंत राष्ट्रसभेंतील सर्व पक्षांचें एकमत होऊं शकतें " असें जें जावडेकरांनीं म्हटलें आहे ती त्यांच्या विचाराची मुख्य बैठक आहे. पण ती मुळींच खरी नाहीं. सरदार पटेल यांचेपासून शंकरराव देवांचेपर्यंत जी विशिष्ट विचारसरणीची पुढारी मंडळी आहेत त्यांना आतां स्वातंत्र्य प्राप्त झाल्याची खात्री असून लढ्याचे मार्ग ही मंडळी आतांपासून रोखून धरीत आहेत. १९४२ मध्यें लिनलिथगो-मॅक्स्वेल कंपूनें चर्चिलच्या मूर्ख धोरणास अनुसरून गांधीजीप्रभृतींना पकडले नसतें तर गांधींनीं लढा टाळला असता. आतां लढा झाल्यास सरदार तुरुंगांत जाण्याऐवजीं गृहमंत्री राहतील व अच्युतरावांना मुरारजीभाईशीं सामना द्यावा लागेल. लढ्याबाबत कॉंग्रेसची एकजूट असेल अशी खोटी कल्पना लढावाल्यांनीं करून घेऊं नये. पायाखालची जमीन घट्ट असली पाहिजे.

× × ×

आम्ही सरदार पटेल अथवा शंकरराव देव यांची खोडी काढण्यासाठीं हें लिहीत नाहीं. राष्ट्रीय लढ्याला अनुकूल भूमिका मिळण्याचा संभव फारच थोडा आहे असें आमचें म्हणणें आहे. त्यासाठीं आर्थिक मंदी अफाट प्रमाणावर होऊन भांडवलशाहीचें जीवन संकटांत आलें पाहिजे आणि शेतकरीकामकऱ्यांना भांडवलशाहीचा भार असह्य झाला पाहिजे. पण जरी भांडवलशाहीला सुखाचे दिवस आतां येणार नाहींत तरी ती कोसळून पडेल असाही संभव थोडा आहे. शहरी कामगार व सरकारी नोकर यांचे पगार सरकार वाढवीत आहे. धंद्यांचें नियंत्रण करून शेतकऱ्याच्या मालाची खरेदी स्वतां योग्य भावानें करण्याचा प्रयत्न करीत आहे. हें सर्व व्हावें तसें होत नाहीं. लांचलुचपत फार होते. तरी पण अनियंत्रणापेक्षां कुनियंत्रण पुरवलें हें शहाण्या लोकांना कळत आहे. कूळकायदा, सावकारी नियंत्रण, सरकारी धान्यखरेदी, रेशनिंग वगैरे सर्व उपायांनीं अर्थव्यवस्था कांहीं तरी निर्माण होत आहे, ती बिनव्यवस्थेपेक्षां अधिक चांगली आहे व तीमुळें, रशियन राज्यक्रांतीपूर्वी तेथील समाजांत झाले ते उद्रेक व स्फोट येथें होणें असंभवनीय आहे. त्यांतल्या त्यांत कामकऱ्यांची अवस्था शेतकऱ्यांपेक्षां अधिक चांगली ठेवण्याचा सरकारचा व कारखानदारांचा निर्धार असल्यानें रशियांत शेतकरी–कामकऱ्यांची युति झाली तशी येथें होणार नाहीं. सरदार पटेल यांनीं मध्य सरकार आपण केव्हांही सोडणार नाहीं असें जें सांगितलें तें ब्रिटनला अथवा मुस्लिम लीगला उद्देशून सांगितलें नसून अच्युतरावांना उद्देशून सांगितलें होतें हें लक्षांत घेतलें म्हणजे सरदार पटेल गृहमंत्री असतां लढ्याच्या बाजूला सैन्य मिळेल काय याचा विचार कार्यकर्त्यांनीं केला पाहिजे. गांधी–पटेल प्रभृति १९४२ सालीं तुरुंगांत होते ती परिस्थिति आतां उत्पन्न होणार नाहीं हें लक्षांत घेऊन लढावाल्यांनीं आपल्या योजना आखाव्या.

ब्रिटिश सरकार घटना परिषदेमार्फत पूर्ण स्वातंत्र्य देणार नाहीं अशी आमची पूर्ण खात्री आहे. तरीही घटनापरिषदेमार्फत ब्रिटनशीं समेट होणारच नाहीं असें आम्हांला वाटत नाहीं. हिंदी व्यापारी व धंदेवाले आणि ब्रिटिश मजूर पक्ष या सर्वांनाच हिंदी शेतकऱ्यांची खरेदीशक्ति वाढवायची आहे.

ब्रिटनच्या साह्यानें येथें प्रचंड धंद्याची वाढ येथील भांडवलदार करूं पाहत आहेत आणि येथें बोल्शेव्हिक वणवा पेटूं नये यासाठीं हिंदी नोकऱ्या आणि बाजारपेठ ब्रिटिशांना देण्यास येथील भांडवलदार तयार आहेत. या क्रमांत ब्रिटिश साम्राज्यसत्ता आंतरराष्ट्रीय जगांत थोडथोडी ढिली पडत जाऊन इंग्लंडचे संबंध क्रमशः इतर जगापेक्षां युरोपशीं वाढत जातील. रशिया ब्रिटिश साम्राज्य इल्लींहून अधिक वेगानें बुडविण्याची घाई करणार नाहीं. कारण स्टालिन हा युद्ध ओढवून घेणारा मुत्सद्दी नसून युद्ध टाळणारा मुत्सद्दी आहे. त्यानें आंतरराष्ट्रीय तंगी कायम ठेवली व मागासलेल्या राष्ट्रांतील जनतेला सहानुभूति आणि थोडेंफार साहाय्य दिलें तर तेवढ्यानें अँग्लोअमेरिकनाचें जगावरील वर्चस्व ढिलावत जाऊन इग्लंड, अमेरिका व युरोप येथें समाजवादी विचारसरणी बळावत जाईल. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इतिहासाची ही प्रवृत्ति ज्यांना दिसेल त्यांना, घटनासमितींत देशांतील सर्व भांडवलदारांच्या पाठिंब्यानें बसलेल्या काँग्रेसला ब्रिटन लाथाडूं शकणार नाहीं आणि उलट हे भांडवलदारही ब्रिटनला चिडवून अथवा मुसलमानांना चिडवून आणि देशांत असंतोष भडकवून क्रांतीचा नुसता धाकही उत्पन्न करतील असें वाटत नाहीं. घटनासमितीचें नक्की भवितव्य मग कसेंही होवो.

वरील विचारसरणी लक्षांत घेतल्यास वर्गलढा करावा कीं नाहीं, अहिंसा किती तोळे मासे पाळावी ही चर्चा अस्थानीं ठरते. याचा अर्थ आतां क्रांतीचा गाशा गुंडाळावा असा मात्र नव्हे. आमच्या मतें खेड्यांतून फक्त विशिष्ट प्रकारचें कार्य केलें तरच यापुढें क्रांतीची आशा आहे. आम्ही यापूर्वी अनेकदां सुचविलेलीच कल्पना पुन्हा मांडतो. ती केवळ आमची कल्पना नसून मोठमोठ्या पंडितांनीं मांडली आहे. खेड्यांत ग्रामपंचायती स्थापून सर्व जमिनी ग्रामपंचायतींना खंडानें द्याव्या व ग्रामपंचायतीनें त्या शेतकऱ्यांना देऊन सहकारी शेती सुरू करावी. शेतकऱ्याला लागणाऱ्या मालाची खरेदी आणि शेतकऱ्याच्या मालाची विक्री या ग्रामपंचायतींनीं करावी. शेतीची पहाणी, आंखणी, कसवट ही सर्व शास्त्रीय व सहकारी पद्धतीनें करावी हळूहळू सर्व व्यापारी व्यवहार ग्रामपंचायतीनें

सहकारी तत्त्वावर करूं लागून त्याचा 'नफा' गांवाच्या उन्नतीसाठीं उपयोगांत आणावा, समाजवादी जीवन सुरु करण्याचाच हा उपोद्घात आहे. खेड्यांतून, कॉंग्रेसकमिट्यांतून या कार्यक्रमास पाठिंबा मिळत गेल्यास, गांधी म्हणतात त्याप्रमाणें, हल्लींच्या प्रांतिक सरकारांतूनही स्वतंत्र मध्यसरकार निर्माण होईल. यांतच लढा वेळोवेळीं उद्भवेल. घटनासमिति यशस्वी होवो अथवा न होवो, हा लढा अढळ आहे व तोच खरा लढा आहे. जातीय प्रश्न सुटेल तर यांतूनच सुटेल आणि वर्गकलह अपरिहार्य असला तर तो यांतूनच उद्भवेल. या कार्यक्रमास जे विरोध करतील त्यांच्याशीं हिंसात्मक लढा करावा लागणार नाहीं किंबहुना अहिंसेच्या आग्रहानेंच लढा करावा लागेल. अपवाद राहतीलच. पण हिंसा कोठवर केली तर क्षम्य आहे वगैरे विचार व्यर्थ आहेत. एकदां हिंसेला सुरवात झाली म्हणजे ती फलदायी व्हायची तर अॅटम बॉंब वापरावा लागतो. ज्याला तो उपलब्ध नसतो तो चिरडला जातो. ज्याचे जवळ तो असतो त्यालाही यापुढें फक्त निखारे ओटींत घ्यावे लागतील.

* * *

आमच्या मतें विधायक क्रांति कीं विध्वंसक क्रांति ही शंका आतां सोडावी. खेड्यांच्या जीवनाची वर सुचविली तशी पुनर्घटना हा एकच एक सध्यांच्या परिस्थितींत मार्ग आहे. तो बिकट आहेच. पण असला तर तोच व्यवहार्य आहे. अचिंत्य व अव्यवहार्य पण चमकदार घटनांच्या चिंतनांत जो आनंद असतो तो यांत मिळणार नाहीं हें खास. पण आपल्याच दांतांतलें रक्त चाखीत बसण्याचा आनंद हितकारक नाहीं.

अग्रलेख—लोकमान्य—१९ जुलै १९४६

# साताऱ्याचा प्रश्न व त्याचें उत्तर—लेखांक १

सातारा जिल्ह्यांत इलाख्याचे गृहमंत्री श्री. मुरारजी देसाई यांनीं गेल्या जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत तीन दिवसांचा धावता दौरा काढला. तेथें त्यांनीं इनामदारजमिनदारापासून शेतकऱ्याकामकऱ्यांपर्यंत सर्व वर्गांच्या प्रतिनिधींच्या भेटी घेतल्या, जाहीर व्याख्यानेंही दिलीं आणि साताऱ्याच्या परिस्थितीसंबंधानें आपलें अनुमान काय आहे तें प्रांजळपणें या व्याख्यानांतून लोकांसमोर मांडले. सातारा जिल्ह्यांत गेल्या एप्रिल–मे–मध्यें गुंडगिरी व गुन्हेगारी यांना ऊत आला होता. तेव्हां तेथली परिस्थिति समक्ष पाहून तिजवर काय उपाययोजना करावी यासंबंधीं स्थानिक अधिकारी व प्रमुख नागरिक यांचेशीं विचारविनिमय करणें आणि सरकारचें मनोगत लोकांना सांगणें हा गृहमंत्र्यांच्या दौऱ्याचा हेतु होता. गृहमंत्री निघून गेल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनीं बेचाळीसच्या लढ्यांतील क्रांतिकारक बंडवाल्यांच्याशींही विचारनिविनिमय करून गुन्हेगारीचा उपशम करण्याचें ठरविलें असावें असें आजच्या अंकीं आम्हीं, सातारा जिल्ह्यांत अधिकारी व क्रांतिवीर एकत्र आल्याची जी बातमी साताऱ्याच्या ‘ समर्थ ’ वरून दिली आहे, तीवरून दिसते उलट श्री. मुरारजी देसाई यांच्या दौऱ्याचा परिणाम कसा कसा विपरीत झाला हे सातारा जिल्ह्यांतील प्रसिद्ध कार्यकर्ते आप्पासाहेब लाड यांनीं कालच्या ‘ लोकमान्यां ’तील लेखांत सांगितलें आहे. तेंही विचारार्ह वाटतें. पण या दोन्हीवरूनहि या महत्त्वाच्या बाबीचा पूर्ण उलगडा होत नाहीं म्हणून साताऱ्याच्या प्रश्नाची थोडी साधकबाधक चर्चा येथें आम्ही करूं इच्छितों.

सातारा जिल्ह्यांतील एकंदर प्रश्नाचें स्वरूप व महत्त्व कळून घेण्यापूर्वी मुरारजीभाईंचा दौरा व त्यांचे विचार यासंबंधीं दोन शब्द लिहितों. साताऱ्यांतील मुरारजीभाईंचें व्याख्यान होऊन जाताच, एरवीं भीतीनें दारूच्या गुत्त्याकडे न फिरकणारे दारुडे त्या दिवशीं गुत्त्यात जाऊन यथेच्छ

प्याले व गटारांत लोळले असें श्री. लाड यांनीं लिहिलें आहे. एवढाच मजकूर वाचून कोणासही श्री. लाड यांचा रागच येईल आणि 'मुरारजी-भाईंनीं आपल्या व्याख्यानांत दारू प्यायला उत्तेजन दिलें कीं काय' असा प्रश्न कोणीही लाड यांना खडसावून विचारील. पण या प्रश्नाचें उत्तर लाड यांनीं आपल्या लेखांत सोपपत्तिक रीतीनें दिलें आहे. दारूबंदी बेचाळीसच्या बंडवाल्यांनीं केली ती प्रतिसरकार स्थापून केली. या प्रतिसरकारनें दंडाचा उपयोग या दारूबंदीसाठीं केला व लोकमताच्या दहशतीमुळें दारूबाजांनीं दारू सोडली. पण मुरारजीभाईंनीं बेचाळीसच्या बंडापासून सातारा जिल्ह्यांत निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख 'रावणशाही' या शब्दांनीं केला, ही दहशतबाजी थांबली पाहिजे असा दम भरला आणि दारूबंदी-सारख्या सुधारणा दहशतीनें न करता अहिंसेनेंच केल्या पाहिजेत असें साताऱ्याच्या व्याख्यानांत निक्षून सांगितलें. त्याचा साहजिकच परिणाम असा झाला कीं क्रांतिवीरांनीं घातलेल्या दहशतीला मुरारजीभाईंनींच दडपून टाकलें अशी दारुड्यांची खात्री झाली व साहजिकच दारूबाजांनीं फार दिवसांच्या शिवरात्रीचें पारणें एकदम दारूचीं पिपें घशाखालीं घालून सोडलें.

मुरारजी देसाई यांच्या भाषणांच्या परिणामासंबंधानें श्री. लाड यांनीं जें उदाहरण दिलें तें क्रांतिवारास शोभणारें भडक उदाहरण आहे असें कोणी म्हणेल. म्हणून आणखी एका वेगळ्या माणसानें सांगितलेलें दुसरें उदाहरण येथें देतों. मंत्रिमंडळ एप्रिलमध्यें अधिकारावर आलें, साताऱ्चे क्रांतिवीर सरकारी परवानगीनें प्रगट झाले, मे-महिन्यांत सातारा जिल्ह्यांत गुन्हेगारी माजली आणि जूनमध्यें मुरारजींचा दौरा सातारा जिल्ह्यांतच झाला. या सर्व काळांत सातारा जिल्ह्याचे सुप्रसिद्ध सेवक—सातारा जिल्ह्याचे जणू कांहीं महात्मा गांधी असे श्री. भाऊराव पाटील हे येथील के. ई. एम्. हॉस्पिटलमध्यें रुग्णशय्येवर तळमळत पडले होते. शारीरिक व्यथेपेक्षा साताऱ्याच्या अडचणीच्या प्रसंगीं, क्रांतिवीर सुटले आहेत अशा वेळीं आपण साताऱ्यास न राहतां मुंबईतील दवाखान्यांत अडकून पडलों ही व्यथा त्यांच्या तळमळीचें मुख्य कारण होती. त्यांना भेटायला येथील एक प्रसिद्ध इमारत-कंत्राटदार आला. तो सातारा जिल्ह्यांतील आहे. मुरारजी

भाईंच्या दौऱ्याचा कोणता अनिष्ट परिणाम होईल हें तो आपल्या मतानें सांगत होता. " भाऊराव, ज्या कोरेगांव कोर्टात गेल्या दोन वर्षांत लोकांचे खटले गेले नाहीत अथवा जेथें वकीलांना वकीलपत्रें मिळालीं नाहींत तेथें आतां, प्रतिसरकारची कोर्टें बंद झाल्यामुळें, वकील आणि कोर्टें यांच्या तुंबड्या भरूं लागणार काय ? साताऱ्याची या वकीलाच्या आणि खटल्याच्या संकटांतून कधींच सुटका होणार नाहीं काय ? " असें तो कंत्राटदार भाऊरावांना विचारीत होता. " तुम्हीं लवकर परत जा आणि नवीघडी बसवा " असें तो कंत्राटदार भाऊरावांना सांगत होता.

*   *   *

श्री. लाड यांनीं दारूचें दिलेलें उदाहरण आणि वरील कंत्राटदारानें दिलेलें कोर्टखटल्याचें उदाहरण हीं सातारा जिल्ह्यांचीं दोन रोगनिदर्शकें असून हे दोन रोग साताऱ्याच्या क्रांतिकारकांनीं खेणून काढले होते. मुरारजी-भाईंच्या सद्धेतुमूलक धोरणानें ते रोग पुन्हा पूर्ववत साताऱ्याच्या शरीरात घर करणार असले तर तें महासंकट आहे. गेल्या महिन्यांतलें साताऱ्या-कडील जें वृत्त कळतें त्यावरून या रोगांची वाढ होऊं लागली असें स्पष्ट दिसतें. आणि याचें कारण मुरारजींचे हेतु वाईट आहेत असें नव्हे, तर साताऱ्यांतील बंडाचें स्वरूप, राजकीय क्रांतीचीं मूल तत्त्वें, अहिंसा तत्त्व, वगैरेसंबधानें श्री. देसाई याचा गैरसमज व दुराग्रह आहे हें या अनर्थाचें कारण आहे असें आम्ही श्री मुरारजीभाईंस नम्रपणें कळवितों. आपल्या साताऱच्या व्याख्यानांत मुरारजीभाई म्हणाले " तुम्ही अत्याचारानें राजकीय क्रांति करीत होता म्हणून तुम्हांला अपयश आलें. महात्माजींच्या मार्गानें तुम्ही गेला असता म्हणजे तुम्ही यशस्वी झाला असता. " स्वतां मुरारजी भाई म. गांधींच्या मताप्रमाणें वागूनच तुरुगांत गेले असें मानायचें असेल तर आतां त्यांना राज्यसत्तापद आलें आहे तेंच त्यांचें यशस्वी स्वातंत्र्य म्हणायचें काय ? आणि अधिकारावर आल्यापासून महात्मा गांधींची कोणतीं अहिंसा तत्त्वें पाळून मुरारजीभाई राज्य करीत आहेत ? श्राद्धाचे वेळीं पिंडदान करीत असतांना आपले पितर पिंड खाण्यास येथें हजर राहूं

शकत नाहीत या गोष्टीचा कोणीच कधीं विचार करीत नसतो त्याप्रमाणें स्वताचें वर्तन व व्यावहारिक शक्याशक्यता यांतील विसंगतीचा विचार न करतां वेळीं अवेळीं वाटेल त्या अनधिकारी माणसानें अहिंसेवर प्रवचनें करावीं व लोकांना बोल लावावा हें खरोखर गैर आहे.

अहिंसा हें फार श्रेष्ठ तत्त्व आहे. पण त्याचें वरील प्रकारचें विडंबनच आज कित्येक वर्षे चालूं आहे. त्यापासून जेव्हां तात्कालिक अपाय होत नाहीं तेव्हां त्याची फिकीरही कोणी करीत नाहीं. पण मुरारजींच्या युक्तिवादानें साताऱ्यावर आपत्ति कोसळेल अशी भीति वाटत असल्यानें या विषयाची चर्चा करणें अवश्य झालें आहे. मुरारजीभाईंना आम्हीं यापूर्वी अनेकदां सांगितलें तेंच पुन्हा सांगतों कीं सातारा जिल्ह्यांत खरेखुरें स्वराज्य कांहीं काळ स्थापन झालें होतें ही गोष्ट केवळ क्रांतिकारकांची खुशामत करण्यासाठीं बोलायची नसून ती एक ऐतिहासिक सत्यघटना म्हणून बोलायची आहे. मुरारजीभाईंना ब्रिटिश सत्तेखालीं राजदंड वापरण्याचा जितका अधिकार आहे त्याहून काकणभर अधिक अधिकार बेचाळीसच्या बंडांत स्थापन झालेल्या क्रांतिकारक सरकारला होता. त्या सरकारनें चुका केल्या असतील, अतिरेक केला असेल. पण त्यानें अहिंसा पाळली नाहीं म्हणून त्यांस दोष देणें हें अयोग्य व भ्रममूलक आहे. याहूनही महत्त्वाचा मुद्दा एक आहे तो असा. सातारा जिल्ह्यांतील क्रांतिकारकांनीं ज्या चांगल्या क्रांतिकारक गोष्टी घडवून आणल्या त्या केवळ 'हिंसेंत बुडालेल्या आहेत' म्हणून नष्ट करून, पूर्वीची समाजविघातक परिस्थिति पुन्हां सुरू करायची कीं काय? एकाद्या शिकाऱ्यानें गांवास वाघापासून वांचविण्यासाठीं वाघास फसवून पिंजऱ्यांत अडकाविलें तर "ही वाघाशीं ठकबाजी झाली, प्रथम त्याला बंधमुक्त करा आणि मग त्याजशीं न्याय्य युद्ध करा" असें म्हणणें योग्य होईल काय?

दारूबाजी आणि कोर्टबाजी वाढावी असें मुरारजीभाईंचें मत असणें मुळींच शक्य नाहीं. पण कायद्याचें व शांततेचें राज्य प्रथम स्थापन झालें पाहिजे असा मुरारजीभाईंचा आग्रह आहे. सकृद्दर्शनीं तो रास्त दिसतो. प्रांतांत प्रांतिक कायद्याचें राज्य सुरू झालें व त्यापुढें प्रतिसरकारनें आपला

पसारा आवरला, तर मग ग्रामराज्य व त्याबरोबर ग्रामकोर्टेंही रद्द होणें अपरिहार्यच झालें हें ओळखून सातारा जिल्हाध्यक्ष स्वामी रामानन्द तीर्थ यांनीं ग्रामकोर्टें रद्द केलींही. दारूबंदीविरुद्ध असलेलें दंडशासनही त्याबरोबरच थांबलें. अर्थात् कोर्टबाजी व दारूबाजी पुन्हा भडकली असली तर तें अपरिहार्यही असेल. पण त्याबद्दल मुरारजीभाईंना खेद व्हायला पाहिजे, व ही घटना बदलण्यासाठीं तांतडीचे इलाज त्यांनीं केले पाहिजेत. पण घडतें आहे तें असें कीं क्रांतिकारकाचें राज्य आवरलें जाऊन पोलीस आणि मामलेदार यांचें राज्य भक्कम होत आहे यांतच गृहमंत्र्यांना समाधान वाटतेसें दिसतें. कलेक्टर क्रांतिवीरांच्या भेटी घेऊन त्यांना मान देतात, यामुळें सरकारी अधिकारी व क्रांतिकारक यांमध्यें दिलजमाई झाल्याचा देखावा दिसत आहे. पण उलट चार वर्षें शरमिंदे झालेले गावकामगार कंबरा बांधीत आहेत. वकील, सावकार, गुत्तेवाले आणि सरकारी अधिकारी चार वर्षांतली बेकारी भरून काढण्याच्या तयारींत आहेत. रक्तानें लिहिलेलीं क्रांतीचीं अक्षरें पुसून जात आहेत. भरून गेलेली खराब परिस्थिति पुन्हा येत आहे. तीमुळें समाजजीवनास अपाय होईल. साताऱ्याचा प्रश्न व त्याचें उत्तर मुरारजीभाईंना समजलेलें नाहीं त्याचा हा परिणाम आहे. तो प्रश्न व त्याचें उत्तर याची चर्चा पुढील लेखांत करूं.

—जुलै १९४६

# साताऱ्याचा प्रश्न आणि त्याचें उत्तर—लेखांक ३

सातारा प्रकरणासंबंधानें आम्ही मुरारजीभाईंचेवर जी टीका करीत आहों तींत व्यक्तिशः मुरारजीभाईवर आमचा कांहीं राग आहे असें कोणी मानूं नये. ही टीका मंत्रिमंडळाच्या एकंदर धोरणावर आहे व पर्यायानें ती कॉंग्रेसवर आहे. मोठ्या कांग्रेस पुढाऱ्यांनीं मंत्र्यांचें धोरण व राज्यकारभार याबाबत मंत्र्यांचें सारथ्य केलें पाहिजे असें आमचें म्हणणें असून हें सारथ्य होत नाहीं यामुळें कोणती चूक घडून येत आहे ती आम्हीं उजेडांत आणून कॉंग्रेसपुढाऱ्यांना दाखवूं इच्छीत आहों. कॉंग्रेसमंत्र्यांची परिस्थिति कठिण आहे हें आम्हीं जाणतों. पुण्याचा हरिजन सत्याग्रह ही भावी संकटाची केवळ नांदी आहे. अशा संकटकाळीं मंत्रिमंडळास पाठिंबा देणें हें आमचें कर्तव्य असून त्यांत आम्ही कसूर करणार नाहीं. पण मूलग्राही स्वरूपाच्या प्रश्नांची निरवानिरव जुन्या नोकरशाहीच्या आंधळया व अहृदय पद्धतीच्या थातुरमातुर उपायांनीं करण्याचें मंत्रिमंडळाचें धोरण चूक आहे, तें बदलल्यावांचून भावि संकटापासून मंत्रिमंडळ स्वताचें व समाजाचें संरक्षण करूं शकणार नाहीं हें मंत्रिमंडळाच्या हितासाठींच आम्ही स्पष्टपणें सांगूं इच्छितों. कायदा मोडला कीं तो मोडणाऱ्याला दडपलें पाहिजे एवढीच जुनी नोकरशाही नीति. कॉंग्रेस मंत्रिमंडळानें बेचाळीसच्या बंडवाल्यांना माफी देऊन सोडून दिलें ही त्यांनीं फार चांगली गोष्ट केली. पण बेचाळीसच्या बंडाचें निदान नोकरशाहीनें केलें त्याहून कॉंग्रेसमंत्र्यांनीं कांहींच वेगळें केलें नाहीं. यामुळें जनताहिताच्या योजना कोणत्या हातीं घ्याव्या याचा मंत्रिमंडळाला कांहींहि बोध होणार नाहीं. ज्या कारणांनीं बेचाळीसची परिस्थिति उद्भवली तीं कारणें कायमच राहतील. कॉंग्रेसमंत्रि अधिकारावर असल्यानें कॉंग्रेसचे क्रांतिवीर हात बांधल्याप्रमाणें चुळबुळत राहतील आणि परिस्थिति ब्रिटिश नोकरशाहीच्या वेळेपेक्षाही अधिक बिघडेल हा धोका महत्त्वाचा आहे.

म्हणून साताऱ्याच्या प्रश्नाचें स्वरूप मंत्रिमंडळानें व कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं प्रथम समजून घ्यावें अशी आम्ही विनंति करतों. साताऱ्याचा प्रश्न हाच जवळ जवळ साऱ्या महाराष्ट्राचा प्रश्न तरी खास आहे. पण साताऱ्यास तो अधिक स्पष्टपणें दृग्गोचर झाला. १९४२च्या बंडांत क्रांतिकारकांनीं प्रातिनिधिक न्यायकोर्टें स्थापून फौजदारी व दिवाणी खटल्यांचे न्यायनिवाडे केले. सावकार, जमिनमालक व सरकारी अधिकारी यांजकडून सामान्य शेतकऱ्याची पिळणूक व छळ होई त्यास आळा घातला आणि गुंड, चोर, दरोडेखोर, यांना पकडून शासन करून जनतेला स्वास्थ्य मिळवून दिलें. हें प्रचंड कर्तृत्व गाजविणारीं माणसें अगदीं सामान्य अशिक्षित अशीं आहेत. त्यांना हें सर्व राजकीय क्रांतीचें कौशल्य साधलें असेल या गोष्टीवर मुरारजीभाईंचा भरंवसाच बसत नाहीं. तो न बसो, पण निदान सातारा जिल्ह्यांत कोर्टांतील खटले व सावकारी याजवर लोकांचा विशेष राग आहे एवढें तरी मुरारजीभाईंच्या लक्षांत आलें आहे काय ? सातारा व आसपासचा मुलूख:हा किती तरी काळ ब्राह्मणब्राह्मणेतर वादाच्या रोगानें पछाडलेला होता.पण बेचाळिसच्या बंडांत ही जातीय तेढ पूर्णपणें नष्ट झालेली दिसली इतकेंच नव्हे तर अस्पृश्यतानिवारण, दारूबंदी यांसारखे प्रश्नही भराभर सोडविले गेले. ज्याना अशिक्षित लोकांनीं हें सर्व कसें घडवून आणलें हें कळत नाहीं त्यांनीं गेल्या पन्नास वर्षांचा या भागाचा इतिहास समजून घेतला पाहिजे. या इतिहासा वरून बेचाळीसच्या बंडाचें साताऱ्यांतील विशेष स्वरूप समजेल व त्याचा भावी काळासाठीं उपयोग करून घेतां येईल.

+ + +

साताऱ्यातील ( म्हणजेच अखिल महाराष्ट्रांतील ) या ऐतिहासिक परिस्थितीचें स्वरूप दुहेरी आहे. ब्रिटिश अंमल येथें दृढ झाल्यानंतर पालटलेली भौतिक परिस्थिति आणि त्याचबरोबर घडत आलेली विचारक्रांति अशा त्या एकंदर प्रश्नाच्या दोन बाजू होत. पेशवाई व मराठेशाही नष्ट झाल्यानंतर वरिष्ठ मराठा सरदार वर्ग नुसताच ऐदी व खाबू बनला आणि सामान्य मराठा सैनिकानें तरवार फेकून देऊन नांगर हातीं घेतला. पेशवाई अमलांत ब्राह्मण हा वर्चस्वशाली झाला होता. तो कारकून, अधिकारी सेना-

पति, सावकार, जमिनमालक होता. पेशवाई बुडताच त्यानें तरवार टाकून ब्रिटिशासाठीं लेखणी हातीं धरली. जमिन-मालकी व सावकारी त्याजकडे पूर्वीसारखी राहिली. सावकारी व दुकानदारी करणारा वाणी हा या ब्राह्मण-वर्गाशीं कधीं सहकार व कधीं स्पर्धा करून समाजावर आर्थिक प्रभुत्व चालवीत होता. ब्रिटिश अमलामुळें चोऱ्या, दरवडे नष्ट होऊन स्वास्थ्य आलें. कराराचा व मिळकतीच्या देवघेवीचा कायदा जारी झाला. खेड्यांतील धंदे हळुहळू बुडाले आणि बेकार सैनिक व बेकार धंदेवाईक यांची शेत-जमिनीवर गर्दी झाली. यामुळें जमिनीचे खंड वाढले, तुकडे पडूं लागले, फाजील खंडामुळें शेतकरी कंगाल व कर्जबाजारी झाला. कायद्याची कैची कठोर झाल्यामुळें सावकाराचें कर्ज व जमीन-मालकाचा खंड वसूल होण्यापायीं शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे जाऊं लागल्या.

हळुहळु शेतकरी इतका दरिद्री झाला कीं त्याला कितीहि पिळून चिपाड केलें आणि कायद्याची केवढीही कठोर कैची लावली तरी खंड आणि व्याज वसूल होणें अधिकाधिक कठिण होत गेलें. यामुळें सावकार व जमीनमालक 'शेती परवडत नाहीं' असें म्हणून पैसा शेतींत न गुंतवता, शहरांतील इमारती, शहरांतील धंदे, मुलांचें शिक्षण यांत खर्चूं लागले. जिल्ह्याच्या व तालुक्याच्य ठिकाणीं सुशिक्षितांचा मुख्य धंदा वकीलीचा झाला. वकील होणें म्हणजे श्रेष्ठ असें मानलें जावूं लागलें. पण या वकीलीच्या धंद्यानें सामान्य जनतेचा आर्थिक तळ पार खणून काढून त्यांतील माती साफ वाहून नेली. अधिकाधिक श्रीमंताकडे गरीबांच्या जमीनी पोंचविणें आणि, जमीनीवरून होणाऱ्या मारामाऱ्या व खून यांत दोन्ही पक्षीं वकीलपत्रें मिळवून कोर्टाच्या कैलास शिखरापर्यंत जाण्याच्या निमित्तानें गरीबांचा पैसा लुटणें याच गोष्टी महाराष्ट्रांतील वकील वर्गानें प्रामुख्यानें केल्या आहेत. इतर प्रांतांतही वकीलानें हेंच केलें. फावल्या वेळांत याच वकीलानें राजकीय चळवळही केली. यामुळें वकील वर्ग हा समाजाच्या अभिमानाचा विषय झाला. पण दिवसानुदिवस वकीलाच्या धंद्याचें हें स्वरूप उघड झालें आहे. यात दोष वकीलाचा नसून परिस्थितीचा आहे. अखेर आतां परिस्थिति अशी झाली आहे कीं, शेतकरी कफल्लक झाला आणि वकीलांची संख्या वाढत गेली, त्यामुळें नव्या वकी-

लाला धंदाच मिळेनासा झाला व तोही वर्ग कंगाल होत चालला आहे. व्यापारी वर्ग मात्र कंगाल न होतां धनिकपणांत सुशिक्षितांच्या पुढें त्यानें मजल मारली. महाराष्ट्रांत मराठा सरदार, ब्राह्मण वकील आणि कुणबी शेतकरी यांपेक्षां फारच फार वाढत्या प्रमाणांत वाणी व्यापाऱ्याचें आर्थिक वर्चस्व वाढलें. दारिद्र्याच्या या दुर्धर आपत्तींतून समाजास डोकें वर काढता येणें अशक्यच झाल्यासारखें दिसूं लागलें.

या सर्व काळांत महाराष्ट्रांत विशेषतः कोल्हापूरच्या शाहूमहाराजांच्या प्रेरणेनें एक नवीन विचारक्रांति होत होती. शाहूमहाराजांपूर्वी श्री. जोतीराव फुले यांनीं सामाजिक क्रांतीचा प्रचार केला. ब्राह्मण आणि वाणी यांचें त्यावेळीं महाराष्ट्रांत आर्थिक वर्चस्व फार मोठें असल्यामुळें ज्योतिबांच्या अनुयायांचा त्यावेळीं या वर्गावर फार कटाक्ष होता. जोतिबांच्या मागून शाहूमहाराजांनीं जोतिबांच्या चळवळींचीं सूत्रें उचललीं. त्यांच्या उत्तेजनानें मराठे, जैन, अस्पृश्य या समाजांत जागृति होऊन या मागासलेल्या वर्गांतून शिकलेले लोक पुढें येऊं लागले. त्यावेळीं महाराष्ट्रांत ब्राह्मण व वाणी वर्गांचे सर्वत्र प्रभुत्व असल्यानें सामान्य जनतेच्या चळवळीस 'भटजी व शेटजी-विरोधी चळवळ' ऊर्फ ब्राह्मणेतर चळवळ असें नांव व स्वरूप आलें. शाहू महाराजांच्या अखेरच्या दिवसांत या चळवळीचा प्रसार सातारा जिल्ह्यांत बराच होऊन ब्राह्मण वर्गास तेथें अतिशय त्रास झाला. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींचे विचार व नेतृत्व महाराष्ट्रांत जसजसें पसरत गेलें तसतशी लोक-जागृतींतील जातीय भावना नाहींशी होऊन तिला राजकीय व आर्थिक स्वरूप येऊं लागलें. ब्राह्मणांचें वर्चस्व कमी होऊन मास्तर, मामलेदार, सावकार, वकील या जागांवर मराठे आले. तेव्हां समाजाची पिळणूक व छळणूक कमी न होता अधिकच निपटून व अधिक निर्दयपणें होऊं लागली व ही गोष्ट मराठा तरुणांना कोल्हापूर संस्थान व सातारा जिल्हा या दोन्ही मुलखांत कळून येऊं लागली. याचा परिणाम असा झाला कीं १९३० च्या सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळीं सातारा जिल्ह्यांत जातीय चळवळ बहुतेक नामशेष झाली होतीं.

जातीय भावना नष्ट होऊन राष्ट्रवादाचा प्रसार तीव्रतेनें होण्यास म. गांधींची शिकवण विशेष उपयोगी पडली. त्याच काळांत शिक्षणप्रसार, अस्पृश्यतानिवारण व समाजसुधारणा हें कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनीं आपल्या रयत शिक्षणसंस्थेच्या द्वारें फार मोठ्या प्रमाणावर केलें. अगदीं

कहानसान खेड्यापर्यंत शेकडा शाळा भाऊरावनीं स्थानिक पैसा उभारून काढल्या व स्पृश्यास्पृश्यांचें बोर्डिंग स्थापून महार, मांग येथपर्यंतच्या विद्यार्थ्यांना बी. ए, एम. ए. पर्यंत शिक्षण दिलें. भाऊराव यांचें स्वतःचें चारित्र्य, त्याग आणि समाजसेवा समर्थ रामदासांची आठवण करून देण्याइतकी उज्ज्वल असून गांधीजींच्या स्फूर्तिइतकीच समाजसेवास्फूर्ति श्री. भाऊराव पाटील यांनीं साताऱ्यांतील तरुणास दिली आहे. गेल्या बारा चौदा वर्षांत सातारा जिल्ह्यांत समाजवादी व गांधीवादी या दोघांच्या शिकवणीमुळें समाजसेवकांचा फार मोठा वर्ग सातारा जिल्ह्यांत पुढें आला व त्यानें खेडोपाडीं विचारजागृति केली. या सर्वांना भाऊराव पाटील हे स्फूर्तिदाते व समाजसेवकाचा श्रेष्ठ आदर्श म्हणून डोळ्यापुढें दिसत होते. बेचाळीसच्या संग्रामांतील पुढारी नाना पाटील व त्याचे अनेक सहकारी हे १९३० पासूनच्या प्रमुख कार्यकर्त्यांतले असून ते म. गांधीबरोबर भाऊराव पाटलांचेंही नांव आपले स्फूर्तिदाते म्हणून घेत असतात.

× × ×

या क्रांतिवीरांचें मनांत जातीयता नाहीं हें आज त्यांचें वैशिष्ट्य नसून समाजजीवनांत खरा रोग कोणता आहे व त्याचें निवारण कसें करावें याचें मर्म त्यांना कळलें आहे हें त्यांचें वैशिष्ट्य होय. कोर्टातल्या खटल्यांनीं, ओढ्यांतल्या मारामाऱ्यांनीं अथवा खुनांनीं शेतकरी फक्त कफल्लक होत जातो, शेती खालावत जाते. म्हणून शेतीविषयक खटले व गुन्हे बंद करून शेतीच्या उत्पन्नाला शाश्वती व वाढीला उत्तेजन देणें या गोष्टी साताऱ्यांतील बंडवाल्यांनीं प्रामुख्यानें केल्या. दारूबंदी केली, रखेली–पद्धत बंद करून स्त्रीला समाजांत सन्मान्य स्थान मिळवून दिलें. ही बंडवाल्यांची कामगिरी फार मोठी आहे. १९३०नंतर जी निर्भेळ राष्ट्रवादाची लाट सातारा जिल्ह्यांत पसरली तीमुळें सामान्य शेतकरी जागृत व बेडर झाला. सामान्य शेतकऱ्यालाही आपल्या सामुदायिक जीवनाचे प्रश्न कळूं लागले. इतकी जागृति व निर्भयता सामान्य जनतेपर्यंत इतर कोणत्याच जिल्ह्यांत पसरली नव्हती. साहजिकच पन्नास-पाऊणशें वर्षेपर्यंत जुलमानें राज्य करणारे पोलिस व इतर अधिकारी यांना जनतेच्या प्रतिकारवृत्तीबद्दल चेव येऊन असंतुष्ट अस्पृश्य लोक व गुन्हेगार प्रवृत्तीचे कांहीं लोक यांना या नोकरशाहीनें चिथावणी अथवा सवलत दिली यामुळें १९४०–४२ च्या काळांत

सातारा जिल्ह्यांतील कांहीं भागांत गुन्हेगारीस अगदीं ऊत आला होता. पण गांधींनीं 'करेंगे या मरेंगे' चा संदेश देऊन स्वातंत्र्यस्थापनेचा आदेश दिला तेव्हां सातारा जिल्ह्यांतील कांग्रेसवादी तडफदार शेतकरी तरुणांनीं गुंड व गुन्हेगार यांचें पारिपत्य करून समाजाचा रोग होऊन बसलेल्या कोर्टकचेऱ्यांना, फौजदारी गुन्ह्यांना, सावकारी आणि जमिनदारी पिळणुकीला पायबंद घातला. साताऱ्याचें बंड आतां शमलें असलें तरी बंडवाल्यांनीं या ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्या कायम राहिल्या पाहिजेत.

मुरारजी देसाई यांच्या लक्षांत नेमकी हीच गोष्ट येत नाहीं. बेचाळीसच्या बंडवाल्यांनीं राज्य स्थापूनच या गोष्टी केल्या तेव्हां त्या हिंसेनें केल्या म्हणून त्यांना दोषी मानणें हें अगदीं गैर आहे. शिवाय तें सर्व पदरांत पडलेलें यश आहे. क्रांतिकारकांनीं कॉंग्रेस सरकारसाठीं आपली राज्यसत्ता सोडली. त्यांचीच मदत कॉंग्रेस सरकारनें घेऊन या गोष्टी पुढें कशा चालू ठेवायच्या याचा विचार तांतडीनें केला पाहिजे. उदाहरणार्थ दारूबंदी अमलांत राहावी म्हणून नव्या कायद्याची जरूर ती मदत घेऊन गांवांतील पुढाऱ्यांच्या कमिट्यांच्या हवालीं तें काम करणें सहज शक्य आहे. तसेंच ग्रामपंचायत कायदा सुधारून कोर्टबाजीला आळा घालण्याचें धोरण आपण कसें करणार आहों हें सांगून लवादपद्धतीस उत्तेजन देण्याचें धोरण सरकारनें जाहीर केलें पाहिजे. पण या गोष्टींचें महत्त्व मुरारजीभाईंना वाटतेसें दिसत नाहीं. कायदा आणि शांतता यांचें नोकरशाही राज्य झटकन स्थापन झालें म्हणजे पुरे असें त्यांना झालें आहे. मध्यंतरीं जी गुन्हेगारी माजली ती कॉंग्रेस सरकारला भेडसावण्यासाठींच माजली व नोकरशाही त्याबाबतींत फारशी अलिप्त असणें अशक्य आहे. तीमुळें मुरारजी भ्याले. नोकरशाहीला यश आलें. बेचाळीसचें बंड शमलें इतकेंच नव्हे तर त्या बंडाची सुफळेंही नष्ट झालीं आणि पुन्हा कायद्याचें, वकीलाचें, कोर्टबाजीचें, पिळणुकीचें राज्य सुरू झालें आहे. हें चांगलें नाहीं. १९४२ च्या पूर्वीची स्थिति पुन्हा आणण्याचा दुराग्रह चुकीचा आहे. नवें धोरण अधिक मूलग्राही असणें जरूर आहे. तें कसें असावें याचा विचार उद्यांचे अंकीं करून ही लेखमाला आम्ही संपविणार आहों.

# सातार्‍याचा प्रश्न आणि त्याचें उत्तर—ले. ३ (शेवटचा)

सातारा जिल्ह्यांत दारुबंदी केली अथवा ग्रामपंचायतीचीं कोर्टें स्थापलीं म्हणजे सरकारनें करायला हवें तें सर्व झालें असा आमचा समज मुळींच नाहीं. बेचाळीसच्या बंडवाल्यांनीं प्रमुख्यानें याच गोष्टी केल्या व त्या नव्या अमदानींत नव्या स्वरूपांत कायम राहाव्या असें आमचें म्हणणें आहेच. पण या दोन गोष्टी म्हणजेच बेचाळीसच्या बंडाचें सारसर्वस्व नव्हे. बेचाळीसच्या बंडांतील या दोन बाबी लाक्षणिक होत्या. ज्या विशिष्ट परिस्थितींतून गेलीं पाऊणशें वर्षें महाराष्ट्रास व विशेषतः सातारा जिल्ह्यास जावें लागलें त्या परिस्थितीशीं जनतेनें बेचाळीसच्या बंडांत केलेली प्रतिक्रिया म्हणजे दारूबंदी, पंचायत कोर्टें इत्यादि बाबी होत. यालाच संकलितपणें ग्राम-राज्य मानण्यांत येऊं लागलें. कोणत्या विशिष्ट परिस्थितीशीं हा झगडा होता हें कालच्या अंकीं सांगितलें आहे. लोकाचे खटले चालविण्याची ऐट मिरविणें हा त्यांत हेतु नव्हता. जमिनीसाठीं खटले चालवून आणि मारामार्‍या करून गावेंचीं गावें आपण उजाड केलीं याच्या पश्चा-त्तापाचें द्योतक असें हें गांवपंचायत कोर्ट होतें. पण फक्त खटले थांबण्यानें आपले प्रश्न मिटत नाहींत ही गोष्ट नाना पाटील, पांडू मास्तर, किसन वीर, आप्पा लाड या लोकांना माहीत होती. ब्रिटिश अंमल आल्यापासून काय-द्याचें राज्य आलें त्याचा परिणाम खंड वाढण्यांत झाला. पुढें जमिनी कायद्याच्या कैचीनें सावकाराकडे गेल्या पण या जमीनमालकांनीं शेतींत भाडवल गुंतविण्याचें कमी कमी केलें. त्यामुळें शेती, शेतकरी व त्याबरोबर सारा महाराष्ट्र भिकेस लागण्याची पाळी आली. महाराष्ट्रांतील सर्व वर्ग दरिद्री होऊन अखेर फक्त व्यापार्‍यानें सारी लूट मारली. महाराष्ट्राला या दारिद्र्यांतून व पिळणुकींतून बाहेर काढणें हें खरें कार्य आहे हें क्रांतिवीराना कळतें. त्यांनीं व सरकारनें हें केलें पाहिजे.

खंडाच्या काळांत प्रतिसरकार व ब्रिटिश सरकार यांचा लढा चालू असल्यामुळें क्रांतिकारकांना ज्या गोष्टी करतां आल्या नाहींत त्या आतां कायदेशीरपणाच्या काळांत करतां आल्या पाहिजेत व सरकारनें त्या केल्या पाहिजेत. महाराष्ट्राची शेती गेल्या पन्नास वर्षांत भांडवल नाहीं म्हणून मागासली हें कालच्या अंकीं आम्हीं दाखविलें आहे. ही शेती सुधारायची असल्यास जमिनमालकांच्या खंडांतला अमुक एक भाग सक्तीनें शेतीला भांडवल म्हणून घेतला पाहिजे. तसेंच शेतकऱ्यावर खंडाचें जें डोईजड ओझें चढलें आहे तें कायद्यानें कमी करून खंड चढाओढीच्या तत्त्वावर ठरणें अशक्य केलें पाहिजे. सरकारच्या कूळकायद्यानें कुळांना कायम वहिवाटीचे हक्क मिळालेच आहेत. कायम वहिवाटीचा हक्क, हलका खंड व भांडवलाचा पुरवठा या तीन गोष्टी शेतकऱ्यास मिळाल्यास आजच्या परिस्थितींत शेती करण्याला त्याला उत्तेजन येईल. मात्र एवढ्यानेंच भागलें नाहीं. खरें महत्त्वाचें कार्य पुढेंच आहे. ब्रिटिश अमदानींत 'भटजी व शेटजी' यांचें वर्चस्व माजून त्यांनीं समाजाला पोखरून काढलें अशी सत्यसमाजवाद्यांची मुख्य तक्रार होती. तींतील जातीय भाव आतां मागें पडला असून लोक आपली तक्रार आतां आर्थिक व सामाजिक भाषेंत मांडूं लागले आहेत. न्यायकोर्टें, वकील, सावकार आणि व्यापारी यांजकडून समाजाची लूट होते ती थांबविण्याची लोकांची मागणी आहे. लोकांना या गोष्टी अशा तात्त्विकपणें कळत नाहींत असें म्हणणारे लोक स्वतः मूर्ख आहेत. सातारा जिल्ह्यांत जाहीर सभांतून अशिक्षित शेतकरी या गोष्टी बोलतात. ग्रामपंचायत कोर्टांनीं कोर्टबाजीचें व्यसन बंद करावें, सहकारी तत्त्वावर सावकारी व शेती सुरू करून सावकार व व्यापारी निर्मूल करावा हें लोकांना हवें आहे. लोक तपशीलानें या गोष्टी बोलत आहेत.

सावकार व व्यापारी यांना समाजांत कधींकाळीं उपयुक्त स्थान असेलही. पण आज तरी हे दोन वर्ग भुंगा बांबू पोखरतो त्याप्रमाणें समाजाला पोखरून खात आहेत. शेतकऱ्याला कायम जमीनवहिवाट, कमी खंड व भांडवलाचा पुरवठा या गोष्टी दिल्या पाहिजेत. त्याप्रमाणेंच त्याला

व्यापाऱ्याच्या व सावकाराच्या कैचींतून सोडविला पाहिजे. शेतीसाठीं लागणारें कर्ज सहकारी पतपेढ्यातून मिळण्याची व्यवस्था आजवर रूढ आहेच, पण तीमुळें लोकांचा मुळींच फायदा झालेला नाहीं. याचें कारण काय ? याचें कारण शेतकऱ्याची व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबली नाहीं उलट वाढली हें होय. शेतकऱ्याची लूट सर्व बाजूंनीं होतें. त्यांत व्यापारी लूट कमालीची क्रूर व कमालीची निपटून होते. शेतकरी शेतासाठीं प्रथम कर्जबाजारी होतो. नंतर शेतकऱ्याच्या निकडीचा गैरफायदा घेऊन व्यापारी शेतकऱ्याकडून फाजील किंमत घेऊन त्याला माल विकतो एका टोकास शेतकऱ्याची ही लूट झाल्यानंतर दुसऱ्या टोकास म्हणजे शेतीचा माल विकण्यास जेव्हां शेतकरी बाजारांत येतो तेव्हांही तो पुन्हा व्यापाऱ्याच्या राक्षसी दाढांत सापडतो आणि चरखांतून निघणाऱ्या उसासारखा पिळून निघतो. खेडुतांना ही पिळणूक अतीशय जाणवते. खेड्यापाड्यांतून शेतकरी कंगाल तर व्यापाऱ्यांच्या तीन तीन मजली हवेल्या व लक्षावधीचा व्यापार असून कलेक्टर, मामलेदार, वकील, मास्तर सगळे वर्ग व्यापाऱ्यांचे मिंधे असतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. उत्पादनव्यवहाराच्या दोन्ही टोकाकडून शोषला जाणारा शेतकरी सहकारी सोसायट्यांचीं कर्जें बुडवितो. व्यापाऱ्याच्या कैचींतून शेतकऱ्यास सर्वस्वी सोडविल्याखेरीज त्याचें दारिद्र्य नष्ट होणार नाहीं.

शेतकऱ्यास व्यापाऱ्याच्या कैचींतून सोडविण्यासाठीं अगदीं क्रांतिकारक उपाय अमलांत आणणें अवश्य असून ग्रामपंचायतीमार्फत सरकारनें त्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे व जनतेनें आणि पुढाऱ्यांनीं या कामीं सरकारी धोरणास उचलून धरलें पाहिजे. हा क्रांतिकारक उपाय म्हणजे सारा बाजारव्यवहारच सरकारनें स्वतः म्हणजे समाजामार्फत सहकारी पद्धतीनें चालविणें हा होय. हल्लीं शेतकऱ्यांचें धान्य ठराविक व योग्य दरानें विकत घेऊन व त्यावर माफक कमिशन आकारून लोकांना तें विकण्याचें जें सरकारचें धोरण आहे तें या भावी बाजारपद्धतीचा चांगला आरंभ आहे, यापुढें पाऊल टाकून सरकारनें शेतकऱ्यास लागणारे बैल, औतें व इतर साहित्य माफक, कमिशननें शेतकऱ्यास पुरविलें पाहिजे. तसेंच शेतकऱ्यास लागणारें कापड, औषधें व इतर नाना वस्तु सहकारी तत्त्वावर ग्रामपंचायतीनें

दुकानें काढून शेतकऱ्यास पुरविणें जरूर आहे. या कार्यासाठीं गांवकऱ्याकडून भांडवल जमविणें, दुकान चालविणें या गोष्टी गांवकऱ्यांनीं स्वराज्याच्या जबाबदारीनें केल्या पाहिजेत. यांतून व्यापाऱ्याचें सर्वस्वी उच्चाटन झालें पाहिजे. या सहकारी धंद्यांतून अगदीं अल्प व्याज भांडवलावर दिल्यास केवढा प्रचंड नफा उरेल याची कल्पना खेडोपाड्यांतून व्यापाऱ्यांच्या हवेल्या व दौलती केवढ्या माजल्या आहेत हें पाहिलें असतां सहज येईल. हा सर्व नफा मग खेड्याच्या सुधारणेसाठीं-शाळा, दवाखाने आरोग्यरक्षण, वगैरे कामासाठीं खर्च केल्यास आज लोकहितासाठीं पैसा कोठून आणावा हें जें कोडें सरकारला पडतें तें आपोआप सुटेल. यापुढील कार्य म्हणजे सहकारी शेती हें. आजच्या चिरटोळया शेतींत मागसलेल्या साधनांनीं शेतीचें उत्पन्न अगदींच थोडें येतें. त्याऐवजीं गांवपंचायतीनें एकेका गांवाची शेती सहकारी पद्धतीनें करायचें ठरविल्यास शेतींचें पीक आधुनिक साधनांचा उपयोग करून अफाट वाढविता येईल.

ही सर्व चळवळ समाजक्रांतीची आहे. व्यापारी, वकील, अधिकारी या सर्वांनीं पोखरून कंगाल करून टाकलेल्या महाराष्ट्रास या उपायावांचून आतां अन्य मार्ग नाहीं. पुढील चारपांच वर्षांत सरकार व शेतकऱ्यांचे पुढारी यांनीं हें धोरण न अवलंबिल्यास व्यापारी वर्ग महाराष्ट्राच्या संबंध शेतीचे व उद्योगधंद्यांचें ‘खरेदीकरण’ करून ‘संघटन’ आपल्या हातीं घेईल आणि सारा महाराष्ट्र हा सर्वस्वी कंगाल हमाल बनेल. सर्व महाराष्ट्राची ही जी गरज ती जागृत व कर्तृत्ववान नागरिकांच्या पाठिंब्यानेंच भागविता येईल. त्यासाठीं जनतेची मनोभूमिका क्रांतिकारी बनविली पाहिजे. साताऱ्यांत ही मनोभूमिका बेचाळीसच्या बंडानें बनविली आहे. म्हणून सातारा जिल्हा हा या प्रयोगासाठीं तेथल्या पुढाऱ्यांनीं, जनतेनें व सरकारनें निवडावा तरच बेचाळीसच्या बंडाचें खरें पारणें फिटेल. बेचाळीसच्या बंडानें भाजलेल्या व बुभुक्षित झालेल्या साताऱ्याच्या भूमींत समाजक्रांतीचें बीजच पेरलें पाहिजे. ही भूमि पुनः वकील, पोलीस, मामलेदार व व्यापारी यांच्या हवालीं करण्यानें साताऱ्याचा व महाराष्ट्राचा सर्वनाश होईल. तेथली परिस्थिति, पुढाऱ्यांचीं धोरणें,

अधिकाऱ्यांचा कावा आणि काँग्रेसमंत्र्यांचा भोळा भाव, दुरभिमान व गैरसमज हें सर्व आम्ही जाणतों. जखम स्पर्शानें व परिस्थिति शब्दांनीं दुखवूं नये म्हणून कितीतरी कठोर शब्द व विचार मागें ठेवून आम्ही येथें फक्त विधायक चिकित्सा व सूचना करीत आहों.

आजच्या अवघड परिस्थितींतून वाट काढण्याचें सामर्थ्य एका थोर पुरुषाचे अंगीं आहे त्याचें नांव सरकार व क्रांतिवीर या दोघांनाही सुचवितों. भाऊराव पाटील हे उभयतांनींही आपले सल्लागार व पुढारी मानावे. बाळासाहेब खेर व नाना पाटील हे दोघेही भाऊराव पाटलांना सारखेच मानतात हें आम्हांस माहीत आहे. वर जो क्रांतीचा आराखडा आम्हीं दिला तो भाऊरावांना माहित असून, त्यांना तो पटलेला आहे. तो अमलांत आणण्याचा त्यांचा निर्धार आहे असेंही आम्ही ऐकतों. हाच निर्धार पार पाडा असें आमचें भाऊरावांना सांगणें आहे. भाऊरावांना यापुढें सत्तांच्या शिक्षणाची भूक लागली आहे; पण मंत्रिमंडळाजवळ खरो-खरच पैसा इतका थोडा आहे कीं खेडोपाड्याच्या उन्नतीच्या गरजा भागविणें मंत्रिमंडळाला अशक्यच होईल. अखेर खेडुतांनीं अधिक पिकविलें पाहिजे, त्यांतला अधिकाधिक वाटा खेडुतांना मिळाला पाहिजे व खेडुतांच्या गांव-पंचायतीनें खेडुतोद्धाराचा पैसा खेडुतांच्या वाढलेल्या उत्पन्नांतून मिळविला पाहिजे. शेती सामुदायिक केली व व्यापारी ही संस्थाच समाजांतून नाहींशी करून सहकारी पद्धतीनें खरेदीविक्री केली तर खेड्यांच्या उन्नतीला लागणारा पैसा खेडुतांच्या सामुदायिक जीवनांतून खास निघेल.

सर्व पक्षांच्या व समाजाच्या आदरास पात्र झालेल्या भाऊराव पाटलांसारख्या पुढाऱ्यांनीं आपली उरलेली हयात ज्या कामीं राब-वावी अशा महत्त्वाचें हें कार्य आहे. पुढील चार पांच वर्षांत हें कार्य न होईल तर महाराष्ट्रांतील शेतकरी वर्ग लिलावांत निघेल आणि त्याची खरेदी येथें दृढमूल झालेला व्यापारी वर्ग करील. मग शिवाजीचे अळणी पोवाडे गाण्याहून दुसरें कर्तव्य येथें कांहीं राहणार नाहीं. मंत्रिमंडळास

आमची विनति की तुमचा पाडाव करण्यासाठीं हा प्रचार नाहीं. आम्हा सर्वांचें पुढारी जे महात्मा गांधी त्यांचें धोरण यशस्वी व्हायचें असेल तर सातान्यांत आज त्याची मुहूर्तमेढ रोवण्यास बेचाळीसच्या बंडानें मनोभूमिका तयार केली आहे. पण या बंडाबद्दल मंत्रिमंडळाचा गैरसमज आहे. परिस्थितीवर उपाय काय करावा यासंबंधानें मंत्रिमंडळाचें धोरण चुकीचें दिसतें. म्हणून त्यांना साहाय्य करण्यासाठीं हा दृष्टिकोण मांडला आहे. मंत्रिमंडळ, भाऊराव पाटील, नाना पाटील या सर्वांचें सहकार्य घडून सातारा जिल्ह्याच्या व महाराष्ट्राच्याही उद्धाराचें हें कार्य लवकर हातीं घेतलें जावो अशी आशा व्यक्त करून ही लेखमाला पुरी करतों.

—जुलै १९४६

# रशियांतील नवें 'सनातनी' जीवन

रशियांत १९१७ सालीं राज्यक्रांति झाली हें रशियाचें वैशिष्ट्य खरेंच, पण त्याहूनही मोठें वैशिष्टय असें कीं, रशियांतली १९१७ ची क्रांति झाल्यानंतर तेथलें जीवन कधींच स्थिरावलें नाहीं. त्यांत एकीमागून एक अशा क्रांतीच्या लाटा एकसारख्या येतच आहेत. चीनमध्यें १९११ सालीं राज्यक्रांति झाली व तेथेंही अजून स्थिरावलेलें जीवन नाहीं; असा या रशियांतील अस्थिर जीवनाचा अर्थ आहे काय ? मुळींच नाहीं. चीन जो क्रांतीच्या कोलाहलांत सांपडला तो तेव्हांपासून गेलीं ३३ वर्षे परचक्र व अंतर्गत यादवी या दुहेरी संकटांत सांपडलेला असल्यानें त्याचें जीवन अस्थिर झालें आहे. उलट रशियांत राज्यक्रांति, यादवी व परचक्र यांचा कालखंड १९१७ पासून १९२० पर्यंतच टिकला व संपला. त्यानंतर अंतर्गत पुनर्घटनेचें जें कार्य रशियांत चालू आहे तेंच क्रांतिमय झालें आहे. धनोत्पादन-संघटनेची सुधारणा, भांडवली धनाची व भोग्य धनाची वाढ आणि संभाव्य युद्धसंकटाशीं झुंजण्याची वाढती तयारी या तीन गोष्टींवर गेल्या २४ वर्षांत सोव्हिएट रशियानें विशेष भर दिला असून या प्रयत्नाच्या अनुषंगानें व वैचारिक आंदोलनामुळें रशियाच्या कौटुंबिक, नैतिक सामाजिक, सांस्कृतिक वगैरे सर्व प्रकारच्यां जीवनांत एकसारखे पालट होत आहेत हे पालट नेहमीं एकाच दिशेनें होत नसल्यानें प्रत्येक पालट हा प्रगतिपर आहे कीं नाहीं या प्रश्नावर जगभर विचारवंतांत मतभेद माजले आहेत. उदाहरणार्थ, रशियाचें नवें धर्मविषयक धोरण आणि स्त्रीपुरुषांच्या विभक्त शिक्षणाची नवी प्रथा या गोष्टी रशियाच्या कांहीं अभिमान्यांनाही प्रतिगामी वाटत आहेत. लैंगिक संबंधविषयक जी नवी नीति रशियांत रूढ होत आहे तीबद्दल तर यांना तोंडांत बोट घालण्याइतकें आश्चर्य वाटतें. कुटुंबसंस्था व वैवाहिक जीवन उध्वस्त करूं लागलेला रशिया आतां हिंदु सनातन्या-

पेक्षांही पातिव्रत्यप्रेमी व कुटुंबशील होऊं लागलेला दिसतो. रशियाच्या या नित्य बदलणाऱ्या जीवनासंबंधानें ठोकताळ्यानें मतें ठोकून देण्यापेक्षां तें जीवन अधिक जवळून व तपशिलांत समजून घेण्याचा वाचकांनीं प्रयत्न करावा अशा बुद्धीनें, मॉरिस हिंडस या लेखकाच्या ' मदर रशिया ' या अगदीं नव्या ग्रंथाच्या आधारानें रशियांतील पतिपत्नीसंबंधविषयक जीवनाचें हल्लींचें स्वरूप मी येथें थोडक्यांत मांडणार आहें.

संपत्तिसाधनें ही राष्ट्रीय मालकीचीं करणें हें कम्युनिस्टांचें महत्त्वाचें तत्त्व असल्याचें सुप्रसिद्ध आहे. त्यावरून कम्युनिस्ट हे स्त्रियाही राष्ट्रीय मालकीच्या करतात असा आरोप त्यांचेवर केला जात असून मार्क्सनें नव्वद वर्षांपूर्वी कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंत या आरोपाचा उल्लेख व इन्कारही केला, पण हा आरोप करण्याचा प्रघात कांहीं थांबला नाहीं. रशियन कम्युनिस्ट समाजासंबंधानें परदेशीयांची हीच समजूत आहे. रशियन राज्य-क्रांतीनंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत रशियांत जुन्या समाजव्यवस्थेविरुद्ध जी प्रतिक्रिया झाली तीमध्यें वरील आरोप खरा वाटावा असे प्रकार केव्हां केव्हां घडले. शहरांतील विद्यार्थ्यांत झारशाहींतील गुलामगिरीविरुद्ध प्रति-कार करणाऱ्या ज्या कल्पना पसरल्या होत्या त्या शुद्ध रानटी होत्या. लैंगिक बाबतींत बेताल वर्तन हेंच क्रांतिकारक वर्तन होय असें त्यांच्या मनानें घेतलें. त्या काळांत त्यानीं लैंगिक बेतालपणाचे अगदीं विक्रम केले. प्रसिद्ध रशियन साहित्यिक रोमॅनोव्ह याची ' विदाउट फ्लॉवर्स ' ही गोष्ट या बेताल लैंगिक वर्तनाची निदर्शक आहे. या कथेंत एक तरुण एका ओळखीच्या मुलीला भेटतो. तो केवळ लैंगिक वासनेच्या समाधानासाठींच तिजकडे आलेला असतो. प्रेम अथवा प्रियाराधन वगैरे कशाचेंही प्रदर्शन तो करीत नाहीं. एखाद्या वेश्येशीं करावें तसें वर्तन तो तिच्याशीं करतो. ती मुलगी दुःखी होते, संतापते; तिला सौंदर्य, प्रियाराधन यांची भूक असते. पण तो तरुण तिजकडे शारीरिक भूक शमविण्याची वस्तु याच दृष्टीनें पाहतो. प्रेम व प्रियाराधन सब झूट आहे असें तो मानतो. या गोष्टी स्त्रियांच्या गुलामगिरीला कारण झाल्या असें त्या तरुणाचें मत असून नुसता स्वैर शरीरसंभोग हेंच खरें स्त्रीस्वातंत्र्य अशी त्या तरुणाची कल्पना आहे. रोमॅ-

नोव्हच्या या कथेंतील नायिका पुढें आपल्या मैत्रिणीस लिहिलेल्या पत्रांत म्हणते, 'आम्हा दोघांत आतां कोणालाच एकमेकाबद्दल प्रेम वाटत नाहीं. आमचा परस्परांशीं फक्त शारीरिक संबंध येतो. अशा शारीरिक संबंधाहून प्रेमांत अधिक कांहीं असतें असें मानणें हा मूर्खपणा होय अशीं येथल्या तरुणांचीं मतें आहेत.'

शहरी विद्यार्थ्यांतच ही मनोवृत्ति होती. खेड्यापाड्यांतील शेतकरी तरुणांत हा बेतालपणा पसरला नाहीं, असें मॉरिस हिंडस म्हणतो. या शहरी बेताल वर्तनाबद्दल लेनिननें धिक्कारच केला होता. स्त्रीपुरुषांनीं लैंगिक संबंधांत एकनिष्ठता न पाळणें म्हणजे चिखलानें भरलेल्या डबक्यांतून पाणी पिण्यासारखें आहे असें तो म्हणे. कम्युनिस्ट पक्षाचे इतर पुढारीही लैंगिक बाबतींतील बेताल वर्तनाचा निषेध करीत. पण हा निषेध प्रथम फारसा परिणामकारक ठरला नाहीं. सरकारचे कायदे व धोरण अनिर्बंध व्यक्ति-स्वातंत्र्यास अनुकूल होतें. त्यामुळें लैंगिक बाबतींत पुष्कळदां भयंकर गुंडगिरी माजे. एकदां लेनिनग्राडमध्यें विद्यार्थ्यांच्या एका जमावानें एका मुलीवर सामुदायिक बलात्कार केला. या मुलांवर खटला भरण्यांत आला व त्याला वृत्तपत्रांतून खूप प्रसिद्धी देण्यांत आली. यामुळें त्या मुलांची नाचक्की खूप झाली व नंतर सर्व प्रकारच्या गुंडगिरीचा नायनाट करण्या-साठीं सरकारनें निकराचे प्रयत्न केले.

पंचवार्षिक योजना सुरू झाल्या तेव्हांपासून प्रत्येक व्यक्तीच्या अंगच्या सद्गुणांचा विकास करून ते गुण सदर योजना पार पाडण्याचें कामीं उप-योजिण्याचें ठरलें. तेव्हांपासून वैयक्तिक जीवनांत शिस्त, नियमितपणा, एकनिष्ठा आणली पाहिजे याबद्दल प्रचार सुरू झाला. त्यानंतरही, कोणी व्यक्तिशः स्वैराचारी असेल, पण त्यामुळें सामाजिक जीवनांत घोटाळे माजत नसतील तर त्याच्या स्वातंत्र्यास कोणी आड येत नसे. पण एकंदरींत स्वैराचार हा निंद्य आहे असें लोकमत बनूं लागलें व त्याला आळा बसला. लैंगिक स्वैराचाराविरुद्ध समाजांतील माणसें स्वेच्छेनें प्रचार करूं लागलीं. पूर्वी जसें जसें स्वैराचार हें धार्मिक दृष्ट्या पाप मानलें जाई तसें आतां मानलें जात नसे. पण सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच लैंगिक नीतीचें

समर्थन होऊं लागलें. बायबलांतले आदेश व धर्मग्रंथांतल्या शिक्षा सांगून लैंगिक नीतीचें समर्थन केलें जात नसे, तर आर्थिक योजना पार पाडणें आणि समाज बलवान्, संघटित, सुखी होण्यासाठींच नीतिमत्तेची गरज आहे, असें आतां शिकविण्यांत येऊं लागलें. लेनिन सांगतो, "कोणत्याही अतिमानुष शक्तीकडून आदेशिलेलीं नीतितत्त्वें आम्ही मानीत नाहीं. त्यानें फक्त आत्मवंचना होते. नीतिमत्तेमुळें श्रमजीवि वर्गाची पिळणूक थांबवून मानव समाजाला संस्कृतिविकासाच्या वरच्या पायरीवर चढतां येतें, हा नीतिमत्तेचा भौतिक उपयोग आहे."

पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर जी ही नवी नीति अंमलांत येऊं लागली ती क्रांतीपूर्वीच्या नैतिक कल्पनांचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे असें दिसून येऊं लागलें. 'सुधारून वाढविलेली आवृत्ति' हे शब्द कुचेष्टेनें अथवा उपरोधिकपणें वापरण्याची पद्धत आहे, पण मी ते येथें खऱ्या अर्थानें वापरले आहेत. आंधळया, हटवादी, क्रूर अशा सनातनी नीतिमत्तेचा आचार आतां बुद्धिपुरःसर, त्याचा भौतिक व सांस्कृतिक सुपरिणाम असतो तो मिळविण्यासाठीं, क्रूरपणा काढून टाकून स्वेच्छेनें करण्यांत येऊं लागला. उदाहरणार्थ, व्यभिचार हा रशियन कायद्यांत गुन्हा नाहीं. तथापि अलीकडे व्यभिचारी वर्तन करण्याऱ्या स्त्री-पुरुषांस निंद्य मानतात. व्यभिचार हें पाप आहे असें कोणीच मानीत नाहीं. पण "एकनिष्ठ राहणें हेंच स्त्री-पुरुषांचें स्वतांसंबंधानें व सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीनें अवश्य असें कर्तव्य आहे" असें उत्तर मॉरिस हिंडसला एका तरुणीनें दिलें असें हिंडस सांगतो. धार्मिक निष्ठेचीं माणसें जितक्या कसोशीनें हे आचारधर्म पाळतात तितक्याच कसोशीनें हीं भौतिक दृष्टीचीं रशियन माणसें आतां जुने सदाचार पाळतात. 'कॉम्सोमॉल' नांवाची रशियन तरुणांची संघटना गांवोगांव आहे. तिच्या एका पुढाऱ्याला हिंडस विचारतो, 'एकादा तरुण अनेक तरुणींशीं समागम-संबंध ठेवूं लागला तर तुम्ही काय करतां?'

"आम्ही त्याला आमच्या संघटनेंतून हाकून लावूं." असें त्या पुढाऱ्यानें उत्तर दिलें.

हाच प्रश्न आणखी एका पुढाऱ्याला विचारला असतां तो म्हणाला, "अशा तरुणाला आम्ही प्रथम हाकून लावणार नाहीं. प्रथम त्याचा जाहीर सभेंत अथवा वर्तमानपत्रांत धिक्कार करूं व मग त्याची हाकलपट्टीही करूं."

हल्लीं हें सार्वजनिक रीत्या नाचक्की करण्याचें बंड फारच माजलें आहे. पूर्वीं सोव्हिअट अंमलांत वेश्याव्यवसाय चालेच. दारिद्र्य, बेकारी व अनिर्बंध जीवन याचा तो परिणाम होता. पण पंचवार्षिक योजनांचा अंमल सुरू झाल्यापासून वेश्यागमनाविरुद्ध फार मोठी मोहीम सुरू झाली. कीव्हमधील एका दैनिकांत वेश्येच्या घरीं सापडलेल्या एका माणसाचा फोटो छापून आला होता. त्याखालीं अतिशय निर्भत्सनापूर्ण मजकूर लिहिला गेला होता. वेश्याव्यवसाय व लैंगिक रोग यांना आळा घालण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यांत येतो. इंग्लंडांत व अमेरिकेंत परम्यासारखे रोग ज्या दवाखान्यांत उपचारिले जातात तेथें रोगाचा संसर्ग कोणापासून कसा झाला वगैरे 'कांहींही प्रश्न विचारले जात नाहींत' अशी पाटी तेथें लाविलेली असते. पण रशीयांत अशा दवाखान्यांत रोगी आला कीं संसर्ग कोणापासून झाला याचा छडा लावतात व मूळ संसर्ग पसरविणाऱ्या स्त्रीस अथवा पुरुषास पकडून आणून सक्तीनें उपचार करतात अशीं नांवें न सांगणाऱ्यावर सक्ती होते. वेश्यागृह चालविण्याच्या गुन्ह्यास मृत्यूची शिक्षा आहे. इतर कोणत्याही राष्ट्राच्या सैन्यापेक्षां रशियन सैन्यांत परम्यासारखे रोग अतिशय कमी असून सैन्यांच्या छावण्यांजवळ वेश्यागृहें चालविण्याविरुद्ध अतिशय कडक बंदोबस्त असतो.

पातिव्रत्याची जुनी कल्पना अत्यंत प्रखर होती. आतां सोव्हिअट अंमलांत ती तात्त्विक दृष्ट्या राहिलेली नाहीं. क्रांतिनंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत शहरामध्यें आचारांतहि बेतालपणा आला होता. पण पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून हें सर्व बदललें आहे. खेड्यांतील तरुणतरुणींत जुनी पातिव्रत्याची व एकपत्नीव्रताची कल्पना कायम आहे. लग्नापूर्वीं समागम केलेली मुलगी पत्नी म्हणून पत्करण्यास तरुण नाखूष असतात. यांत आतां पापपुण्याचा मुद्दा कोणी काढीत नाहीं; पण लग्नाआधीं समागम करणारी मुलगी ही उडाणटप्पू आणि वैवाहिक जबाबदारीस नालायक

मानली जाते. शेतकऱ्यांच्या मुलींना या संकटाचा आतां धाक बसलेला असल्यानें त्या आतां आपलें पावित्र्य अतिशय खबरदारीनें सांभाळतात. शहरांतील कारखान्यांतल्या मुलींतही ही दक्षता जवळजवळ इतक्या प्रमाणांत वाढत आहे. २७ जून १९३६ रोजीं गर्भपातास बंदी करणारा कायदा झाला तेव्हांपासून अवैवाहिक संबंधानें मूल झाल्यास आपल्याला पति मिळणें कठीण होईल या भीतीनें कारखान्यांतील मुलीही तरुणांशीं जपून वागूं लागल्या आहेत. हा कायदा पास झाल्यापासून पतिपत्नीसंबंध व मातृपद यांस महत्त्व प्राप्त झालें आहे. हिंडस लिहितो,—

"पंचवार्षिक योजना अंमलांत आल्यापासून सामाजिक अभिरुचि व कायदा यांच्या साहाय्यानें लैंगिक बाबतींतील उडाणटप्पूपणा व सैलटपणा यांस आळा घालण्यांत आला आहे. लैंगिक क्षेत्रांत विवाह व वैवाहिक जीवनाचे परिणाम या गोष्टी अंतर्भूत होतात. नव्या कायद्यानें गर्भ-प्रतिबंधास हीन लेखण्यांत आलें असून गर्भपातास पूर्ण प्रतिबंध करण्यांत आला आहे. वेश्याव्यवसायाचें पूर्ण उच्चाटन झालें आहे. यामुळें खेड्यापाड्यांतून जुन्या काळचें 'सनातनी' जीवन नव्या व अधिक उन्नत स्वरूपांत पुनरुज्जीवित झालें आहे."

अर्थात् रशियासारख्या अफाट देशांत इतकी उन्नतावस्था सर्वत्र आहे असें नाहीं. पण आज ना उद्यां मागासलेल्या समाजांना या नव्या उन्नतीच्या क्षेत्रांत आणलें जाईल. युवक-संघटनांच्या वृत्तपत्रांतून पुष्कळ लैंगिक संबंधविषयक पत्रव्यवहार प्रसिद्ध होतो. त्यावरून जनतेच्या भावना यासंबंधानें काय आहेत हें कळून येतें. हिंडसनें रणांगणावर गेलेल्या एका डॉक्टराच्या बायकोचें त्या डाक्टरला गेलेलें पत्र व त्या डॉक्टराच्या मित्रांनीं त्या बाईस लिहिलेलें उत्तर दिलें आहे. तीं दोन्ही खालीं देतों; म्हणजे नव्या रशियनांच्या नव्या 'सनातनी'पणाचें स्वरूप कळून येईल.

डॉ. व्हॅलेंटिन हा रणांगणावर गेला असून, त्याची पत्नी लिडा ही त्यास लिहितेः—

"प्रिय व्हॅलेंटिन, तुला धन्यवाद असोत.

हे प्रेमळ धन्यवाद तुला पोचविण्याची मला आज अगदीं घाई झाली आहे. फार दिवस मी तुला कांहीं लिहिलें नाहीं याबद्दल मी मनापासून क्षमा मागतें. हल्लींचें आमचें जीवन–विशेषतः माझें जीवन–कसें चाललें आहे, तें सांगण्यापासून या पत्रास मी सुरवात करणार आहें. पूर्वींची सर्व परिस्थिति बदलली आहे. युद्धामुळें जीवन बरेंच त्रासदायक झालें आहे. तरी पण आमच्या तरुण अंतःकरणांतून भावना नष्ट झाल्या नाहींत; विशेषंतः जिव्हाळ्याच्या नाजूक भावना–अथवा स्पष्टच बोलतें–लैंगिक वासना, आमच्या तारुण्यानें स्फुरणाऱ्या अंतःकरणांत धैर्य, उत्साह आणि नव्या नव्या गोष्टी पार पाडण्याचा हुरूप, हल्लींच्या विलक्षण कालमाहात्म्यामुळें आणि आम्हा रशियनांच्या विलक्षण स्वभावामुळें, ओसंडत आहे. सद्यःस्थितींत आमचें जीवित एक प्रकारें खेडवळ व अस्थिर झालें आहे. जीवन उध्वस्त होऊन हें नवें जीवन आलें आहे. तरी पण सभोंवारच्या या सृष्टिसौंदर्यानें आमच्या अंतःकरणांत आनंदाच्या ऊर्मी येत असतात. अशा परिस्थितींत दुसऱ्या पुरुषाच्या प्रेमपाशांत मी सांपडलें असलें तर तूं रागावूं नये अथवा माझी निर्भर्त्सना करूं नये असें मला वाटतें.

खरोखर हें जें कांहीं घडलें तें अचानक घडलें. असें घडावें ही माझी इच्छा मुळींच नव्हती. तें सर्व कसकसें घडत गेलें हें मला आठवतही नाहीं. पण तें सगळें घडलें खरें. मी बेफिकीरपणें माझ्याच हृदयाशीं प्रेमचेष्टा करीत होतें. तें खट्याळ असल्यानें त्यानें माझ्या बुद्धीची अवज्ञा सुरू केली. तुझ्याबद्दल माझें प्रेम अतिशय नाजूक व गाढ होतें; पण हळुहळू, दिवस गेले तसतसे हें प्रेम कमी होत गेलें. माझें तुजबद्दलचें प्रेम इतकें अस्थिर ठरलें हा माझा गुन्हा झाला असें तुला वाटेल काय ? कदाचित् मी गुन्हेगारच ठरेन. पण मी तरी काय करूं ? हल्लींचा हा माणूस माझ्यासमोर आल्यापासून माझ्या अंतःकरणांतील तुझ्या प्रतिमेची जागा त्यानें घेतली खरी. कृपा करून मजबद्दल कठोर होऊं नकोस. मला एवढीच आशा आहे कीं अशा प्रकारें मी तुजपासून दूर गेलें म्हणून तुला विशेष दुःख होणार नाहीं. 'आपण अविवाहित आहों' या गोड भावनेचा तजेला पुन्हा तुजवर येईल. तुझ्या जीवनाला भार न होतां तुझ्या अंतःकरणाला अनुरूप

अशी मैत्रीण तुला मिळेल अशी मला खात्री वाटते. तूं सुखी असावास हीच माझी इच्छा. भरपूर आरोग्य आणि मोठ्यांत मोठा विजय तुला मिळो. ”

वरील पत्रास डॉ. व्हॅलेंटिननें कांहींच उत्तर न पाठवितां आपल्या मित्रांस तें पत्र दिलें. त्या मित्रांनीं लिडाला या पत्राचें चांगलें खरमरीत उत्तर पाठविलें. तें खालीं देतों.

“ लिडा—

तुला हें पत्र लिहिणारे जे आम्ही त्या आम्ही तुला कधींच पाहिलेलें नाहीं. पण तुझा पूर्वीचा सहचर जो व्हॅलेंटिन तो आमच्या चांगला परिचयाचा आहे. तो व आम्ही आघाडीवर एकत्र असल्यामुळें आमची दोस्ती खूप झाली आहे. फुरसतीच्या वेळीं आम्हाला जुन्या आठवणी होतात आणि आमच्या मित्रांच्या संबंधानें आम्ही एकमेकांना गोष्टी सांगत असतों. व्हॅलेंटिन तुजसंबंधानें नेहमीं फार चांगलें बोले आणि एकदम मनःक्षोभ करणारें व थकवा आणणारें काम त्यानें संपविलें कीं तो म्हणे, ‘ शत्रूचा एकदां फडशा पाडला कीं मी माझ्या प्रियतमेकडे जाईन. ’ .

या युद्धानें आम्हांला जीवनाचें खरें मूल्य कळलें. आम्ही मनानें अधिक परिपक्व, अधिक स्वतंत्र वृत्तीचे आणि अधिक गंभीर झालों आहों. आम्ही एक मोठें सन्मान्य कृत्य करीत आहों. मानवजातीच्या भयंकर दुष्ट अशा शत्रूस मारीत आहों. फॅसिझमचा नायनाट करीत आहों. पिछाडीस आमचे बंधु, भगिनी, मित्र जे आहेत ते सर्वस्वत्यागपूर्वक आम्हाला बहुमोल साहाय्य करतात. त्यांच्या पत्रांनीं आम्हांला उल्हास वाटतो. देणग्यांचीं पार्सलें त्यांचेकडून येतात त्यांनीं आम्हांस अत्यानंद होतो. आमचें आमच्या नातलगांवर प्रेम आहे आणि त्यांना आमच्याबद्दल अभिमानही वाटतो हें आम्हांस माहीत आहे.

स्वार्थत्यागावांचून युद्ध अशक्यच आहे. आम्ही मेलों तरी आम्हांला आमचीं माणसें विसरणार नाहींत हें आम्हांला ठाऊक आहे. आम्हीं जखमी होऊन अथवा कायमचे अंध, पंगु होऊन घरीं गेलों तर आमचीं माणसें आम्हांवर उलटणार नाहींत. जो समरांगणांवर लढला त्याच्यावर उलटणारा आणि त्याचा त्याग करणारा माणूस विरळाच सांपडेल. पण आमचा प्रिय मित्र ‘ वल्मा ’ पुष्कळ दिवस वाट पहात असतां त्याला

अगदीं अलीकडे हें तुझें पत्र आलें. आम्हां मंडळींत हें तुझें पत्र अगदीं गाजलें आहे.

तुला आम्ही स्पष्टपणें सांगतों कीं सोव्हिअट माणुसकीला तुझें हें वर्तन शोभत नाहीं. क्षुद्र अहंकाराची भावना तुझ्या मनांत आहे असें या तुझ्या पत्रावरून दिसतें. ज्या वस्तु तुझ्या सावलींत वावरतात आणि तुझ्या सुखालाच कारणीभूत होतात त्यांचेबद्दलच तुला आस्था वाटते हें उघड आहे. ज्या स्त्रीचा पति रणांगणावर लढत आहे, आणि जिचें पतीवर प्रेम आहे ती तुझ्यासारखें वर्तन कधींच करणार नाहीं. आतांचा तुझा नवरा कसा आहे हें तुझ्या पत्रावरून कळलें असल्यानें त्याचेबद्दल सहानुभूति व आदर आम्हांला कधींच वाटणार नाहीं. रणांगणावर लढणाऱ्या एका सैनिकाचें कौटुंबिक जीवन उध्वस्त करून त्यानें सन्मान्य कृत्य केलें नाहीं. पण तुझ्यापेक्षा त्याचा अपराध कमी आहे. एकंदरींत तुझ्या नवऱ्याला गोड गोड पत्रें लिहून त्याला तूं फसवीत होतीस. थोड्याच दिवसापूर्वीं तूं त्याला एक तुझा फोटो पाठविलास व त्याच्याखालीं काव्य पंक्ति लिहिल्या होत्यास. खरोखरच हें तूं कां करीत होतीस ? ' आपण अविवाहित आहों या भावनेचा तजेला पुन्हा तुजवर येईल ' असें तूं लिहितेस. कोण धाष्टर्य हें ! अशा गोड कल्पनेच्या भराऱ्या आम्हाला ऐकवूं नको. आम्हांला आनन्द होतो तो यासाठीं कीं आमच्या मायभूमीत तुझ्यासारखीं माणसं फार थोडीं असून जीं आहेत त्यांचा आमचे लोक तिरस्कार करतात.

व्हॅलेंटिनच्या गैरहजेरींत तूं कांहीं मोठ्या सन्मान्यतेनें वागली असशील असा संभव दिसत नाहीं. लैंगिक वासनांनीं ओसंडून जाणारें तुझें मन दर उन्हाळयास नवा नवरा मागेल असें आम्हांला वाटतें. दीर्घकालाचा विचार करतां तुझी स्थिति पुढें काय होईल याचा आतां आम्हांला विचारही करावासा वाटत नाहीं. पण व्हॅलेंटिनवर तूं दुःखाचा डोंगर लोटलास; त्याचेबद्दल आम्ही अस्वस्थ आहों.

त्याच्या मनाला जखम झाली असेल ? खात्रीनें झाली असली पाहिजे. कारण युद्धांतील सर्व कसोटीच्या प्रसंगांना आमच्या स्त्रिया टक्कर देत असतां त्यांच्यांत राहून त्यांना कलंक लावणारी अशी तुझ्यासारखी

माणसें आमच्यांत आहेत हें पाहून मनास जखम होते. तुझ्यासारख्या स्त्रीशीं लग्न केल्याबद्दल व्हॅलेंटिनला खेद होत असावा. आपली बायको अशी निघाली याबद्दल तो आमचेसमोर शरमतो.

आमचें हें पत्र तुझ्या पत्रासारखें काव्यमय नाहीं. आधींच लिहिण्याला वेळ येथें थोडा आणि ' आना करेनिना ' कादंबरींतील वाक्यें घालून आमचें लेखन सौंदर्यमय करण्याचा प्रयत्नही आम्ही करीत नाहीं पण तुझें व्हॅलेंटिनशीं झालेलें वर्तन आणि तुझें तें साहित्यिकी थाटाचें पत्र पाहून आम्ही चकित झालों व आमचा मनःक्षोभ वाढला. आमच्या या पत्रानें तुझा अपमान होईल असें आम्हांला वाटत नाहीं. कारण तुझ्या अंतःकरणांत दुसऱ्याच भावना असल्यानें तूं लिहितेस. तथापि केव्हां तरी आपलें वर्तन अत्यंत उद्धटपणाचें व अधमपणाचें होतें हें तुझ्या लक्षांत येईल अशी आम्ही आशा करतों."

(सह्या) लष्करी डॉक्टर, तिसरी श्रेणी–फ्रिड
लष्करी डॉक्टर, तिसरी श्रेणी–येवटेव
लष्करी डॉक्टर, तिसरी श्रेणी–क्रिव्हॉशीन
लष्करी डॉक्टर, व्होजनाया "

वरील दोन्ही पत्रांवर मॉरिस हिंडसनें कांहींच लिहिलें नाहीं. मी हीं पत्रें वाचल्यापासून माझ्या मनांत अतिशय खळबळ माजली आहे. लिडाच्या पत्राबद्दल मला प्रथम थोडी सहानुभूति वाटली. या डॉक्टरांनीं तिला लिहिलेलें पत्र अतिशय निष्ठुर आणि जुन्या काळच्या क्रूर सनातनी वृत्तीसच साजणारें आहे असें मला प्रथम वाटलें. हळू हळू आतां मनांत विचार येतो आहे कीं, हा जुना, हट्टी, क्रूर, स्वार्थी, आंधळा सनातनीपणा नसून नव्या समाजव्यवस्थेंतले जबाबदारीचें हें जीवन आहे. सोव्हिअट रशियांतल्या जीवनासंबंधानें विचार करतांना व मतें बनवितांना एका अतिशय नव्या अनुभवांतून नवें जीवन तेथें बनत आहे, त्या अनुभवाला साजेसें रूप त्याला येत आहे हें लक्षांत घेणें अवश्य आहे. सध्या अविवेकी असे प्रशंसक व अविवेकी असें निंदक यांचाच सुळसुळाट चोहोंकडे फार आहे. मॉरिस हिंडसचें ' मदर रशिया ' हें पुस्तक अशांच्या डोळ्यांत अंजन घालील.

—वसंत दिवाळी अंक १९४५

# कळकाची पांच फूट लाठी

कळक म्हणजे बांबू. यालां ‘ वेळू ’ अशी शुद्ध मराठी संज्ञा आहे. उंसाला जशीं पेरीं असतात तशीं याला पेरीं असतात. ऊंस भरीव आणि रसयुक्त असतो. सागवानाचें लाकूड नीरस असतें; पण भरीव आणि मजबूत असतें. ऊंस रसाळ असल्यानें तो रस, गूळ व साखर हीं जीवनापयोगीं द्रव्यें देतो. सागवान नीरस असलें तरी इमारतीला तुळवटासाठीं व खांबासाठीं उपयोगी पडतें. कळक सागवानासारखा भरीव नसून पोकळ असतो व त्यांत उंसासारखा रस नसतो. म्हणून कळकाचें लाकूड इमारतीला खांबासाठीं अथवा तुळवटासाठीं उपयोगीं पडत नाहीं किंवा उंसाप्रमाणें कोणतेंहि जीवनोपयोगी असें द्रव्यहि देत नाहीं. मी असें ऐकतों कीं, कळकाचा रांधा करून त्याचा कागद करतात. कळकांत चिवट व लवचिक असा धागा असतो. यामुळें कळकाच्या पट्टया काढून त्याच्या चटया करतात. धुणीं वाळत घालण्याच्या दांड्या या कळकाच्या करतां येतात. देवदेवतांच्या पालखीसाठीं दोन तीन जागीं वांकलेला जो मोठा जाड दांडा असतो तो या कळकाचा असतो. कळक अगदीं कोंवळा व बारीक असतांना पालखीच्या दांड्याच्या आकाराचा पोकळ पत्रा करून त्यांतून तो ओवून घेतात व तशीच मग त्याची वाढ होऊं देण्यांत येते. यामुळें पालखीच्या दांड्याच्या आकाराचा मोठा वेळू तयार होतो. कळकाचे उपयोग अनेक आहेत. मेल्यानंतर गरीबांनाही सन्मानानें मिळणारी पालखी ही या कळकांचीच करतात. या कळकाचा सर्वांत महत्त्वाचा उपयोग लोकांचीं टाळकीं सडकण्यासाठीं होतो. मी कांहीं जंगल विषयांतला तज्ज्ञ नव्हे. अथवा कळकाच्या लागवडीचाहि अभ्यास मीं केलेला नाहीं. कळकाच्या झाडांचा समूह असतो त्याला ‘ कळकाचें बेट ’ म्हणतात. पण असें बेट उभ्या जन्मात अगदीं लहानपणीं फक्त एकच मीं पाहिलें आहे. मी कळकाचें ज्ञान देण्यासाठीं हा लेख लिहीत आहे असेंहि वाचकानीं समजू नये. नेहमीं नेहमीं लिहिणाऱ्या माणसाचें लिहिणें एकसाची होत जातें व मग ते

लोक वाचीत नाहींत. यासाठीं कांहीं तरी नावीन्य म्हणून, आजच्या गांधी टोपीच्या जगांत जसें एकाद्या विद्यार्थीकाँग्रेसच्या कार्यकर्त्यानें विष्णुशास्त्र्यांच्या वेळचें पागोटें घालून रस्त्यावर फिरावें त्याप्रमाणें मी हा लेख लिहिण्यास कळकाच्या लाठीचें 'शास्त्रीय विवेचन' करण्याची बैठक घेतली. आतां मला कळकासंबंधानें शास्त्रीय ज्ञान असें कांहींच नसल्यानें हें विवेचन येथेंच सोडून मी माझ्या मुख्य विषयाकडे वळतों.

* * *

पण ज्या मुख्य विषयासंबंधानें मी लिहिणार आहे तो या कळकाच्या लाठीभोंवतींच घोंघावतों आहे, म्हणून एखाद्या आराध्यदेवतेचें जसें आवाहन कार्यारंभीं करतात तसें हें लाठीचें आवाहन वर केलें आहे असेंहि वाचकांनीं वाटल्यास मानावें. माझ्या या विषयांत लाठीचा टाळकें सडकण्याचा जो गुण तो मला अभिप्रेत आहे. परवां सरदार पटेल म्हणाले ना कीं 'तरवारीला तरवार भिडवूं' म्हणून ? पण मी कांहीं शीख नाहीं. शिखांना तरवार बाळगण्याचें स्वातंत्र्य आहे. बाकीच्या हिंदी लोकांना फक्त बांगड्या भरून घेण्याचें स्वातंत्र्य आहे. माझें सरदार पटेल यांना मागणें आहे कीं, "तरवार राहूं द्या, पण मला लाठी तरी द्या, नुसत्या बांगड्या हातांत घालून लढणार कसे ?" मला टाळकी सडकण्यासाठीं लाठी पाहिजे आहे मुंबईचा दंगा शमविण्यासाठीं मला लाठी पाहिजे आहे. पण आमच्या नामदार मुरारजीभाईंना हें पटत नाहीं. मुरारजीभाईंची मला निंदा करायची नाहीं. महसूलमंत्री व गृहमंत्री या दोन्ही नात्यांनीं त्यांनीं काम करण्याची कसोशी फार केली. पण त्यांना जातीय दंगा थांबवितां आला नाहीं. याबाबत जनतेचीहि गुन्हेगारी फार मोठी आहे. लोक बेजबाबदार, भेकड, क्रूर व दुसऱ्याच्या शौर्यावर वढाया मारणारे आहेत. कोणतीही धोक्याची परिस्थिति दिसतांच पळून जाणारे आहेत. अशांचें रक्षण आज शिवाजी आणि प्रतापसिंह अवतरले तरी करूं शकणार नाहींत. लोकांचे हे दोष लक्षांत घेतले म्हणजे दंगा न शमल्याचा दोष मुरारजींकडे फारसा येत नाहीं. पोलिस खातें जुनें, त्याला चुचकारून करतां आलें तेवढें मुरारजींनीं केलें; आणि याहून अधिक होऊं शकलें नाहीं याचा दोष

मुरारजीभाईकडे नाहीं हें मी कबूल करतों. पण मग हेच पोलिस, हेच लोक असे हे सर्व असेच पुढेंहि असणार. आणि मग हे जातीय दंगे असेच सतत चालणार काय ? माझें म्हणणें असें कीं, मी लाठीनें दंगे थांबवूं शकेन असें मला वाटतें, पण मला कोणी गृहमंत्री करीत नाहीं आणि मुरारजी माझें म्हणणें ऐकून घेत नाहींत.

× × ×

मुरारजी म्हणतात, लोकांच्या हातांत लाठ्या दिल्या तर यादवी माजेल. आज लोकांच्या हातीं नुसत्या बांगड्या असल्यानें यादवीची भीति नाहीं हें खास. खरें म्हणजे आज सगळे लोक बांगड्याहि घालीत नाहींत. बांगड्याचाहि प्रसंगीं लढण्यासाठीं उपयोग होऊं शकेल. पण पुरुषांना बांगड्या भरण्याचें स्वातंत्र्य असलें तरी त्यांना लाज वाटते आणि म्हणून फांशी जाणारा माणूस जसा पूर्ण निःशस्त्र होऊन फासांत मान अडकवितो त्याप्रमाणें मुंबईतला प्रत्येक नागरिक लाठीपासून बांगडीपर्यंत हातांत कांहींहि न घेतां आज पूर्ण निःशस्त्र होऊन गुंडांच्या सुरींपुढें नम्र होत्साता आपलें जीवन कंठीत आहे. ही लाचारीची परिस्थिति कळकाची पांच फूट लाठी वापरण्याची मुभा असेल तर मी नाहींशी करून दाखवितों असें श्री. मुरारजीभाईंना मीं म्हटलें तर ते म्हणतात, " छे ! छे ! मग हिंदुमुसलमान एकमेकांची टाळकीं सडकतील आणि मुंबईस रक्ताच्या नद्या वाहातील." पण मुंबईच्या सद्यःस्थितीचें स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न मुरारजीभाईंनीं केला आहे काय ? आज येथें सर्व काँग्रेसवाले हिंदुसभामनोवृत्तीचे आणि सर्व मुसलमान मुस्लिम लीग मनोवृत्तीचे झाले आहेत. राष्ट्रीय हिंदु अथवा राष्ट्रीय मुसलमान कोणीच उरला नाहीं. दादरला एखाद्या हिंदूनें एकादा मुसलमान मारला तर येथल्या सर्व हिंदूंना आनंद होतो आणि मीहि त्या आनंदांत सहभागी असतों हें मीं कबूल केलें पाहिजे. भेंडीबाजारांत एकाद्या मुसलमानानें एकाद्या हिंदूवर सुरा चालविला कीं, तेथल्या सभ्य मुसलमानांनाहि अशाच गुदगुल्या होत असतील. " प्रत्यक्ष शस्त्रें नाहींत तरीहि एवढ्या तेढीला परस्पर समाजांच्या मनोवृत्ति गेल्या आहेत तर मग अशा

परस्परांवर दांतओठ खाणाऱ्या समाजाच्या हातीं लाठ्या जर दिल्या तर यादवी कितीशी लांब राहील ? " असें मुरारजीभाई विचारतात.

आणि माझें मुरारजीभाईंना यावर असें उत्तर आहे कीं, लोकांच्या हातीं लाठ्या नसल्यामुळें ही तेढ वाढत गेली आहे. आणखी एक वर्ष ही तेढ अशीच भडकत राहिल्यास मग मात्र लोकांना शस्त्रें मिळतांच यादवी भडकेल; इतकेंच नव्हे तर लोक यादवीसाठीं शस्त्रें जमवूनहि यादवी करतील. आज परिस्थिति तशी इताशेची नाहीं. आज लोकांना युक्तियुक्तीनें शस्त्रें दिलीं तर यादवी भडकण्याऐवजीं ती कायमची शमण्याचा संभव अधिक आहे. यादवी मध्यम वर्गाला हवी असली तरच होते व मध्यम वर्गाला नको असली तर मध्यम वर्ग यादवीला प्रतिबंध करतो. मध्यम वर्ग हा शब्द मी विशिष्ट अर्थानें वापरतों आहे. फारच फार श्रीमंतवर्ग नव्हेत अथवा निव्वळ गुंडागिरी, गुन्हेगारी यांवर जगणारा भुकड वर्ग नव्हे तर स्वतांच्या मेहनतीनें न्याय्य मार्गांनीं पोट भरणारा ऐपतदार व अनुदार वर्ग तो मध्यम वर्ग. मुंबईतले कारकून, कामगार, व्यापारी, दुकान-नोकर वगैरे लोक या वर्गात मोडतात. खेडोपाडीं शेतकरी लोक या वर्गांत मोडतील. राज्यक्रांति, यादवी अथवा आंतरराष्ट्रीय युद्ध अशा प्रसंगीं हाच वर्ग आपलें सर्वस्व धोक्यांत घालून रणांगणाच्या आघाडीवर लढत असतो. हा वर्ग समर्थ असेल तरच राष्ट्र समर्थ राहतें. जें सरकार या वर्गाला दुबळ राहूं देतें तें सरकार एकंदर समाजाला गुंडांच्या व गुन्हेगारांच्या अथवा परकी पिळणूक करणाऱ्यांच्या हवालीं करतें. हा मध्यम वर्ग ज्या देशांत दुबळा असतो, असंघटित असतो, हताश असतो, बेजबाबदार असतो त्या देशांतील अधिकारी अनीतिमान, क्रूर व स्वार्थलंपट असतात. अशा सरकारचे वरिष्ठ अधिकारी कितीहि समंजस असोत, खालच्या अधिकाऱ्यांच्या अनीतिमत्तेच्या गर्तेत तेहि हळूं हळूं गाडले जाऊं लागतात व तो समाज प्रथम नैतिक दृष्ट्या व मग भौतिक दृष्ट्या नाश पावतो. शहाण्या राज्यकर्त्यांनीं या मध्यम वर्गाची नीति, दानत, संघटना, आत्मविश्वास, आत्मरक्षणसामर्थ्य टिकविण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न सतत केला पाहिजे. या वर्गाला यादवी, क्रांति व युद्ध हवें असेल तर त्याला दुबळें करून

तें टाळण्यापेक्षां त्याला समर्थ ठेवूनच तें टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे अथवा तें होऊं देण्याचा धोका पत्करला पाहिजे. या मध्यम वर्गाच्या भावना आंतल्या आंत कुचंबूं देणें हें अत्यंत वाईट, समाज-विनाशक असतें. या वर्गाला दुर्बल केल्यास अथवा राहूं दिल्यास समाज गुन्हेगारांच्या हवालीं जातो आणि हे गुन्हेगार मग सरकारी अधिकाऱ्यांचेंहि साहाय्य मिळवितात, त्यांना आपल्या लगामीं लावतात व हे गुन्हेगार स्वतांच बेजबाबदार राज्यकर्ते होतात. अशा अवस्थेंत परकी सत्ता कायम राहते, इतकेंच नव्हे तर नसली तर येते. इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत यादवी, राज्यक्रांत्या व रक्तपात झाले त्यावेळीं ज्या मानानें मध्यम वर्ग बलवान राहिला त्या मानानेंच त्यांना यश आलें, ज्या मानानें मध्यम वर्ग दुर्बल राहिला त्या मानानें त्या त्या राष्ट्रांचा नैतिक व भौतिक नाश झाला. मला म्हणायचें आहे तें हें कीं, ब्रिटिश सरकारनें आमच्या मध्यम वर्गाला दुबळें केलें, दुबळें ठेवलें, पिळणूक करणाऱ्या परक्यांच्या, गुंडांच्या व गुन्हेगारांच्या हवालीं केलें. पण आमचें कॉंग्रेस सरकारहि यादवीच्या भयानें या मध्यम वर्गाला दुबळे व असंघटित ठेवून बेजबाबदार ठेवीत व बनवीत आहे. मुरारजीभाई प्रामाणिक आहेत, ते अहोरात्र निःस्वार्थानें मेहनत करतात. पण त्यांनीं मीं वर मांडला तो विचार कधीं समजून घेतला नाहीं, दंगा थांबविणें एवढेंच त्यांचें ध्येय आहे. लोकांजवळ शस्त्रेंच नसलीं म्हणजे ते लढणार नाहींत व गुंडांचा बंदोबस्त पोलिस करतील असें त्यांना वाटतें. लोकांना शस्त्रें दिलीं तर शांततेची जबाबदारी आपण पत्करणार नाहीं असा दम पोलिस मुरारजींना भरतात आणि मग पोलिसापुढें नांगी टाकून मुरारजी लोकांना शस्त्रें नाकारतात.

× × ×

याचा परिणाम आज मुंबईस जनतेवर काय झाला आहे हें मुरारजींच्या लक्षांत येत नाहीं. मुंबईस आज राज्य कोणाचें आहे ? मुरारजींचें ? मुळींच नाहीं. शेतकरीजीवनास उत्कृष्ट असे कायदे मुरारजीभाईंनीं केले त्याबद्दल त्यांना कृतज्ञतापूर्वक वंदन करून मी दंग्याबाबत सांगतों कीं, मुरारजीभाई आज मुंबईस पोलिसांचे गुलाम झाले आहेत आणि पोलिस खात्यासंबधानें

स्पष्ट सांगायचें तर—पण विशेषण अथवा क्रियाविशेषण योग्य कोणतें तें वाचकांना वापरण्यास सांगून मी वस्तुस्थितीचें वर्णन करतों. कारण या बिनतोड परिस्थितींत पोलिसचा तरी काय इलाज असें कोणीहि म्हणूं शकेल. परिस्थिति अशी आहे. जातीय दंगल कशी आणि कोणीहि सुरूं केली असो, दंगल सुरूं होतांच लोकांची लाठी–काठीहि काढून घेण्यांत आली. पण मवाली आणि गुंड हे मुंबईच्या जीवनांतले जे महत्त्वाचे घटक, त्यांचें शस्त्र, पोलिसचे बेचाळीस पितर खालीं उतरले तरी, कोणी काढून घेऊं शकणार नाहीं. या मवाल्यांत पोलिसांचे अनेक मित्र आहेत. कारण त्यांवांचून पोलिसला प्रसंगविशेषीं गुन्हेगार पकडण्यासाठीं जीं जाळीं पसरावीं लागतात तीं पसरतां येणारच नाहींत. यामुळें पोलिसला या गुंडाशीं अदबीनेंच वागावें लागतें. या जातीय तेढीच्या परिस्थितीनें या गुडांना एक नवेंच महत्त्व आलें आहे ते ' देशभक्त ' झाले आहेत. जातीय तेढीच्या वातावरणांत भयग्रस्त झालेला मध्यमवर्गीय माणूस विरुद्ध जमातीवर चिडला आहे, आणि स्वतः निशस्त्र व निर्बल असल्यामुळें कोणीहि विरुद्ध जमातींतल्या एखाद्या क्षुद्र माणसाचाहि जीव घेतला कीं, आनंदानें चाकोलेट चघळतो आहे. पूर्वीच्या दिवसांत सुरेवाजीवर जगणारा म्हणून लोकांत अप्रिय असणारा मवाली आतां विरुद्ध जमातींतल्या एखाद्या माणसावर सुरा चालवून आपल्या जमातींत लोकप्रिय होतो. आतां त्याच्या जातीचा समाज त्यास समाजशत्रु न मानतां समाजरक्षक मानतो. आणि या ' रक्षणकार्या ' साठीं हा जातिभक्त मवाली आतां आपल्या जमातीकडून पैसे उकळतो आहे. हिंदु गुंड आतां मुसलमानाचें लालबाग अथवा गिरगांव येथील दुकान राजरोसपणें लुटूं शकतो. उलट भेंडीबाजार, महंमदअली रोड व नळबाजार येथें हिंदूचा खून अथवा हिंदूंच्या मालमत्तेची लूटालूट राजरोसपणें मुसलमान मवाली करीत आहे. यांत आतां पाकिस्तानवादी कोण आणि हिंदुस्तानवादी कोण ? कोणीहि कांहींहि नाहीं. जो खुनी व लुटारू गुंड—मग तो हिंदु असो अथवा मुसलमान असो—आजवर समाजशत्रु म्हणूनच सर्वत्र लेखला जात होता, म्हणून ज्याला आपलें जिणें नेहमीं अवघडपणें व समाजभीतीनें घालवावें लागत होतें तो आज देशभक्त, पुढारी झाला

आहे. त्या त्या समाजाकडून त्याच्या गुन्हेगारीवर पांघरूण पडलें आहे. पोलिस लोकमताविरुद्ध त्याला पकडूं शकत नाहीं. आणि एकंदरीनें मुंबईच्या जीवनावर गुन्हेगारांची सत्ता वाढली आहे. येथें मुरारजींचें राज्य नाहीं.

वाचक म्हणतील, संपादकीय आरामखुर्चीवर बसून हें मी नुसतें तर्कांचें चऱ्हाट वळतों आहे. कृपा करून असें समजूं नका. हा विषय इतका जिव्हाळ्याचा आहे कीं, एखादा ढोंगी माणूसहि यासंबंधानें कांहीं बोलला तरी तें समजून घ्या. सत्य हें असें जोरदार असतें कीं, जिव्हाळ्यानें चर्चा करून कृतीचा मार्ग शोधल्यास तें खास हातीं येतें. पण असें संशोधन केलें पाहिजे. मुरारजी अहोरात्र खपतात. शब्दशः शेंकडों गोरगरिबांनाहि स्वतः भेट देऊन त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करतात. ते तापटपणा दाखवितात; पण यामुळ झटाझट कामें उरकतात; माझ्या माहितीचीं कित्येक माणसें माझ्या सल्ल्यावरून मुरारजींकडे गेलीं व आपले पकडले गेलेले निरपराधी नातेवाईक त्यांनीं सोडवून आणले. अशी धरपकड टाळणेंहि हें मुरारजीभाईंच्या शक्तीबाहेरचें आहे. लोकमतास मुरारजी हे मुनशींच्यापेक्षां अधिक मान देतात व ते हिंदुमुसलमानांत निःपक्षपातीपणा ठेवतात ही गोष्ट प्रसंगविशेषीं हा निःपक्षपात सदोष ठरत असून सुद्धां—एकंदरीनें चांगली आहे. मुरारजी तापट व ताठर दिसतात, पण ते लोकशाहीप्रेमी आहेत हें मी अनेक अनुभवांवरून बारीकपणें पाहून पारखलें आहे. मी दूषित पूर्वग्रहामुळें लिहीत नाहीं. माझी तक्रार आहे ती ही कीं, मुंबईच्या आजच्या परिस्थितीचें मूलग्राही स्वरूप ते पहात नाहींत आणि वरिष्ठ कॉंग्रेस पुढारीहि इकडे लक्ष देत नाहींत. मला असें म्हणायचें आहे कीं, आज जातीय वादाची तेढ पेटली आहे ही बाब महत्त्वाची नाहीं. नेहमीं कांहीं ना कांहीं तेढी समाजांत राहणारच. पण जातीय तेढीच्या नांवाखालीं मध्यमवर्गीय समाज गुंडांचा व मवाल्यांचा गुलाम झाला असून हा गुंड व मवाली ही जातीय तेढ त्यांचा धंदा मान्यतेनें चालण्यासाठीं, टिकवूं पाहतो आहे आणि ज्यांना आपलें पुढारीपण टिकविण्यासाठीं समाजाला आग लागली तरी फिकीर वाटत नाहीं असे बडे पुढारी—म्हणजे खरोखर अखिल भारतीय मवाली अथवा गुंड जातीय तेढ कायम टिकवून सामान्य गुंडाला व मवाल्याला आपला धंदा

लोकमान्यतेनें चालविण्याला अवश्य तें वातावरण कायम ठेवीत आहेत. आणि-सरळ कबुली देतों कीं, आम्ही पत्रकार दोन्ही टोंकांच्या या मवाल्यांचीं कर्तृत्वें जाड ठशांत छापून आग अधिकच भडकवीत आहों.

या सर्वांवर मुरारजीभाई व कॉंग्रेस पुढारी हे इलाज करूं शकतील. पण त्यांनीं परिस्थिति सूक्ष्मपणें पारखली पाहिजे. येथें नागरिक हक्काचे व नागरिक जीवनाचे कांहीं महत्त्वाचे मुद्दे विचारणीय आहेत. जातिय तेढीचें वातावरण कितीहि व कसेंही असो, ऐपतदार व अब्रूदार समाजाला त्या वातावरणाची जी विल्हेवाट लावायची असेल ती लावण्याचें स्वातंत्र्य सर्व वेळीं हवें आहे. मुंबईतील हिंदु कामगार व मुसलमान कामगार यांना विरुद्ध बाजूचा एकादा खून झाल्यानें गुदगुल्या होत असल्या तरी सरळ रणांगणांत उभे राहून जमावानें सतत लढत रहावें, हजारो लोकांनीं रोजगारीवांचून तडफडत उपासानें व मारामारीनें मरावें हें निदान अजून पसंत नाहीं. गुजराती वाणी व गुजराती बोहरी यांना रणांगणांत उतरून सडकोसडकीं मारा माऱ्या व विध्वंस करावा अशी अजून तरी इच्छा नाहीं. पण तेढीचें वातावरण आहे त्याला हे वर्ग भितात, स्वतःजवळ रक्षणाचें साधन नाहीं म्हणून अस्वस्थ होतात आणि मग मवाल्यांनीं तरी आपलें रक्षण करावें म्हणून प्रथम खुषीनें आणि नंतर मवाल्याच्या भीतीनें मवाल्याला पैसे देतात. त्याला पोलिसापासून रक्षण देतात. ही परिस्थिति उभय जमातींतील इभ्रतदार व अब्रूदार समाजाला असह्य झाली आहे, पण अखिल भारतीय 'गुंडा'नीं चालविलेला जातीय द्वेषप्रचार, हलकट व स्थानिक मवाल्यांनीं चालविलेली खुनाखुनी आणि सरकारनें ऐपतदार व इभ्रतदार समाजाचें केलेलें निशस्त्रीकरण यामुळें हा मध्यम वर्ग नाइलाज, हताश, भेकड आणि मुरारजीभाईवर बेजबाबदार टीका करणारा झाला आहे.

× × ×

मुरारजीभाईना व कॉंग्रेस पुढाऱ्यांना माझें विनयपूर्वक सांगणें आहे कीं, आत्मरक्षणाचें अगदीं साधें व सोपें शस्त्र अशी जी पांच फुटांची लाठी ती वापरण्याची परवानगी सरसकट सर्वांना द्या आणि केवढीहि आणिबाणीची परिस्थिति निर्माण झाली तरी लाठी काढून घेतली जाणार

नाहीं असें जाहीर करा. जागोजाग यामुळें प्रथम थोडी यादवी माजेलहि; त्यासाठीं मुंबईंत जेथें संमिश्र समाज आहेत अशा समाजांना एकत्र बोलावून हल्लीं गुंडराज्य कसें माजलें आहे हें त्यांना समजून सांगून, 'आम्ही तुम्हांस लाठ्या वापरूं देणार आहों, यादवी न करतां गुंडांपासून आत्मरक्षण करणें हें तुमचें कर्तव्य आहे' इत्यादि विचार त्यांस समजून सांगा. पुढारी कितीहि ओरडोत, उभय समाजांतील माणसांचे रोजचे व्यवहार एकमेकांत इतके गुंतले आहेत कीं, त्यांना सलोख्यानें राहणें योग्य असल्याचें पटवितां येईल. असा थोडा प्राथमिक प्रयत्न केल्यावर सरकारनें त्या विभागांत लाठीचा सरास परवाना द्यावा. प्रथम थोडी यादवी होईलहि. पोलिसनें फारसें पुढें न जातां थोडा वेळ यादवी वाढण्याचा धोका पत्करावा, पुन्हां पुढाऱ्यांना एकत्र आणावें म्हणजे आपोआप यादवी थांबविण्याचा प्रयत्न उभयपक्षीं नेटानें सुरू होईल. थोडी प्रत्यक्ष यादवी झाली म्हणजे आपल्या मूर्खपणाचा पडताळा या समाजास जो येईल त्यांतून मिळणारी अक्कल हें पुढील शांततेचें भांडवल ठरणार आहे.

× × ×

पण गुंडांची व्यवस्था काय करायची ? या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचें येथें उत्तर देतों. एकदां आपणांस हवी तर यादवी आपण करूं शकतों अशी समाजास खात्री असली आणि यादवी गैर आहे याचा चांगला प्रत्यय समाजास आला म्हणजे यादवीचें वातावरण कायम ठेवण्यासाठीं खुनाखुनी करणारा जो गुंड त्याचें पारिपत्य करण्याचा उपाय हा समाज शोधूं लागतो. लाठी हा त्याचा उपाय आहे. खून होतो कसा हें येथें सांगतों. आपण सुरा मारला तरी आपणांस पाहणारीं माणसें निःशस्त्र अथवा आपल्या जमातींचीं असल्यानें आपण निसटून जाऊं शकूं हें गुंडाला माहीत असतें. पाठीमागून दुसऱ्याच्या पोटांत खुपसलेली सुरी थोडीशी फिरवून, कोथळा बाहेर काढून गुंड सुरी काढून घेतो. यानंतर शेजारच्या आपल्या जमातीच्या चहाच्या दुकानाच्या फळीवर चढण्यास त्याला जीं दोन मिनिटें लागतात तेवढ्यानें त्याची सुटका होते. मग सभ्य तिऱ्हाइताप्रमाणें तो झाल्या प्रकाराबद्दल गंभीर चर्चा करूं लागतो. जर समाजाला गुंडगिरी नको असेल तर

त्या वेळीं गल्लींत हजर असणारा कोणीहि धीट माणूस हातांतील लाठीनें त्या गुंडाचें मनगट फोडूं शकेल. तेवढ्यामुळें तो गुंड अडून पडून पकडला जाईल. त्याला निसटून जाण्यास जीं दोन मिनिटें आज मिळतात त्याचें मूलभूत कारण निःशस्त्र माणूस सुरा हातीं असणाऱ्यावर धांवून जाण्यास धजत नाहीं हें होय. पण पांच फुटांची लांब मजबूत काठी असल्यास दुरून घाव मारतां येतो. मुंबईत अशी एकहि गल्ली नाहीं कीं जेथें एका वेळीं निदान पांच दहा माणसें जवळपास नाहींत. दोन माणसें लाठ्या घेऊन सोबतीनें चालली तरी सुरेबाजापासून ती आपलें रक्षण करूं शकतील. पांच फुटांची लाठी हें गुप्त शस्त्र नव्हे, त्यानें प्राणहत्या सहसा होत नाहीं. फक्त आत्मरक्षण करतां येतें. मुख्यतः सुरेबाजाला पळून जाण्यास जीं दोन मिनिटें लागतात व मिळतात तीच ही सुरेबाजी चालू राहण्याचें खरें कारण आहे, हें लक्षांत घेतल्यास ही सुरेबाजाचीं दोन मिनिटें हिरावून घेण्याचें साधन पांच फुटांची लाठी हेंच आहे हें कोणीहि कबूल करील. लाठीचा टाळकें सडकण्याचा गुण मला अभिप्रेत आहे असें जें मी लेखाच्या आरंभीं म्हटलें त्याचा अर्थ आतां वाचकांच्या लक्षांत येईल.

* * *

लोकांना लाठ्या दिल्या कीं, यादवी माजेल ही जी भीति मुरारजीभाईंना वाटते त्याहून मला वाटणारी भीति फार वेगळी आहे माझी भीति निवारण्यासाठीं यादवीचा धोका पत्करला पाहिजे. लोक भेकड, बेफिकीर, नादान आहेत व म्हणून लाठी वापरण्याची परवानगी दिली तरी ते वापरणार नाहींत, सुरेबाज सुरा चालवितांना दिसला तरी त्यास प्रतिकार न करतां पळून जातील किंवा कौतुक करीत तेथें उभे राहतील अशी मला भीति वाटते. सरकारनें होमगार्ड्स्‌ची योजना आंखली व त्यांना शस्त्रें देऊं केलीं तरी होमगार्ड्स्‌ होण्यास माणसें पुढें येत नाहींत अशी सरकारची तक्रार आहे. मुरारजी म्हणतील, अशा नादान लोकांना शस्त्रें देऊन उपयोग काय ? माझें उत्तर असें कीं, यादवीच्या भीतीनें लाठी हिरावून घेण्याचें धोरण सोडून द्या आणि लोकांच्या ठिकाणची नादानी काढून टाकण्यासाठीं

त्यांना लाठीसारखें बिनउपद्रवी, उघड व बचावाचें अस्त्र तरी द्या. लोक भांडतील म्हणून त्यांना दुबळें ठेवण्यापेक्षां त्यांना समर्थ आणि शूर होण्यासाठीं हत्यार द्या. आपण लढावें कीं लढूं नये याचा स्वयंनिर्णय लोकांना द्या. म्हणजे लढण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत येईल आणि मग लढणें हा मूर्खपणा आहे हें पटेल. म्हणजे मग मवाल्यांना झोडपून काढून लोक समाजांत स्वस्थता निर्माण करतील. लोक दुबळे व निशस्त्र आहेत तोंवर कोणीहि चटकन भीतीचें वातावरण निर्मूं शकतो. मवाल्याला त्यामुळें लोकमान्यता येते व आपल्या 'पराक्रमां' नीं तो तें वातावरण टिकवून आपल्या धंद्याचा बस बसवितो. त्यामुळें समाज अधिकाधिक भेकड होतो आणि मग अशा समाजाचें रक्षण करण्यास ब्रिटिश सैन्य येथें कायम रहातें. मुरारजीभाई आणि कॉंग्रेस पुढारी यांनीं आतां हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लोकांची यादवी थांबल्याखेरीज ब्रिटिश सैन्य येथून जाणार नाहीं हा जो त्यांचा नवा सिद्धांत आहे तो त्यांनीं सोडून द्यावा, लोकांना लाठी व वाढत्या क्रमानें अधिकाधिक चांगलीं शस्त्रें द्यावीं, शस्त्रें वापरण्याची हौस मतप्रचारानें वाढवावी, लोकांना शौर्याच्या कला शिकवाव्या, तेढी वाढल्या तर यादवीचा धोका पत्करावा; पण लोकांचीं किमान सामर्थ्याचीं व आत्मरक्षणाचीं जीं हत्यारें आहेत तीं हिरावून न घेतां त्यांच्या वापरानेंच लोकांना आत्मरक्षण करून शांतता निर्माण करण्याचा मार्ग दाखवावा. अखेर लोकांना सुविचार सुचेल व ते समर्थ राहूनहि शांत रहातील. आजच्या निःशस्त्र, दुर्बल समाजांत शांतता राहणार नाहीं, ब्रिटिश सैन्य येथून जाणार नाहीं आणि अशा परिस्थितींत परचक्र आलें तर आणखी एकदां कोठल्या तरी क्लाइव्ह-हेस्टिंग्ज यांची परंपरा सुरू होईल. मी पांच फूट कळकाच्या लाठीचें हें जें तत्त्वज्ञान आणि व्यवहारज्ञान सांगितलें आहे त्यांतच जातीय दंगल थांबविण्याचें, ब्रिटिश सैन्य घालविण्याचें आणि परचक्रास तोंड देण्याचें सुप्त सामर्थ्य आहे असें मला वाटतें.

—चित्रमय जगत् स्वातंत्र्य अंक १९४७

6-3 6.6.6

REFBK-0006837